नवभारत ग्रंथमाला

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

हरिहर वामन देशपांडे

नवभारत ग्रंथमाला

१२

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

नवभारत ग्रंथमाला

लवकरच प्रसिद्ध होणारीं पुस्तकें

वनस्पतिजीवन

प्रो. श्रीपाद लक्ष्मण अजरेकर

वनस्पतिशास्त्राचे तज्ज्ञ व संशोधक या नात्यानें प्रो. अजरेकरांचें नांव विख्यात आहे. त्यांच्या या पुस्तकांत सखोलपणा व शास्त्रशुद्धता तर आहेच, परंतु त्याचा विशेष हा की तें कादंबरीप्रमाणें रसाळ झालें आहे. गहन शास्त्रीय विषयांवर सामान्य वाचकांकरितां पुस्तकें कशीं लिहावीं याचा हा एक नमुना आहे, असें कोणासही वाटेल. आपल्या प्राणिकोटीचे मूलबान्धव जे वनस्पति त्यांच्या जीवनाची रम्य कहाणी सोप्या भाषेंत या पुस्तकांत सांगितली आहे.

आधुनिक जर्मनी

डॉ. दामोदर गणेश लोंढे

पूर्ण माहितगार, व्यापक दृष्टीच्या व विचक्षण लेखकांकडून आधुनिक राष्ट्रांच्या सर्वांगीण जीवनाचें उद्‌घाटन करणारे ग्रंथ लिहवून घेण्याविषयीं नवभारत ग्रंथमालेने चिकाटीचे प्रयत्न चालविले आहेत. जर्मनीसारख्या सर्व जगाचा कुतूहलविषय होऊन राहिलेल्या दुर्दम राष्ट्रावर लिहिलेला हा ग्रंथ हें त्या प्रयत्नांचें पहिलें फळ होय. डॉ. लोंढे हे तत्त्वज्ञानांत पारंगत असून सामाजिक तत्त्वविवेचनांत त्यांचा हातखंडा आहे. ते जर्मनींत अगदी अलीकडे दोन तीन वर्षें राहिलेले आहेत. त्यांचा हा अनुभवसिद्ध ग्रंथ सर्व महाराष्ट्रीय वाचकांस अमूल्य वाटेल, यांत शंका नाही.

भगवान बुद्ध

प्रो. चिंतामण विनायक जोशी

बौद्धधर्म व पाली वाङ्मय यांजवरचा प्रो. चिंतामणराव जोशी यांचा अधिकार सर्वश्रुत आहे. बौद्धधर्म, संस्कृति व वाङ्मय यांवर सुमारें चार पांच ग्रंथांचा आराखडा नवभारत ग्रंथमालेने आखलेला आहे; त्यांतील हा पहिला ग्रंथ होय. प्रो. जोशी यांचें या विषयावरील प्रभुत्व जितकें गाढ आहे तितकीच त्यांची लेखनशैली मनोरम आहे, हें मराठी वाचकांस तरी सांगावयास नको आहे.

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

लेखक
हरिहर वामन देशपांडे, वैद्य
वाङ्मयविशारद

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड,
नागपूर व पुणें.

शके १८५९] किंमत दीड रुपया [सन १९३८

मुद्रक व प्रकाशकः–**पांडुरंग नारायण बनहट्टी**, बी. एस्सी.,
व्यवस्थापक, **नारायण मुद्रणालय**, धनतोली, नागपूर,
आणि
डायरेक्टर, **सुविचार प्रकाशन मंडळ, लि०**
धनतोली, नागपूर.
(शाखा, ६८९ बुधवार, पुणें.)

प्रास्ताविक निवेदन

नवभारत ग्रंथमालेच्या चालकांच्या कृपेनेच 'राजपूत संस्कृति' या ग्रंथाच्या पाठोपाठ प्रस्तुत ग्रंथाच्याही प्रकाशनाचा योग येत आहे. या दोन्ही ग्रंथांच्या लेखनासाठी 'राजपूत संस्कृती'च्या प्रास्ताविक निवेदनांत म्हटल्याप्रमाणें गु. डॉ. शिवाजीराव पटवर्धन व मध्यप्रांत सरकारच्या स्वास्थ्यविभागाचे विद्यमान मंत्री ना. पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचें प्रोत्साहनच कारणीभूत झालें आहे. ह्या दोन्ही ग्रंथांचा उर्वरित भाग प्रो. श्री. ना. बनहट्टी यांच्या प्रेमळ टोंचणीमुळेच पूर्ण होऊं शकला.

प्रस्तुत ग्रंथांत राजस्थानांतील राजपूत राज्यांच्या उदयाचा व ऱ्हासाचा फारच त्रोटक व धावता वृत्तांत स्थलाभावास्तव द्यावा लागला. परंतु समकक्षीय भारतीय इतिहासाशीं त्याचा संबंध शक्य तोंवर विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भारतवर्षाच्या इतिहासांत राजपुतांच्या इतिहासाचें स्थान निश्चित करण्यास मदत होईल अशी आशा आहे.

'ऱ्हासाची मीमांसा' हें प्रकरण या ग्रंथाच्या शेवटीं जोडलें आहे. अशा तऱ्हेचें प्रकरण कां लिहिलें नाही अशी पृच्छा 'राजपूत संस्कृती'वर अभिप्राय देतांना कांही वृत्तपत्रांनी केली होती. त्यांचें यामुळे समाधान होईल अशी आशा आहे. राजपुतांचें निमित्त करून हिंदु जातीच्याच समग्र ऱ्हासाची एका निराळ्या दृष्टीने मीमांसा करण्याचा यांत प्रयत्न केला आहे. ह्या दृष्टिकोणाचें वाचकांकडून सहृदयतेने स्वागत होईल अशी आशा आहे.

ह्या ग्रंथाची सूची तयार करण्याचे कामीं आमच्या भारत आयुर्वेद महाविद्यालयांतील श्री. दा. ज्ञा. कराडे, काव्यतीर्थ, श्री. वा. प्र. मोहगांवकर इ० प्रबुद्ध विद्यार्थ्यांचें जें साहाय्य झालें त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

हरिहर वामन देशपांडे

अनुक्रमणिका

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

विभाग पहिला

मे वा ड

प्रकरण पहिलें

१. राजपूत इतिहासाचें महत्त्व

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मन:।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवा: ॥

हिंदुस्थानच्या इतिहासाचें अध्ययन करणाऱ्या कोणाही मनुष्यास राजपूत राष्ट्रांच्या उदयास्ताचा अभ्यास केल्याशिवाय आपलें अध्ययन समाप्त करतां येणार नाही. मुसलमानी सत्तेचें महंमद बिन कासिमच्या वेळेस प्रथम आक्रमण झाल्यापासून महाराष्ट्रांत श्री शिवछत्रपतींचा उदय होऊन मराठी राज्याची प्रस्थापना होईपर्यन्त सतत आठनऊशें वर्षेपर्यंत जी जाति परकी आक्रमणाशीं टकरा देत राहिली व हिंदु धर्म व हिंदु संस्कृति यांना आश्रयस्थान बनली त्या जातीचा व तिने बनविलेल्या राष्ट्रांचा इतिहास वाचण्याचा कोणास अभिमान वाटणार नाही? वर्षानुवर्षें व शतकानुशतकें राजपुतांनी भरतवर्षांत आत्माभिमानाची ज्योत तेवत ठेवण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नांत कित्येक प्रसंगीं त्यांना यश मिळालें तर कित्येक प्रसंगीं अपयश! त्यांच्या यशांत भव्यपणा होता तसा अपयशांतही! सामान्य वाचकांस त्यांच्या अपयशाचा इतिहास मात्र माहीत असतो. त्यांनी राणा प्रतापाचें नांव कट्टर स्वातंत्र्याभिमानी म्हणून ऐकलेलें असतें व अकबरासारख्या महान् सम्राटाशीं सामना देतांना त्याने प्रकट केलेल्या अद्वितीय गुणांची त्यास अल्पशी ओळख असते. त्यानंतर तो मिर्झा राजा जयसिंह, जसवंतसिंह, सवाई जयसिंह, अमरसिंह, कर्णसिंह, अजितसिंह, इत्यादि राजपूत राजांचीं नांवें वाचतो. परंतु हे सर्व लोक आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य परकीयांच्या चरणीं अर्पण करून निर्लज्जपणें स्वाभिमानशून्यतेचें जीवन कंठीत आहेत असा भास होतो. त्याबरोबरच आपल्या मुली यवन बादशहांना अर्पण करणाऱ्या राजपूत राजांचीं व सरदारांचीं नांवें डोळ्यासमोर येतात व एकंदर राजपूत जातीविषयीं तिरस्कार

उत्पन्न होऊं लागतो. विकृत इतिहासज्ञानाने अथवा इतिहासाच्या एकांगी अध्ययनाने असें होणें स्वाभाविक आहे. सामान्य वाचकांस राजपूत राजांनी मुसलमान राजांना—नव्हे खुद्द दिल्लीपतींना सुद्धा—अनेकवार परास्त केलें होतें व नुसतें परास्तच केलें नव्हतें, तर पकडून कैद करून चितोडगडच्या किल्ल्यांत सहासहा महिने डांबून ठेवलें होतें, हें माहीत असतें काय ? भारतीय साम्राज्याची राजधानी म्हणून दिल्लीचा मान नष्ट करून त्यांनी तो चितोडास प्राप्त करून दिला होता. त्यांच्याजवळ दोन दोन लाख खडी फौज सदैव तयार असे. चक्रवर्तिसदृश वैभव त्यांनी कमाविलें होतें आणि जगाच्या इतिहासांत अपूर्व असें विद्या, कला, कौशल्य इत्यादिकांना प्रोत्साहन दिलें होतें, या गोष्टी सामान्य वाचकांच्या बुद्धीस अवगत नसतात. बाप्पा रावळ, महाराणा खुम्मान, महाराणा भीमसिंह, महाराणा हम्मीर, भीष्मप्रतिज्ञ चंद्रसिंह उर्फ चुंडा, महाराणा कुम्भ, भूषणभूत महाराणा संग्रामसिंह इ. थोर, पराक्रमी, वैभवशाली व भरतवर्षास भूषणभूत होणाऱ्या राजपूत राजांचीं नांवें किती लोकांस माहीत असतात ? त्यांनी चौफेर मुसलमानी आक्रमण दाबून टाकून पुनः शंभर शंभर वर्षें तोंड वर काढणार नाही असा शत्रूंस चोप दिला व आपल्या प्रजेस दीर्घकालीन सुखाचा, शांतीचा, वैभवाचा व समृद्धीचा लाभ करून दिला, इत्यादि रम्य व हृद्य कथांशीं किती लोक परिचित असतात ? सातव्या शतकांत खलीफा हज्जाजच्या कारकीर्दींत महंमद बिन कासिमने दाहिर राजाचा पराभव करून सिंधविजय केला. परंतु त्याची पाठ वळली नाही तोंच सिंध प्रांतांतील त्याच्या गव्हर्नरांना मारठोक करून हाकून लावणारा व त्यांपैकी एकाच्या मुलीशीं स्वतः लग्न लावणारा राजपूत वीर बाप्पा रावळ निर्माण झाला. बाप्पा याने केवळ सिंध प्रांतांतील मुसलमानांनाच हाकून लावलें होतें असें नव्हे, तर पंजाब, वायव्य सरहद्द, अफगाणिस्तान, बलुचिस्तान व कंदाहारपर्यंत स्वाऱ्या करून ठिकठिकाणीं दिग्विजय मिळविला होता. वास्तविक आजच्या राजपूत राष्ट्रांचा उदयारंभ बाप्पा रावळपासूनच होतो. बाप्पा हा भारतीय इतिहासांतला अतिमहान पुरुष असून कुलगुरु चिं. वि. वैद्य यांनी आपल्या मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत त्याची तुलना शिवाजी-

बरोबर केली आहे. यावरून त्याची योग्यता प्रकट होते. तेव्हापासून म्हणजे आठव्या शतकापासून तो तहत बाबराची स्वारी होईपर्यंत म्हणजे महाराणा संग्रामसिंहापर्यंत एकाहून एक उज्ज्वल, पराक्रमशाली व यशोनिधान राजांची मालिका बाप्पाच्या वंशांत उत्पन्न झाली व त्यांनी राजस्थानला अभूतपूर्व शांति व समृद्धीचा लाभ करून दिला. राणा संग्रामचा जरी पराजय झाला असला तरी राजपूत राष्ट्रांस त्याने जें वैभव, जो दरारा, जो मान व जी प्रतिष्ठा भारतीय राष्ट्रांत प्राप्त करून दिली होती त्या योगें त्याची फक्त श्रीमंत बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्याशींच तुलना करतां येईल. पानिपतच्या पराजयानंतर मराठ्यांची एक सबंध लढाऊ पिढी गारद झाली तशी शिक्रीच्या लढाईने राजपुतांची ! नानासाहेबांच्या वेळीं मराठी राज्याचें वैभव कळसास पोहचलें होतें, तसेंच राणा संगाच्या वेळीं राजपुतांनी आपल्या वैभवाचें शिखर गाठलें होतें. पानिपतच्या पराजयानंतर पूर्वीचें अपयश भरून काढण्याचा मराठी राष्ट्राने प्रयत्न केला व तो अंशतः सफलही झाला; तद्वतच संगानंतर राणा प्रतापसिंहाचें नांव या बाबतींत आपल्या दृष्टीसमोर उभें राहतें. राणा प्रतापची परंपरा बराच काल राणा अमरसिंहाने चालविली. परंतु राजपूत राष्ट्रांचें संघटन करून मोगली सत्तेच्या मुळावरच घाव घालण्याचा प्रयत्न राणा राजसिंहाने केला असल्याने त्याची कारकीर्द फिरून हिंदुस्थानच्या इतिहासांत चमकून उठली. औरंगजेबासारख्या शहानशहाचा तीन वेळां खुल्या लढाईंत पराभव करणारा कोणी वीर त्या काळच्या भरतवर्षांत निर्माण झाला असेल तर तो एक राजसिंहच होय. तो शिवाजीचा समकालीन होता. त्या दोघांचाही मृत्यु एकाच वर्षी म्हणजे १६८० सालीं व्हावा हाही अपूर्व योगायोग होय. हिंदू जातीवर अन्याय व अत्याचार करण्याबद्दल औरंगजेबास पत्र पाठवून अगर समक्ष त्याचा निषेध करणारे उभ्या भारतांत त्यावेळीं दोनच महापुरुष निघाले. एक शिवाजी व दुसरा राजसिंह. दोघेही उत्तम सेनानी म्हणून विख्यात आहेत. दोघांनीही गनीमी काव्याच्या लढाया मारल्या. शिवाजीस भिऊन औरंगजेबाने दक्षिणेंत पायच ठेवला नाही. तर राजस्थानांतून राजसिंहाच्या भयाने त्यास प्राण मुठींत धरून पळून यावें लागलें. शिवाजीचें

नांव माहीत नाही असा महाराष्ट्रीय असूं शकेल काय ? पण त्याच्याच समकालीन असलेल्या राजसिंहाची किती लोकांस माहिती असते ?

२. शिक्षाप्रद चरित्रें

सारांश, राजपुतांचा इतिहास म्हणजे कर्नल टॉडने म्हटल्याप्रमाणे " शतकानुशतकें आपल्या स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या शूर लोकांचा " इतिहास होय. " आपल्या वाडवडिलांच्या धर्माचें, आपल्या हक्कांचें व स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठी त्यांना प्रिय असलेल्या वाटेल त्या गोष्टीचा त्यांनी त्याग केला, व कोणत्याही आमिषास बळी न पडतां मोठ्या दृढतेने त्यांनी आपल्या प्राणांच्या देखील आहुति दिल्या. त्यांचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहिल्याबरोबर कोणाही मनुष्याचें अंतःकरण भावनेने भरून आल्याशिवाय राहत नाही." टॉडसारख्या परकी मनुष्याच्या अंतःकरणाची जर राजपुतांच्या इतिहासाचें अध्ययन करतांना ही स्थिति होते तर राजपूत हे ज्यांचे धर्मबांधव व देशबांधव आहेत त्यांना त्यांच्या इतिहासाबद्दल किती आस्था, आदर, अभिमान व आत्मीयता वाटावयास पाहिजे ? मराठी भाषेंत राजपूत राष्ट्रांच्या इतिहासाचें संकलित ज्ञान करून देणारें एकही पुस्तक नाही असें म्हटल्यास तें फारसें सत्यास सोडून होईल असें वाटत नाही. प्रस्तुत पुस्तकांत उपलब्ध माहितीच्या आधारें राजपूत राष्ट्रांच्या संकलित इतिहासाची थोडक्यांत माहिती करून देण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. राजपुतांच्या सांस्कृतिक इतिहासावर पर्यालोचनात्मक असा प्रस्तुत लेखकाचा एक प्रबन्ध स्वतंत्र ग्रंथरूपाने ह्याच ग्रंथमालेंतून प्रसिद्ध झालेला असल्याने ह्या इतिहासकथनांत सांस्कृतिक गोष्टींचा समावेश सहसा होणार नाही. त्यांत केवळ ऐतिहासिक घटनांचेंच निवेदन येईल. तथापि त्यावरूनही प्रारंभींच्या मनुवचनांत म्हटल्याप्रमाणें ह्या देशांतील सर्वसामान्य मानव्यतेइतकेंच, किंबहुना कांकणभर अधिकच, राजपूत चरित्राचें व इतिहासाचें ज्ञान शिक्षाप्रद होईल अशी आशा आहे.

प्रस्तुत ग्रंथांत राजपूत राष्ट्रांच्या उदयास्तांच्या इतिहासाबरोबरच राजपूतांच्या नाशाच्या कारणमीमांसेवर स्वतंत्र प्रकरण लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. आजवर राजपुतांच्या विषयीं जे अनेक दुर्ग्रह प्रचलित

होते तेच त्यांच्या नाशाचीं अनेक ग्रंथकारांनी जीं कारणें दिलीं आहेत त्यांतही दिसून येतात. हे पूर्वग्रह वस्तुस्थितीस सोडून आहेत असा राजपुतांच्या इतिहासाच्या अभ्यासाने प्रस्तुत लेखकाचा समज झालेला आहे. प्रस्तुत लेखकाच्या मतें या बाबतींतील वास्तविक स्थिति काय आहे हें शेवटच्या प्रकरणांत स्वतंत्र बुद्धीने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला हें ठरविणें वाचकांवरच सोंपविणें इष्ट आहे.

प्रकरण दुसरें

१. अरवली पर्वताचें माहात्म्य

विंध्य व सातपुडा यांच्या साह्याशिवाय मध्यभारतांत, महाकोशलांत व विदर्भांत झालेल्या प्राचीन व वैभवशाली अशा अनेक राष्ट्रांच्या व राजघराण्यांच्या इतिहासाचीं सूत्रें हातीं लागत नाहीत. सह्याद्रि पर्वताचें भौगोलिक महत्त्व समजून घेतल्याशिवाय महाराष्ट्रीय स्वातंत्र्याच्या इतिहासाचें योग्य आकलन होऊं शकत नाही, त्याचप्रमाणें अरवली पर्वतावर आरोहण केल्याशिवाय राजपुतांच्या इतिहासाचें यथार्थ ज्ञान प्राप्त होणें शक्य नाही. विंध्य, सातपुडा व सह्याद्रीप्रमाणेंच अरवलीच्या प्रत्येक शिलेवर व खडकावर, प्रत्येक दरींत व खोऱ्यांत राजपुतांचा इतिहास घडलेला आहे; प्रत्येक नदी व नाला आणि प्रत्येक हमरस्ता व आडरस्ता स्वातंत्र्यार्थं लढणाऱ्या राजपुतांच्या रक्ताने भिजून लालभडक झालेला आहे. अरवलीच्या शिखरांवर राजपूत राजांनी बांधलेले किल्ले आजही उभे आहेत व त्यांच्या आश्रयाने राजपुतांनी मारलेल्या लढाया व मिळविलेले विजय यांची साक्ष देत आहेत. अरवलीच्या उंच पहाडीवर राजपूत राजांनी बांधलेलीं हिंदु मंदिरें व जैन यतींचे मठ त्यांच्या वैभवाची व शिल्पकलेच्या चातुर्याची साक्षात प्रतिमा म्हणून दृग्गोचर होत आहेत; आणि अरवलीच्या झऱ्याझऱ्याच्या ठिकाणीं निर्माण झालेलीं, व राजपूत राजपुरुषांच्या, सरदारांच्या व धनिकांच्या दानधर्मांनी प्रख्यात झालेलीं पवित्र तीर्थस्थानें राजपूत धर्माभिमानाचा डिंडिम आजही

बाजवीत आहेत. सारांश अरवली पर्वत म्हणजे राजपुतांच्या इतिहासाचें स्थायी प्रतीक होय. म्हणून राजपूत इतिहासाचें अध्ययन करतांना अप्रतिम सृष्टिसौंदर्याने नटलेल्या आणि स्फूर्तिप्रद व रोमांचकारी घटनांनी भर-लेल्या अशा ह्या अद्रिराजाचें स्थानमाहात्म्य समजून घेणें अगत्याचें आहे.

२. हिंदुस्थानचा ॲपेनाईन

सांप्रत हिंदुस्थानच्या नकाशांत पिवळ्या रंगाचा राजपुताना म्हणून ओळखला जाणारा प्रदेश ह्या अरवलीच्या योगें पूर्व राजपुताना व पश्चिम राजपुताना म्हणून विभागला गेला आहे. दक्षिणेच्या भागास अरवलीचें एक टोक विंध्य पर्वतास जाऊन टेकलें असून तेथून मध्यभारत म्हणून ओळखला जाणारा प्रदेश सुरू होतो. येथून जसजसें उत्तरेस जावें तस-तशीं एकाहून एक उंच अशीं शिखरें आक्रमण करावीं लागतात. प्रथमच 'गुरु शिखर' म्हणून प्रसिद्ध असलेलें अबूचें शिखर लागतें. येथून उत्तरेस अजमीरपर्यंत अरवलीची कक्षा जाऊन पोचते आणि तेथून त्याच्या अनेक उंच अशा रांगा हल्लीच्या अलवार संस्थानांत इतस्ततः पसरलेल्या व खुद्द दिल्लीच्या जवळपास जाऊन भिडलेल्या आपणांस दिसतात. ह्याच्या पश्चि-मेस व पूर्वेस अनेक लहान मोठ्या नद्या व शेंकडो निर्झर वाहतात व आस-मतांतील प्रदेश सुपीक व जलपूर्ण करतात. अरवलीच्या पूर्वेस आपणास चंबळ, वेत्रवती, शोणभद्र ह्या महानद्या आणि बनास व तिला मिळणाऱ्या बेरिस, कोटासर, खारी, दायी इ. राजपूत इतिहासांतील प्रसिद्ध नद्या वाहतांना आढळतात. पूर्वेपेक्षा पश्चिमेस वाहणाऱ्या नद्यांची व प्रवाहांची संख्या कितीतरी अधिक आहे; व गोडवाड्याचा सर्व प्रदेश त्यांनी सुपीक बनविला आहे. पश्चिमेच्या नद्यांपैकी पुष्कळशा नद्या इतिहासप्रसिद्ध लूनी नांवाच्या खाऱ्या पाण्याच्या नदीस जाऊन मिळतात व ही लूनी कच्छच्या रणामधील रेताडांत गुप्त होते. अरवली पर्वताची उंची साधारणपणें साडे पांच हजार फूट आहे. त्यांतून असलेल्या वाटा अत्यंत बिकट आहेत. खिडीखिडीच्या ठिकाणीं राजपुतांनी किल्ल्यांची उभारणी करून जाण्या-येण्याचीं दारें करून टाकलीं आहेत. जागोजागीं अत्यंत उंच, सरळ, व एक-दम तुटलेल्या कड्यांनीं त्यास दुर्लंघ्य बनविला आहे; व मोठ्या प्रयत्नांनी

कडे चढून वर गेलेल्या प्रवाशाचा मार्ग गहन अरण्यांनी व लगेच थोड-थोड्या अंतरावर लागणाऱ्या खोल दऱ्याखोऱ्यांनी अवरुद्ध करून टाकला आहे. या पर्वताच्या भव्यतेकडे, सौंदर्याकडे, वैचित्र्यपूर्णतेकडे व दुर्लंघनीय-तेकडे पाहून टॉडसारख्या पाश्चिमात्य इतिहासज्ञाने व भूगोलशास्त्रवेत्त्याने त्यास 'हिंदुस्थानचा अपेनाईन' म्हणन वाखाणिलें आहे.

३. राजस्थानच्या चतुःसीमा

अशा प्रकारच्या अरवली पर्वतावर मनुष्य क्षणभर उभा राहिला व त्याने सभोवार दृष्टिक्षेप केला म्हणजे सामान्यतः चतुष्कोणात्मक असलेला राजपुताना दिसूं लागतो. राजपुतान्याचेंच स्थानिक नांव राजवाडा अथवा राजस्थान असून राजपूत इतिहासांत तेंच विशेष प्रसिद्ध आहे. राजस्थानच्या एकंदर चतुःसीमेकडे साकल्येंकरून नजर टाकली तर उत्तरेस सतलजपर्यंत, पश्चिमेस सिंधूपर्यन्त, दक्षिणेस विंध्याद्रीपर्यन्त व पूर्वेस चंबळ —यमुना संगमापर्यंत त्याच्या मर्यादा जाऊन भिडलेल्या आढळतात. त्याचा नैॠत्य प्रदेश लूनी नदीच्या द्वारें कच्छच्या रणास जाऊन मिळतो. वायव्य प्रदेश पंजाबपासून थारच्या घोर वाळवंटाने संरक्षित राहतो. ईशान्य प्रदेश पंजाब दिल्लीप्रांत यांची सरहद्द बनतो; आणि आग्नेय प्रदेशाच्या योगाने राजस्थानपासून मध्यभारत वेगळा तोडला जातो. ह्या एकंदर प्रदेशाचें क्षेत्रफळ साडेतीन लक्ष वर्गमैल असून तो २२° ते ३०° उत्तर अक्षांशांत व ६९° ते ७८° पूर्व रेखांशांत वसलेला आहे. अरवली पर्वतावरूनच आपणास आणखी असेंही दिसून येईल की, अरवलीच्या योगाने राजस्थानचे जे दोन तुकडे पडतात त्यांतील पूर्व विभागाचें क्षेत्रफळ लहान असून पश्चिम विभागाचें त्याहून दुपटीने अधिक आहे. या लहान असलेल्या पूर्व विभागांतच उदेपूर उर्फ मेवाड, बूंदी, कोटा व जयपूर हीं संस्थानें असून पश्चिम विभागांत जोधपूर, बिकानेर, व जेसलमीरचीं संस्थानें आहेत. दक्षिणेस विंध्य पर्वतांत उगम पावलेली चंबळ नदी राजस्थानची सीमा बनून जणू काय त्याचा सबंध पूर्व विभाग भिजवून जलपूर्ण व सुपीक करण्यासाठीच नैॠत्येकडून ईशान्येकडे वाहत जाते आणि तिला बनास आपल्या उपनद्यांसह येऊन मिळते ह्या भागांत पर्जन्यमान सामा-

न्यत: २० ते ३० इंच असतें. पाऊस व नद्यांचें पाणी यामुळे राजस्थानचा हा भाग अतिशय सुपीक व रमणीय झालेला आहे व त्यांत निरनिराळ्या नद्यांना अडवून राजपूत राजांनी राजसमुद्र व जयसमुद्र यांसारखीं विस्तीर्ण सरोवरें बांधून अधिक मनोहरपणा उत्पन्न केला आहे.

अरवलीच्या पश्चिमेकडील प्रदेशाचें क्षेत्रफळ विस्तीर्ण असलें तरी त्यांतील बहुतेक प्रदेश थारच्या वाळवंटाने व्यापलेला आहे. या भागांत पर्जन्यमान सामान्यत: पांच इंचांपेक्षा जास्त नाही. वालुकामय प्रदेशामुळे व पर्जन्याच्या व नदीनाल्यांच्या अभावामुळे हा प्रदेश निव्वळ मरुभूमि झालेला आहे व त्याचें नांवही 'मरुस्थल' असेंच पडलेलें आहे. अर्थात तो सर्वच प्रदेश अत्यंत नापीक आहे. हा बहुतेक प्रदेश जोधपूर उर्फ मारवाड, जेसलमीर व बिकानेर या संस्थानांत विभागला आहे. सांभरचें सुप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचें व मिठाचें सरोवर अरवलीच्या उत्तर विभागाच्या पश्चिम पायथ्याशीं आहे. हा सर्व प्रदेश विसाव्या शतकांतल्या इंग्रजी सुधारणेपासून सर्वथा अलिप्त आहे व पांचशें वर्षांपूर्वी तेथील रहिवाश्यांची जी स्थिति होती तीच आजही कायम आहे. फक्त त्यांच्या स्वातंत्र्याचें पाणी तेवढें नष्ट झालेलें आहे व पारतंत्र्याची पकड आपणावर कशा तऱ्हेने बसलेली आहे याचा त्यांना पत्ता सुद्धा नाही.

४. प्रमुख संस्थानें

राजस्थानच्या ह्या एकंदर प्रदेशांत खास राजपुतांचीं अशीं एकंदर प्रमुख सात राज्यें आहेत. त्यांचा उल्लेख वर आलाच आहे. तथापि त्यांचीं नांवें पुन: एकवार येथे देत आहें. तीं येणेंप्रमाणें:--

१ मेवाड उर्फ उदयपूर
२ मारवाड उर्फ जोधपूर
३ अंबर उर्फ जयपूर
४ बीकानेर
५ जेसलमीर
६ बुंदी } हाडावती
७ कोटा } हाडावती

या सात राज्यांचाच इतिहास प्रामुख्येंकरून या ग्रंथांत वर्णिला आहे.

प्रकरण तिसरें

१. राजपुतांच्या उत्पत्तीविषयीं क. टॉडचें मत.

राजपूत हा शब्द मूलतः राजपुत्र या शब्दापासून बनलेला आहे. राजपूत हे आर्यवंशीय क्षत्रिय आहेत. पंचनदांतील व गंगायमुना तटाकावरील क्षत्रियांनी परिस्थितिवशात् तेथून निघून हल्लीच्या राजस्थानांत येऊन वसति केली ही गोष्ट आता शाबीत झालेली आहे. परंतु एक वेळ इतिहासांत राजपूत हे आर्यवंशीय क्षत्रिय आहेत की नाहीत हा वाद सुरू होता; आणि तो प्रथम कर्नल टॉडनेच सुरू केला होता. क. टॉड हा राजपूत इतिहासावरील आधुनिक कालांतील पहिलाच ग्रंथकार होय. त्याचा राजपुतांच्या गुणांविषयीं अभिमानही फार जबर; परंतु त्याबरोबरच राजपुतांची उत्पत्ति आर्यांपासून नाही याबद्दलचा त्याचा आग्रहही तितकाच जबरदस्त. एरव्ही राजपुतांच्या गुणगौरवामध्ये निःसीम आनंद मानणारा टॉड त्यांच्या वंशाविषयीं बोलतांना मात्र त्यांना मध्यआशिया खंडांतील शाकवंशीय समजतो. त्याने आपल्या सबंध ग्रंथाची उभारणीच मुळी राजपूत हे शाकवंशीय होत या कल्पनेवर केली आहे, व तिच्या पुष्टीकरतां शब्देतिहासशास्त्र, पुराणवस्तु–संशोधनशास्त्र, इत्यादिकांचा आधार घेतला आहे.

"[उत्तरेस] ३०° ते ५०° अक्षांश आणि [पूर्वेस] ७५° ते ९५° रेखांशाच्या दरम्यानचा प्रदेश म्हणजे मध्यआशियाचें पठार होय .... हा सर्व प्रदेश अद्याप बहुतांशीं असंशोधित आहे. तो एका प्राचीन संस्कृतीचें माहेरघर होय. चंगीझखानाच्या काळापर्यंत सुद्धा मध्यआशियांत मोठमोठालीं शहरें नांदत होतीं. मध्यआशियांतील भूमि निव्वळ कुरणाळ होती असें समजणें ही मोठी चूक होय. प्राचीन संशोधक आपणांस असा दाखला देऊं शकतात की, ज्या वेळीं सूने गेट किंवा यूची लोकांवर स्वाऱ्या केल्या त्या वेळींही हिंदुस्थानच्या मालांनी भरलेलीं अशीं सुमारें शंभर शहरें त्याला आढळलीं. त्यांमध्ये राजांच्या शिक्काछापाचीं नाणींही प्रचलित होतीं.

" ख्रिस्ती युगास प्रारंभ होण्याच्या पूर्वी कितीतरी काळ मध्य-आशियाची अशी स्थिति होती. परंतु ज्यांची युरोप कधीही बरोबरी करूं शकणार नाही अशा प्रकारच्या भयंकर व घोर लढाया व युद्धें यांनी हा सर्व प्रदेश उजाड व वाळवंटासारखा करून टाकला. आधुनिक काळांत तैमुरलंगाने गेटिक राष्ट्रांच्या विरुद्ध ज्या लढाया मारल्या त्यावरून देखील त्याच्या महत्त्वाकांक्षी पूर्वजांनी केवढा मनुष्यसंहार केला असेल याची कल्पना येते.

" गेट, जोट किंवा जिट, आणि तक्षक यांपासून हिंदुस्थानांतल्या ३६ राजकुळांपैकी बऱ्याच कुळांची उत्पत्ति झाली आहे. हे सर्व शाक–ताई (झगताई) उर्फ शाकद्वीप ह्या प्रदेशांतून आलेले आहेत. कास्पियन समुद्रापासून तों गंगा नदीपर्यंत एक विशाल सिथिक राष्ट्र पसरलेलें होतें असें पिंकरटनचें देखील म्हणणें आहे."

याप्रमाणें सिथियन राष्ट्राचें वर्णन करून टॉडने ह्या रुधिरपिपासु शाकद्वीपस्थ लोकांचें राजपुतांच्या चालीरीतींशीं पुढीलप्रमाणें साम्य दाखविलें आहे.

"युद्धप्रिय व मदिराप्रिय अशा सर्व लोकांचा हर हा आश्रयदाता होय; आणि राजपूत योद्ध्यांच्या भक्तीचा तोच खास विषय होय. हिंदुस्थानच्या ह्या महादेवाला रुधिर व मदिरा यांचाच नैवेद्य दाखविण्यांत येतो हेंही युक्तच होय. हराचे–बलाचे–विशिष्ट पुजारी जे गोसावी ते सर्व मादक पेयें, वल्ली व औषधें यांचें सेवन करण्यांत आनंद मानतात.

"हिरोडोटसच्या म्हणण्याप्रमाणें गेट लोकांतही सतीची चाल होती. तेथूनच ती राजपुतांत व हिंदुस्थानांत आली. 'असि' म्हणजे तरवारीची व अश्व म्हणजे घोड्याची पूजा (ही गेट व राजपूत उभयतांत लोकप्रिय आहे) ह्यावरूनच ह्या खंडास 'आसिया' उर्फ 'आश्विया' म्हणजेच आशिया असें नांव प्राप्त झालें असावें."

२. कै० राजवाड्यांचें मत

वरील लांबलचक उताऱ्यावरून टॉडच्या एकंदर म्हणण्याचा अभिप्राय वाचकांच्या लक्षांत आला असेलच. टॉडच्यानंतर ह्या

मताचा जोराचा पुरस्कार करणारे गृहस्थ म्हणजे श्री. देवदत्त रामकृष्ण भांडारकर हे होत. त्यांनी हें मत इतक्या जोराने व सप्रमाण मांडण्याचा प्रयत्न केला की, त्यावरून तत्कालीन स्मिथ वगैरे बहुतेक इतिहासकारांनी तें प्रमाण धरून आपले ग्रंथ लिहिले. परंतु या मताचा पुरातत्त्वभूषण इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनी समाचार घेतला आहे. ते म्हणतात, " राजपूत व जाट लोकांतील कांही अथवा सर्वकुळथा अहिंदु जे शक किंवा तुरुष्क लोक ते हिंदु बनून त्यांच्यापासून झाल्या, असा विपरीत सिद्धांत गेलीं पन्नास पाऊणशें वर्षें बहुतेक सर्व इंग्रज व युरोपियन लोक ठोकून देतात. इंग्रज व युरोपियन लोक पडले चौकसपणाने सशास्त्र विवेचन करणारे, तेव्हा त्यांचे विपरीत दिसणारेही सिद्धांत प्रमाणवत् मानून आपल्या इकडील कित्येक विद्वन्मन्य हवें तसें बरळायला लागले. विद्वन्मन्यांचे उच्छिष्ट व निरर्गल प्रलाप धर्मनिष्ठांना कवडीमोल भासत. परंतु ते कवडीमोल आहेत अशी खात्री ह्या विद्वन्मन्य लोकांची कशी व्हावी ? कोण्या युरोपियन शास्त्र्याने तसें सांगितल्याशिवाय त्यांच्या मूर्ख मतांचा कवडीमोलपणा त्यांना कधी पटावयाचाच नाही. हें जाणून एका इंग्रज मानवंशशास्त्रज्ञाचें राजपूत वंशासंबंधाने शास्त्रविचारांतीं आता काय मत झालेलें आहे तें देतों. तो म्हणतो :—

३. रिस्लेचें मत

" ' सिथियन लोकांचे सर्व अवशेष नष्ट झालेले आहेत. त्यांचें काय झालें अशी पृच्छा करणाऱ्या जिज्ञासूस जाट व राजपुतांच्या रूपाने त्यांचे वंश शिल्लक आहेत यापेक्षा दुसरें उत्तर देतां येत नाही. परंतु ह्या विधानाचीं प्रमाणें फारच भुसभुशीत आहेत. हिरोडोटसने वर्णन केलेल्या गेट लोकांचेच राजपूत व जाट वंशज होत याचें त्यांना निर्विवाद प्रमाण देतां येत नाही. नामसादृश्याचें प्रमाण तर फारच भ्रामक आहे. पण त्याही व्यतिरिक्त आपणाजवळ असे ऐतिहासिक पुरावे आहेत की, हिंदुस्थानावर आक्रमण करणारे सर्व सीथियन लोक रुंद डोक्याचे होते. त्यामुळे त्यांचे वंशज प्रामुख्याने लांब डोक्याचे असूं शकतील ही गोष्ट संभवूं शकत नाही. (राजपूत व जाट हे तर लांब डोक्याचे लोक आहेत.)

वांशिक भिन्नता ओळखण्याचें डोकें हें प्रधान साधन होय; व एका प्रकारच्या डोक्याच्या लोकांचे वंशज अजीबात दुसऱ्याच प्रकारच्या डोक्याचे लोक होत असें म्हणणें म्हणजे सर्वस्वीं परस्परविरुद्ध विधान करणें होय. जाट व राजपुतांचें सीथियन लोकांशीं साधर्म्य दाखविणारा प्रयत्न हा अशाच दर्जाचा आहे.' "

४. राजपुतांचें आर्यवंशीयत्व

अशा तऱ्हेने, हिंदुस्थान सरकारने हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न वंशांची मूलोत्पत्ति शोधून काढण्याकरितां नियुक्त केकेल्या रिस्लेसारख्या मानव-वंशशास्त्रज्ञाचा अभिप्राय देऊन 'कंटकेनैव कंटकम्' या न्यायाने टॉड व तन्मतानुयायी देशीविदेशी इतिहासकारांना कै० राजवाडे यांनी खासा जबाब देऊन टाकला आहे.

राजपूत इत्यादि भारतीय जाती निःसंशय आर्य होत हें मत प्रतिपादन करणारा विद्वानांचा वर्गही मोठा आहे; व त्यांनी राजपुतांना अनार्य ठरविणारांचीं प्रमाणें अनेक तऱ्हांनी खोडून काढलीं आहेत. अधिक अलीकडच्या विद्वानांनी आर्यांच्या दोन टोळ्या भिन्न भिन्न वेळीं भिन्न रस्त्याने हिंदुस्थानांत आल्या ही गोष्ट त्यांच्या दोन नांवांवरून व दोन प्रकारच्या म्हणजे सूर्य व चंद्र वंशांवरून मानली आहे. व ती ऐतिहासिक परंपरा, शीर्षमापनशास्त्र आणि भाषोत्पत्तिशास्त्र यांच्या आधारें सिद्ध केली आहे. राजपुतान्यांत राज्य करणारीं सर्व घराणीं आपली उत्पत्ति सूर्य किंवा चंद्र वंशापासून लावतात हें सुप्रसिद्ध आहे.

५. कुलगुरु वैद्यांचें मत

आधुनिक विद्वानांत कुलगुरु चिं. वि. वैद्य यांनी आजपर्यंत उपलब्ध झालेल्या प्रमाणांत आणखी अनेक प्रमाणांची भर घालून राजपूत हे शुद्ध आर्यवंशीय होत ही गोष्ट निर्विवाद सिद्ध केली आहे. प्राचीन कालापासून चालत आलेल्या सूर्यचंद्रवंशीय क्षत्रियांचेच राजपूत हे वंशज कसे होत ही गोष्ट त्यांनी सप्रमाण सिद्ध केली आहे.

राजपुतांच्या इतिहासाचे अग्रगण्य संशोधक रायबहादूर गौरीशंकर ओझा यांनीही राजपुतांमध्ये असलेले आदित्य, चंद्र इ० नामान्त याच

गोष्टीचे दर्शक असून त्यावरून व त्यांच्या गोत्र इत्यादिकांवरून श्री. भांडारकरांचें म्हणणें खोडून त्यांचें आर्यवंशीयत्व सिद्ध केलें आहे.

६. राजस्थानांत वसति कां केली ?

अशा तऱ्हेने राजपुतांचें आर्यवंशीयत्व शाबीत झाल्यानंतर त्यांनी राजस्थानच्या डोंगराळ भूमींत व मरुस्थलींत वसति केव्हा केली व कां केली हा प्रश्न उत्पन्न होतो. परकी आक्रमणाच्या लाटा एकामागून एक या देशावर आदळूं लागल्यानंतर व देशांतील सर्वसामान्य समाज परकी सत्तेखाली राहून गुलामींत स्वाभिमानशून्यतेचें जिणें कंठूं लागल्यानंतर ज्या मूठभर स्वातंत्र्यप्रिय व स्वधर्माभिमानी आर्यांना ही गोष्ट असह्य झाली, त्यांनी आपल्या हृदयांतील स्वातंत्र्याची ज्योति तशीच अखंड जळती ठेवण्याकरितां देशांतर करून राजस्थानचा आश्रय केला व तेथे वैदिक संस्कृतीचा अदित्यध्वज रोवून त्याच्या सावलींत मोठ्या वीरतेने परकी आक्रमणाशीं सामना केला ही गोष्ट राजपूत संस्कृतीवरील आमच्या पुस्तकांत (पृ.१५२) आम्ही सविस्तर प्रतिपादन केली आहे. ह्या प्रतिपादनास कुलगुरु चिं. वि. वैद्यांच्या पुढील अवतरणावरून बळकटी येत आहे.

"वैदिक क्षत्रियांनी वसाहतीला अनाकर्षक असलेल्या ह्या डोंगराळ आणि वालुकामय प्रदेशांत ख्रिस्तीशकापूर्वी किंवा त्या शकाच्या सुरुवातीला जी वसाहत केली ती त्यांच्या पंजाबांतील व गंगेच्या प्रदेशांतील प्राचीन ठिकाणांवर बाहेरून आलेल्या स्वाऱ्यांचें दडपण पडल्यामुळे होय, असा इतिहासदृष्ट्या तर्क करणें कठीण नाही. वस्तुस्थितीच अशी आहे की, शक, कुशान, हूण आणि अगदी शेवटीं आलेले महंमदी तुर्क किंवा अफगाण यांच्या स्वाऱ्यांमुळे विपुल जलांनी युक्त व संपन्न अशा या दोन प्रदेशांतून हाकून लावलेल्या भारती आर्य लोकांस राजपुतान्याने नेहमीच आश्रय दिला आहे. आपल्याला विश्वसनीय अशा इतिहासावरून हें माहीत आहे की, राजस्थानच्या वाळवंटांत ज्या राजपूत घराण्यानें शेवटीं आश्रय केला तें कनोजच्या राठोडांचें होतें. वस्तुतः राजपुतान्याला 'राजपुतांची भूमि' हें नांव महंमदी कालांतच मिळालें. राठोडांच्या पूर्वी अशाच तऱ्हेने देशांतर केल्याचा पुरावा इतिहासांत सापडतो.

"अशी कल्पना करण्यास हरकत नाही की, आठव्या शतकांत आरबांशीं शौर्याने लढून नांवास चढलेले राजपूत हे परकीयांनी स्थानभ्रष्ट करून पंजाब व गंगा प्रदेश यांतून हाकून लावल्यानंतर राजस्थानांत येऊन राहिलेल्या वैदिक आर्यांचे वंशज होते. राजपुतान्याच्या ह्या अरण्यांत आणि डोंगरांत वैदिक क्षत्रियांनी आपलें स्वातंत्र्य आणि आपला वैदिक धर्म यांचें संरक्षण केलें होतें; आणि येथेही जेव्हा आपणामधील स्वभावसिद्ध क्रूरतेला मूर्तिविध्वंसक अशा नूतन धर्मांतील उग्र असहिष्णुतेची जोड देणाऱ्या नव्या परकीयांनी त्यांच्यावर हल्ले चढविले, तेव्हा आपल्या धर्माचें आणि स्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरिता या वैदिक क्षत्रियांनी किंवा राजपुतांनी आपल्या प्रयत्नांची शर्थ करून दाखविली; आणि म्हणूनच या काळांत आपल्याला असा चमत्कार दिसतो की, राजपुतान्यांत नवीं नवीं राजपूत घराणीं उदयास आलीं, आणि त्यांनी अरबांना नुसतें मागेच हटविलें नाही तर आपल्या नव्या उत्साहांत हिंदु राज्यांची दुसरी परंपरा स्थापिली आणि हिंदु मध्ययुगाच्या दुसऱ्या कालविभागांत हिंदुस्थानावर राज्य केलें."

अशा तऱ्हेने राजपुतांचें शुद्ध आर्यवंशीयत्व व त्यांनी राजस्थानांत केलेल्या वसाहतींचा काल याविषयीं स्थूलमानाने माहिती सांगितल्यानंतर त्यांनीच म्हटल्याप्रमाणें, "या इतिहासाची सुरुवात अर्वाचीन राजपुतांनी ज्यांना एकमताने दाक्षिण्ययुक्त शौर्याची जयपताका दिली आहे व ज्यांचें रक्त शुद्ध क्षत्रिय आहे म्हणून मान्य केलें आहे त्या गुहिलोतापासून करणें योग्य आहे."

प्रकरण चवथें

१. एक सहस्रकाचें स्वतंत्र राज्य

राजस्थानांतलें मेवाड उर्फ उदयपूर हें प्राचीनतम संस्थान होय. भरतवर्षावर परकीयांचीं आक्रमणें सुरू झाल्यापासून ज्या ज्या राष्ट्रांनी आपलें स्वातंत्र्य संरक्षण करण्याचे अथवा गतस्वातंत्र्य मिळविण्याचे भगीरथ प्रयत्न केले त्या सर्वांत मेवाडचा क्रमांक प्रथम लावावा लागेल.

आठव्या शतकांत ज्या वेळीं आरबांनी भरतवर्षावर स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला त्याच सुमारास मेवाडच्या गुहिलोत उर्फ शिसोदिया घराण्याची स्थापना झाली. तेव्हापासून तों गेल्या १९ व्या शतकापर्यंत सुमारें हजार अकराशें वर्षे टिकलेल्या या घराण्यांतील पराक्रमी व स्वातंत्र्याभिमानी पुरुषांच्या कारकीर्दीचा धावता इतिहास देखील मोठा मनोरंजक व उद्‌बोधक होण्यासारखा आहे. एक सहस्रकाच्या प्राचीनत्वावरोबरच या घराण्याचा आणखी एक विशेष आहे. तो म्हणजे त्याचें रघुकुलोद्‌भवत्व होय. राजस्थानांतील सर्व राजे एकमताने प्रभु रामचंद्राच्या वंशांतील या नात्याने मेवाडाधिपतींना अग्रपूजेचा मान अव्याहतपणें देत आले आहेत.

२. गुहिल घराण्याची स्थापना

श्रीरामचंद्राचा पुत्र लव याने लवकोट उर्फ लाहोर शहर वसवून तेथे आपलें राज्य स्थापन केलें. त्याच्या वंशांतील एका राजपुत्राने गुजरातेंत जाऊन वल्लभी येथे आदित्य वंशाचा ध्वज रोवला. वल्लभीचें हें रघुवंशीय पुरुषांचें राज्य कित्येक शतकें मोठ्या भरभराटीने चाललें. पुढे सहाव्या शतकाच्या सुमारास वल्लभी राज्यावर पार्थियन लोकांच्या टोळधाडी जाऊन आदळल्या व त्यांनी वल्लभीचा विध्वंस करून टाकला. वल्लभीचा शेवटचा राजा शिलादित्य याचा पार्थियनांशी झालेल्या युद्धांत अंत झाला. त्या वेळीं त्याची गरोदर राणी पुष्पावती आपल्या माहेरीं म्हणजे प्रमारांच्या राजधानीस चंद्रावतीस गेली होती. परत वल्लभीस येत असतां तिला वाटेंतच आपल्या पतीच्या मृत्यूची व वल्लभीच्या नाशाची वार्ता समजली. त्या वेळीं अरण्यांत भटकत असतां एका गुहेंत ती प्रसूत होऊन तिला पुत्र झाला त्याचें नांव गुहिल उर्फ गुहादित्य ठेवण्यांत आलें. ह्या गुहिलाने बरेच दिवस वनवासांत कंठून नंतर ईडर येथील भिल्लांचें राज्य काबीज केलें; व अशा तऱ्हेने राजस्थानांत रामचंद्राच्या वंशाची स्थापना होऊन त्यास गुहिलवंश ही संज्ञा मिळाली. गुहिल हा मोठा पराक्रमी पुरुष झाला व त्याने आपल्या बाहुबलावर ईडरच्या लहानशा राज्याचा चांगलाच विस्तार केला. हूण राजा मिहिरकुलाच्या नंतर, राजपुतान्यांतील बहुतेक भागावर, इतकेंच नव्हे तर त्याच्या समीपवर्ती

प्रदेशांवरही गुहाचाच अंमल चालत असावा असा इतिहासज्ञांचा तर्क आहे. फार काय पण आगऱ्यापर्यंतच्या प्रदेशावर देखील गुहिलाचें राज्य पसरलेलें असावें असें तत्कालीन सापडलेल्या नाण्यांवरून इतिहासज्ञांनी अनुमान काढलें आहे. गुहाचा काल इ. स. ५६६ हा मानण्यांत आला आहे.

गुहिलाच्या पाठीमागून क्रमशः भोज, महेंद्र व नागादित्य हे राजे झाले. परंतु त्यांचा फारसा वृत्तांत उपलब्ध नाही. मेवाडचें नागडा शहर या नागादित्यानेच वसविलें असें म्हणतात. नागादित्यानंतर त्याचा पुत्र शिलादित्य गादीवर बसला. त्याचें प्राचीन शिलालेखांतून 'शत्रूंना जिंकणारा, देव, ब्राह्मण व गुरुजनांना आनंद देणारा आणि स्वकुलाकाशांत चंद्राप्रमाणे शोभणारा राजा शिलादित्य पृथ्वीवर विजयी होत आहे' असें वर्णन केलेलें आढळतें. शिलानंतर त्याचा पुत्र अपराजित गादीवर आला. हाही मोठा तेजस्वी व पराक्रमी राजा झाला. त्याच्या संबंधीं 'गुहिल-वंशांतील तेजस्वी राजा अपराजित ह्याने सर्व दुष्टांचा नाश केला; व अनेक राजे त्याच्या समोर आपलें मस्तक नम्र करीत होते व त्याच्या सेनापतींचें यश दशदिशांना पसरलें होतें, अशीं वर्णनें तत्कालीन शिला-लेखांतून आढळतात. त्याच्या वेळच्या सापडलेल्या एका शिलालेखांतील कविता मोठी मनोहर असून त्यावरील अक्षरें छापील अक्षरांसारखीं सुंदर आहेत असें आढळून आलें आहे. त्यावरून अपराजिताचा तत्कालीन राजे-मंडळींत मोठा मान असून त्याने विद्येस व शिल्पकलेस चांगलेंच उत्तेजन दिलें असावें असें दिसतें. अपराजितानंतर दुसरा महेंद्र गादीवर बसला व ह्यानंतर कालभोज सिंहासनासीन झाल. कालभोज म्हणजेच सुप्रसिद्ध बाप्पारावळ होय असें पं. गौरीशंकर ओझा यांनी सिद्ध केलें आहे.

३. बाप्पारावळ

कालभोज उर्फ बाप्पा हा फारच पराकमी व विख्यात पुरुष झाला. त्याच्या इतका पराक्रमी पुरुष त्याच्यापूर्वी कोणीही झाला नसल्याने व त्याच्यापासून गुहिलोत घराण्याचा खरा उत्कर्ष झाला असल्याने तोच गुहिलोत घराण्याचा आद्य संस्थापक मानण्यांत येतो. प्रमार राजांच्या ताब्यांत असलेलें चितोड शहर व किल्ला जिंकून तेथेच त्याने

आपली राजधानी वसविली. शिवाजीच्या मावळ्यांप्रमाणेच त्यानेही आपल्या राज्यांतील भिल्ल इत्यादि अडाणी जातींना जमवून त्यांची एक प्रबळ व इमानदार सेना तयार केली. ह्या सेनेच्या बळावर त्याचें तेज हळू हळू वाढत गेलें. इ. स. ७३९–४० च्या सुमारास आरबांच्या राजस्थानावर स्वाऱ्या सुरू झाल्या होत्या. महंमद बिन कासिमच्या आधिपत्याखाली त्यांनी दाहिर राजाचा पराभव करून सिंधुदेश म्हणजे हल्लीचा सिंधप्रांत अगोदरच प्रादाक्रांत केला होता. तेथून राजस्थानांत पुढे सरकून चितोड सर करण्याचा आरबांनी संकल्प केला होता. अशा वेळीं बाप्पाने मोठ्या शौर्याने आरबांचा प्रतिकार करून त्यांचा धुव्वा उडविला आणि त्यांना पार राजस्थानच्या बाहेर हाकून लावलें. एवढ्यावरच तो थांबला नाही, तर त्याने खंबायतपर्यंत स्वाऱ्या करून त्यांचा पिच्छा पुरविला व महंमद बिन कासीमने सिंध येथे ठेवलेल्या सेलीम नांवाच्या सुभेदाराचा पाडाव केला व त्याच्या ठिकाणीं आपल्या सुभेदाराची नेमणूक करून सेलीमच्या मुलीशीं स्वतः लग्न लावलें. आरबांच्या ह्या पराजयाने बाप्पाची कीर्ति सर्वतोमुखीं पसरली.

बाप्पाची योग्यता फार मोठी वर्णन करण्यांत येते. तो शिवाजीप्रमाणेंच अत्यंत धर्माभिमानी होता. तो कट्टा शिवोपासक असून हारीत नांवाच्या एका मुनीचा शिष्य होता. राजस्थानांत बाप्पाच्या नांवाविषयीं अतिशय आदर वसत असून त्याच्या पराक्रमाबद्दल अनेक दंतकथा प्रचलित आहेत. आपल्या खांड्याच्या एका वाराने दोन रेड्यांचीं मस्तकें तो धडापासून वेगळीं करीत असे. तो चार बकऱ्यांचें मांस एकाच बैठकीस खाऊन फस्त करीत असे. बत्तीस मण वजनाचें खड्ग तो धारण करीत असे. त्याने इस्पहान, कंदाहार, काश्मीर, इराक, इराण, तुराण, काफिरिस्तान इ० अनेक देशांवर स्वाऱ्या केल्या होत्या व तिकडील शेंकडो कुमारिकांशीं त्याने विवाह लावले होते, त्याला सुमारें दोनशें पुत्र होते, इत्यादि प्रकारच्या ह्या दंतकथांवरून बाप्पा हा मोठा भीमपराक्रमी पुरुष होता असें अनुमान सहज काढतां येतें.

बाप्पाच्या विषयीं विश्वसनीय ऐतिहासिक माहिती फारशी आढळून येत नसली तरी त्याच्या ज्या सुवर्णमुद्रा उपलब्ध झाल्या आहेत

त्यांवरून तो स्वतंत्र व प्रतापी पुरुष असून एका विशाल राज्याचा स्वामी होता एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. पण एवढ्यावरून बाप्पाची वास्तविक योग्यता कळून येत नाही. परकी आक्रमणाशीं सतत एक हजार वर्षेपर्यंत शर्थीने झुंजणाऱ्या ज्या एका स्वतंत्र व स्वाभिमानी राष्ट्राची त्याने चितोडास स्थापना केली, त्यावरून त्याचें मोठेपण लक्षांत येतें. सातव्या शतकापासून तों दहाव्या शतकापर्यंत एकामागून एक वाढत्या प्रमाणावर आरबी आक्रमणाच्या लाटा राजस्थानवर आदळत होत्या व त्यांना बाप्पाच्या वंशजांनी अत्यंत धैर्याने व पराक्रमाने तोंड देऊन परत लावलें होतें. ह्या लढाया इतक्या विपुल झाल्या की, एक राजस्थानी कवि म्हणतो—

मेद:क्लेदभरेण दुर्जनजनस्याप्लावित: संगरे ।

'या देशांतील सर्व भूमि समरांगणांत नि:पात पावलेल्या दुर्जनांच्या म्हणजे यवनांच्या मांसाने व मेदाने भरून गेली.' त्यावरूनच तिला मेदपाट' किंवा मेवाड नांवाची अभिधा प्राप्त झाली. बाप्पाने स्थापना केलेल्या ह्या गुहिलोत वंशाची इतकी प्रचंड वृद्धि झाली की, आजमितीला त्या वंशांत उत्पन्न झालेले एक लक्ष लोक केवळ राजस्थानांत सापडतील. बाप्पाने स्थापन केलेला वंश केवळ राजस्थानांतच वृद्धि पावला असें नव्हे तर भरतवर्षांत अन्यत्रही अनेक ठिकाणीं तो पसरला व त्यांत अनेक स्वातंत्र्याभिमानी व राज्यकर्ते पुरुष निर्माण झाले–स्वतंत्र नेपाळचें राजघराणें व महाराष्ट्र स्वराज्याचे संस्थापक छत्रपति शिवाजी महाराजांचें भोसले घराणें हा बाप्पाच्याच वंशवृक्षाचा विस्तार होय. बाप्पाच्या या प्रचंड वंशविस्ताराविषयीं चितोडच्या शिलालेखांत पुढीलप्रमाणे मार्मिक उद्गार काढण्यांत आले आहेत—

एतेऽद्यापि महीभुज: क्षितितले तद्वंशसंभूतय:
शोभन्ते सुतरामुपात्तवपुष: क्षात्रा हि धर्मा इव ।

त्यांच्या वंशांतील राजे अद्यापि देखील क्षात्रधर्मान्वित राहून पृथ्वीस शोभा देत आहेत' ही या शिलालेखांतील वाणी आजही यथार्थ आहे असें कबूल करावें लागतें.

बाप्पा ह्याने दीर्घकालपर्यन्त राज्य केलें. तो जसा वैभवशाली राजा, कुशल सेनानी व विख्यात धर्माभिमानी पुरुष होता, त्याचप्रमाणे तो मोठा सुविद्य व अध्यात्मज्ञानी तत्त्वदर्शीही होता. हारीत मुनीजवळ त्याने अनेक कलांचा व विद्यांचा अभ्यास केला होता. वृद्धापकाळीं आपल्या रघुवंशीय पूर्वजांप्रमाणेंच आथर्वणाचा अभ्यास करण्यासाठी वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करून त्याने आपलें राज्य पुत्रांच्या स्वाधीन केलें होतें व पुढे त्याने चतुर्थाश्रमाचा स्वीकार केला. आपल्या सौराष्ट्राच्या स्वारींतून व्यानमातेची मूर्ति त्याने चितोडास आणन स्थापिली; व तीच चितोडच्या सर्व राजांची कुलस्वामिनी म्हणून राहिली. शिवोपासनेमुळे त्यानेच भगवान एकलिंगजीच्या मंदिराची स्थापना केली व आपलें राज्य एकलिंगजीच्या चरणीं अर्पण करून हारीत मुनीच्या आज्ञेवरून केवळ एकलिंगजीचा दिवाण म्हणून त्याने राज्यकारभार चालविला. त्याच्या वंशांत उत्पन्न झालेल्या प्रत्येक राजपुरुषानेही स्वतःस एकलिंगजीचे दिवाण समजूनच आपलें राज्य सांभाळलें व त्यावरूनच त्यांना दीवानजी अशी संज्ञा मिळाली.

बाप्पाच्या पाठीमागून त्याचा पुत्र **पहिला खुम्माण** गादीवर आला. त्याच्या संबंधीं कांहीच इतिहास आढळत नाही. खुम्माणच्या पाठीमागून **मत्तट** आणि त्यानंतर **भर्तृपट्ट** व त्याच्यामागून **सिंह** हे पुरुष गादीवर आले; पण त्यांचाही फारसा इतिहास उपलब्ध नाही. सिंहामागून दुसरा खुम्माण राज्य करूं लागला.

४. खुम्माण दुसरा

कालभोज उर्फ बाप्पानंतर हाच महत्त्वाचा पुरुष मेवाडच्या गादीवर आला. 'खुम्माणरासो' नांवाच्या काव्यांत ह्याच्या कारकीर्दीचें वर्णन आढळतें. नवव्या शतकाच्या प्रारंभीं इकडे खुम्माण मेवाडच्या गादीवर बसला होता तर तिकडे त्याच वेळीं बगदादच्या खलीफाच्या गादीवर खलींफा अलमामून याने आरोहण केलें होतें; व दोघांचीही कारकीर्द जवळ जवळ सारखीच चालली. प्रसिद्ध खलीफा हारून अलरशीद गादीवर असतांना त्याने अलमामून यास खोरासन, सिंध इ. प्रांताची सुभेदारी दिली होती. व सिंधच्या बाजूने आंत येणाऱ्या कोणाही

आक्रमकास मेवाडशीं सामना केल्याशिवाय जाणें शक्य नव्हतें. या बाजूने येणाऱ्या प्रत्येक आक्रमणास चितोड हा मोठा प्रतिबंध होता व त्यामुळे आरबांना चितोडविजय करण्याची एक मोठी महत्त्वाकांक्षा लागून राहिली होती. खलीफा अलमामून हा स्वतःच ज्या वेळीं गादीवर आला त्या वेळीं त्याने जोराचें आक्रमण करून चितोड नेस्तनाबूद करण्याचा आपला संकल्प तडीस नेण्याचा प्रयत्न केला. मागील सर्व आक्रमणांहून हें आक्रमण जबरदस्त होतें. त्याच्या प्रतिकारासांठी खुम्माणने फार जोराची तयारी केली होती. त्या काळीं खुम्माणचें वर्चस्व व श्रेष्ठत्व बहुतेक सर्व राजपूत राजांनी मान्य केलें होतें. काश्मीरपासून मध्यभारतापर्यंतचे सर्व राजे भारतीय युद्धाप्रमाणें ह्या युद्धांत खुम्माणच्या नेतृत्वाखाली जमा झाले होते. मातृभूमीच्या संरक्षणार्थ झालेल्या या युद्धाचें महत्त्व अपूर्व आहे व खुम्माणरासोमध्ये त्याचें मोठें अद्‌भुत वर्णन केलें आहे.

आरबांनी चितोडाधिपतीस 'खंडणी भरा व खलीफाचें मांडलिकत्व पत्करा' असा उद्धट निरोप पाठविला. खुम्माणने तरवारीनेच या निरोपाचा जबाब दिला. खंडणीचा पैसा देण्याऐवजी मेवाडच्या सबंध भूमीस आरबांच्या रक्ताचा अभिषेक केला. त्याने त्यांच्यावर इतक्या जोराने हल्ला चढविला की, त्यांच्या फौजेस वाट फुटेल तिकडे पळून जावें लागलें. या युद्धांत खुम्माणने एकंदर २४ मोठमोठ्या लढाया मारल्या असें खुम्माणरासोंत वर्णन आहे. खुम्माणने मोठ्या शर्थीने आपलें स्वातंत्र्य रक्षण केलें व आरबांना पिटाळून लावलें. त्यामुळे राजस्थानांत खुम्माणची सीझरप्रमाणेच फार प्रसिद्धि आहे. त्याने मेवाडचा तो आदित्य–चिन्हांकित रक्तप्रवर्ण ध्वज चितोडवर डौलाने फडकत ठेवला.

यानंतर **मयाधक** व **तिसरा खुम्माण** यांनी मेवाडवर राज्य केलें. पण त्यांचा कांहीच वृत्तांत उपलब्ध नाही. तिसऱ्या खुम्माणचा उत्तराधिकारी दुसरा **भर्तृपट्ट** झाला. त्याने कित्येक मंदिरें वगैरे बांधल्याचा उल्लेख आढळतो. यावरून त्याचा काळ शांततेचा गेला असावा. भर्तृपट्टाच्या नंतर त्याचा पुत्र **अल्लट** गादीवर आला. त्याच्या काळचे कांही शिलालेख उपलब्ध झाले आहेत. त्यावरून त्या काळच्या सुव्यवस्थित शासनपद्धतीची थोडीशी कल्पना येऊं शकते. अल्लटाने आहाड येथे

आपली राजधानी नेली असावी असा तर्क आहे. तर कित्येकांनी त्यानेच आहाडनगर शहर वसविलें असेंही प्रतिपादन केलें आहे. तो गदायुद्धांत प्रवीण असून त्याने आपल्या प्रचंड गदेच्या आघाताने देवपालनामक शत्रूस ठार मारलें असा उल्लेख सापडतो.

अल्लटाच्या पाठीमागून त्याचा पुत्र **नरवाहन** गादीवर आला. तो 'कलांचा आधार, धीर, विजयाचें निवासस्थान, क्षत्रियांचें क्षेत्र म्हणजे उत्पत्तिस्थान, शत्रुदलांना नष्ट करणारा, वैभवांचें भवन आणि विद्यांचा वेदी' होता असें त्याचें शिलालेखांतून वर्णन आढळतें. नरवाहनाच्या मागून त्याचा पुत्र **शालिवाहन** गादीवर आला व त्यानंतर त्याचा पुत्र **शक्तिकुमार.** 'हा प्रभुशक्ति, मंत्रशक्ति व उत्साहशक्ति या शक्तित्रयांनी संपन्न होता,' असें याचें वर्णन आढळतें. याच्या कारकीर्दींत आहाडचें वैभव बरेंच वाढलें होतें. तें शहर 'संपत्तीचें आगर असून विपुल वैभवशाली अशा अनेक वैश्यांनी सुशोभित केलें होतें' असें वर्णन शिलालेखांतून केलेलें आहे.

याच्या कारकीर्दींत माळव्याचा प्रमार राजा मुन्ज याने मेवाडवर स्वारी करून चितोड शहर जिंकलें व आहाडचा विध्वंस केला, असा उल्लेख आढळतो. त्यानंतर चितोड बरेच दिवस प्रमारांच्या स्वाधीन राहिलें. शक्तिकुमाराच्या पाठीमागून त्याचा पुत्र **अंबाप्रसाद** गादीवर आला. याचाच 'आम्रप्रसाद' असाही उल्लेख आहे. काश्मिरी पंडित जयानक याने रचलेल्या 'पृथिवीराजविजय' महाकाव्यांत याची थोडी माहिती आलेली आहे, तीवरून सांभरचा चौहान राजा वाक्पतिराज याने मेवाडवर स्वारी केली होती व या युद्धांत छुरिकेने अंबाप्रसादाचें मुख विदीर्ण करून त्याचा नाश केला व त्याचें सर्व सैन्यही गारद केलें असें दिसतें.

५. चार शतकांचें सिंहावलोकन

अशा तऱ्हेने गुहिलापासून अंबाप्रसादापर्यंतचा काल म्हणजें सहाव्या शतकापासून तो दहाव्या शतकापर्यंतचा काल होय. ह्या कालांत मेवाडच्या गादीवर सुमारें २० राजे बसले. आरबांनी अनेक वेळां मेवाडवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. पण बाप्पा व खुम्माण यांनी त्यांना चांगलाच मार दिल्यामुळे त्यांनी पुनः सिंधकडून राजस्थानवर आक्रमण

केल्याचें दिसत नाही. ज्या आरबांनी आपल्या नवीन संस्कृतीने उत्स्फूर्त होऊन महंमदी धर्माची ध्वजा आशिया व युरोपांतील बहुतेक देशांवर रोविली आणि तत्कालीन मोठमोठ्या राष्ट्रांना धुळीस मिळविलें त्यांचा राजस्थानवर मात्र जोर चालूं शकला नाही; आणि मेवाडच्या राजांनी त्यांचा अत्यंत यशस्वितेने प्रतिकार केला, ही गोष्ट त्यांना भूषणावह होय. आरबांच्या आक्रमणाचा आवेग अत्यंत प्रबल होता; व त्यांच्या भाराखाली बाकीचें जगत् चिरडून गेलें होतें. असें असतांना मेवाडच्या राजपुतांनी वैदिक संस्कृतीची व धर्माभिमानाची ध्वजा आपल्या स्कंधीं धारण करून ती नुसतीच सुरक्षित ठेवली असें नव्हे तर ती शक्य तितकी उंच फडकाविली, आपल्या राज्याचा विस्तार केला; व विद्या, कला व वैभव यांनी समृद्ध असें बलशाली हिंदुराष्ट्र निर्माण करून तीनचार शतकें सन्मानपूर्वक जगविलें व तत्कालीन राजमंडळांत नेतृत्वाचा मान मिळविला, यावरून त्यांच्या योग्यतेची कल्पना केली पाहिजे.

६. इ. स. १००० नंतर.

यानंतरच्या एका शतकाचा विशेष असा इतिहास मिळत नाही. अंबाप्रसादाच्या नंतर क्रमाने **शुचिवर्मा, नरवर्मा, कीर्तिवर्मा, योगराज, वैराट, हंसपाल, वैरिसिंह,** व **विजयसिंह,** हे राजे झाले. त्यांच्या कारकीर्दींत कांही विशेष घटना घडलेली दिसत नाही. त्यांच्या कारकीर्दींत प्रजेची भरभराट झालेली दिसते. त्यांनीही पूर्वीच्या राजांप्रमाणेंच आहाड येथेच आपली राजधानी ठेवली व आहाडला मजबूत कोट बांधले. त्यांच्यापैकी कित्येकांचे 'ज्यांनी आपल्या शौर्याने शत्रुसमुदायास शरण आणलें' असे उल्लेख आढळतात. पण हे शत्रु एतद्देशीयच असावे. कारण कोणा बाह्य शत्रूची ह्या काळांत स्वारी झालेली दिसत नाही. 'वैरिसिंहाच्या समोर अनेक सामंत नम्र होत असत. त्याने आपल्या शत्रूंना पहाडाच्या गुहेंत पळविलें व त्यांचीं नगरें हिरावून घेतलीं', असें वर्णन आहे. यावरून त्याचाही पराक्रम व्यक्त होतो.

विजयसिंहाच्या मागून **अरिसिंह, चौंडसिंह** व **विक्रमसिंह** हे क्रमाने मेवाडचे राजे झाले; पण त्यांचा कांहीच इतिहास मिळत नाही.

यानंतर **रणसिंह** गादीवर आला. याला **कर्णसिंह** असेंही म्हणत. याच्या वेळेपासून गुहिलोत घराण्याच्या दोन शाखा झाल्या. एक रावळ नांवाची व दुसरी राणा नांवाची. रावळ शाखेंत **जैत्रसिंह, तेजसिंह, समरसिंह** व **रत्नसिंह** हे राजे झाले व राणा शाखेंत राहप, माहप, इ. राणे झाले. मेवाडचें आधिपत्य रावळ शाखेकडेच राहिलें व राणा शाखेच्या लोकांनी शिसोदा येथे आपली वेगळी गादी स्थापन केली म्हणून इतःपर त्यांचें गुहिलोत हें उपनांव नष्ट होऊन 'शिसोदिया' हें नांव पडलें. अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळेस रावळ शाखेचा नाश होऊन नंतर राणा हम्मीरने चितोडला आपली गादी स्थापन केल्यापासून मेवाडवर शिसोदिया राणा-वंशाचें राज्य सुरू झालें. पण हा सर्व वृत्तांत पुढे देण्यांत येईल.

रणसिंहाच्या मागून **क्षेमसिंह** व त्यानंतर **सामंतसिंह** बसला. ह्या सामंतसिंहाने गुजराथच्या अजयपाल नामक राजावर स्वारी करून त्याच्या सैन्याची दाणादाण केल्याचा उल्लेख आढळतो. पूर्वी प्रमारांच्या ताब्यांत गेलेला चितोडचा किल्ला आता अजयपालच्या ताब्यांत होता तो जिंकून परत मिळविण्यासाठी सामंतसिहाने त्याच्यावर स्वारी केली व त्यांत यश संपादन केलें. सामंतसिंह शरीराने कामदेवापेक्षाही सुंदर होता असें त्याचें वर्णन आहे. परंतु त्याने आपल्या सरदारांच्या जहागिरी काढून घेतल्यामुळे त्याचें बळ कमी झालें व सरदारांची सहानुभूति व मदत नष्ट झाल्याबरोबर नाडौलचा चौहान राजा कीतू उर्फ कीर्तिपाल याने मेवाडवर स्वारी करून त्यास पदच्युत केलें. सामंतसिंहाने गमाविलेलें मेवाडचें राज्य त्याचा लहान भाऊ **कुमारसिंह** याने पुढे परत मिळविलें व आपल्या राष्ट्रास स्वतंत्र केलें. बाराव्या शतकाच्या चतुर्थ पादांत ११७९ च्या सुमारास अशा तऱ्हेने मेवाडला कांही काल गुहिलोत वंशाच्या शासना-खालून निघून चौहानांच्या शासनाखाली राहावें लागलें. कीर्तिपालाने मेवा-डचें राज्य घेतल्यावर सामंतसिंहाने मेवाडच्या शेजारीं असलेल्या बागडास नवीन राज्य स्थापन केलें. ह्याच वंशाचें आजच्या डोंगरपूर संस्थानवर हल्ली स्वामित्व आहे. मेवाडवर कुमारसिंहाची शाखा सुरू झाली. त्याच्या मागून **मथनसिंह** व **पद्मसिंह** या त्याच्या पुत्रपौत्रांनी मेवाडवर राज्य केलें व त्यांच्या कारकीर्दीबरोबरच बारावें शतक संपलें. याही शतकांत

थोडासा काल वगळला तर मेवाडच्या परिस्थितींत फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. महंमूद गझनीच्या स्वाऱ्याही याच काळांत झाल्या. व त्यांमुळे पंजाब व सरहद्दप्रांत यांत अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. परंतु त्यांची झळ मेवाडला लागलेली दिसत नाही. आरबांच्या आक्रमणानंतर तुर्कांचीं आक्रमणें हिंदुस्थानवर सुरू झालीं; पण त्यांचा मेवाडशीं संघर्ष अद्याप यावयाचा होता. १००० पासून १२०० पर्यंत मेवाडच्या राजांनी निःसंदेहपणे आपलें स्वातंत्र्य सांभाळलें व आपल्या प्रजेची एकंदर समृद्धि वाढविली असेंच म्हणावें लागतें. सतत दोनशें वर्षे मिळणाऱ्या ह्या शांतीचा मेवाडच्या प्रजेचा अभ्युदय होण्यांत कसकसा उपयोग झाला याचा जरी सविस्तर इतिहास उपलब्ध नसला तरी एकंदर मेवाडची प्रजा ह्या कालांत सुखी राहिली असें अनुमान काढण्यास कांहीच हरकत नाही.

७. जैत्रसिंह

मेवाडच्या इतिहासांत जैत्रसिंह हा एक फार प्रबळ, पराक्रमी, महत्त्वाचा व लक्षांत ठेवण्यासारखा पुरुष झाला. तो मोठा रणरंगी असून त्याने आसपासच्या राजांशीं व दिल्लीच्या सुलतानाशींही लढाया मारल्या व त्यांचा पराजय केला. जैत्रसिंह तेराव्या शतकाच्या पूर्वार्धांत झाला. त्यावेळीं महंमद घोरीचा व पृथ्वीराजाचा संग्राम होऊन उत्तर हिंदुस्थानांतलीं बलिष्ठ हिंदुराज्यें नष्ट झालीं होतीं. सिंध व दिल्ली या ठिकाणीं मुसलमानी सुलतानशाह्या स्थापन झाल्या होत्या. दिल्लीचें सुलतानपद गुलाम घराण्याकडे आलें असून जैत्रसिंहाच्या समकालीन शम्सउद्दीन अल्तमष हा १२१० मध्ये दिल्लीच्या तख्तावर बसला होता. या वेळीं राजस्थानांत एक मेवाडचें राज्य सोडून दिलें तर ह्या मुसलमान सुलतानशाहीशीं तोंड देऊं शकेल असें प्रबल हिंदुराज्य राहिलें नव्हतें; व उरल्या सुरल्या मेवाडचा व त्याच्या आश्रयाने राहणाऱ्या राजस्थानांतील अन्य राजपूत राज्यांचा नाश करून तीं गिळंकृत करावीं अशी महत्वाकांक्षा सुलतानाच्या ठिकाणीं असणें स्वाभाविक होतें. सुलतान शम्सउद्दीन अल्तमषाने राजपुतान्यावर कित्येक स्वाऱ्या केल्याची हकीकत मुसलमानी तवारिखांमधून लिहिलेली आहे. अल्तमषने मेवाडवर केलेल्या

स्वारींत नागडा (नागद्र उर्फ नागऱ्हद) काबीज केलें व नंतर जैत्रसिंहाशीं त्याचा सामना झाला. जैत्रसिंहाने या लढाईंत त्याचा चांगलाच पराभव केल्यामुळे मुसलमानी सैन्याची दाणादाण उडाली व ते पळून गेले.

जैत्रसिंहाला आपल्या काळच्या सर्वच मुसलमान सुलतानांबरोबर लढाया कराव्या लागल्या. त्यांच्या वाढत्या सत्तेस प्रतिबंध घालणारा व त्यांना आपल्या तरवारीचें पाणी दाखविणारा हाच एक त्या काळचा हिंदु राजा दिसतो. सिंधमध्ये त्या काळीं फिरून मुसलमानी अंमल स्थापन झाला होता. गुलाम नासिरुद्दीन कुबाच नांवाचा कुतबुद्दीन ऐबकाचा जावई सिंधप्रांत बळकावून बसला होता. जैत्रसिंहाच्या वेळीं त्या प्रांतावर जलालुद्दीन खार्जमी अंमल गाजवीत होता. या जलालुद्दिनाने सिंध प्रांतांत कहर चालविला होता. ठठ्ठा व इतर ठिकाणचीं हिंदु मंदिरें मोडून व भ्रष्ट करून त्या ठिकाणीं त्याने मशिदी उभारल्या होत्या. खवासखां नांवाच्या त्याच्या सरदाराने अनहिलवाडावर स्वारी करून मोठी लूटमार केली होती. जैत्रसिंहास हें वर्तमान कळलें तेव्हा त्याने खवासखांचें सैन्य मारून काढलें. ह्या लढाईंत जैत्रसिंहाने केवढा जंगी विजय मिळविला व सिंधच्या मुसलमान सरदारांचा कसा बीमोड केला याचें वर्णन आबूच्या एका शिलालेखांत आढळतें. त्यांत म्हटलें आहे की, 'सिंधुकांच्या सेनेचें रक्त पिऊन मत्त झालेल्या पिशाचिनींच्या आनंदांत मग्न झालेले पिशाच्च-गण रणक्षेत्रांत अद्याप जैत्रसिंहाच्या भुजबलाची प्रशंसा करीत आहेत.'

जैत्रसिंहाने बराच दीर्घकालपर्यंत राज्य केलें. इ. स. १२६१ सालीं त्याचा देहान्त झाला असावा. तत्पूर्वी त्यास फिरून एकवेळ दिल्लीचा सुलतान नासिरुद्दीन यास मार द्यावा लागला. त्याच्या ह्या कारकीर्दींत दिल्लीस एकंदर तीन सुलतान झाले. परंतु ह्यांपैकी कोणाचीही ठाकुरकी त्याच्यापुढे चालली नाही. त्याच्या शौर्याची प्रशंसा त्याच्या शत्रूंना सुद्धा केली आहे. चीरव्याच्या शिलालेखांत त्याचें पुढीलप्रमाणे यथायोग्य व स्फूर्तिप्रद वर्णन केलें आहे. "आपल्या शत्रुराजांना जैत्रसिंह हा प्रलय-कालच्या मारुतासारखा भासत होता. त्याला पाहून कोणाचें चित्त कंपित होत नव्हतें? माळवा, गुजराथ, मारवाड, जांगलदेश अथवा म्लेंच्छ यांच्या अधिपतींपैकी कोणीही त्याचें मानमर्दन करूं शकला नाही."

न मालवीयेन न गौर्जरेण न मारवेशेन न जांगलेन ।
म्लेंच्छाधिनाथेन कदापि मानो म्लानिं न निन्ये ? वपस्व यस्य ।।

त्याच्या काळांतील कोरलेले शिलालेख व पुस्तकें उपलब्ध झालीं आहेत. त्याच्या वेळेपासूनच मेवाडची राजधानी चितोड येथे नेण्यांत आली.

जैत्रसिंहाच्या नंतर त्याचा पुत्र तेजसिंह मेवाडच्या गादीवर बसला. तोंपर्यंत मेवाडचा गौरव अतिशय वाढला होता. सर्व राजमंडळांत मेवाडला मान मिळूं लागला होता ही गोष्ट तेजसिंहाला 'परमभट्टारक' 'महाराजाधिराज' व 'परमेश्वर' या पदव्या होत्या यावरून व्यक्त होतें.

तेजसिंहाने बारा तेरा वर्षे राज्य केलें व त्याच्या मागून त्याचा पुत्र समरसिंह गादीवर आला. हा समरसिंह मोठा पराक्रमी व सद्धर्मवर्ती पुरुष झाला. 'शत्रुसंहारसिंह, अतिशूर, चंद्रिकेप्रमाणे धवल कीर्तिमान, स्वहितविहितकर्मा आणि सद्धर्ममर्मा' अशा विशेषणांनी तत्कालीन विद्वानांनी त्याचा गौरव केला आहे. दिल्लीचा सुलतान गयासउद्दीन बल्बन याच्या सरदारांनी गुजराथच्या हिंदु राज्यावर स्वारी केली असतां समरसिंह त्याच्या मदतीस धावून गेला व मुसलमान सेनेचा मोड करून त्याने 'घोर अशा तुरुष्क सेनारूपी अर्णवांत बुडालेल्या गुर्जर भूमीचा उद्धार केला' असें त्याचें वर्णन आढळतें.

तो जसा शूर होता तसाच उदार व मातृभक्तही होता. त्याने आपली माता जयतल्लदेवी हिच्या आज्ञेवरून अनेक मंदिरें बांधलीं व जुन्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. आपल्या प्रजेला तो समानतेने वागवी व स्वतः कडवा हिंदु असूनही जैन पंडितांचा देखील मोठा आदर करी व त्यांच्याही मठांना व मंदिरांना मोठमोठ्या देणग्या देऊन त्यांचें पोषण करीत असे. तेराव्या शतकाबरोबरच समरसिंहाचाही अंत झाला. त्याच्या मागून त्याचा पुत्र रत्नसिंह गादीवर बसला. समरसिंहाचा दुसरा पुत्र शुभकर्ण हा नेपाळांत गेला व तेथे त्याने नेपाळचा राजवंश स्थापन केला.

८. तेराव्या शतकाचें सिंहावलोकन

राजस्थानच्या इतिहासांत तेरावें शतक फार महत्त्वाचें गेलें. मसलमानी सत्ता भारताच्या अन्य भागांत बळावूं लागली होती. अनेक

मुसलमान आक्रमकांनी या शतकांत राजस्थानवर व मेवाडवर स्वाऱ्या करण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु तो सफल झाला नाही. मेवाडच्या शूर राजांनी केवळ आपल्याच स्वातंत्र्याचें रक्षण केलें असें नव्हे, तर आसपासच्या त्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या अनेक हिंदु राजांना वेळोवेळीं मदत करून त्यांचेंही स्वातंत्र्य अबाधित राखलें.

मुसलमानांचा वाढता जोर त्यांनीच दाबला. या शतकांत मेवाडच्या राजपुरुषांनी दिल्लीच्या सुलतानांना वेळोवेळीं नामोहरम केलें त्याचें स्मरण त्यांच्या वंशजांना अखेरपर्यंत राहिलें. जोंपर्यंत मेवाडचें दमन होत नाही तोंपर्यंत आपण भलेही दिल्लीचे सुलतान असलों तरी आपला पाय पुढे सरकूं शकत नाही व आपणास अनिर्वेध राज्यसत्तेचा उपभोग घेतां येत नाही एवढी दचक त्यांच्या मनांत निर्माण झाली. त्यामुळे ह्या-पुढच्या काळांत दिल्लीच्या तख्तावर आरूढ होणाऱ्या प्रत्येक मुसलमान सुलतानाची अथवा बादशहाची चितोड सर करणें ही महत्त्वाकांक्षा होऊन बसली. या शतकांत मेवाडच्या प्रजेच्या ऐश्वर्यांत बरीच भर पडलेली दिसते. हिंदु व जैन सर्वच धर्मांची प्रजा मेवाडाधिपतींच्या शासनाखाली आनंदाने व सुखाने राहिली. त्यांच्यावरोबर कोणतेंही भेदभावाचें वर्तन करण्यांत आलें नाही. अनेक भव्य मंदिरें व मठ यांची उभारणी, हिंदु व जैन धर्माचार्य यांना देणग्या व पुरस्कार, सर्व जातीच्या विद्वानांचा सत्कार व विद्या कलांचा पुरस्कार यांनी मेवाडचे राजे प्रजेचे विश्वासपात्र झाले होते. त्यांनी कोणावर जुलूम केल्याचें वर्णन कोठेही आढळत नाही. सारांश, राजधर्माचें पालन ते कसोशीने करीत होते.

ह्या ठिकाणीं आणखीही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, मेवाडच्या राजांची प्रदेशविस्तार करावा ही महत्त्वाकांक्षा कधीच नव्हती. आपण सुखाने नांदावें व दुसऱ्यासही स्वातंत्र्याने नांदूं द्यावें असा त्यांचा बाणा दिसतो. त्यांनी आपण होऊन कधी कोणाची खोडी केली नाही. पण त्यांच्या स्वातंत्र्यावर आघात करणारास योग्य शासन करण्यासही त्यांनी कमी केलें नाही. आपल्या देशाचें स्वातंत्र्य रक्षण करून आपल्या प्रजेसह ते मोठ्या गुण्यागोविंदाने नांदले. बाप्पापासून समरसिंहाचा पांचशें वर्षांचा काल मेवाडला एकसारखा भरभराटीचा व शांततेचा गेला

महंमदी आक्रमक तर त्याच्या स्वातंत्र्यास स्पर्शही करूं शकले नाहीत. एकसारखीं सतत पांचशें वर्षेंपर्यंत अव्याहत शांतीचा उपभोग घेण्याचें भाग्य फार थोड्या देशांच्या वाट्यास येतें. या शतकांत मेवाडची राजधानी चितोड येथे आली. यापूर्वी ती कधी आहाड येथे, तर कधी नागडा येथे असे. तेरावें शतक म्हणजे मेवाडच्या वैभवाचा पहिला हप्ता होय. यानंतर कांही दिवस मेवाडला अतिघोर आपत्तीचे गेले. त्याचा इतिहास यापुढील प्रकरणांत वर्णन करावयाचा आहे.

प्रकरण पांचवें

१. सामान्य परिस्थिति.

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धांत गुलाम घराण्याचा नाश होऊन दिल्लीच्या तख्तावर खिलजी घराणें आरूढ झालें होतें. चौदाव्या शतकाच्या प्रारंभीं, चुलत्याचा गफलतीने व कपटाने वध करणारा धर्मांध, जुलमी व अत्याचारी अल्लाउद्दीन दिल्लीची सुलतानशाही गाजवीत होता. मलिक काफूर नांवाच्या त्याच्या बाटून मुसलमान झालेल्या सेनापतीने आपल्या बाटग्या धर्मवेडाच्या भरांत आसेतुहिमाचल भारतवर्ष काबीज करून त्यांतील राजांच्या मुकुटांना आपल्या धन्याच्या पदधूलींत मिळविलें होतें. अद्याप एकटचा मेवाडचा रक्तलांछित आदित्यध्वज मात्र आपल्या गौरवाने चितोडवर तळपत होता. त्याची व त्याच्या देशाच्या गौरवाची शोभा पद्मिनी—मेवाडची स्वामिनी—आपल्या सौंदर्याने वृद्धिंगत करीत होती. तिच्या लावण्यकमलाचा सुगंध चितोडच्या पहाडावरून निखिल भरतवर्षांत पसरत होता; व ऐहिक सुखाकांक्षेच्या उन्मादाने उत्तेजित झालेल्या अल्लाउद्दिनच्या घ्राणेंद्रियापर्यंतही तो जाऊन पोचला होता. हें असलें लावण्यकमल रुक्ष राजस्थानच्या एका भिकार पहाडावर असण्यापेक्षा अमिरी दिल्लीच्या भव्य राजप्रासादास अधिक शोभा देईल असें त्यास वाटूं लागलें. तो आपणास 'सिकंदरसानी' म्हणजे प्रतिसिकंदर समजत असे व ही आपली पदवी त्याने आतापर्यंतच्या चरित्रावरून

सार्थ करून दाखविली होती. अनहिलवाडा, धार, अवंती, मंडोर, देवगिरी, वारंगळ व द्वारावती यांसारख्या पुरातन कालापासून आपल्या गौरवाबद्दल प्रसिद्ध असलेल्या नगरी व कोण्यानकोण्या काळीं आपल्या चक्रवर्तित्वाबद्दल प्रख्यात असलेले त्यांतील सोळंखी, प्रमार, पुरिहार, चालुक्य, यादव इत्यादि वंशांचे नृपति त्याने उध्वस्त करून टाकले होते; व भरतवर्षाच्या इतिहासांतून त्यांचें नांव कायमचें पुसून टाकलें होतें. याच दुर्दैवी देशांच्या यादींत मेवाडला नेऊन बसवावें व पद्मिनीसारखें रत्न उपटावें असा त्याने निश्चय केला.

२. अल्लाउद्दिनची चितोडवर स्वारी.

रत्नसिंहास मेवाडच्या गादीवर येऊन पुरतीं तीन वर्षें झालीं नव्हतीं तोंच १३०३ मध्ये अल्लाउद्दीनने मेवाडवर भयंकर स्वारी केली. मुसलमानांचा सेनासागर व द्रव्यनिधि अफाट होता. रत्नसिंहास मदत करील असा एकही हिंदु राजा भरतवर्षांत शेष नव्हता. त्याची सर्व भिस्त मेवाडच्या भूमींत उत्पन्न झालेल्या राजपुतांवरच होती. मेवाडचा स्वातंत्र्यनाश व पद्मिनीचा मानभंग यांसाठी अल्लाउद्दिन तडफडत होता. तर आपल्या सर्वस्वाची आहुति देऊनही त्या उभयतांचें संरक्षण करण्यास मेवाडचे पुत्र तयार होते.

अल्लाउद्दिनची सेना मेवाडांत घुसून तिने देश उध्वस्त करून टाकला; व चितोडास वेढा दिला. ह्या वेढ्याच्या अनेक रम्य कथा आजवर प्रचलित आहेत. इतिहासाच्या निकषावर घासल्यानंतर ह्यांत कविकल्पनाच अधिक दिसत असली तरी त्यांतील सत्यांशामुळेच त्या अतिशय लोकप्रिय आहेत. मेवाडचे चारण त्या मोठ्या स्फूर्तीने वर्णन करून सांगतात. आजपर्यंतच्या इतिहासकारांनीही त्यांचें रसभरित वर्णन केलें असलें तरी प्रस्तुत इतिहासांत संशोधनांतीं सत्य म्हणून ठरलेला तेवढाच भाग वर्णन करण्यांत येईल.

सकृद्दर्शनींच हें सांगणें जरून आहे की, कर्नल टॉडने लिहिलेला राजस्थानचा बराच इतिहास वर्तमान संशोधकांनी असत्य व निराधार ठरविला आहे. टॉड म्हणतो. "अज्ञान बालक लक्ष्मणसिंह हा मेवाडचा

स्वामी व त्याच्यातर्फे त्याचा चुलता भीमसिंह त्याचा प्रतिनिधि होता व पद्मिनी त्याची पत्नी होती." परंतु त्याने दिलेलें हें सर्व नातें निर्मूल आहे. आपण वर पाहिल्याप्रमाणे या वेळीं रत्नसिंह हाच मेवाडचा अधिपति होता व पद्मिनी ही त्याचीच पत्नी होती. लक्ष्मणसिंह हा एक केवळ त्याच्याच कुळांतला सिसोद्याचा सामंत होता. तो भीमसिंहाचा नातु होता; आणि मेवाडवरील आपत्ति जाणून तो या वेळीं रत्नसिंहाच्या साह्यार्थ आपल्या सातही पुत्रांना बरोबर घेऊन चितौड येथे धावून आला होता. त्याच्या प्रमाणेच अनेक सरदार व सामन्त या वेळीं मेवाडचें स्वातंत्र्य व पद्मिनीचें शील यांचें संरक्षण करण्यासाठी चितोडावर जमा झाले होते. इलियटने आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत तत्कालीन मुसलमान लेखकांच्या आधारें त्या वेळीं तीस हजार राजपूत वीर समरांगणावर पडले असें म्हटलें आहे. यावरून त्यापेक्षाही जास्त राजपूत सेना तेथे जमली असावी हें उघड आहे.

३. लक्ष्मणसिंहाचा आत्मत्याग.

हा वेढा सुमारें सहा महिने चालला व त्यांत राजपुतांनी आपल्या शौर्याची पराकाष्ठा केली. रत्नसिंह लढाईंत मारला गेला तेव्हा वृद्ध लक्ष्मणसिंहाने स्वतः सेनापतिपद धारण करून लढाई चालविली. त्याने मुसलमानांचा चांगलाच संहार केला. परंतु अखेरीस मातृभूमीच्या संरक्षणार्थ पेटलेल्या त्या यज्ञकुंडांत त्याचा व त्याच्या सातही पुत्रांचा हवि पडला. रत्नसिंहाच्या मृत्यूनंतरही लक्ष्मणसिंहाने जें हें धैर्य दाखविलें त्याबद्दल कुंभलगडच्या शिलालेखांत त्याची पुढीलप्रमाणे यथार्थ प्रशंसा करण्यांत आली आहे. "आपल्या पुत्रास म्हणजे रत्नसिंहास चित्रकूटाचलाच्या रक्षणार्थ नियुक्त करून तो 'महेशपूजाहतकल्मषौघ' समरसिंह पृथ्वीपति होता, तो स्वर्गपति झाला. परंतु तोही जेव्हा मारला गेला तेव्हा खुम्माणवंशांतल्या लक्ष्मणसिंहाने त्या दुर्गश्रेष्ठाचें रक्षण केलें. कारण

कुलस्थितिं कापुरुषैर्विमुक्तां न जातु धीराः पुरुषास्त्यजंति ॥

'हलक्या लोकांनी जरी कुलस्थिति सोडली तरी धीर पुरुष तिचा कधी त्याग करीत नाहीत.' याप्रमाणे युद्धांत म्लेच्छसंहार करून चित्रकूटाचलाचें (चितोडचें) रक्षण करीत असतांना तो शस्त्रपूत असा लक्ष्मणसिंहही स्वर्गास गेला."

४. पद्मिनीचा जोहार.

लक्ष्मणसिंहानें आपल्या सातही पुत्रांसह या युद्धांत कसें आत्मार्पण केलें तो सर्व इतिहास मोठा अद्भुत व रोमांचकारी आहे. त्याच्या सातही पुत्रांनी अहमहमिकेने या युद्धांत भाग घेऊन म्लेंच्छांचा संहार करीत आपलीं शिरकमलें मातृभूमीच्या चरणीं अर्पण केलीं. आता यशप्राप्तीची कोणतीही आशा राहिली नाही, असें पाहून वृद्ध लक्ष्मणसिंहाने आपले सर्व सैनिक बोलावून अखेरच्या हल्ल्याची तयारी केली. मरण्या–मारण्याच्या निश्चयाने आपला सेनापति तयार झालेला पाहून सर्व राजपूत वीर 'मारतां मारतां मरावें। तेणें सद्गतीस पावावें।' या सिद्धांतानुसार शत्रूवर तुटून पडून अखेरचा प्रयत्न करून पाहण्यास तयार झाले. सर्वांनी अखेरचे रणवेश चढविले.

पुरुषांचें हें आत्मसमर्पण होण्यापूर्वी त्यांना आणखी एका दिव्यांतून पार पडावयाचें होतें. हें दिव्य म्हणजे स्त्रियांचा जोहार होय. राजपुतांच्या इतिहासांतला हा विशेष अद्भुत व रोमांचकारी भाग आहे. ज्या पद्मिनीच्या प्रीत्यर्थ चितोडचा सर्वनाश झाला ती तरी आता जगून काय करणार होती ? आणि तिच्याबरोबर चितोडगडांतील यच्चयावत विधवा होऊं घातलेल्या व झालेल्या, राजपुतांच्या स्त्रिया तरी जगून काय करणार होत्या ? चितोडच्या राजपूत स्त्रियांना आपल्या पतींनी रणांत जाऊन मरावें व आपण विधवा होऊन इस्लामी विटंबनेस पात्र व्हावें ही गोष्ट रुचणें शक्य नव्हतें. दुष्ट व पापी मुसलमानांच्या कामवासनेस मेवाडची सती राजपुतिनी कधीच बळी पडली नाही असा तिचा आजवर लौकिक आहे. ती माहेरीं जाण्याच्या आनंदाने मृत्युपथाचा मार्ग आक्रमू लागते. परंतु आपलें सतीव्रत कधीही सोडीत नाही. म्हणून आपल्या पतींच्या आधीच स्वर्गलोकाच्या दारांत पंचारत्या घेऊन उभें राहण्याचा व त्याचें स्वागत करण्याचा त्यांनी निश्चय केला.

५. ता. २६ आगस्ट १३०३.

त्यांच्या जोहाराचें टॉडने जें वर्णन केलें आहे, तें हृदय थरारून सोडणारें आहे. तो म्हणतो, "पंधरा हजार राजपुतिनी, लहानमोठ्या

सर्व, चितोडगडावर एकत्र जमल्या. पद्मिनीसह त्यांनी मंगल सुवासिनींचा पोषाख चढविला; व ह्या सर्वजणी तळघरांत शिरल्या; सर्व प्रकारचे ज्वालाग्राही पदार्थ त्यांत भरण्यांत आले. सौंदर्यराणी पद्मिनीच्या सभोवार बसून सौभाग्याचीं मंगलगीतें गाणाऱ्या त्या सर्व राजपुतिनींच्या शील-संरक्षणार्थ राजपूत वीरांनी स्वहस्तें त्या तळघरास अग्नि लावला आणि स्वतः एकलिंगजीचा जयघोष करीत चितोगडाची दारें सताड उघडीं टाकून ते यवन सैन्यावर जाऊन तुटून पडले. थोड्याच वेळांत चितोड अल्लाउद्दीलच्या स्वाधीन झाला. पण तेथे काय होतें? चितोडचें एक कुत्रेंही पारतंत्र्यांत राहण्यास तयार नव्हतें. दगड, विटा व माती यांनी भरलेला तो निर्जीव गड पाहून क्रूर अल्लाउद्दिनचें काळीज थरारलें. पंधरा सहस्र स्त्रियांच्या जोहाराचें तें भयंकर दृश्य पाहून त्याची दृष्टि क्षणभर अंध झाली."

यानंतर अल्लाउद्दिनने गडावर सापडलेल्या प्रत्येक सजीव व निर्जीव पदार्थाचा नाश करविला. राजपूत कारागिरीचा अवशेष म्हणून राहणारी प्रत्येक गोष्ट त्याने जमीनदोस्त करून टाकली. त्याने केलेला हा चितोडचा विध्वंस इतिहासांत चितोडचा पहिला 'शाका' म्हणून प्रसिद्ध आहे. साडेसातशें वर्षांच्या परिश्रमाने मिळविलेलें मेवाडचें वैभव अल्लाउद्दीनने आपल्या क्रोधाग्नींत क्षणमात्रांत भस्म केलें. याप्रमाणें चितोडचा विध्वंस करून व आपला ज्येष्ठ पुत्र खिजरखां यास मेवाडचा सुभेदार नेमून अल्लाउद्दिन दिल्लीस परत गेला.

६. सुलतानशाहीचीं शकलें व मेवाडचें पुनरुथ्थान.

यानंतर मेवाडवर १० वर्षेंपर्यंत मुसलमानी शासन राहिलें. या राष्ट्राच्या गेल्या साडेसातशें वर्षांच्या आयुष्यांत यावनी शासनाखाली राहण्याचा हाच पहिला दुर्दैवी प्रसंग होय. पण चितोडच्या विध्वंसाने व मेवाड जयाने अल्लाउद्दिनचें वैभव वाढूं शकलें नाही. आपलें गतस्वातंत्र्य परत मिळविण्याचे मेवाडच्या शूर राजपुतांनी जे यशस्वी प्रयत्न केले, त्यांचा इतिहास पुढे येणारच आहे. पण त्याला पार्श्वभूमीसारखी असलेली तत्कालीन खिलजी साम्राज्याची परिस्थिति थोडी अवलोकन केली

पाहिजे. फिरिश्ता लिहितो, "आता सुलतानाच्या साम्राज्यरवीचें तेज मंद होऊं लागलें होतें. फार दारू प्याल्याने त्याचें आरोग्य बिघडलें व तो अतिशय आजारी झाला. त्याची बेगम मलिकजहां व पुत्र खिजरखां यांनी त्याची बिलकूल फिकीर केली नाही. त्यामुळे दक्षिणदिग्विजयास गेलेल्या मलिक काफूरला त्याने परत बोलावून घेतलें व त्याच्याजवळ आपली बेगम व शहाजादा यांसंबंधीं गाऱ्हाणें केलें. मलिक काफूर पुष्कळ दिवसांपासून स्वत: सुलतान बनण्याचा प्रयत्न करीत होता. त्याने आता अल्लाउद्दिनच्या कुटुम्बाचा नाश करण्याचें कपट रचलें. त्याने सुलतानाच्या दोन्ही पुत्रांना कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाठवून दिलें. या दिवसांत संबंध राज्यांत बंडाची आग भडकूं लागली होती. बंडाच्या बातम्या ऐकून सुलतान क्रोधाने आपलेंच मांस कापूं लागला. शोक व क्रोध यांमुळे त्याचा आजार वाढतच गेला व त्यांतच १३१६ सालीं त्याचा देहांत झाला. मलिक काफूरने त्यास विषप्रयोग करून ठार मारलें असा संशय आहे."

७. स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न

अल्लाउद्दिनच्या आजाराची हकीकत ऐकून दिल्लीच्या सिंहासनाची अभिलाषा धरून खिजरखां चितोडचा किल्ला व मेवाडचा कारभार जालोरचा मांडलिक मालदेव याच्या स्वाधीन करून दिल्लीस निघून गेला. परंतु खिजरखां दहा वर्षें चितोडास असतां त्यास राजपुतांनी चैन पडूं दिलें नाही. आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न त्यांनी कसे चालू ठेवले हें आता पाहावयाचें आहे.

मागे कर्णसिंहाच्या वेळीं गुहिलोत घराण्याच्या रावळ व राणा अशा दोन शाखा होऊन पहिली चितोडास व दुसरी सिसोद्यास जाऊन राहिली हें आपण पाहिलेंच आहे. रावळशाखेचा अखेरचा तंतु **रत्नसिंह** याचा चितोडच्या वेढ्यांत अंत झाला. तसेंच राणा शाखेचा लक्ष्मणसिंह याचा व त्याच्या सात पुत्रांचाही त्याच लढाईंत नाश झाला. परंतु लक्ष्मणसिंहाचा कनिष्ठ पुत्र **अजयसिंह** हा घायाळ होऊन बचावला होता व

त्यास वंशवृद्धयर्थ चितोडवरील वेढयांतून बचावून बाहेर घालवून लावलें होतें. तोच यानंतर आपणास मेवाडचा राणा म्हणवूं लागला. या वेळेपासून मेवाडवर राणा शाखेचें आधिपत्य सुरू झालें.

८. छत्रपति शिवाजीचे पूर्वज

परंतु अजयसिंह हाच कांही एकटा लक्ष्मणसिंहाचा वारस नव्हता. कारण त्याचा ज्येष्ठ पुत्र अरिसिंह याने चंदाणा शाखेच्या एका गरीब राजपुत्राच्या देवी नामक पुत्रीबरोबर प्रेमविवाह लावला होता. ही मुलगी अत्यंत बलशाली असून तिने आपल्या भुजबळावर अजयसिंहास गवसला नाही असा एक प्रचंड रानडुक्कर केवळ बांबूच्या लाठीने मारला होता. तिच्या या सामर्थ्यावर खूष होऊनच अरिसिंहाने तिच्याशीं विवाह लावला होता. या बलशाली युवतीपासून त्यास एक पुत्रही झाला होता. परंतु बापाच्या भयाने अरिसिंहाने आपलें हें रहस्य प्रकट केलें नव्हतें. चितोडच्या जोहाराच्या वेळीं हा बालक अशा तऱ्हेने आपल्या आजोळीं अज्ञातवासांत असल्याने बचावला होता. हाच सुप्रसिद्ध राणा हम्मीर होय. अजयसिंह चितोडविध्वंसानंतर अरवली पर्वताच्या अगदी अंतर्भागांत व मेवाडच्या पश्चिम सरहद्दीवर असलेल्या खेलवाडयाच्या प्रदेशांत राहून वनवासी जीवन घालवूं लागला. त्यासही सज्जनसिंह व क्षेमसिंह असे दोन पुत्र होते परंतु त्यांच्या ठिकाणीं पुनश्च आपल्या पूर्वजांचें वैभव व मेवाडचें स्वातंत्र्य मिळविण्याचें सामर्थ्य नव्हतें. उलट हम्मीरचें धाडस, शौर्य व बुद्धिमत्ता यांचा परिचय अजयसिंहास झाला होता. म्हणून मेवाडच्या गादीचा हक्क त्याने आपल्या पुत्रांस न देतां हम्मीर यासच दिला. यामुळे विषण्ण होऊन सज्जनसिंह व क्षेमसिंह दक्षिणेंत निघून गेले व तिकडे त्यांनी बहामनी राज्यांत नोकरी पत्करली. यांपैकी सज्जनसिंहाच्या वंशांतच सुप्रसिद्ध छत्रपति शिवाजी महाराजांचा जन्म झाला. शिवाजीचें हें सीसोदियाकुलोद्भवत्व कै. राजवाडे वगैरे विद्वानांनी नाकारलें होतें. परंतु कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्रि. डॉ. बाळकृष्ण यांनी ही गोष्ट सत्य असल्याचें आपल्या शिवाजीच्या चरित्रांत बलवत्तर प्रमाणांनी सिद्ध केलें असल्याने त्याबद्दल संशय घेण्यास आता जागा नाही.

९. महाराणा हंमीर

अजयसिंहाचे पाय पुनः चितोडास लागले नाहीत. त्याचा देहान्त झाल्यावर हंमीरने आपणास मेवाडचा राणा म्हणून घोषित केलें. तेव्हा पासून मातृभूमीच्या स्वतंत्र्यासाठी हंमीरने आपली तरवार जी एकदा म्यानांतून बाहेर काढली ती पुनः कधी म्यान केली नाही. त्याने प्रथम खेलवाड्यामध्ये आपला व्यवस्थित जम बसविला व नंतर त्याने चितोडकडे मोर्चा वळविला. चितोडवर खिजरखां आपलें आसन जमवून होता. अद्यापि त्यास हाकून देण्याइतकें हंमीरचें सामर्थ्य वाढलें नव्हतें, म्हणून त्याने एका निराळ्याच युक्तीचा अवलंब केला. त्याने मेवाडांतील मुसलमानी राज्यावर बहिष्कार पुकारला व मुसलमानी अमलाखाली असलेल्या मेवाडच्या आपल्या प्रजेस घरेंदारें सोडून स्वतंत्र खेलवाड्यांत येऊन राहण्याची त्याने आज्ञा केली. सुमारें आठदहा वर्षांनी गुहिलोतवंशीय राण्याची आज्ञा कानीं पडतांच त्याच्या दर्शनाकांक्षेने मेवाडची देशाभिमानी प्रजा सर्वसंगपरित्याग करून खेलवाड्यास गेली. मेवाड ओस पडलें. खेलवाड्याच्या जंगलांत आबाद नगरीची वसति झाली. अरवलीच्या पूर्वपश्चिम भागांत हंमीरने आपल्या प्रजेच्या वसतीची सोय लाविली.

अशा तऱ्हेने एका बाजूने त्याने शत्रूच्या ताब्यांत असलेला प्रदेश निर्जन व राज्य करण्यास नालायक करून टाकला; तर दुसऱ्या बाजूने मेवाडमध्ये जाण्यायेण्याचे सर्व रस्ते अडवून आंतबाहेर जाणेंयेणें करणाऱ्या शत्रुसेनेंवर व तीस जाऊन मिळालेल्या स्वकीय प्रजेवरही गनिमी हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. हंमीर व त्याची प्रजा पहाडी मुलखांत सुरक्षित होती. ह्यामुळे शत्रु त्यांचें कांही एक वाकडें करूं शकत नव्हता. परंतु हंमीर मात्र अचानकपणें आपल्या पहाडांतून बाहेर पडून शत्रूवर हल्ले चढवी व त्यांना बेजारहैराण करून टाकी. पहाडी मुलखांतून भिल्ल इत्यादि जातींशीं सख्य जोडून हंमीरने त्यांना आपले कायमचे मित्र बनविलें व त्यांच्याच साह्याने मेवाडच्या सर्व वाटा रोखून शत्रूचें दिल्लीदरबारशीं अथवा दुसरीकडे कोठेही दळणवळणच बंद करून टाकलें. हंमीरच्या या त्रासाने त्रस्त झालेला खिजरखां मेवाडचा कारभार

मालदेवाच्या सुपूर्त करून अल्लाउद्दिनच्या आजाराचें निमित्त करून दिल्लीस निघून गेला.

मेवाडच्या सीमाप्रदेशावरील अल्लाउद्दीनने भग्न करून टाकलेले किल्लेकोट हंमीरने पुनः बांधले. हम्मीरच्या हल्ल्यांनी मेवाडांत उरलेल्या स्वातंत्र्याभिमानशून्य प्रजेस आपल्या शेताची लागवड देखील करणें अशक्य झालें. अशा तऱ्हेने राजकीय व आर्थिक बहिष्काराचें शस्त्र उपसून हंमीरने आपल्या शत्रूस दे माय धरणी ठाय करून सोडलें. हंमीरच्या भयाने संत्रस्त झालेल्या मालदेवाने आपली मुलगी हंमीरास देऊन त्याशीं सख्य जोडलें, पण लग्नाच्या निमित्ताने चितोडवर गेलेल्या हंमीरने तेथील यवनरक्षकास बांधून किल्ल्याखाली पटकून दिलें व अकल्पितपणें गडावर आपला ताबा मिळविला व त्यावर आदित्यध्वज फडकविला. अशा तऱ्हेने अवघ्या पंचवीस वर्षांच्या आंत यवनांच्या ताब्यांत गेलेला आपला मातृदेश हंमीरने स्वतंत्र केला. गुहिलवंशाचा तोच आपला आवडता रक्तलांछित आदित्यध्वज आपल्या पूर्वतेजाने मेवाडच्या भूमीवर चितोडगडच्या बुरुजांवरून पुनश्च फडकूं लागला. त्यास पाहिल्याबरोबर आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचे प्रवाहचे प्रवाह कुंभळमेरांतून, खेलवाड्यांतून, जंगलांतून, दऱ्याखोऱ्यांतून व पहाडाच्या शिखरांवरून मेवाडांत आपापल्या गावीं येऊन राहूं लागले. मेवाडच्या स्वातंत्र्याच्या वार्तेने अल्लाउद्दिनच्या मागाहून गादीवर आलेल्या महंमद तुघ्लकाच्या तोंडचें तर पाणीच पळालें. हंमीर मेवाडचा महाराणा झाला.

हंमीर मेवाडच्या गादीवर बसल्याने सर्व हिंदुमात्राचें लक्ष त्याच्याकडे वेधलें गेलें. अवघ्या पंचवीस वर्षांत प्रबळ सत्ताधारी सुलतानाच्या गुलामगिरींतून स्वदेशास मुक्त करणारा राष्ट्रपुरुष म्हणून त्याची अखिल राजस्थानांत ख्याति झाली. कारण त्या वेळीं स्वतंत्र प्रवृत्तीचा असा एकही हिंदु राजा आर्यावर्तांत उरला नव्हता. अल्लाउद्दिनच्या व महंमद तुघ्लकाच्या जुलमाने हिंदु प्रजा त्रस्त झाली होती. अशा आपत्प्रसंगीं एकाएकीं चितोडवर रक्तलांछित आदित्यध्वज फडकूं लागलेला पाहून अखिल आर्यावर्तास आनंद होणें स्वाभाविक आहे. मिळालेल्या संधीचा हंमीरने पुरेपूर उपयोग करून घेतला. अप्रतिहत व संतत हालचाली करून मोठ्या कौशल्याने मेवाडच्या संरक्षणाचा बंदोबस्त करून व मेवाडच्या

आसपासच्या त्याच्या विरुद्ध असलेल्या राजांना जिंकून अथवा मारून त्याने आपली सत्ता सर्वत्र प्रस्थापित केली. महंमद तुघ्लकाने त्याच्यावर प्रचंड सेना पाठविली; परंतु त्याने अपूर्व रणकौशल्याने तिचा फडशा पाडला. यानंतर पुनः शेंदीडशें वर्षें दिल्लीच्या सुलतानांनी मेवाडकडे वर भुवई उचलून पाहिलें नाही. चारी बाजूंच्या शत्रूंना दाबीत हंमीरच्या विजयाचा वारू बेफामपणें स्वैर धावत होता. चितोड येथील महावीर स्वामीच्या मंदिरांत सापडलेल्या शिलालेखांत त्याचें पुढीलप्रमाणें मोठें बहारदार वर्णन केलें आहे.

वंशे तत्र पवित्रचित्रचरितस्तेजस्विनामग्रणीः
श्रीहंमीरमहीपतिः स्म तपति क्ष्मापालवास्तोष्पतिः ।
तौरुष्कामितमुण्डमण्डलमिथःसंघट्टवाचालिता
यस्याद्यापि वदन्ति कीर्तिमभितः संग्रामसीमाभुवः ॥

"त्या वंशामध्ये पवित्र व आदर्श चरित्राचा व तेजस्वी लोकांचा अग्रणी असा पृथ्वीचें पालन करणारा हंमीर महीपति विराजत आहे. तुर्क लोकांचीं असंख्य मुण्डमण्डलें ज्यांच्यावर पडलीं आहेत असे समरांगणांच्या चारही सीमांचे प्रदेश अद्यापि त्याचें चोहोंकडे कीर्तिगान करीत आहेत." महाराणा कुंभकर्णाने लिहिलेल्या 'गीतगोविंदा'वरील 'रसिकप्रिया' नामक टीकेंत हंमीरचें वर्णन 'विषमघाटीपंचानन' म्हणजे विषम अशा संकटांना सिंहाप्रमाणें तोंड देणारा असें केलें आहे. रा. ब. ओझाजींनीही आपल्या इतिहासांत त्याचें असेंच वर्णन केलें आहे.

इ. स. १३६४ सालीं हंमीरचा देहान्त झाला. त्याने अर्धशतकाच्या वर आपली कारकीर्द गाजविली. पहिल्या भागांत आपल्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविलें; व दुसऱ्या भागांत दीर्घ प्रयत्नाने मेवाडला तत्कालीन भारतवर्षांत पुनः गौरवाचें स्थान प्राप्त करून दिलें.

पूर्वी मुसलमानांकडे असलेल्या पण पुढे हंमीरच्या पदरीं नोकरीस राहिलेल्या एका राजपूत सरदारास उद्देशून हंमीरने काढलेले पुढील उद्गार टॉडने दिले आहेत. "पोटभर खा, सेवा कर व इमानदारीने वाग. तूं एकदा तुर्कांचा गुलाम बनला होतास. आज तुझ्याच जातीच्या एका हिंदूचा तूं सेवक आहेस. हा चितोडगडचा खडक पहा! माझ्या

पूर्वजांच्या रक्ताने भिजून हा ओलाचिंब झाला आहे म्हणून मला तो अत्यंत पूजनीय आहे. तो आपल्या पृष्ठभागीं मला धारण करीत आहे व करील. माझ्या पूर्वजांप्रमाणें एखाद्या सुन्दर स्त्रीच्या मुखचंद्रास भाळून याचें स्वातंत्र्य मी पुनः धोक्यांत घालणार नाही." केवढें राष्ट्रीयत्व! केवढी प्रखर देशभक्ति!

१०. महाराणा क्षेत्रसिंह

हंमीरच्या नंतर त्याचा पुत्र क्षेत्रसिंह उर्फ खेतसी मेवाडच्या गादीवर आला व त्याने आपल्या पराक्रमी पित्याचें नांव पूर्णपणें राखलें. त्याने अनेक लढाया मारून बराच मुलूख काबीज केला व मुसलमानांना आपल्या तरवारीचें पाणी दाखविलें. मंडलगडचा किल्ला जिंकून हाडावतीचें राज्य त्याने आपल्या राज्यांत मिळविलें. त्याबद्दल शिलालेखांत म्हटलें आहे की,

दिल्लीचारुपुरेश्वरेण बलिना स्पृष्टोऽपि नो पाणिना
भग्नो विश्रुतमंडलाकृतिगढो जित्वा समस्तानरीन् ।

"ज्याला दिल्लीचा सुलतान स्पर्श देखील करूं शकला नाही असा मंडलगढचा सुप्रसिद्ध दुर्ग सर्व शत्रूंना मारून त्याने भग्न करून टाकला." त्याच्याइतकेच त्याचे सरदारही पराक्रमी व शूर होते. त्याच्या एका महादेव नामक हाडा सरदाराचें वर्णन शिलालेखांत पुढीलप्रमाणें केलें आहे. "त्याची तलवार शत्रूच्या डोळ्यांत भोवळ उत्पन्न करीत होती. त्याने अमीशाहवर आपली तलवार उपसून मेवाडचें रक्षण केलें. सुलतानाच्या सेनेस अपल्या पायाखाली कुचलून नरेंद्र क्षेत्रसिंहास विजय प्राप्त करून दिला." "माळव्याच्या मुसलमान सुभेदारास तर त्याने इतका जबरदस्त मार दिला की, तो 'भयेन चकितः स्वप्नेऽपि तं पश्यति' स्वप्नांत देखील त्याच्या भयाने दचकून उठत असे. सापाने जसें बेडकास पकडावें तसें त्याने त्यास पकडलें." वरील सर्व वर्णनावरून क्षेत्रसिंहाच्या 'भुजबल प्रतापाच्या' 'प्रौढी'ची कल्पना येऊं शकते. माळवा, दिल्ली व गुजराथ या तीन्ही बाजूंनी मुसलमानी सत्ता नांदत असतां क्षेत्रसिंहाने त्यांना डोकें काढूं दिलें नाही. शत्रूंवर त्याने विलक्षण दरारा बसविला होता.

जगत्त्राणकृत्यस्य पाणौ कृपाणः प्रसिद्धोऽभवद्भूपतिः खेतराणः ॥

"ज्याने जगाचें रक्षण करण्यासाठीच आपला कृपाण हातीं धरला होता तो खेतराणा प्रसिद्ध भूपति झाला" यांत नवल काय ?

११. महाराणा लाखा

इ. स. १३८२ सालीं क्षेत्रसिंहाच्या मागून त्याचा पुत्र महाराणा लक्ष्मणसिंह उर्फ लाखाराणा मेवाडच्या गादीवर आला. गादीवर आल्या-बरोबर त्याने बदनोरच्या पहाडी मुलखांतील मेड नांवाच्या जंगली जातींनी उभारलेलें बंड शमविलें. तोही मोठा उग्र तेजाचा असून 'त्याचा रणघोष ऐकतांच मेडांचा धैर्यध्वंस झाला' असें त्याचें वर्णन आहे. त्यांचा प्रदेश त्याने आपल्या राज्यास जोडला.

काशी, प्रयाग व गया हीं तीन हिंदूंचीं पवित्र तीर्थस्थानें मुसल-मानांच्या अंमलाखाली गेलीं होतीं, व तेथे जाणाऱ्या यात्रेकरूंवर मुसल-मान राजे आपला कर लादीत होते; त्यामुळे स्वतंत्र हिंदु राज्याची उभारणी करणाऱ्या प्रत्येक धर्मपरायण राजाचें हीं क्षेत्रें आपल्या ताब्यांत ठेवणें व तेथील जाचक कर नाहीसा करणें हें एक कर्तव्यच होऊन बसलें होतें. राजपूत राष्ट्रांच्या अमदानींत पहिल्या प्रथम लाखा राण्याने ही गोष्ट साधली व हिंदुमात्राला ह्या पवित्र तीर्थस्थलांची यात्रा सुलभ करून दिली.

ह्या राण्याची कारकीर्द त्याच्या पराक्रमापेक्षा त्याच्या पुण्य कृत्यां-बद्दल, त्याच्या औद्योगिक उन्नतीच्या प्रयत्नांबद्दल आणि विद्याकलांना त्याने दिलेल्या उत्तेजनाबद्दल प्रसिद्ध आहे. त्याने आपल्या राज्यांतील जावर नामक प्रदेशांत कथील व रुपें या धातूंचा शोध लावून त्याच्या खाणी खोदविल्या. ह्यायोगें त्याने मेवाडच्या संपत्तींत अतोनात भर घातली व प्रजेच्या औद्योगिक जीवनास चालना दिली. त्याने कित्येक मंदिरें बांधून कलाकौशल्य व सौंदर्य यांना फार उत्तेजन दिलें; कित्येक तळीं खोदविलीं व कित्येक किल्ले बांधले. याच राण्याच्या कारकीर्दींत उदयपूरचा प्रसिद्ध पिशोल्याचा तलाव प्रथम खोदण्यांत आला. त्याने आपली सुवर्णतुलाही केली होती. विद्वानांचाही त्याने चांगला गौरव केला व त्यांस मोठमोठीं

गावें इनाम देऊन पुरस्कृत केलें. त्याच्या शासनकाळांत केशव उर्फ झोटिंगभट्ट नांवाचा मोठा प्रसिद्ध वैदिक व शास्त्रार्थवेत्ता विद्वान होऊन गेला. केशवचा बाप नरहरि न्यायशास्त्र व वेदविद्या ह्यांत मोठा निपुण असून त्यास 'इलातलविरिंची' म्हणजे पृथ्वीवरचा ब्रह्मा अशी पदवी होती. लाखा राण्याने इ. स. १४२२ पर्यंत म्हणजे सुमारें चाळीस वर्षें राज्य केलें.

१२. चिरशांतीचा लाभ

चौदाव्या शतकाचा पहिला पाद मेवाडला पारतंत्र्यांत घालवावा लागला. परंतु त्यानंतर लगेच स्वतंत्र झालेल्या मेवाडचा सबंध शतकभर म्हणजे लाखाराण्याच्या मृत्यूपर्यंत अतोनात उत्कर्ष झाला. १३१० पासून १४२० पर्यंत ११० वर्षांत हंमीर, क्षेत्रसिंह व लाखा राणा हे तीनच राजे झाले. यावरूनच हे राजे किती दीर्घायुषी झाले याची कल्पना येते. त्यांनी आपल्या दीर्घ शासनकाळांत मेवाडच्या प्रजेला अपूर्व शांतीचा व समृद्धीचा लाभ करून दिला. या काळांतील मेवाडच्या उत्कर्षाचें टॉड वर्णन करतो, "ह्या काळांत मेवाडच्या प्रजेस केवळ शांतीचा नव्हे, तर उत्कट उत्कर्षाचाही लाभ मिळाला असें त्यांत निर्माण झालेल्या भव्य इमारती व अन्य सार्वजनिक स्मारकें यांवरून म्हणावें लागतें. मेवाडच्या घराण्यांत उत्पन्न झालेले राजे कलाकौशल्याचे व विशेषतः स्थापत्य शास्त्राचे अत्यंत पुरस्कर्ते होते. केवळ जमिनीच्या कराच्या रूपाने येणाऱ्या उत्पन्नामध्येच मोठमोठीं दिग्विजयी सैन्यें पोसणें आणि याबरोबरच सौंदर्य व कलांना इतक्या तऱ्हेने उत्तेजन देणें या गोष्टी त्यांना कशा साध्य करतां आल्या याचें कोणासही आश्चर्य वाटेल. चिरकाल टिकणारा अभ्युदय व पितृवत्सल व सौम्य अशी प्रजाहित-तत्पर राज्यव्यवस्था यांच्या योगेंच ह्या गोष्टी साध्य होऊं शकतील." या काळांत अल्लाउद्दिनचें आक्रमण सोडलें तर त्यानंतर फिरून मुसलमान आक्रमकांना मेवाडकडे वक्रभ्रूकटाक्ष करून पाहतां आलें नाही. मेवाडच्या नृपतींनी त्यांच्या अंतःकरणांत आपल्या संबंधीं खासें भय निर्माण केलें होतें.

प्रकरण सहावें

१. भीष्मप्रतिज्ञ चुंडा उर्फ चंद्रसिंह.

राजस्थानच्या इतिहासांत लाखा राण्याचा जेंष्ठ पुत्र चंद्रसिंह उर्फ चुण्डा याचें नांव मोठें आदरणीय समजलें जातें. कुरुवंशांत भीष्माने जी कामगिरी बजावली तीच रघुवंशाच्या या शाखेच्या अलीकडील इतिहासांत चुंडाने बजावली असल्याने त्याचें स्थान फार मोठें आहे. चुंडा फार वीर प्रकृतीचा व दाक्षिण्यशील पुरुष होता. अत्युत्कट पितृभक्तीचें, अपूर्व स्वार्थत्यागाचें व प्रखर राष्ट्राभिमानाचें ज्वलन्त उदाहरण त्याने राजपूत जातीसमोर ठेवलें असल्याने तो जरी प्रत्यक्ष मेवाडच्या गादीवर बसला नसला तरी त्याचा वृत्तांत वर्णिल्याशिवाय मेवाडचें इतिहासकथन संपूर्ण व सुसंगत होऊं शकत नाही.

लाखा राण्याचा वृद्धापकाल झाला होता व तरुण वीर चुंडा युवराजपदाचा अधिकारी होता. तो व त्याचा धाकटा भाऊ रघुवीर आपल्या प्रजावात्सल्यादि गुणांनी अत्यंत लोकप्रिय झाले होते. मेवाडच्या कुलपरंपरेप्रमाणे चुंडचाचा प्रथम पुत्र मेवाडचा उत्तराधिकारी होणार होता हें जाणून राठोडांचा राव रणमल्ल याने आपली कन्या हंसा चुंडास अर्पण करण्याच्या निश्चयाने नारळ पाठविला. त्या वेळीं थट्टेने आपल्या शुभ्र मिशांवरून हात फिरवून "आमच्यासारख्या वृद्धांना कोण आपली मुलगी देतो ?" असें लाखा राणा उद्गारला. थट्टेंत का होईना पण आपल्या पित्यानें ह्या कन्येचा अभिलाष व्यक्त केला हें पाहून, रणमल्लाने आपली मुलगी लाखा राण्यासच द्यावी असा पितृभक्त चुंडचाने आग्रह केला. परंतु आपल्या नातवाच्या भावी युवराजपदाच्या अभिलाषेने हंसा चुण्डास अर्पण करण्यास तयार असलेला रणमल्ल ती लाखास देण्यास तयार होईना. तेव्हा चुंडाने एकलिंगजीची शपथ घेऊन मेवाडच्या गादीवरचा

आपला हक्क सोडला व तो हंसेच्या मुलास अर्पण केल्याचा करार लिहून दिला आणि पुढे तिच्याबरोबर आग्रहपूर्वक लाखा राण्याचा विवाह घडवून आणला. चुंडाच्या ह्या अप्रतिम स्त्रीदाक्षिण्याकडे व पितृभक्तीकडे पाहून कर्नल टॉड म्हणतो,–"स्त्रीजातीचा निःसीम आदर हेंच सुधारणेचें अथवा सुसंस्कृतपणाचें प्रधान लक्षण मानलें तर त्यांत राजपुतांचा अनुक्रम सर्वांत वर लावावा लागेल."

या हंसाराणीच्या पोटींच राण्यास मोकल नांवाचा पुत्र झाला व लाखा राण्याच्या मृत्यूनंतर तोच मेवाडच्या गादीचा उत्तराधिकारी बनला. लाखाराणा मरण पावला तेव्हा आता चुण्डा आपलें वचन पाळील किंवा नाही याबद्दल हंसा राणीस शंका आल्यामुळे तिनें त्यास बोलावून 'तूं मोकलला एक जहागीर करून दे व माझी सती जाण्याची तयारी कर' असें सांगितलें. त्यावर चुण्डा म्हणाला, 'माताजी! मोकल मेवाडचा स्वामी. मी त्याचा एक नम्र सेवक आहें. मोकल अल्पवयी असल्यानें आपणास राजमाता बनून कारभार केला पाहिजे. सती जातां येणार नाही.' यावर तिने चुण्डाची अत्यंत प्रशंसा केली व मोकलला सिंहासनावर बसवून चुण्डाच्या स्वाधीन सर्व कारभार केला.

परंतु सत्ताभिलाषा व असूया कोणास सुटली आहे? कारभाराच्या निमित्ताने चुण्डाच्या हातांत गेलेली सत्ता आपणास आता परत मिळणें शक्य नाही; मोकलला व आपणास चुंडा मेवाडांत असेपर्यंत यावज्जन्म त्याच्याच दास्यांत राहावें लागणार असें तिला वाटूं लागलें. तिचा बाप रणमल्ल हाच ही कल्पना तिच्या मनांत भरवून देण्यास कारण होता. हंसाची इच्छा अधिकारग्रहणाची आहे हें कळतांच चुण्डाने सर्व कारभार तिच्या स्वाधीन करून स्वतः देशनिर्वासन केलें. चक्रवर्ति सम्राट होण्याचे सर्वगुण अंगीं असतांना केवळ पित्याच्या इच्छेसाठी आपल्या सापत्न भावास राज्याधिकार देणारा व मातेच्या इच्छेसाठी देशनिर्वासन करणारा चुण्डा राजस्थानांतला मोठा दिव्य पुरुष होय. राजपुतांचा इतिहास संशोधित करणारे रा. ब. ओझाजी म्हणतात, 'धन्य है चुण्डाकी पितृभक्ति। रघुकुल में या तो रामचंद्र ने पितृभक्ति के कारण ऐसा ज्वलन्त उदाहरण दिखलाया, या चुण्डाने। इसीसे चुण्डा के वंश का अबतक गौरव चला आता है।' महाराणा

लाखाने आपल्या मृत्यूच्या वेळीं चुण्डाच्या पितृभक्तीची स्मृति कायम राहावी म्हणून 'आजपासून मेवाडच्या महाराण्यातर्फे ज्या ज्या आज्ञा प्रचलित करण्यांत येतील त्या प्रत्येकीवर चुण्डा व त्याचे मुख्य वंशधर हेच भाल्याची मुद्रा करतील' अशी आज्ञा केली. तिचें पालन आजतागायत होत आहे.

२. महाराणा मोकल

मोकल सुद्धा पराक्रमी व कर्तृत्ववान पुरुष निपजला. दिल्लीचा सुलतान महंमद तुघ्लक याने जफरखां नांवाच्या सरदारास गुजरातचा सुभेदार नेमलें होतें व मोकल गादीवर आला त्या वेळीं हा जफरखां स्वतःच मुजफ्फरखां असा किताब धारण करून गुजरातचा स्वतंत्र सुलतान होऊन बसला होता. त्याच्या फिरोजखां नांवाच्या सरदाराने मेवाडच्या मुलखांत उपद्रव सुरू केला होता. तेव्हा महाराणा मोकलने स्वतः त्यावर स्वारी करून त्यास पिटाळून लावलें व आपल्या प्रजेचा त्रास वाचविला. कुंभलगडच्या एका शिलालेखांत मोकलच्या कारकीर्दीचें पुढीलप्रमाणें संक्षेपतः वर्णन केलें आहे. "त्याने सपादलक्ष (सांभरचा इलाखा) देश उध्वस्त केला. जालंधरवाल्यांना कंपायमान केलें. शाकंबरीला बळकाविलें, दिल्लीच्या सुलतानाच्या मनांत आपल्या स्वास्थ्यासंबंधीं संशय उत्पन्न केला आणि पीरोज व मुहम्मद यांचा पराभव केला." यावरून त्याच्या दराऱ्याने दिल्लीपति सुलतान सुद्धा भयभीत झाला होता असें दिसतें. सांभरचें खाऱ्या पाण्याचें सरोवर ज्या भागांत आहे तो सर्व भाग, जालोरचा प्रदेश व दिल्लीच्या सुलतानाच्या राज्यांतील कांही प्रदेश त्यानें जिंकला होता. "ज्याचा पक्ष बलवान आहे, शत्रूची लक्षावधि सेना ज्याने नष्ट केली आहे, मोठमोठ्या संग्रामांत ज्याने जय मिळविला आहे व दूरदूरच्या बातम्या दूतांच्या द्वारा ज्याला माहीत असतात" अशा प्रकारचें त्याचें वर्णन आढळतें व त्यावरून त्याच्या कर्तबगारीची व उत्तम शासनपद्धतीची कल्पना येते. आपल्या पूर्वजांप्रमाणेच मुसलमानांवरचा धाक त्यानें कायम ठेवला होता. सांभरच्या सरोवरांतून मीठ काढण्याचा व्यवसाय ताब्यांत घेऊन त्याने प्रजेचें उत्पन्न वाढविलें. लाखा राण्याने सुरू केलेली

अपूर्ण बांधकामें त्याने पूर्ण केलीं; व ब्राह्मणांच्या विद्याध्ययनाची व्यवस्था केली. चांदीसोन्याचीं चोवीस तुळादानें त्याने केलीं होतीं. यावरून त्याच्या वैभवाची कल्पना येते. १४३३ सालीं कांही आपसांतल्या वेबनावाने उत्पन्न झालेल्या मारामारींत तो मारला गेला.

३. स्वातंत्र्यमंदिराचा कळस

मोकलच्या नंतर महाराणा कुंभ मेवाडच्या गादीवर आला. हा फारच कर्तृत्ववान पुरुष निघाला. किंबहुना मेवाडच्या सर्व राजांपेक्षा याची कारकीर्द मेवाडच्या एकंदर इतिहासांत अप्रतिहत यशाची व गौरवाची समजली पाहिजे. एकाहून एक वाढत्या उमेदीचे व कर्तबगार पुरुष पिढ्यानुपिढ्या व शतकानुशतकें निर्माण करण्याचें भाग्य मेवाडच्या गुहिलोत वंशाइतकें पृथ्वीच्या पाठीवर दुसऱ्या कोणा वंशास क्वचितच लाभलें असेल. पंधराव्या शतकाच्या द्वितीय पादाच्या प्रारंभीं राणा कुंभाची कारकीर्द सुरू झाली. गुहिलोतपासून तों कुंभापर्यंतच्या साडे-आठशे वर्षांत एखाददुसरा अपवाद सोडल्यास मेवाडचा सारखा अभ्युदयच होत गेला. गुहिल, बाप्पा, खुम्माण, जैत्रसिंह, हमीर, क्षेत्रसिंह, लाखा राणा, चुंडा व मोकलजी इ० राजांनी मेवाडच्या इतिहासांत उज्ज्वल नांव मिळविलें आहे.

राणा कुंभाच्या वेळीं म्हणजे पंधराव्या शतकांत मेवाडचा भाग्यसूर्य अगदी मध्याकाशांत तळपत होता. आर्यावर्तांतल्या समस्त हिंदु राजांना त्याने मेवाडच्या आदित्यध्वजासमोर वंदन करावयास लावलें होतें व दिल्ली, माळवा व गुजरातच्या इस्लामी सुलतानांना हतदर्प केलें होतें. अल्ला-उद्दिनने केलेला मेवाडचा नाश त्याने पूर्णपणें भरून काढला होता. चितोडचे भव्य महाल व मंदिरें, गगनचुम्बी विजयस्तंभ, मोठमोठालीं सरोवरें, नगरसंरक्षक तट, मजबूत पहाडी व भुईकोट किल्ले व जिकडे तिकडे विखुरलेलीं कलापूर्ण व रमणीय स्मारकें, भरभराटीचा व्यापार, धातूंच्या खाणी व कृषि इत्यादींच्या योगें संपत्तीचें अपरिमित उत्पादन, प्रजेचें आरोग्य, सुख व शांति, लोकसंख्येची वृद्धि इ० अनेक गोष्टी मेवाडगौर-वाचा मध्याह्न सूचित करीत होत्या. मेवाडच्या विजयी सेना व पराक्रमी

सरदार आपल्या तरवारीचा अभिमान चरितार्थ करीत होते. राणा कुंभाच्या ठिकाणीं त्याच्या पूर्वजांचे सर्वच गुण युगपत् वास करीत होते. बाप्पाचा पराक्रम व युद्धचातुर्य, हंमीरचा दांडगा उद्योग व संतत उत्साह, लाखा राण्याची कला व सौंदर्यप्रीति, चुण्ड्याची दीर्घदर्शिता, शहाणपण, व प्रजाहिततत्परता हे सर्व सद्गुण त्याच्या ठिकाणीं एकवटले होते. याशिवाय त्याच्या कुशाग्रबुद्धीची मौलिकता तर कांही औरच होती. त्यामुळे महाराणा कुंभ उर्फ कुंभकर्णाची कारकीर्द विशेष महत्त्वाची झाली आहे. ती इतकी विशाल आहे की एका स्वतंत्र ग्रंथास विषय होईल. या ठिकाणीं स्थलाभावास्तव अतिसंक्षेपतःच आपणास तिचें अवलोकन करावयाचें आहे.

४. महाराणा कुंभाची कारकीर्द

त्याने गादीवर आल्याबरोबर मोकलच्या वधाचा सूड उगविला. या कामांत त्यास त्याचा आजा रणमल्ल याची फार मदत झाली व त्यामुळे मेवाड दरबारांत रणमल्लाचें प्रस्थ फारच वाढलें. चुण्डाचा भाऊ व कुम्भाचा चुलता रघु उर्फ राघवदेव हा फारच सत्त्वधीर, कनवाळू व प्रजावत्सल पुरुष होता व कुंभ त्याच्याच तंत्राने चालत असे. परंतु रणमल्लास तें सहन न होऊन त्याने रघुदेवाचा वध करविला व कुम्भाच्या तरुण वयाचा फायदा घेऊन स्वतःचें प्रस्थ वाढविण्यास प्रारंभ केला. परंतु कुंभाने आपला चुलता चुण्डा यास परत बोलावून त्याच्या हस्तें रणमल्लाचा निकाल लावून असूयेचें बीज मोडून काढलें व रघुदेवाच्या अन्याय्य वधाचा बदला घेतला. रघुदेव हा मोठा विक्रमशाली व अप्रतिम लावण्यवान् पुरुष होता. मेवाडची समस्त प्रजा त्याच्या रूपगुणांवर लुब्ध होती. रघुदेवाच्या वधाने ती रणमल्लावर चिडून गेली होती. तिने रघुदेवाच्या हौतात्म्याचा दिव्य गौरव केला. राजपुतान्याच्या कोन्याकोपऱ्यांत भ्रमण केलेला टॉड म्हणतो, "रघुदेवाच्या प्रतिमेला मेवाडच्या प्रत्येक देवघरांत स्थान मिळालें. पितृदेव म्हणून प्रत्येक मेवाडी त्याची पूजा करूं लागला. वर्षांतून दोनदा त्याचे सार्वजनिक उत्सव केले जातात. बाप्पानंतर इतका सार्वजनिक मान रघुदेवासच मिळाला. यावरून

त्याची लोकप्रियता कळून येते." रघुदेवाच्या खुनाचा चुण्डाने बदला घेतल्यामुळे मेवाडच्या प्रजेस परमानंद झाला. यापुढे कुंभ चुण्डाच्या मार्गदर्शित्वाखाली आपला कारभार करूं लागला.

महाराणा कुंभाने आपल्या कारकीर्दीत पहिल्या झपाट्याला अबूचा किल्ला सौंसमल देवड्याच्या स्वाधीन होता तो जिंकून काबीज केला. व त्यामुळे त्याच्या राज्यास बळकटी आली. कुंभाचा वाढता जोर पाहून माळव्याचा सुलतान महंमद खिलजी गडबड करूं लागला. हें पाहून कुंभाने त्याच्यावर स्वारी केली. सारंगपूरच्या मैदानावर दोन्ही सैन्यांची गाठ पडली. घनघोर लढाई होऊन महंमुदाचा जंगी पराजय झाला व तो पळून मांडूच्या किल्ल्याचा आश्रय धरून राहिला.

५. माळव्याच्या सुलतानास कैद

सुलतान महंमूद खिलजी मांडूच्या किल्ल्यांत लपलेला पाहून महाराणा कुंभाने त्यावर चाल केली व त्यास वेढा दिला. सुलतानाची सेना पळूं लागली. सुलतान कुंभाच्या हातीं सापडला. कुंभाने त्यास कैद करून ज्या चितोडचा अल्लाउद्दिनने विध्वंस केला होता त्याच चितोडच्या किल्ल्यांत आणून कैद करून ठेवलें व पुढे त्याजजवळून खंडणी वगैरे कांही एक न घेतां त्यास सोडून दिलें. अबुल फजलने कुंभाच्या औदार्याबद्दल त्याची फार प्रशंसा केली आहे.

अशा तऱ्हेने माळव्याच्या सुलतानाचा नक्शा उतरविल्याबरोबर तरुण कुंभाचा जिकडे तिकडे दरारा पसरला. १४३३ पासून १४३९ पर्यन्तच्या अवघ्या सात वर्षांच्या दरम्यान त्याने आपल्या सर्व शत्रूंना नेस्तनाबूद करून अखिल राजस्थान आपल्या शासनाखाली आणला होता. रामपूरच्या शिलालेखांत त्याच्या या सात वर्षांच्या कारकीर्दीचें पुढीलप्रमाणे वर्णन केलें आहे. "आपल्या कुलरूपी काननांत सिंहाप्रमाणें विराजणाऱ्या कुंभकर्णाने सारंगपूर, नागपूर (नागौर), नरामक, अजयमेरू, मंडोर, मंडलकर, बुन्दी, खाटू, चाटसू इ० सुदृढ व विषम किल्ल्यांना लीलेने जिंकलें. आपल्या भुजबलाने अनेक उत्तम हत्ती संपादन केले आणि म्लेंच्छमहीपालरूपी सर्पांचें गरुडाप्रमाणे दलन केलें. प्रचंड

भुजदंडाने जिंकलेले अनेक राजे त्याच्या चरणावर आपलें मस्तक नम्र करीत होते. प्रबल पराक्रमाने दिल्ली व गुजरातच्या राज्यांवर त्याने आक्रमण केल्याने तेथील सुलतानांनी त्याला छत्र नजर केलें व त्याला 'हिंदुसुरत्राण' ही पदवी बहाल केली." यावरून माळवा, जयपूर, जोधपूर, बुन्दी, कोटा, हाडावती, इ० सर्व भाग त्याच्या राज्यांत मोडूं लागला हें उघड दिसतें. केवळ सात वर्षांत त्याने मुसलमान राजांकडून 'हिंदुसुरत्राण' म्हणजे हिंदूंचा सुलतान ही पदवी ग्रहण केली यावरूनच त्यांना त्याने किती नमविलें होतें याची कल्पना येते.

राणा कुंभाने उदारपणें आपल्या कैदेंतून सोडून दिलेला महंमद खिलजी पुन: तयारी करूं लागला व तीनचार वर्षांनी त्याने मेवाडवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला. हें आक्रमण जोराचें होतें व त्यासाठी खिलजी सुलतानाने जातीनें नेट धरला होता. ह्या त्याच्या आक्रमणाचें फिरिश्ताने जें वर्णन केलें आहे तें जसेंच्या तसें खरें धरलें तरी त्यामुळे कुंभाचें कांहीही वाकडे होऊं शकलें नाही व आंबट तोंड करून मार खाऊन त्यास परत जावें लागलें ही गोष्ट सिद्ध होते.

६. कुंभाचा कडवा धर्माभिमान

राणा कुंभ हा एक कट्टा धर्माभिमानी पुरुष होता व त्याने मुसलमानांनी हिंदूवर केलेल्या जुलमाचा पुरेपूर बदला घेतला होता. हिंदूंनी मुसलमानांचा धर्म उच्छिन्न करण्याचा तडाखा चालविला होता ही गोष्ट फिरिश्तानेही कबूल केली आहे. कीर्तिस्तंभप्रशस्तीमध्ये कुंभाने मुसलमानांचा केवढा उच्छेद केला व हिंदु धर्माचा केवढा उद्धार केला याचें पुढीलप्रमाणें रसपूर्ण वर्णन केलें आहे.

> शकाधिपानां व्रजतामधस्ताददर्शयन्नागपुरस्य मार्गम् ।
> प्रज्वाल्य पेरोजमशीतिमुच्चां निपात्य तन्नागपुरं प्रवीरः ।
> निपात्य दुर्गं परिखां प्रपूर्य गजान्गृहीत्वा यवनीश्च बद्ध्वा ।
> अदंडयद्यो यवनाननन्तान् विडंबयन् गुर्जरभूमिभर्तुः ॥

"कुंभकर्णाने शकाधिपांना (माळव्याचे सुलतान) पाताळाचा मार्ग दाखविला; फिरोजखानाने उभारलेली उंच मशीद पाडून जाळून टाकून नागौर

शहर घेतलें, किल्ले तोडले, खंदक भरून काढले, हत्ती हिरावून घेतले, यवन स्त्रियांना कैद केलें व असंख्य यवनांना शिक्षा केली. गुजरातच्या सुलतानाची विटंबना केली."

७. महंमदी सत्तांचें संघटन व त्यांचा पाडाव

कुंभाची शक्ति ही मुसलमानी सत्तेस भयंकर धोका आहे हें मुसलमान सुलतानांनी लवकरच ओळखलें. त्यांची सत्ता हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून इतका कट्टर हिंदुधर्माभिमानी, परकी सत्तेचा द्वेष्टा व इतका प्रबळ व पराक्रमी राजा आजवर कोणीच झाला नव्हता. त्याच्या नेतृत्वाखाली हिंदु सत्तेचें बलवत्तर संघटन होण्यास प्रारंभ झाला होता. हें संघटन राणा संग्रामसिंहाच्या वेळेस बहुतेक पूर्णावस्थेस पोचलें होतें. त्याचा इतिहास पुढे येणारच आहे. परंतु राणा कुंभाचें वाढतें बळ जर रोधावयाचें असेल तर मुसलमानी सत्तांचें संघटन करणें अवश्य आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येऊन चुकली होती. कोणाही एकेकटचा सुलतानाची त्याच्यासमोर लढाईंत उभें राहण्याची ताकद नव्हती, म्हणून त्यांनी आपलें संघटन करण्याचा प्रयत्न केला. गुजरात व माळव्याच्या सुलतानांचा आपआपसांत कुंभाचा पाडाव करण्याच्या बाबतींत जो करारनामा ठरला तो खाली देत आहें. यावरून कुंभ किती प्रबळ बनला होता याची योग्य कल्पना येईल.

"मुसलमानांचा आपसांत मेळ नसल्याने काफीर (हिंदू) शांतिपूर्वक राहूं शकतात. शास्त्राच्या आज्ञेप्रमाणें आपण बंधुभावनेने एकत्र होऊन हिंदूंना, विशेषेंकरून राणा कुंभास दाबलें पाहिजे. कारण त्यानें अनेक वेळा मुसलमानांचें नुकसान केलें आहे. एकानें एकीकडून व दुसऱ्याने दुसरीकडून एकदम हल्ला करून कुंभास नष्ट करावें व त्याचा प्रदेश आपसांत वाटून घ्यावा. हा करारनामा चांपानेर मुक्कामीं करण्यांत आला व त्यावर दोन्ही पक्षाच्या प्रतिनिधींच्या सह्या झाल्या. सन १४५६."

याप्रमाणें करारनामा ठरून दोन्ही मुसलमान सत्तांनी मेवाडवर एकदम आक्रमण केलें. कुंभ तयारच होता. त्याने दोन्ही सैन्यांचा मेळ होण्याच्या आधीच एकेकास गाठून चोप देण्याचा निश्चय केला. त्यानें

प्रथम कुतुबशाहास गाठून खूप मार दिला. फौजेचा धुव्वा उडालेला पाहतांच माळव्याच्या त्याच्या मुलखांत शिरलेल्या महंमूद खिलजीने आता आपली धडगत नाही हें पाहून राण्याच्या सैन्यास तोंड न देतांच पळ काढला. अशा तऱ्हेने महंमुदास पळवून राणा पुनः कुतुबशहावर उलटला. फिरिश्त्याच्या म्हणण्याप्रमाणें 'कुतुबशाह दारूच्या धुंदींत मस्त होत असे व त्यास शुद्धीही रहात नसे. त्याच्या फौजेने नागौरच्या हिंदु जनतेवर पुनः अत्याचार सुरू करून कित्येक गाई मारल्या. राणा कुंभाने पंचवीस हजार स्वार घेऊन तडक त्यास गाठलें व नागौरचा किल्ला काबीज करून हजारो मुसलमानांची कत्तल उडविली. कुतुबशाह कुंभ आल्याची वार्ता समजतांच अहमदाबादेस पळून गेला व कुम्भ चितोडकडे पलटला. हें पाहून पुनः कुतुबशाहाने कुंभलगडावर चढाई केली. परंतु कुंभाने पुनः त्यास पिटून काढल्यामुळे तो फिरून अहमदाबादेस पळून गेला. अशा तऱ्हेने कुंभाने मुसलमानांच्या या संयुक्त सैन्याचें बळ मोडून काढलें. या त्याच्या विजयाचें कीर्तिस्तंभप्रशस्तींत—

स्फूर्जद्‌गुर्जरमालवेश्वरसुरत्राणोरुसैन्यार्णव–
व्यस्ताव्यस्तसमस्तवारणवनप्राग्भारकुंभोद्‌भवः ।

असें वर्णन केलें आहे. त्यायोगें त्यांची शक्ति इतकी क्षीण झाली की, त्यांनी पुनः कुंभाच्या वाटेस जाण्याचा प्रयत्न केला नाही. याशिवाय कुंभाच्या अनेक विजयांचें वर्णन शिलालेखादिकांतून आढळतें. त्यांत जरी कदाचित् थोडी अतिशयोक्ति असली, तरी त्यावरून त्याने चौफेर मिळविलेल्या विजयांची चांगली कल्पना येते.

८. तत्कालीन परिस्थितींचें समालोचन

कुंभाच्या वास्तविक योग्यतेचें ज्ञान होण्याकरितां व त्याने चिडून मुसलमानांचा इतका उच्छेद कां केला हें लक्षांत येण्यासाठी तत्कालीन परिस्थितीवर थोडी नजर फेकणें इष्ट आहे. हिंदुस्थानचा इतिहासलेखक व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो, "दिल्लीच्या सुलतानांची तीन शतकांची कारकीर्द रक्ताने बंबाळ झालेली आहे. चंगीझखान व तैमूर यांच्या अत्याचाराच्या

कहाण्या तर अंगावर शहारे आणणाऱ्या आहेतच, परंतु दिल्लीच्या अनेक सुलतानांच्या कारकीर्दींतही रक्तपात, अत्याचार व दगलबाजपणा यांचेच देखावे दिसतात. असा एकही सुलतान झाला नाही की, जो भयंकर क्रूर व धर्मांध नव्हता. फिरोजशहा तुघ्लक दयाळू व प्रजाहितदक्ष म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु त्याचीही कारकीर्द असहिष्णुता व क्रौर्य यांनीच भरलेली आहे." हिंदूंच्या देवळाचा त्याला अतिशय तिरस्कार असे. तो म्हणतो, "ईश्वरी प्रेरणेवरून मी हिंदूंचीं देवळें भग्न केलीं; त्यांचे पुढारी ठार केले व त्यांच्या अनुयायांना फटके मारून शिक्षा दिल्या. मी हिंदूंचीं देवळें पाडून त्या जागीं मशिदी उभारल्या; व त्यांच्या पुढाऱ्यांच्या कत्तली उडविल्या." उघडपणें आपला धर्म पाळणाऱ्या एका ब्राह्मणास त्याने जिवंत जाळलें. मुसलमान सुलतानांच्या या अत्याचारांच्या प्रतिक्रियेचा परिपाक कुंभाच्या ठिकाणीं उतरला होता. त्यास परिस्थितीही तशीच अनुकूल सापडली होती. तो गादीवर आला तेव्हा दिल्लीची सुलतानशाही अत्यंत निर्बल झाली होती. १३९८ सालीं तैमूरलंगाची स्वारी झाली होती. तिने दिल्लीची सुलतानशाही नेस्तनाबूद केली होती. माळवा व गुजरात येथे स्वतंत्र सुलतानशाहचा स्थापन झाल्या होत्या. १४१४ पासून १४५० पर्यंत दिल्लीचें सिंहासन रिकामें पडलें होतें. तैमूरचे प्रतिनिधि सय्यद वाटेल तो सावळागोंधळ घालीत होते. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता व त्यांस कुंभाच्या वाढत्या शक्तीकडे लक्ष देण्यास फुरसत नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडून कुंभास बिलकूल विरोध झाला नाही. दिल्लीची मुख्य शक्ति कमजोर असल्यामुळे माळवा व गुजरातच्या सुलतानांचा समाचार घेण्यास कुंभास आयतेंच फावलें; व त्याने मुसलमान सुलतानांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांचा पूर्ण सूड घेतला.

९. चितोडचा विजयस्तंभ

राणा कुंभाच्या या अखंडविजयी पराक्रमामुळे राजस्थानच्या इतिहासांत तो एक अद्वितीय राजा झाला यांत शंका नाही. त्याचा एकंदर रुबाब इतका वाढला होता की, त्याच्या पूर्वीच्या राण्यांना फक्त 'महा-

राजाधिराज महाराणा' ही पदवी असे, ती कुंभास 'महाराजाधिराज, रायराय, राणेराय, महाराणा' अशी पदवी मिळाली. त्याशिवाय राजगुरु, दानगुरु, शैलगुरु, परमगुरु, चापगुरु, हिंदुसुरत्राण वगैरे पदव्या त्याच्या विरुदावळींत आढळतात त्या निराळ्याच. कुंभाने केलेल्या पराक्रमाच्या गोष्टी करूनच तो थांबता तर त्याची गणना फक्त उत्तम सेनापतींतच झाली असती. परंतु तो अष्टपैलू मनुष्य होता. आपल्या देशाचें स्वातंत्र्य-रक्षण व शत्रूंचा विनाश याबरोबरच त्याने धर्माचाही उद्धार केला. शिल्पकला व विद्या यांना कुंभाने जितकें उत्तेजन दिलें तितकें त्याच्या कोणत्याही पूर्वजाने अगर वंशजाने दिलें नाही. मेवाडांत त्याने एकंदर बत्तीस किल्ले, असंख्य विहिरी, तलाव, बगीचे, रस्ते, कोट व वाडे बांधले.

माळवा व गुजरातच्या सुलतानांवर त्याने जो अद्वितीय विजय मिळविला होता. त्याचें स्मारक म्हणून त्याने चितोडला एक भव्य विजय-स्तंभ उभारला आहे. त्यावर खालील वाक्यें खोदलीं आहेत.

"गुजरकुंड व मालवा येथील सुलतानांनी महासागरासारखें अफाट सैन्य घेऊन पृथ्वीस कंपायमान करीत मेदपाटावर स्वारी केली तेव्हा" आणि "मेरू पर्वताकडे तुच्छतापूर्वक स्मित करून पाहणारा चितोडच्या भ्रुकुटीचा एक कटाक्ष." या विजयस्तंभाकडे पाहून कर्नल टॉड म्हणतो, "असला विजयस्तंभ आजच्या मेवाडच्या राजांना आपल्या राज्याचें दहा वर्षांचें सर्व उत्पन्न खर्च करूनही बांधतां येणार नाही."

१०. कुंभाचें व्यक्तित्व

राणा कुंभाची कारकीर्द मेवाडला आत्यंतिक भरभराटीची गेली हें वर सांगितलेंच आहे. त्याने कृषि, व्यापार उद्योग, कला व विद्या यांना उत्तेजन दिलें. त्याच्या काळांत साहित्याची व कलेची अतोनात भरभराट झाली. राणा कुंभाच्या साहित्य व कला यांच्या सेवेची अधिक सविस्तर हकीकत आमच्या 'राजपूत संस्कृति' या पुस्तकांतील 'साहित्य व कला' या प्रकरणांत दिली आहे. तेव्हा तत्संबंधींचा विस्तार येथे करीत नाही.

"तो शरीराने धष्टपुष्ट आणि राजनीति व युद्धविद्या यांत मोठा कुशल होता. त्याने आपल्या शौर्याने दिल्ली व गुजरातच्या सुलतानांचा

कितीतरी प्रदेश काबीज केला. त्यामुळे त्यांनी त्यास एक छत्र नजर करून 'हिंदुसुरत्राण' ही पदवी अर्पण केली. अर्थात तो हिंदूंचा बादशाहा आहे हें कबूल केलें. याच त्याच्या सर्व गुणांमुळे–"कीर्तिधर्मप्रजापालनसत्त्वादि-गुणक्रियमाणश्रीरामयुधिष्ठिरादिनरेश्वरानुकारस्य"–म्हणजे कीर्ति, धर्म, प्रजापालन, सत्त्वधीरपणा, इत्यादि बाबतींत त्याने थेट श्रीराम व युधि-ष्ठिर यांचेंच अनुकरण केलें होतें आणि तो "सर्वोर्वीपति सार्वभौम" झाला होता असें तत्कालीन शिलालेखांत जें वर्णन करण्यांत आलें आहे तें यथार्थ नाही असें कोण म्हणेल ?

११. 'पितृघातकी ऊदा'

महाराणा कुंभास शेवटीं उन्माद रोग झाला होता. त्याच्या या दुःस्थितीचा फायदा घेऊन त्याचा राज्यलोभी ज्येष्ठ पुत्र उदयसिंह उर्फ ऊदा याने कुंभलगडच्या किल्ल्यावर एका तलावाच्या काठीं बसला असतांना कुंभास कटयार भोसकून ठार मारलें. त्यामुळे त्याचा राजस्थानांत 'हत्या-रा' म्हणूनच उल्लेख करण्यांत येतो. मेवाडच्या इतिहासांत राज्यलोभाने पितृघाताचें पातक करणारा ऊदाच पहिला पुरुष निघाला. पण मुसलमानी सुलतानशाहींत बहुधा प्रत्येक पिढींत हे प्रकार घडलेले दिसतील.

ऊदा हा दुष्ट पुरुष होता. तो मेवाडच्या गादीवर राहिल्यास प्रजेचें कल्याण होणार नाही अशी प्रजेची व सरदारांची खात्री पटली होती. राजा जर नालायक निघाला तर त्यास पदच्युत करून दुसरा राजा नेमण्याचा अधिकार आपणास आहे असें समजणाऱ्या मेवाडच्या प्रजेने व सरदारांनी ऊदास काढून त्याचा धाकटा भाऊ रायमल्ल यास गादीवर बसविलें. ऊदाने सुखासुखी राज्यत्याग केला नाही. रायमल्लास त्याच्याबरोबर चारपांच लढाया माराव्या लागल्या. आता मेवाडांत आपली धडगत नाही असें पाहून, ऊदा मांडूचा सुलतान गियासउद्दीन खिलजी याला शरण गेला. पितृघातकी म्हणून ज्याप्रमाणे ऊदाने कुयश मिळविलें त्याचप्रमाणें देशद्रोही व फितूर म्हणूनही मेवाडांत तोच पहिला निघाला. गियासउद्दीन खिलजी यास त्याने आपली मुलगीही देऊं केली होती. परंतु त्याचा कोणताही उद्देश पूर्ण होण्यापूर्वीच अंगावर वीज पडून

तो मरण पावला. एवंच मेवाडच्या उभ्या आठ शतकांच्या इतिहासांत ऊदा हाच पहिला पितृद्रोही, देशद्रोही, धर्मद्रोही व कुलांगार निघाला हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

नापसंत राजास काढून आपल्या पसंतीचा राजा प्रजेने गादीवर बसविल्याचें हें राजपूत इतिहासांतलें पहिलें उदाहरण असलें, तरी यापुढच्या इतिहासांत अशीं उदाहरणें अनेकवार घडलेलीं आहेत. ऊदाच्या बद्दल राजस्थानांत पुढील दोहा प्रसिद्ध आहे–

ऊदा बाप न मारजै, लिखियो लाभै राज।
देशबसायो रायमल, मरयो न एको काज ॥

" हे उदयसिंह ! बापाला मारूं नये, नशीबांत असेल तरच राज्य मिळेल. राष्ट्राचा स्वामी तर रायमल झाला पण तुझें मात्र एकही काम सिद्ध झालें नाही. "

१२. रायमल्ल

महाराणा रायमल्ल याने सन १४७३ पासून तों १५०९ पर्यंत म्हणजे सुमारें ३६ वर्षें राज्य केलें. मेवाडच्या साधारण उत्कर्षाच्या दृष्टीने त्याची कारकीर्द चांगली गेली. कुंभाने संपादन केलेलें वर्चस्व त्याने कायम राखलें. ऊदाच्या भांडणाचा फायदा घेऊन सुलतान ग्यासउद्दीन याने ऊदाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रास गादी मिळवून देण्याच्या मिषाने मेवाडवर स्वारी केली. परंतु रायमल्लाच्या फौजेने त्यास चांगलें तोंड दिलें. "ह्या भयंकर युद्धांत महाराण्याने शकेश्वर (सुलतान) ग्यासचा गर्व हरण केला." "वीरवर गौरने किल्ल्याच्या एका शृंगावर उभें राहून प्रवाहाप्रमाणें आक्रमण करणाऱ्या मुसलमानी फौजेचा संहार केला; आणि अखेरीस मुसलमानांच्या रुधिरस्पर्शाने विटाळलेली काया धुवन काढावी या हेतूने स्वर्गंगेंत स्नान करण्यासाठी निघून गेला." अशीं या लढाईचीं वर्णनें आढळतात. स्वदेशाच्या संरक्षणासाठी इतका पराक्रम गाजवून धारातीर्थी देह ठेवणारा हा वीरवर गौर कोण होता याचा मात्र पत्ता लागत नाही. असो. अशा प्रकारें पराभूत झालेला सुलतान पळून आपल्या राजधानीस निघून गेला.

ग्यासउद्दिनच्या मनांत या पराजयाचें शल्य अतिशय बोचलें. त्याने फिरून तयारी केली व आपला सरदार जफरखां यास फार मोठी सेना देऊन मेवाडवर पाठविलें. त्याने मेवाडच्या मुलखांत येऊन लूटमार चालविल्याची वार्ता समजतांच राणा रायमल्ल आपल्या पांचही पुत्रांना बरोबर घेऊन एका मोठ्या सेनेचें संचालन करीत त्याच्यावर जाऊन तुटून पडला. जफरखांचा फौजेसह नाश झाला. परंतु रायमल्लाने त्याला आता एवढ्यावरच सोडलें नाही. दक्षिणद्वारप्रशस्तींत त्याच्या यापुढील पराक्रमाचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे—

खेराबादतरून् विदार्य यवनस्कंधान्विभिद्यासिभिः ।
दंडान्मालवजान् बलादुपहरन् भिंदंश्च वंशान्द्विषाम् ।।

रायमल्ल ग्यासउद्दिनच्या मुलखावर माळव्यांत चालून गेला. खैराबाद येथे पुनः घनघोर लढाई झाली. खैराबादचें जंगल कापून राण्याने शत्रूस पकडलें व आपल्या तरवारीने त्यांची कत्तल उडविली. शत्रूचे वंशच्या वंश त्याने फोडून काढले. आणि सुलतानाच्या माळव्यांतील प्रजेकडून जबरदस्तीने खंडणी वसूल करून तो स्वदेशास परत आला.

१३. कलिपुरुषाचा प्रवेश

रायमल्लास एकंदर तीन पुत्र होते. संग्रामसिंह, पृथ्वीराज हे एका पत्नीपासून व जयमल्ल दुसऱ्या पत्नीपासून. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राणा कुंभाच्या वेळीं मेवाडचा भाग्यभानू मध्याकाशांत तळपत होता. त्यानंतर वस्तुतः राणा रायमल्लाच्या वेळेपासूनच तो पश्चिमाचलाकडे झुकला. त्याचे प्रतापकिरण जरी तितकेच उज्ज्वल व देदिप्यमान दिसत असले, तरी तो हळूहळू प्रतीचीस झुकत होता हेंही निश्चित. एखादा समाज अथवा राष्ट्र उत्कर्षाच्या ऐन कळसास पोचलें की, त्यांत कौटुम्बिक कलह सुरू होतात व अशा तऱ्हेने एकदा ह्या कलिपुरुषाचा त्यांत प्रवेश झाला की, मग त्यापासून बचावण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो व्यर्थ जातो. राणा रायमल्लाची कारकीर्द मेवाडच्या इतिहासांत या दृष्टीने महत्त्वाची आहे. कुंभापर्यंत गुहिलोत वंशाच्या प्रत्येक पुरुषाने आपलें रक्त मेवाडच्या संरक्षणाकरितां, हिंदू जातीच्या गौरवाकरितां व

वैदिक संस्कृतीच्या संघटनेकरितां खर्च केलें. परंतु ऊदाच्या रूपाने अखेरीस कलिपुरुषाने ह्या शुद्ध वंशांतही प्रवेश केला व त्याने चिकटवलेल्या दुहीच्या जळूने हळूहळू मेवाडचें रक्त शोषण करून अखेरीस त्याचा नाश करून टाकला.

ऊदाचे शेषमल व सूरजमल हे दोन्ही पुत्र ग्यासउद्दीनचा पराभव झाल्यानंतर रायमल्लास शरण आले; व त्यानेही आपल्या ह्या पुतण्यांना क्षमा करून नोकरींत ठेवून घेतलें. त्यांनी कांही दिवस आपली तरवार इमानें इतबारें मेवाडच्या शत्रूंचा निःपात करण्यासाठी उपयोगांत आणली. परंतु पैतृक ज्येष्ठत्वाच्या नात्याने कुंभाची आपल्या बापास मिळालेली गादी आपणास मिळाली नाही याबद्दलचा मत्सर अखेरीस त्यांच्या ठिकाणीं उदित झाला व त्यांनी रायमल्लाच्या तीनही पुत्रांत भांडणें लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

रायमल्लाचा वडील पुत्र संग्रामसिंह उर्फ संग धैर्यशाली व पराक्रमी असला तरी विशेष गंभीर व चिंतनशील असल्याने त्याच्या स्वभावांत बराच नेमस्तपणा आलेला होता. त्याचा भाऊ पृथ्वीराज हाही अतिशय पराक्रमी, साहसी व वीर पुरुष होता. आपण पृथ्वीराज चौहानासारखे मोठें व्हावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. ऊदाचा पुत्र सूरजमल याने संगाची बाजू घेऊन पृथ्वीराज व संग यांत कलह उत्पन्न केला. ह्या आपसांतील भांडणांत त्या तिघांची अनेकवार द्वंद्वयुद्धें झालीं. यांत संगाचा एक डोळा फुटला व अखेरीस आपल्या निमित्ताने चाललेला हा आपसांतला कलह नाहीसा व्हावा, म्हणून त्याने अज्ञातवास पत्करला. तेव्हा सुरजमल हाच आपल्या वंशांतील कलिपुरुष होय हें जाणून पृथ्वीराज त्याच्यामागे लागला. त्यांच्या लढाया कित्येक दिवस चालल्या.

पृथ्वीराजाची ही कलहप्रियता पाहून रायमल्लाने त्यास आपल्या राज्यांतून हाकून लावलें. तेव्हा गोडवाडचाच्या प्रदेशांत जाऊन तेथील जंगली व पहाडी लोकांना आपल्या पराक्रमाने जिंकून त्याने तेथे आपलें राज्य स्थापन केलें. संग अज्ञातवासांत, पृथ्वीराज निर्वासित; तेव्हा जयमल हाच आता मेवाडचा उत्तराधिकारी बनला. परंतु तारा नांवाच्या एका सरदाराच्या मुलीचें जबरदस्तीने हरण करण्याच्या प्रयत्नांत त्याचा वध

झाला. तेव्हा रायमल्लाने पृथ्वीराजास परत बोलाविलें. परंतु त्याचाही विषप्रयोगाने घात झाला.

अशा तऱ्हेने राणा रायमल्लास अर्जुनासारखे पराक्रमी पुत्र असूनही त्यांचा राष्ट्रीय गौरववृद्धीच्या कामीं उपयोग होऊं शकला नाही. आपसांत भांडून त्यांनी अंतःकलहाचें बीज मेवाडांत निर्माण केलें. तथापि रायमल्ल याची गणना त्याच्या थोर पूर्वजांच्या रांगेंतच करावी लागेल. कारण अत्यंत विपरीत परिस्थितींत व अंतःकलहाच्या झंझावातांतही आपल्या राष्ट्राचें सुकाणू त्याने घट्ट धरलें व त्यास स्वस्थानापासून भ्रष्ट होऊं दिलें नाही.

१५०९ च्या मे महिन्याच्या २४ तारखेस रायमल्लाचा देहांत झाला. पृथ्वीराजाच्या मृत्यूनंतर अज्ञातवासांतला संग पुनः चितोडास येऊन बापाजवळ राहिला होता. रायमल्लाच्या देहान्ताबरोबरच १५व्या शतकाचाही अस्त झाला. पंधरावें शतक मेवाडच्या उत्कर्षाचें शिखर होय. यावर राणा संग्रामसिंहाच्या कारकीर्दीने सोन्याचा कळस चढला, पण तो लगेच पडला व तोच दुर्दैवी इतिहास यापुढील प्रकरणांतून वर्णन केलेला आहे.

प्रकरण सातवें

१. सोळाव्या शतकारंभींचा भारत

१५०७ सालीं बाबर सिंधुतटावर येऊन पोचला. महाराणा संग्रामसिंह १५०९ सालीं गादीवर आला. राजपूत इतिहासांत संगाचें स्थान फार उच्च आहे. त्याचें महत्त्व लक्षांत येण्यासाठी त्या काळच्या भारतीय परिस्थितीचें सिंहावलोकन केलें पाहिजे. सोळाव्या शतकाच्या प्रारंभींचीं पंचवीस तीस वर्षें भरतवर्षाला मोठ्या क्रांतीचीं गेलीं. आर्यावर्तांत पंजाबपासून बंगालपर्यंतचा प्रदेश मुसलमानी सत्तांच्या ताब्यांत होता. त्या अत्यंत विस्खळित असून एकीचा पायपोस एकीच्या पायांत नव्हता. दिल्लीची सत्ताही केंद्रीय राहिली नव्हती. माळवा, गुजराथ, सिंध, पंजाब, बंगाल इत्यादि प्रांतोप्रांतीं मुसलमान नबाब स्वतंत्र सुलतान

होऊन वसले होते. त्या सर्वांच्यामध्ये स्वातंत्र्याभिमुखच नव्हे, तर अव्याहत स्वातंत्र्याचा उपभोग घेणारा राजस्थानचा मुकुटमणि मेवाड अफाट समुद्रांतल्या दीपस्तंभासारखा दिसून पडत होता. राणा रायमल्लाने कुंभाच्या वेळचें राजस्थानचें वजन यथातथा सांभाळून ठेवलें होतें.

उत्तर भागांत ही अशी स्थिति असतां दक्षिण भारतांतही पांच बलाढ्य महंमदी सत्ता स्थापन झाल्या होत्या. बहामनी राज्याचे पांच तुकडे पडून विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, विदर व वऱ्हाड अशा पांच स्वतंत्र मुसलमानी राज्यांनी दख्खनचा प्रदेश व्याप्त करून टाकला होता. अशा तऱ्हेने दक्षिण भारतांतही महंमदी सत्तेचें आक्रमक स्वरूप व्यक्त होत असलें तरी त्याही विस्कळीत झाल्या होत्या. एका विस्तीर्ण बहामनी राज्याचे हे तुकडे पडले होते. तर त्याच वेळीं विजयनगरचें साम्राज्य हिंदुधर्म व संस्कृति यांच्या आश्रयाचें एकमेव स्थान होऊन बसलें होतें. इकडे राजस्थानांत १५०९ सालीं आर्यावर्ताच्या हिंदुसम्राट राणा संग्रामसिंहाने गादीवर यावें व तिकडे बरोबर त्याच वर्षी कृष्णदेवराय या विजयानगरच्या महान सम्राटाने गादीवर बसावें हा योगायोगच नव्हे काय? त्याचप्रमाणें १५२८ मध्ये संगाचा तर त्यानंतर एक वर्षानेच कृष्णदेवाचाही मृत्यु व्हावा हाही योगायोगच नव्हे काय? राणा संग मेवाडच्या गादीवर येण्यापूर्वी मेवाडचा बाह्य दरारा कायम असला तरी अंतस्थ कलह सुरू होऊन जयमल व पृथ्वीराज यांसारखे राजपुत्र मारले गेले होते. त्याचप्रमाणें कृष्णदेवराय गादीवर येण्यापूर्वी विजयनगरचें सिंहासन इम्मादी नरसिंह याच्या रक्ताने दूषित झालें होतें. संगाप्रमाणेंच कृष्णदेवासही अंतःस्थ शत्रूंचा बंदोबस्त करून साम्राज्याचा बाह्य विस्तार वाढवावा लागला व मुसलमानी सुलतानशाहयांशीं तोंड देऊन त्यांचा मोड करावा लागला. संगाच्या कारकीर्दीच्या अखेरीस मध्य आशियांतून जहीरउद्दीन बाबराचें आक्रमण होऊन पुढे तीनशें वर्षेपर्यंत समृद्धि पावलेल्या मोगल साम्राज्याचें बीज रोवलें गेलें. तर कृष्णदेवाच्या कारकीर्दींत पोर्तुगीझ लोक हिंदुस्थानांत आले व आज राज्य करणाऱ्या पाश्चिमात्य युरोपीय सत्तेच्या बीजारोपणास प्रारंभ झाला. राणा संग व कृष्णदेव

हे त्या काळचे उत्तर व दक्षिण भारतांतील अखेरचे वैभवशाली हिंदु सम्राट होत. १५६५ सालीं तालीकोटच्या लढाईंत विजयानगरचें साम्राज्य भग्न झालें; तर १५६७ सालीं अकबराने चितोडचा विध्वंस करून राजस्थानच्या आशा भग्न करून टाकल्या. अशा तऱ्हेच्या विलक्षण साधर्म्याचे हे दोन हिंदु सम्राट आहेत. प्रस्तुतग्रंथानुरोधाने राणा संगाच्या कारकीर्दीतील स्थूल घटनांचें वर्णन चालू प्रकरणांत करावयाचें आहे.

२. गुजरातच्या सुलतानाचा पाडाव

ईडरचा तरुण राजपुत्र रायमल्ल यास त्याचा चुलता भीम याने हाकून लावून स्वतः ईडरचें राज्य बळकावलें. तेव्हा रायमल्लाने संगाचा आश्रय केला. संगाने त्यास आपली मुलगी देऊन जावई करून घेतलें. थोड्याच दिवसांत भीम मरण पावला व त्याचा पुत्र भारमल ईडरच्या गादीवर बसला. त्याने गुजरातचा सुलतान मुजफ्फर याचें मांडलिकत्व स्वीकारलें. तेव्हा राणा संगाने रायमल्लास मदत देऊन ईडरच्या गादीवर बसविलें. सुलतान मुजफ्फर यास ही बातमी कळतांच त्याने निजामुल्मुल्क नांवाच्या सरदारास ईडरवर पाठविलें; तेव्हा रायमल्ल ईडर सोडून वीसलनगरास गेला. निजाम भारमल्लास गादीवर बसवून रायमल्लाचा पाठलाग करूं लागला. तेव्हा रायमल्लाने त्यास पहाडांत गाठून त्याचे पुष्कळसे सरदार मारले व त्याच्या सेनेचा धुव्वा उडविला. तेव्हा जहिरउल्मुल्क नामक सरदारास सुलतानाने रायमल्लावर पाठविलें. परंतु रायमल्लाने ईडरवर स्वारी करून जहीरच्या सेनेचाही पाडाव केला व त्यास ठार मारलें. प्रकरण इतक्या थरास गेलेलें पाहतांच स्वतः सुलतानाने रायमल्लावर आक्रमण केलें. तेव्हा स्वतः राणा संगाने मैदानांत उतरून रायमल्लास ईडरच्या गादीवर बसवून सुलतानी फौजेचा पराजय केला. ह्या स्वारींत राजपुतांनी मुसलमानांची खाशी कत्तल उडविली; शेकडोंना कैद केलें व त्यांचा प्रदेश मारून जंगी लूट मिळविली. त्यामुळे गुजरातच्या सुलतानाचा बंदोबस्त होऊन तो राणा संगापुढे नम्र होऊन राहिला.

३. दिल्लीच्या सुलतानाचा पराभव

याप्रमाणें गुजरातच्या सुलतानावर दरारा बसवून राणा संग उत्तरेस वळला. त्याने दिल्लीच्या राज्यावर स्वाऱ्या करून त्यांतील प्रदेश

आपल्या राज्यास जोडण्यास प्रारंभ केला. १५१७ सालीं इब्राहीमखान हा लोदी घराण्यांतील तरुण राजपुत्र दिल्लीच्या तख्तावर आला. त्यास राणा संगाचें आक्रमण सहन न होऊन त्याने प्रचंड सेना तयार करून मेवाडवर स्वारी केली. ही खबर ऐकून राणा संग त्यावर चालून गेला. खातोली नांवाच्या गावापाशीं लढाई होऊन इब्राहीमखान पळून गेला. त्याचा राजपुत्र संगाचा कैदी बनला. त्यास जबरदस्त दंड घेऊन संगाने सोडून दिलें. ह्या लढाईंत राणा संगाचा डावा हात तरवारीने तुटला व पाय लंगडा झाला.

ह्या पराजयाचा सूड उगवण्यासाठी इब्राहीम लोदीने पुनः तयारी करून मेवाडवर स्वारी केली. धौलपूरजवळ लढाई होऊन राणा संगाने मुसलमानांचा पुनः जंगी पराजय केला व बयानापर्यंत त्यांचा पाठलाग केला. 'तारीखे सलातीने अफगाणा'मध्ये "जेव्हा दोन्ही सेना तयार झाल्या तेव्हा हिंदूंनी मोठ्या शौर्याने आक्रमण केलें व सुलतानाच्या फौजेचा पराजय करण्यांत यश मिळविलें. बहुतेक मुसलमानांची कत्तल उडाली व बाकीची सेना अस्ताव्यस्त होऊन पळून गेली" असें या लढाईचें वर्णन केलें आहे. या स्वारींत सिकंदर लोदीच्या ताब्यांत गेलेला माळव्यांतला बराचसा मुलुख मेवाडच्या राज्यांत सामील झाला.

४. माळव्याच्या सुलतानास कैद केलें

माळव्याचा सुलतान महंमूद व त्याचा प्रधान मंत्री शूर राजपूत वीर मेदिनीराय यांच्यांत भांडण होऊन मेदिनीराय राणा संगास जाऊन मिळाला. माळव्याच्या सुलतानाने गुजरातच्या सुलतानाची मदत घेतली व त्याच्या सेनेच्या साहाय्याने मेदिनीरायवर चढाई केली. राणा संगही मेदिनीरायला बरोबर घेऊन त्यांच्या संयुक्त सैन्याशीं सामना करण्यास तयार झाला. गागरौनजवळ लढाई झाली. मुसलमानांचे तीस सरदार मारले गेले. गुजरातच्या सुलतानाची सर्व सेना संगाने कापून काढली; आणि सुलतान महंमूद यास पकडून चितोडच्या किल्ल्यावर तीन महिने कैदेंत ठेवलें. पुढे महंमूदने मेवाडचें मांडलिकत्व कबूल केल्यावर त्यास माळव्याचें राज्य बहाल करून सोडून दिलें. परंतु त्याने कृतघ्नपणें पुनः गुजरातच्या सुलतानाशीं संगनमत करून राणा

संगावर आक्रमण केलें. हें आक्रमण फारच प्रचंड होतें. सुमारें दीड लाखावर सेना मुसलमानांनी उभारली होती. मलिक अयाज नांवाचा सरदार या सेनेचा सेनापति होता; व अफजुलखानाने ज्याप्रमाणें शिवाजीस जिवंत अथवा मृत धरून आणण्याची प्रतिज्ञा केली होती, त्याचप्रमाणें त्यानेही संगास धरण्याचा विडा उचलला होता. मन्दसोरच्या जवळ राजपूत सेना मुसलमानी सेनेशीं भिडली. मुसलमानी सेनेचा पुनः पूर्वीप्रमाणेंच संगाने मोड केला. मलिक अयाजचा तर इतका गर्व हरण झाला की, युद्धक्षेत्रापासून दहा कोस दूर पळून तेथून त्याने तहाचें बोलणें केलें. बेइमान महंमुदानेही पुनः संगाच्या पायाची धूळ चाटली व दोघांनीही संगाचें श्रेष्ठत्व कबूल करून त्याशीं तह केला. 'महाराणायशःप्रकाश' नामक काव्यांत त्याच्या यशाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

> इब्राहिमपूरब दिसा न उलटै। पछम मुदाफर न दे पयाण।
> दखणी महंमदसाह न दौडे। सांगो दामण त्रहुं सुरत्राण॥

म्हणजे पूर्वेकडून इब्राहीम, पश्चिमेकडून मुजफरशहा व दक्षिणेकडून महंमदशाह इकडे पाऊल टाकूं शकत नाही. कारण राणा संगाने त्या तीन्ही सुलतानांचे पाय बांधून टाकले आहेत.

५. मेवाड गौरवाचा मुकुटमणि

याप्रमाणें त्या काळच्या सर्व मुसलमानी सत्तांना मार देऊन व त्यांच्या प्रबळ सैन्यांचा मोड करून तत्कालीन उत्तरभारतांत राणा संगाने आपलें निःसंशय वर्चस्व स्थापन केलें होतें. त्याच्या राज्याच्या मर्यादा उत्तरेस बियाणाजवळ पिवळचा नदीपर्यंत, पश्चिमेस सिंधुनदीपर्यंत, दक्षिणेस माळवा व चंबळपर्यंत वाढल्या होत्या. सारांश, अखिल राजस्थानवर त्याचें अधिराज्य स्थापन झालें होतें. मारवाड व अंबरचे राजे त्यास मान देत होते. बाबरनें 'तुजुके बाबरी' नांवाच्या आपल्या आत्मचरित्रांत त्याचें पुढीलप्रमाणें गौरवपूर्ण भाषेत वर्णन केलें आहे. "राणा संग आपली तरवार व वीरता यांच्या बळावर फार मोठा झाला होता. त्याची शक्ति इतकी वाढली होती की, माळवा, गुजरात व दिल्लीच्या सुलतानांपैकी कोणीही एकटा त्यास हारवूं शकत नव्हता. सुमारें २०० शहरांतील मशिदी त्याने जमीनदोस्त

केल्या होत्या; व कितीतरी मुसलमानांना कैद केलें होतें. त्याच्या राज्याचें उत्पन्न दहाकोट रुपये होतें. एक लक्ष स्वार त्याच्या सेनेंत होते. सात राजे नऊ राव व १०४ लहानमोठे सरदार त्याच्या हाताखाली वावरत होते." यावरून राणा संगाच्या वैभवाची कल्पना येते. एवंच कांही काळपर्यंत राणा संगाचें तेज भरशक्तीनें तळपत होतें. हिंदु जातीच्या गळ्यांतील तो मुकुटमणि बनला होता. हिंदु जातीच्या गौरवाचा हंगाम भरपूर वठला होता. परंतु त्याच्या पिकाचें माप पदरांत घेण्याचें भाग्य भरतवर्षाच्या कपाळावर लिहिलें नव्हतें. संगाने मेवाडच्या राज्यास साम्राज्यपदावर चढविलें असलें तरी, हजारो मैल लांब मध्य आशियांतील झक्झार्टिस नदीच्या किनाऱ्यावर वास्तव्य करणाऱ्या छगताई घराण्यांतील एका धाडशी तरुणाने आपल्या जगप्रसिद्ध पूर्वजांचा–चंगीझखान व तैमूर यांचा–कित्ता गिरवीत जंगली मुसलमानांच्या टोळ्यांची फौज घेऊन राणा संगाने लावलेल्या हिंदु जातीच्या गौरवरूपी उद्यानावर धाड घातली व त्यांतील फुलेंफळें हिंदु जातीच्या हातांत पडण्याच्या ऐन वेळीं तोडून नेलीं. मेवाडच्या या शोकान्त नाटकाचा खराखुरा प्रारंभ बाबराच्या स्वारीने झाला असल्याने यापुढे तिचें वर्णन करणें अवश्य आहे.

६. बाबर व संग यांची तुलना

वास्तविक राणा संग्रामसिंह व जलालुद्दीन बाबर ह्या दोन्ही महान व्यक्ति होत्या. दोघांतही अनेक दृष्टीने साधर्म्य आढळतें. दोघांचाही जीवनप्रवाह लहानपणापासून अनेकविध आपत्तींच्या खाचखळग्यांतून व डोंगरांपठारांतून वाहत आला. दोघेही स्वकीय परकीय शत्रूंना तोंड देत देत पराक्रमाच्या जोरावर उदयास आले. बारा वर्षांचा असतांनाच बाबर फरगाना उर्फ खोकन्दच्या गादीवर आला. सोळा वर्षांच्या आंत अनेक शत्रूंचा निःपात करून त्याने समरकंद काबीज केलें. पुढे दोनच वर्षांत त्याच्या दायादांनी त्याचें सर्व राज्य बळकावून त्यास हाकललें. परंतु लगेच त्याने तें परत मिळविलें. १५०४ साली त्याने काबूल घेतलें. लगेच पुढल्या वर्षी सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंतचा प्रदेश त्याने आक्रमण केला. १५०७ साली पुनः एकवार त्याने सिंधुतटापर्यंतची पहाणी

केली. त्यानंतर बारा वर्षांनी तो हिंदुस्थानकडे वळला व सियालकोट पर्यंतचा मुलुख मारून व तीस हजार हिंदु स्त्री-पुरुषांना कैद करून तो काबुलास निघून गेला. त्यानंतर १५२६ सालीं त्याने परत हिंदुस्थानवर स्वारी केली. पानिपत येथे त्याचा इब्राहीम लोदीशीं सामना होऊन त्यांत बाबराचा जय झाला, व तो दिल्लीपति बनला. त्या वेळीं त्याचें वय ४५ वर्षांचें होतें. राणा संगासारखाच तोही शूर, धाडशी, चिंतनशील, आपत्तींना न डगमगणारा व कुशल सेनानी होता.

७. मुसलमान शक्तीचें संघटन

पराभव पावलेला इब्राहीमखान राणा संगाच्या आश्रयास गेला. बाबराची वाढती शक्ति पाहून त्यास नेस्तनाबूद करणें संगास अवश्य होतें. आपणास शरण आलेल्या इब्राहीमला आपला अंकित करून स्वतः हिंदुस्थानचा सम्राट होण्यास त्यास हाच सर्वांत अधिक उचित अवसर होता. राणा संगाने आपल्या सामर्थ्याने अगोदरच राजपूत राष्ट्रांचें आपल्या नेतृत्वाखाली संघटन केलें होतें. मेवाडच्या आधिपत्याखाली राजपूत राष्ट्रसंघ निर्माण झाला होता. मुसलमानांनाही संगाच्या वाढत्या शक्तीस आळा घालण्यास बाबरासारखा पराक्रमी व युद्धकुशल सेनानी मिळाला असल्याने राणा संगाने उपकारबद्ध करून सोडून दिलेले सर्व मुसलमान सुलतान व सरदार बाबरास जाऊन मिळाले. त्याच्या आगमनाने एकदम मुसलमान शक्ति संघटित झाल्या; व प्रथम बारा हजारांचें सैन्य घेऊन निघालेला बाबर संगाशीं सामना करतेवेळीं एक लाख सेनेचा अधिपति झाला. अशा या तुल्यबल प्रतिस्पर्ध्यांत आपापल्या नशिबाची अखेरची परीक्षा पाहण्याचा सामना येऊन पडला. बाबरही राणा संगाचें सामर्थ्य ओळखून होता. संगासारख्याबरोबर टक्कर घेण्यांत आपणास एक तर कायमचें नामशेष व्हावें लागेल अथवा सरशी झाल्यास भारतवर्षाचें सम्राटपद भोगतां येईल असे दोन्ही परिणाम तो जाणून होता.

८. खानवाची क्रांतिकारक लढाई

इकडून राणा संग चितोडहून निघून उत्तरेस कूच करूं लागला. वाटेंत बाबरास मिळालेल्या खेडारच्या मुसलमान सरदाराचा मोड करून तो बयाण्यास पोचला. तेथे शाहमन्सूर नांवाचा बाबरचा सरदार संगाच्या

भयाने पळून गेला व त्यामुळे मोंगल सेनेंत राजपुतांचा खूप दरारा बसला. १७ मार्च १५२७ रोजीं शिक्रीजवळ खानवा मुक्कामीं बाबर व संग यांची अखेरची लढाई झाली. ही खानवाची लढाई जगांतल्या क्रांतिकारक लढायांत गणली जाईल. यांत राजपुतांनी अद्वितीय शौर्य व प्रतिकारसामर्थ्य व्यक्त केलें. पण अखेरीस राणा संगाचा पराजय होऊन बाबरचा जय झाला. राजपुतांच्या युद्धनीतीचें वर्णन करतांना या लढाईचें सविस्तर वर्णन पुढें करण्यांत येणार आहे व त्यांत राजपूत मुसलमानापेक्षा कोणत्याही तऱ्हेने कमी दर्जाचे लढवय्ये नसून राणा संगाने फारच कौशल्याने एकंदर संग्राम चालविला होता असें दिसून येईल.

परंतु या लढाईचें स्वरूप फारच व्यापक असल्याने व राजस्थानांतील झाडून सारे राजे व सरदार संगाच्या आधिपत्याखाली या लढाईंत सामील झाल्याने राजपुतांचा या लढाईंत चांगलाच नाश झाला. मराठ्यांना जशी पानपत तशी राजपुतांना खानवाची लढाई. पानपत–नंतरही पुन: मराठे कांही काळ चमकले, तसे खानवानंतर पुढे पुन: राजसिंहाच्या वेळेस राजपूत चमकले. परंतु त्यांना कुंभाचें व संगाचें वैभव कधीच प्राप्त होऊं शकलें नाही. या लढाईंत जखमी झालेल्या राणा संगास त्याच्या सैनिकांनी मेवाडच्या पहाडी जंगलांत पळविलें. तेथे 'ह्या पराजयाचें उट्टें भरून काढीपर्यंत चितोडास पाऊल ठेवणार नाही' अशी प्रतिज्ञा करून तो पुन: जमवाजमव करूं लागला. त्याच्या कर्तृत्वाचें मोजमाप लक्षांत घेतां त्यास ही गोष्ट मोठीशी अशक्य नव्हती. खानवाच्या लढाईंत जरी संगाचा पराजय झाला असला तरी पुरा मोड झाला नव्हता व त्याचा पाठलाग करून पहाडी मुलखांत शिरल्यास आपणासच मार खावा लागेल हें बाबरही जाणून होता. म्हणून त्याने त्याचा पाठलाग करण्याचें सोडून दिलें व काल्पी वगैरे एकदोन ठिकाणचे किल्ले घेऊन बाबर परत दिल्लीस गेला. १५२८ च्या जानेवारी महिन्यांत राणा संगाने पुन: तयारी करून बाबरावर चालून जाण्याचा बेत केला. परंतु त्यास हें युद्ध सुरू करण्याइतकें आयुष्य लाभलें नाही. ३० जानेवारी १५२८ रोजीं त्याचा देहान्त झाला. त्याच्या भाईबंदांनी नवीन युद्धाच्या खाईंत हा आपणास लोटणार असें पाहून त्यास विष दिलें असें म्हणतात.

९. राणा संगाची योग्यता

राणा संग हा मध्यम बांध्याचा पुरुष होता. त्याचें शरीर कसलेलें व दिसण्यांत सुन्दर होतें व डोळे असाधारण टपोरेदार होते. मृत्युसमयीं एखाद्या महापराक्रमी योद्धयास शोभा देतील अशीं सर्व चिन्हें त्याच्या शरीरावर विराजमान होतीं. लढाईंतच त्याचा एक डोळा फुटला होता, हात तुटला होता व पाय लंगडा झाला होता. एकून ८० व्रण त्याच्या शरीरावर मोजण्याच्या स्थितींत होते. त्याच्या शरीराचा असा क्वचितच भाग शिल्लक असेल की, जेथे लढाईंत एखादी तरी जखम त्यास लागली नाही. रा. ब ओझाजी म्हणतात, "महाराणा संग मोठा वीर, उदार, कृतज्ञ, बुद्धिमान व न्यायपरायण शासक होता. आपल्या शत्रूला सोडून देऊन त्याचें राज्यही त्यास परत देणें हें कृत्य त्याच्याच सारखा उदार व वीरपुरुष करूं जाणे. तो एक सच्चा क्षत्रिय होता. प्रारंभापासूनच आपत्तींत वाढल्याकारणाने तो निर्भय, साहसी वीर व उत्तम प्रकारचा योद्धा बनला होता. त्यामुळेच त्याने मेवाड हें एक साम्राज्य बनविलें. ज्याच्या सेनापतित्वाखाली विदेशी तुर्कांना भरतवर्षांतून हाकून देण्यासाठी हिंदु सेना संमीलित झाल्या होत्या असा संग हा अंतिम हिंदु राजा होय. त्याच्या नंतरही वीर राजे उत्पन्न झाले. पण ह्याच्याप्रमाणे सर्व राजपुतान्याच्या सेनेचा अधिपति कोणीच झाला नाही." याप्रमाणें संगाची निरपवाद योग्यता कबूल करूनही शेवटीं ओझाजी म्हणतात, "एवढें मोठें राज्य स्थिर करणारा असूनही तो राजनीतिशास्त्रांत अधिक निपुण नव्हता. आपल्या शत्रूला धरून पुनः सोडून देण्यांत औदार्याचें मोठें प्रदर्शन असतें. पण राजकारणाच्या दृष्टीने ती चूकच होय." ओझाजींच्या या विधानांचा परामर्ष या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणांत राजपुतांच्या युद्धनीतीचा विचार करतांना घेण्यांत येईल.

ज्या ठिकाणीं राणा संगास अग्नि दिला तेथे त्याचें समाधिस्थान उभारण्यांत आलें आहे. सर्वांत प्रतापी अशा या राजपूत महाराण्याच्या शवाबरोबरच हिंदु जातीच्या आशाही जळून भस्म झाल्या.

१०. महाराणा रत्नसिंह

राणा संगाच्या नंतर त्याचा तृतीय पुत्र रत्नसिंह गादीवर आला. रत्नसिंहाच्या वेळेस राजपुतांचें वळ विस्खलित झालेलें पाहून माळव्याचा

सुलतान महंमद खिलजी याने आपल्या पूर्वीच्या पराजयाचें उट्टें भरून काढण्याच्या हेतूने मेवाडवर स्वारी केली; पण रत्नसिहाने गुजरातचा सुलतान बहादूरशाह याशीं दोस्ती लावून खिलजी सुलतानाचा पराजय केला. तेव्हा तो बहादूरशहास जाऊन मिळाला. बहादूरशहाने त्याची ती असहाय स्थिति पाहून त्यास मदत करण्याऐवजी पदच्युत करून त्याचें राज्य खालसा केलें व आपल्या राज्यास जोडलें. अशा तऱ्हेने रत्नसिंहाच्या कारकीर्दीत माळव्याची स्वतंत्र सुलतानशाही नष्ट होऊन गुजरातच्या राज्यांत सामील झाल्याने गुजरातच्या सुलतानाचें बळ अतोनात वाढलें. हाडा राजपुत्रांशीं झालेल्या एका द्वन्द्वयुद्धांत सदर राजपुत्र व महाराणा रत्नसिंह या दोघांचाही अंत झाला.

११. महाराणा विक्रमाजित

रत्नसिंह निपुत्रिक वारल्याने त्याचा धाकटा भाऊ विक्रमाजित मेवाडच्या गादीवर बसला. तो राज्य करण्यास अतिशय नालायक असून दुर्व्यसनी होता. शिकार खेळणें व कुस्त्यांच्या दंगली भरविणें हेच त्याचे कालहरण करण्याचे आवडते व्यवसाय होते. त्याच्या नालायकीमुळे राज्याचा बंदोबस्त ढिला पडला, राज्याचे आधारस्तंभ सरदार नाराज होऊन आपापल्या ठिकाणीं निघून गेले व त्यामुळे मेवाडच्या शत्रूंना फावलें.

मेवाडच्या राण्यांनी आजवर गुजरातच्या सुलतानांचा वारंवार पराजय करून व कैदेंत ठेवून त्यांचा जो अपमान केला होता त्याचा सूड उगविण्यास हीच संधि अनुकूल आहे हें जाणून बहादूरशाहाने या वेळीं चितोडवर स्वारी करण्याचें ठरविलें व महंमदखां व खुदावन्दखां नामक आपल्या दोन सरदारांस प्रचंड फौजेसह रुमीखांच्या सेनापत्याखाली चितोडला वेढा देण्यास पुढे पाठविलें. लवकरच तो स्वतःही त्यांस जाऊन मिळाला. ह्या प्रचंड सेनाप्रवाहामुळे भयभीत होऊन विक्रमाजिताची आई राणा संगाची पत्नी राणी कर्मवती हिने तहाचें बोलणें लावलें व अखेरीस महंमूद खिलजीचा मेवाडला जोडलेला मुलुख व महंमद खिलजीस कैदेंत ठेवलें असतांना राणा संगाने त्याचा जडाऊ मुकुट व रत्नपेटी पराजया-

दाखल काबीज केली होती ती व १० हत्ती व १०० घोडे सुलतान बहादूरशहास देऊन तिने तह घडवून आणिला.

विक्रमाजिताच्या कारकीर्दीत आपसांतल्या फाटाफुटीस प्रारंभ झाला होता. त्याच्या अत्याचारास कंटाळलेले सरदार देशद्रोह करून मुसलमानांस जाऊन मिळूं लागले होते. अशा वेळीं चितोडचा गड जिकण्यासाठी बहादूरशहाने पुनः मेवाडवर स्वारी केली. (१५३४)

१२. राणी कर्मवतीचा ज्वलन्त देशाभिमान

विक्रमाजिताशीं असंतुष्ट होऊन सरदार निघून गेले असल्याने त्याजजवळ फार थोडें बळ शिल्लक होतें; व बहादूरशहाचा निश्चय मेवाड नष्ट करण्याचा स्पष्ट दिसत होता. अशा वेळीं राणी कर्मवतीने मोठ्या धैर्याने पुढे येऊन सर्व सरदारांस पुढीलप्रमाणें देशाभिमानाने ओथंबलेलें पत्र लिहिलें. "आतापर्यंत चितोड राजपुतांच्या हातांत राहिला, परंतु आता तो त्यांच्या हातांतून जाण्याचा समय आलेला आहे. मी किल्ला तुमच्या स्वाधीन करत्यें. वाटल्यास तुम्ही त्याचें रक्षण करा, वाटल्यास शत्रूस देऊन टाका."

"समजा, तुमचा स्वामी एक अयोग्य निघाला; तथापि राज्य तर वंशपरंपरेने तुमचें आहे व तें शत्रूच्या हातांत गेल्याने तुमचीच अपकीर्ति होणार नाही काय?" राणीचें हें पत्र पाहतांच सर्व सरदारांच्या हृदयांत देशभक्तीच्या लहरी उचंबळून आल्या व चितोडच्या रक्षणार्थ मरण्याचा संकल्प करून ते राणी कर्मवतीच्या नेतृत्वाखाली चितोडवर एकत्रित झाले. राजपूत आपसांत कितीही भांडले तरी देशावर संकट येईल त्या वेळीं ते एकदिलाने देशासाठी प्राण देण्यास तयार होतात हें त्यांनी सिद्ध करून दाखविलें. फार काय पण ज्या सूरमल्लाने पृथ्वीराज व रायमल्ल यांशीं यावज्जन्म वैर साधलें, त्याचा मुलगा बागजी उर्फ बाघसिंह हा देखील आपलें मूळचें गुहिलोत रक्त स्मरून चितोडच्या मदतीसाठी ऐन वेळीं धावून आला व आपल्या बापाने केलेल्या पापाची निष्कृति करण्याचा आपला संकल्प त्याने जाहीर केला.

१३. चितोडचा वेढा

बहादूर हाने स्वारीस प्रारंभ केला त्या वेळीं गडावर अन्नसामग्री व युद्धसामग्री फारच थोडी होती. त्यामुळे विक्रमाजिताने कांही सैन्य

घेऊन बुंदीच्या बाजूस जाऊन बहादूरशहास सतवावें व किल्ल्यांत रसद पुरविण्याची कामगिरी करावी व लढाई चालू असेपर्यंत बाघसिंहाने त्याचा प्रतिनिधि म्हणून चितोडवर राहावें असें ठरलें. बहादूरशहा गडावर चालून आला. विक्रमाजिताचा प्रतिरोध विफळ ठरवून अखेरीस सुलतानाने गडास वेढा दिलाच.

बहादूरशहाने या वेळेस तोफखाना बरोबर आणला होता व पोर्तुगीझ गोलंदाज त्याचें संचालन करीत होते. त्यांच्या कारवाईने तटास एक मोठें ४५ हातांचें भगदाड पडलें. हाडा राजपुत्र अर्जुन आपल्या पांचशें अनुयायांसह तेथे आडवा झाला. फुटलेल्या बांधावरून वाहूं लागणाऱ्या बलवान जलप्रवाहाप्रमाणें अफाट मुसलमान सेनेच्या लाटामागून लाटा, हल्ल्यावर हल्ले चढवून भगदाडांतून आंत घुसण्याचा प्रयत्न करूं लागल्या. परंतु ५०० हाडांपैकी अखेरचा वीर रणभूमीवर पडेपर्यंत एक देखील मुसलमान गडांत प्रवेश करूं शकला नाही. आस्ते आस्ते भीमविक्रम करून एकेक करून बहुतेक राजपूत सरदार धारातीर्थी पडले.

१४. कर्मवतीचा जोहार

आकाशच फाटल्यानंतर त्यास ठिगळ तरी कोठे लावणार? मुसलमानांचा गडांत प्रवेश होणार हें निश्चितपणें दिसूं लागलें. स्वसंरक्षणाचा अन्य कोणताही मार्ग उरला नाही हें पाहून राजपुतांनी अखेरचा प्रयत्न करण्याचें ठरविलें. मेवाडच्या इतिहासांतील हा दुसरा जोहार होय. बाघसिंहाने राजचिन्हें अंगावर धारण केलीं; व सर्व राजपुतांनी "केसरीये बाणे" धारण केले. त्यांच्या स्त्रियांनीही आपल्या पतींचा हा अंतिम निर्णय पाहून स्वतः जोहार करण्याचा निश्चय केला. राणी कर्मवती भाटांच्या म्हणण्याप्रमाणें तेरा सहस्र वीर राजपूतरमणी-गणांच्यामध्ये आसन घालून बसली. पतिदर्शनाच्या लालसेने तिनेही मंगल मळवट भरला होता. ज्या महालांत सर्व स्त्रिया बसल्या होत्या त्यांत ज्वालाग्राही पदार्थ भरण्यांत आले. व बाघजीने त्यास अग्नि लावून दिला व एकलिंगजीच्या नांवाचा प्रचंड जयघोष करून तो आपल्या शेष

अनुयायांसह गडाचीं दारें उघडून त्यांतून बाहेर पडला. राजपूत मृत्यूच्या निश्चयानेच लढत होते. अद्‌भुत पराक्रम गाजवून देशभक्त बाघजीने आपल्या राजपूत वीरांसह चितोडच्या रणचंडीस आपल्या रक्ताचा अभिषेक केला व आपलीं शिरकमलें तिच्या चरणीं अर्पण केलीं.

शिक्रीच्या लढाईंत बाबराशीं सार्वभौमत्वाचा लढा लढतांना राणा संगाबरोबर मेवाडचा प्रत्येक घराण्यांतला एकूण एक महत्त्वाचा तरुण कामास आला होता. त्यांनतर आणखी दहाच वर्षांच्या आंत पुनश्च मेवाडचें तारुण्य व शौर्य स्वातंत्र्याच्या रणभूमीवर सांडलें व उरल्या सुरल्या राजपूत वंशांचाही उच्छेद झाला.

१५. चितोड परत घेतलें

बहादूरशहाचें आक्रमण पाहून राणी कर्मवतीने हुमायून यास राखी पाठवून आपला भाऊ म्हणून संबोधलें व चितोडच्या मदतीस येण्याची विनंती केली. परंतु तो येण्याच्या आधीच चितोडचा नाश झाला होता. बहादूरशहाचेही कांही असंतुष्ट सरदार हुमायूनशीं संधान बांधीत होते. त्याप्रमाणें हूमायून माळव्याच्या मार्गें चितोडकडे येत आहे हें पाहून बहादूरशहा गड सरदारांच्या स्वाधीन करून हुमायूनशीं तोंड देण्यास निघून गेला. मंदसोर येथे लढाई होऊन बहादूरशहा पळाला. या संधीचा फायदा घेऊन विक्रमाजिताने त्याच्या चितोडवरील फौजेस व सरदारास पिटाळून लावून चितोडचा कब्जा घेतला.

१६. विक्रमाजिताची पदच्युति

इतक्या आपत्तींतून जाऊनही विक्रमाजित सुधारला नाही. त्याच्या उद्दामपणाने त्रस्त झालेल्या राजपुतांनी त्यास पदच्युत करून त्याचा धाकटा भाऊ उदयसिंह यास गादीवर बसविलें व पृथ्वीराजाचा दासीपुत्र बनवीर यास त्याचा पालक म्हणन नियुक्त केलें.

१७. बनवीरचे अत्याचार

परंतु सत्ता हातीं आल्याबरोबर बनवीर उन्मत्त बनला. एके दिवशीं विक्रमाजिताचा वध करून तीच रक्ताने माखलेली तरवार घेऊन उदय-

सिंहाचाही वध करण्यास तो धावला. त्या वेळीं सुप्रसिद्ध पन्नादाईने आपला पोटचा गोळा बळी देऊन उदयसिंहास गडाखालीं पळविलें. पर्यंकशायी तरुणाच्या मुखाकडेही न पाहतां हाच उदयसिंह असें दाखविण्याकरितां पन्नाने त्याच्याकडे अंगुलीनिर्देश करतांच त्याने आपली कराल करवाल त्याच्या उदरांत खुपसली व स्वामिवधाच्या पातकाने माखलेलें आपलें काळें तोंड घेऊन तेथून एकदम प्रयाण केलें. त्यामुळे आपण उदयसिंहास मारलें की, पन्नापुत्रास हें त्याच्या बिलकूल लक्षांत आलें नाही.

अशा तऱ्हेने मेवाडचें राज्य निष्कंटक करण्याचा प्रयत्न करून नंतर तो मदांध बनवीर सरदारांवरही अत्याचार करूं लागला. त्याच्या अकुलीनपणामुळे त्यास न मानणाऱ्या सरदारांचा अपमान करण्याचा त्याने धडाका लावला. पन्नादाईने पळविलेला राजपुत्र उदयसिंह कुंभलगढचा रावळ आसकरण याच्या आश्रयाने जिवंत आहे हें कळतांच राजपूत सरदारांनी बनवीरास पदच्युत करून उदयसिंहास फिरून गादीवर बसविलें. अवघ्या एक वर्षाच्या अवधींत त्यांनी आपणास नको तो राजा काढून टाकन आपल्या पसंतीचा राजा गादीवर बसविला. परंतु तोही राज्यकारभार चालवून भग्न राजपूत राष्ट्रांचें संघटन करण्याच्या कामीं तितकाच नालायक निघाला.

१७. देशांतील सामान्य परिस्थिति

१५३७ सालीं पंधरा सोळा वर्षांचा तरुण राजपुत्र उदयसिंह गादीवर आला. १५४०त हुमायूनचा पराभव होऊन शेरशाह सूर दिल्लीच्या गादीवर बसला. १५४२ सालीं अकबराचा जन्म झाला. १५५५ सालीं हुमायून सूरवंशास पदच्युत करून परत दिल्लीचा स्वामी बनला. पुढच्याच वर्षी हुमायून मरण पावला व अकबर गादीवर आला. १५६० सालीं बैरामखानच्या हातांतून अकबराने राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व यानंतरच खराखुरा त्याच्या महत्त्वाकांक्षापूर्तीस प्रारंभ झाला. सारांश, अकबरासारखा जबर महत्त्वाकांक्षी, प्रबळ, व पराक्रमी बादशाहा दिल्लीच्या गादीवर सुस्थित होण्यापूर्वी व दिल्लीची सल्तनत कायम व स्थायी स्वरूपाने उभी राहण्यापूर्वी उदयसिंहास १५३७ पासून १५६० पर्यंत तेवीस वर्षांचा अवधि मिळाला होता.

वास्तविक हीं तेवीस वर्षें म्हणजे मेवाडच्या कोणाही कर्तबगार राण्यास राणा संगाच्या पराभवानें व बहादूरशहाच्या स्वारीनें नष्ट झालेलें मेवाडचें वैभव परत मिळविण्याची व बाबराबरोबर पळालेली मेवाडची साम्राज्यलक्ष्मी पुन: चितोडच्या महालांत आणून बंद करण्याची उत्कृष्ट संधि होती. हंमीर, कुंभ अथवा संग ह्यांसारखा एखादा राणा जर ह्या वेळीं मेवाडच्या सिंहासनावर अधिकारारूढ असता तर मुसलमानांचें नामो-निशाण भारतवर्षांतून मिटवून पुनश्च बलवान हिंदु साम्राज्याची उभारणी करता. फार काय पण उदयसिंहाच्या नंतर गादीवर बसलेला त्याचा विख्यात पुत्र महाराणा प्रतापसिंह जरी त्याच्या ऐवजी ह्या वेळीं गादीवर आला असता तरी भारतवर्षाचा भाग्यपट फारच निराळ्या रंगानें रंगला असता.

इकडे मेवाडचे राजपुत्र मूर्ख व अयोग्य निघाले तर त्याच वेळीं त्यांच्याहून शतपटीनें कर्तबगार व शककर्त्या पुरुषांत गण्यमान असा अकबरासारखा मुसलमान बादशाहा दिल्लीच्या तख्तावर बसला. जन्मापासून आपत्तीच्या शाळेंत त्याचें सर्व शिक्षण झालें होतें; व त्या सर्व परीक्षांत उत्तीर्ण होऊन वयाच्या १३ व्या वर्षींच तो दिल्लीच्या बादशाही तख्तावर आरूढ झाला होता. गादीवर आल्यापासून अवघ्या सहा वर्षांत आपल्या आजाप्रमाणेंच या तरुण बादशाहानेंही स्वतःच्या कर्तबगारीनें जवळ-जवळ संपूर्ण आर्यावर्तावर आपला दरारा बसविला. त्याच्या प्रभावानें राजस्थानांतले राजपूत राजेही स्तिमित झाले. एरव्हीं त्यांची सगळी दृष्टि मेवाडकडे असे; परंतु ह्या वेळीं मेवाडांत कोणीही उच्च व कर्तबगार आदर्श त्यांच्यासमोर नसल्यानें आपल्या संकुचित वास्तव्यक्षेत्राचें संरक्षण करण्याच्या भावनेनें ते सर्व ह्या उगवत्या सूर्यापुढे नतमस्तक झाले. इतकेंच नव्हे तर आपल्या धाकट्या धाकट्या राज्यांचें संरक्षण करण्याच्याच एकमेव बुद्धीनें आपल्या प्रिय कन्याही मोगल बादशाहास अर्पण करण्याचा आत्यंतिक हीन मार्ग पतकरण्यास ते तयार झाले. अंबरचा राजा बिहारी-मल यानें आपली मुलगी अकबरास देऊन त्याशीं सख्य जोडण्याचा पहिला पाठ राजपुतांना घालून दिला. अंबरच्या या उदाहरणानें इतरांनाही आपला मार्ग मोकळा झाला असें वाटलें.

ह्या परिस्थितींतून मेवाडचें राज्य व राजस्थानचें पाणी (Spirit) तोलून व सांभाळून धरण्याचें सामर्थ्य उदयसिंहाच्या अंगीं नव्हतें. विषयासक्तीने त्याचा बहुतेक काल निरुपयोगी करून टाकला होता.

१८. अकबराची रुधिरपिपासा

दिल्लीच्या तख्तावर आरुढ होऊन सबंध आर्यावर्त अकबराने महंमदी सत्तेखाली आणला असला व तीव्र धर्माभिमानी राजपूत कुलांनी आपल्या मुलीही त्यास अर्पण केल्या असल्या तरी सम्राट म्हणून आपला योग्य मान भारतवर्षाच्या नरेंद्रमंडळांत होत नाही असें अकबरास आढळून आलें. कारण जोपर्यंत चितोडवर रक्तलांछित आदित्यध्वज फडकत आहे व मेवाडचा राणा जोपर्यंत राजपुताचें यश व कुळ विशुद्ध राखीत आहे तोपर्यंत अकबराच्या भारतविजयाला किंमत नव्हती. हिंदु भारताचा आशादीप मेवाडच्या भूमींत तेवूं शकत होता. अकबराची साम्राज्यतृष्णा विलक्षण होती. राजनीति व धार्मिक उदारता ह्यांच्या नांवाखाली भारतवर्षांतला कोपरान् कोपरा पादाक्रान्त करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती; हें त्याच्यावर स्तुतिसुमनांच्या अंजली अर्पण करणारांसही नाकबूल करतां येणार नाही. विजयासाठी विजय हेंच त्याचें ब्रीदवाक्य होतें. कारणावाचूनही तो परमुलुखावर आक्रमण करीत होता. मेवाडविजयाखेरीज भारतविजयास पूर्तता नाही हें जाणून त्याने मेवाडवर स्वारी करण्याचें ठरविलें. उदयसिंहासारखा निरुपद्रवी व अल्पसंतुष्ट पुरुष त्याची कोणतीही कुरापत काढूं शकत नव्हता. परंतु आजपर्यंत जितक्या विजेत्यांनी परप्रदेशावर आक्रमण केलें त्यांतल्या किती लोकांना कारणांची आवश्यकता वाटली? चंगीझखान व तैमूर यांना जितांच्या कत्तली करण्यास काय कारणें शोधावीं लागलीं? मग त्यांच्याच वंशांत उत्पन्न झालेल्या अकबराने केवळ साम्राज्यतृष्णेने—साम्राज्यतृष्णा हें रुधिरपिपासेचें दुसरें अभिधान होय—चितोडावर स्वारी करून आपल्या रक्तांतील तोच अक्षुनदीच्या कांठचा जंगली क्रूरपणा व्यक्त केला असल्यास नवल काय?

१९. चितोडवर स्वारी

अकबराने मेवाडवर १५६७ सालीं स्वारी केली. महाराणा उदयसिंहास ही वार्ता समजतांच त्याने सर्व सरदारमंडळी जमवून आता

काय करावें याबद्दल त्यांचा सल्ला विचारला. त्यांनी सांगितलें की, "नुकताच गुजरातच्या बहादूरशहाबरोबर लढून लढून मेवाड दुर्बल झाला आहे आणि अकबरही प्रबळ शत्रु आहे. तरी आपण आपल्या परिवारासहित पहाडांत निघून जावें. आम्ही किल्याचें पाहून घेऊं." या सल्ल्याप्रमाणें जयमल राठोड व प्रतापसिंह उर्फ पत्ता सीसोदिया यांना सेनापति नियुक्त करून उदयसिंह पहाडांत निघून गेला.

अकबराची तयारी जोरांत होती. तीस हजार मोगल सेना केवळ चितोडच्या वेढ्यांत गुन्तली होती. त्याशिवाय आणखी कितीतरी सेना मेवाडांतील इतर किल्ले जिंकण्यासाठी रवाना झाली होती. त्या काळांत मिळूं शकणारा सर्वांत समृद्ध तोफखाना चितोडवर मोर्चे रोखून ठेवण्यांत आला होता. शेंकडो हत्तींची योजना गडाचे दरवाजे तोडण्याच्या कामीं करण्यांत आली होती. राजा तोडरमल्लासारखा प्रसिद्ध कुशल सेनानी मोगल सेनेचें संचालन करीत होता. राजपुतांचें खरें बळ म्हणजे त्यांची हिंमत! आपल्या तुटपुंज्या साधनसामग्रीच्या बळावरच वीर जयमलने सहा महिनेपर्यंत गड लढविला. ह्या अवधींत मुसलमानांनी अनेक हल्ल्यांमागून हल्ले चढविले; व प्रशस्त शिलातलावर आपटून शतधा विदीर्ण होणाऱ्या जलधारेप्रमाणें ते नाश पावले. ह्या लढाईचा विशेष म्हणजे बाबर व बहादूरशहा यांच्या बरोबर झालेल्या लढायांत इतका भयंकर मनुष्यसंहार झाला असतांही पूर्वींच्या शत्रूपेक्षाही प्रबळतर शत्रूशीं सामना देण्याची राजपुतांनी तयारी केली व अद्‌भुत रणकौशल्य व अचाट पराक्रम व्यक्त केला हा होय.

२०. मोगल सेनेचा संहार

चितोड सर करण्याची अकबराची जिद्द इतकी विलक्षण होती की, बाकीचे सर्व व्यवसाय सोडून तो जातीने वेढ्याचे काम चालविण्यास तयार होता. त्याचा अपरंपार धनसंग्रह व सेनासमूह त्याच्या क्षीण झालेल्या द्रव्यशक्तीस व मनुष्यशक्तीस भरून काढीत होता. सबंध मोगल साम्राज्याचें बळ त्याच्या पाठीशीं होतें. तर राजपुतांची शक्ति प्रतिदिन क्षीण होत होती. शिवाय गडाबाहेर असलेल्या उदयसिंहाने शत्रूची रसद बंद

करणें, चोरटे हल्ले करून शत्रस संत्रस्त करून सोडणें, अचानकपणें त्यांच्या पिछाडीवर तुटून पडून त्यांची लांडगेतोड करणें इत्यादि कर्तव्य गोष्टीं-पैकी एकही केली नाही. मुसलमानांच्या हल्ल्यांत हजारो राजपूत पडले असले तरी मुसलमानांचाही भयंकर संहार झाला. सुरुंग खोदण्याच्या कामांत असलेले कमींत कमी दोनशे मुसलमान दररोज राजपूत तरवारीस बळी पडत होते, असें अबुल फाजलने वर्णन केलें आहे. तारीखे अल्फींत लिहिलें आहे की, "ज्या वेळीं सुरुंग खोदले जात होते व भुईरस्ते तयार केले जात होते त्या वेळीं सात आठ हजार राजपूत स्वारांनी व गोलंदाजां-नी त्यांच्यावर हल्ला केला व त्यांनी इतके मुसलमान मारले की दगड विटांप्रमाणें त्यांचीं प्रेतें वेचून त्यांचे ढीग रचावे लागले." यावरून केवळ एवढयाच एका विभागांत राजपुतांनी ह्या सहा महिन्यांच्या अवधींत किती मोगल सेनेचा संहार केला असेल याची कल्पना येईल. पण मोगल सेनेचा प्रवाह दिल्लीपासून चितोडपर्यंत सारखा वाहत होता. जितके लोक पडतील तितक्यांचे नवीन जथ्थे पुनः ताज्या दमाने चितोडच्या दाराशीं येऊन थडकत होते. त्यामुळे मोगलांचें सेनाबळ व द्रव्यबळ कायमच राहून राजपुतांचें मात्र क्रमशः कमी होत होतें. वीर जयमलही असाच एका हल्ल्यांत मारला गेला. पाय तुटल्यावरही कल्ला नामक धिप्पाड माणसा-च्या खांद्यावर बसून त्याने लढाई केली व शेंकडो मुसलमानांचा फन्ना उडविला. त्याच्यामागून सोळा वर्षाच्या पत्ताने गड लढविला ; पण अखेरीस दाणागोटा व मनुष्यबळ अगदीच संपलेलें पाहून त्याने जौहा-राचा निश्चय केला.

२१. वीरबहाद्दर पत्ता

आपल्या थोर पूर्वस्त्रियांच्या पावलावर पाऊल टाकून राजपूत स्त्रियांनी जौहार करून आपणास जाळून घेतलें. राजपूत रमणींच्या त्या जौहाराचा तो धडकणारा अग्नि पाहून अकबर विस्मित झाला. अंबरच्या भगवानदासाने सांगितलें, "आता भयंकर प्रसंग आहे. कारण जौहार झाला की राजपूत मरण्याच्या निश्चयाने शत्रूवर तुटून पडतात, यासाठी

आता सावध असलें पाहिजे." ह्या जौहारांत उदयसिंहाच्या नऊ राण्या व पांच कन्या व बाकीच्या सरदारांच्या व सैनिकांच्या हजारो स्त्रियांनी आत्मार्पण केलें. त्यांच्या स्वर्गकामनांचीं मंगल गीतें ऐकतांच पत्ताने व त्याच्या उर्वरित राजपूत सैनिकांनी मोठ्याने गर्जना करून गडाचीं दारें सताड उघडून दिलीं; व ते मोगल सेनेवर सिंहाप्रमाणें तुटून पडले. राजपूत सैनिकांच्या आवेशाग्नींत मोगल सैनिक पतंगाप्रमाणें होरपळून निघत आहेत हें पाहून अकबराने शेंकडो हत्तींच्या सोंडेंत शस्त्रें देऊन त्यांना आघाडीवर पाठविलें. पण त्यांचेंही जथ्थेच्या जथ्थे राजपूतांनी कापून काढले. ह्या-प्रसंगीं पत्ताने अमानुष धैर्य दाखविलें. अभिमन्यूच्या शौर्याने तो एकटा शेंकडो हत्तींच्या मेळ्यांत घुसून त्यांशीं झुंजूं लागला. पत्ताची व त्याच्या राजपूत सैनिकांची शक्ति कितीही अद्‌भुत असली तरी एकामागून एक उभ्या असलेल्या या काळ्या पहाडांच्या रांगा ओलांडून त्यांसही पलीकडे जाणें शक्य नव्हतें. लढतां लढतां पत्ता थकून खालीं पडला व एका हत्तीने त्यास सोंडेंत धरून अकबराच्या समोर नेऊन टाकलें. राजपूत सेनानी जयमल्ल व पत्ता यांच्या रणकौशल्याने अकबर इतका स्तिमित झाला की, पुढे आग्र्याच्या किल्याच्या द्वाराशीं त्यांचे हत्तीवर बसलेले पुतळे उभे करून अकबराने त्यांच्या शौर्याचा गौरव केला. ते पुतळे पाहून व त्यामुळे त्यांची स्मृति जागृत होऊन इ. स. १६६३ सालीं हिंदुस्थानांत भ्रमण करणारा फरेंच प्रवासी बर्नियर याने त्यांचें मोठें गौरवपूर्ण वर्णन केलें आहे व शेवटीं "हे दोन हत्ती व त्यावर बसलेले हे दोन दृढनिश्चयी पुरुष पाहिले म्हणजे केवढ्या विलक्षण मोठेपणाची व आदरयुक्त भीतीची मनुष्याच्या मनावर छाप पडते हें सांगणें कठीण आहे" असे उद्‌गार काढले आहेत.

२२. चितोडचा विध्वंस

याप्रमाणें गड पडल्यावर अकबराने तेथे सापडणाऱ्या व्यक्तिमात्राची कत्तल उडविली व वस्तुजाताचा विध्वंस केला. या वेळीं चितोडचा विध्वंस करण्याच्या कामांत त्याने अल्लाउद्दीन व बहादूर यांच्यावरही ताण केली. "तीजो साका चितोडे" हें या प्रसंगाचें वर्णन करणारें गाणें

मेवाडांत प्रसिद्ध आहे. अखिल हिंदु जातीचा मागील आठशे वर्षांत राखून ठेवलेला गौरव, वैदिक संस्कृतीचें सारसर्वस्व, एतद्देशीय कला-कौशल्याचें उत्कृष्ट प्रतीक, आर्यावर्ताचा मध्ययुगांतला सूत्रबद्ध इतिहास, देशप्रेमाचा व स्वाभिमानाचा जिवंत झरा, वैयक्तिक सद्‌गुणांचें माहेरघर, आदर्श स्त्रीपुरुषांची खाण, स्त्रीदाक्षिण्याचा अनुपमेय आदर्श व राजस्थानच्या ज्ञानगंगेची गंगोत्री अशा प्रकारच्या या चितोडगडाचा ज्या अमानुष क्रूरतेने अकबराने राक्षसी ध्वंस करून टाकला, त्यामुळे त्याच्या नांवास कायमचा कलंक लागला आहे. अकबराच्या धर्मोदारतेची व कलाभिज्ञतेची, सौंदर्योपासनेची, भूतदयेची व ज्ञानपिपासेची प्रशंसा करणाऱ्या लोकांनी कृपा करून त्याने केलेल्या चितोडच्या विध्वंसाकडे पाहावें. प्रो. इंद्र म्हणतात "जगाच्या इतिहासांत वीरतेचे दृष्टांत पुष्कळ आहेत. परंतु चितोडगडच्या संरक्षक राजपूतांच्या वीरतेची बरोबरी त्यांपैकी कदाचितच कोणी करूं शकेल ! ते हारले म्हणून काय झालें ? इतिहासांत तेच विजयी समजले जातील. कारण त्यांनी आपल्या घरादारांच्या संरक्षणांत मोठ्या बहादुरीने आत्मसमर्पण केलें आहे. ज्यांना प्रत्यक्ष विजय मिळाला त्यांना इतिहास पराभूतच समजेल. कारण त्यांनी हत्तींच्या भिंतींमागे उभें राहून दुसऱ्यांना अधिकारभ्रष्ट केलें आहे आणि निरपराध वीर व वीरांगना यांच्या हत्त्यांचें पाप डोक्यावर धारण केलें आहे. अनंत इतिहासांत या दिवशींचे हुतात्मे राजपूतच जिवंत राहतील."

२३. उदयसिंहाची अखेर

याप्रमाणें चितोडचा विध्वंस करून नंतर अकबराने मेवाडांतील रणथंबोरचा प्रसिद्ध दुर्गम दुर्ग हस्तगत केला व तो मेवाड सोडून परत गेला. चितोडविध्वंसानंतर उदयसिंह आणखी चार पांच वर्षें जगला. त्याने नंतर पिशोल्याच्या तलावाचे काठीं उदयपूर शहराची स्थापना करून तेथेच राजधानी केली. परंतु या पांच वर्षांत अकबराने त्याच्याकडे फारसें लक्ष दिलें नाही व तोही आपल्या विलासप्रियतेपासून फारसा ढळला नाही. १५७२ सालीं त्याचा देहान्त झाला. त्याने मृत्यसमयीं नेहमीच्या कुलरीतीस सोडून आपल्या जगमल नामक ९व्या पुत्रास युवराज नेमलें.

कारण तो त्याच्या आवडत्या राणीचा पुत्र होता. तो नालायक असल्याने राजपूत सरदारांनी त्यास गादीवर बसूं दिलें नाही. पुरत्या दोन घटकाही होण्याच्या आधीच त्यास पदच्युत करून राज्याचा योग्य वारस, त्यांचा आवडता राजपुत्र व महाविख्यात पुरुष प्रतापसिंह याची त्या सरदारांनी सिंहासनावर स्थापना केली.

प्रकरण आठवें

१. हिंदु गौरवाचा नंदादीप

महाराणा प्रतापसिंह अत्यंत विषम परिस्थितींत मेवाडच्या गादीवर आला. त्या वेळीं बहुतेक सर्व राजपूत राजे व सरदार अकबराचें मांडलिकत्व स्वीकारून गुलाम बनले होते. जोधपूरच्या राठोड महाराजाने आपली कन्या जोधाबाई अकबरास देऊन त्याशीं सख्य जोडलें; व त्याच्या मोबदल्यांत पंचवीस लक्ष रुपये वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश अकबराने त्यास बहाल केला. अंबरचा भारमल्ल, त्याचा पुत्र भगवानदास व नातू मानसिंह हे तर मोगल सिंहासनाचे एकनिष्ठ सेवक बनले होते. मानसिंह शूर सेनापति व राजकारणी पुरुष होता. त्यामुळे त्याचा मानही मोगल दरबारांत फार मोठा. जोधपूर व अंबरच्या राजपूत राजांनी अशा तऱ्हेने अकबराशीं सख्य जोडून आपापल्या राज्यांचा प्रादेशिक विस्तार अतिशय केला. त्यांच्या अनुकरणाने अन्य राजपूत राजांनी व सरदारांनीही यवनदास्य पत्करलें. अकबराने नौरोजाचा जो उत्सव सुरू केला त्यांत एकट्या मेवाडच्या वीरांगना सोडून बाकी समस्त राजस्थानांतील राजपूत रमणी अकबर बादशहाच्या दर्शनास जात व निरनिराळ्या वस्तू त्यास नजर करीत व तोही अनिमिष नेत्रांनी त्यांचें लावण्यपान करी. आपल्या सेवेंत असलेल्या प्रत्येक राजपुताच्या प्रत्येक हिंदूच्या घोड्याच्या पाठीवर आपल्या गुलामगिरीचा दर्शक असा डाग अकबर देत असे. बिनडागलेला असा स्वतंत्र घोडा फक्त मेवाडांतच दृष्टोत्पत्तीस येई. अशा तऱ्हेने राजनीतिकुशल अकबराने आपल्या साम्राज्याची

पोलादी चौकट ह्या पतित राजपुतांच्या साहाय्याने अतिशय मजबूत करून टाकली. त्याची गुलामगिरी पत्करल्यावर भरतवर्षाचा सोनेरी शृंखलांनी व सुराज्यव्यवस्थेने गौरव करण्यास तो तयार होता. अशा तऱ्हेने पूर्वापर भारतवर्ष एकजात दास्याच्या जळजळीत वणव्यांत होरपळून निघत असतां मेवाडमध्येच काय ती आशेची हिरवळ दिसून येत होती.

२. जातीय बहिष्काराचें शस्त्र

प्रताप गादीवर आला त्या वेळीं मेवाडचें सामर्थ्य अतिशय क्षीण झालें होतें. बाबर, बहादूर व अकबर यांशीं झालेल्या लढायांत मेवाडांतील बहुतेक शौर्याचा व तारुण्याचा राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी होम झाला होता आणि बहुतेक महत्त्वाच्या दुर्गांवर मोगली ध्वज फडकत होता. अरवलीच्या पूर्वपश्चिम पहाडीवरचा सुमारें १०० मैल लांब व ६०–७० मैल रुंद इतक्या अल्प प्रदेशाचाच प्रताप स्वामी होता. तथापि मेवाडच्या राजनीतिधुरंधर मंत्र्यांनी महाराणा हंमीर, कुंभ व संग यांनी संचित करून ठेवलेला अपरंपार द्रव्यनिधि मात्र इतक्याही आपत्तींतून सांभाळून ठेवला होता. तो प्रतापच्या स्वाधीन होता. कर्नल टॉडने वर्णन केलेलें प्रतापचें दैन्य केवळ गप्प होय. मेवाडचें मनुष्यबळ क्षीण झालेलें असल्याने व राणा रत्नसिंह, विक्रमाजित, व उदयसिंह हे अयोग्य पुरुष निघाल्याने मेवाडचें राजकीय वर्चस्व अजिबात नष्ट झालें होतें. त्यामुळे अकबरासारख्या प्रबळ शत्रूच्या विरुद्ध राजस्थानांतल्या एकाही राजाचें साहाय्य त्यास मिळण्यासारखें नव्हतें. अशा वेळीं कुलगौरव, धर्माभिमान व अनिर्बंध राष्ट्रीय स्वातंत्र्य यांचा त्याग करून म्लेंच्छसेवेसारख्या नीच वृत्तीचा अवलंब केलेल्या राजपूत राजांना ताळ्यावर आणण्यासाठी प्रतापने निराळ्याच एका शस्त्राचा प्रयोग केला. जातीय बहिष्कार हें तें शस्त्र होय. त्याने आपल्या हाताखालील सरदार व राजस्थानांतील प्रजा यांना ह्या बाटग्या लोकांशीं कोणत्याही प्रकारचा रोटीबेटीव्यवहार करतां कामा नये अशी आज्ञा प्रचलित केली. राष्ट्राभिमानाची वृत्ति जागृत करणाऱ्या त्याच्या या आज्ञेने उभा राजस्थान विजेचा धक्का

लागल्यासारखा एकदम जागा झाला. त्यामुळे राजस्थानांतले अनेक जात्यभिमानी व देशाभिमानी सरदार व शूर पुरुष प्रतापच्या स्वतंत्र व अकलंक ध्वजाखाली जमा झाले.

प्रतापाने स्वत: बादशाहाच्या अंकित झालेल्या सर्व घराण्यांशीं असलेले आपले संबंध तोडून टाकले. व त्याच्या सरदारांनीही ताबडतोब त्याचें अनुकरण केलें. वरपासून खालपर्यंत जाऊन पोचलेल्या या बहिष्कारानें राजस्थानच्या जनतेच्या दृष्टींत प्रतापला एकदम उच्च स्थान मिळालें. त्याच्या संबंधीं आदर व अभिमान उत्पन्न झाला व बाकीचे राजे नीच व पतित दिसूं लागले. याच बहिष्कारामुळे मानसिंह पाहुणा आला असतां प्रतापने त्याच्याबरोबर भोजन केलें नाही व तो भोजनास बसला तेथील जमीन खोदवून गोमूत्र व गंगाजल शिंपडून त्याने ती पवित्र करून घेतली. यावरून हा बहिष्कार किती तीव्र स्वरूपाचा होता याची कल्पना येते.

३. मानसिंहाचें आक्रमण

प्रतापने अकल्पितपणें अशा प्रकारें जातीय बहिष्कारशस्त्राचा प्रयोग करून राजपुतांचें संघटन चालविलेलें पाहून अकबर चिडून गेला. आपल्या अपमानाचें उट्टें काढण्यासाठी तो स्वत: अजमीरपर्यंत चालून गेला व तेथून प्रचंड सेना बरोबर देऊन पंधरा पराक्रमी मोगल सरदारांना व चारपांच राजपूत सरदारांना मानसिंहाच्या हाताखाली देऊन त्याने त्यांस प्रतापवर रवाना केलें. तें पाहून प्रतापने कुंभलमीरच्या किल्ल्याचा आश्रय केला. कुंभलमीर हें एक दुर्गम पहाडांनी घेरलेलें मजबूत स्थान आहे. मोठमोठे उंच व तुटलेले कडे, खोल व भीषण दऱ्या, घोर अरण्यें व वेगवान ओढे यांनी हें सबंध पठार भरलेलें आहे. त्याचा आश्रय करून गनीमी काव्याच्या लढाईस प्रतापने प्रारंभ करून मानसिंहाच्या फौजेस जर्जर करून टाकलें. प्रतापच्या साहाय्यक भिल्लांनी व राजपुतांनी ठिकठिकाणच्या पहाडांतील अडचणीच्या जागीं शत्रूस पकडून मोगल फौजेची लांडगेतोड केली. शिवाय दाणागोटा व रसद मिळणारे सर्व रस्ते बंद करून शत्रूची उपासमार चालविली आणि स्वत: शत्रूच्या रसदीची लूट केली. या स्वारींत प्रतापने अकबराच्या सेनेचा कसा फन्ना पाडला याचें 'मुन्तख बुत्तवा-

रीख'चा कर्ता अल्बदायुनी याने मोठें रसभरित वर्णन केलें आहे. अल्ब-दायुनी हा त्या स्वारींत स्वतः हजर होता व तो अबुल फजल व इतर मुसलमान लेखकांप्रमाणेच बादशाहाचा खैरख्वाह व खुषामदी लेखक असल्याने शाही फौजेचा नाश शक्य तितका कमी करून सांगण्याची व त्याच्या शत्रूची अल्पशीही हानि खूप फुगवून वर्णन करण्याची त्यास सवय होती. तो म्हणतो "भूमि उंचनीच व रस्ते वाकडेतिकडे व काटयागोटयांनी भरलेले असल्याने आमच्या फौजेंत मोठी गडबड उडाली. त्यामुळे आमचा पूर्ण पराजय झाला. आमचे सैनिक जशा शेळयामेढयांच्या झुंडी पळाव्या तसे पळत सुटले."

४. मेवाडची थर्मापिली हळदीघाट

अशा तऱ्हेने मोगल फौजेस जर्जर करून व तिची उपासमार चालवून प्रतापने स्वतः मानसिंहावर आक्रमण करण्याचें ठरविलें. तो किल्ला सोडून पहाडांत घुसला व मानसिंहास त्याच्या फौजेसह घेरीत घेरीत त्याने हळदीघाटच्या खिडींत पकडलें. हळदीघाटची खिड नाथद्वाऱ्यापासून ११ मैल नैर्ऋत्येस आहे. गोगूंदा व खमणोर यांच्यामध्ये पहाडाच्या ज्या विकट रांगा पसरलेल्या आहेत त्यांतून जाणाऱ्या एका अरुंद रस्त्यावर ही खिड आहे. तिच्या दोहोंबाजूस खाली व वर राजपूत व भिल्ल ठेवण्यांत आले होते. त्यांनी बाण व दगड यांचा वर्षाव करून मोगल फौजेचा संहार चालविला. मोगल सेनेच्या तुकडयामागून तुकडया खिडीच्या तोंडाशीं चालून गेल्या. पण तें खिडीचें तोंड कसलें? प्रत्यक्ष मृत्युमुखच तें! खिडीच्या तोंडांत मोगल फौज खाशी पकडली गेली. पण एवढयावरच महाराणा प्रताप स्वस्थ बसला नाही. तीन हजार राजपुतांची एक तुकडी घेऊन खिडीच्या बाहेर मोगल फौजेवर आक्रमण करून तो मानसिंहास धुण्डाळूं लागला. मानसिंहाचें मानमर्दन करण्याचा त्याचा निश्चय होता. राणा प्रतापने केलेल्या या भयंकर हल्ल्याचें अल्बदायुनी वर्णन करतो, "राणा प्रतापच्या सैन्याच्या दुसऱ्या विभागाने, ज्याचें संचालन राणा स्वतःच करीत होता, खिडींतून निघून तिच्या तोंडाशींच असलेल्या काजीखांच्या सैन्यावर हल्ला केला व तिचा संहार करीत करीत तो

तिच्या ऐन मध्यभागीं घुसला. आमची फौज पहिल्याच हल्ल्यांत पळूं लागली होती. ती बनास नदी उतरून पांचसहा कोस तशीच पळत राहिली." अल्बदायुनी पुढे म्हणतो, "दोन्ही पक्षांतील वीरांच्या प्रेतांनी रणांगण नुसतें भरून गेलें होतें........उन्हाळ्यांतील या दिवसांत दुपारीं इतका उष्मा होत असे की, झोपडीच्या आंत बसलें तरी उकळत्या पाण्यांत डोकें ठेवलें आहे की काय असें वाटे. आगीप्रमाणे उन्हाच्या वाफा चालत. आमच्या सैनिकांत तर हिंडण्याफिरण्याचीही ताकद राहिली नव्हती." यावरून मोगल फौजेची कशी दैना झाली होती याची कल्पना येते. हळदीघाटचा संग्राम म्हणजे मेवाडची 'थर्मापिली' होय असें त्याचें टॉडने वर्णन केलें आहे.

५. मानसिंहाचें मानमर्दन

एवंच, अशा तऱ्हेने लढाईचा रंग चालला होता. परंतु प्रतापची प्रतापाकांक्षा इतक्यानेच शांत होणारी नव्हती. ती आपल्या शत्रूच्या—मानसिंहाच्या—नरडीचा घोट घेण्यास अत्युत्सुक झाली होती. राजपूत जातीच्या व राजस्थानच्या गौरवास कलंक लावूनच्या लावून मानसिंहास पुन: मोठेंपण पाहिजे होतें. प्रताप त्यास तें देण्यास तयार नव्हता. इतकेंच नव्हे तर, राजस्थानच्या गौरवाची ज्यास किंमत नाही, त्याची राजवाडाही किंमत करीत नाही, तो अशा देशद्रोह्यांना योग्य शासन करतो हा वस्तुपाठ ह्या प्रसंगाने मानसिंहास शिकविण्याचा प्रतापचा संकल्प होता. तो मानसिंहाचा शोध करीत बेफामपणें मोगल सेनेंत आपला आवडता चेतक नांवाचा घोडा दौडीत होता. चेतकाचा वेग अनिवार होता तर प्रतापच्या भाल्याचा प्रहार दुर्निवार होता. विद्युत्गतीने चेतक पुढे जाई तर वज्रगतीने भाला प्रहार करी. हां हां म्हणतां तो मोगल सेनेच्या ऐन गाभ्यांत शिरला. त्याचा तो भयंकर आवेग पाहून मानसिंह गर्भगळित झाला. प्रतापने त्यास शोधून त्याच्या हत्तीवर आपला घोडा चढविला. चेतक मानसिंहाच्या हत्तीच्या गंडस्थलावर पाय टेकून उभा राहिला. व प्रतापने तीव्र वेगाने मानसिंहाच्या वक्षावर भाल्याचा प्रहार केला. परंतु मानसिंहाने तितक्यांत अंग वाकविल्यामुळे प्रतापचा भाला

त्याच्या वरगडीच्या कवचास चाटून गेला. व माहुताने हत्ती पळविल्यामुळे मानसिहाचा बचाव झाला. हत्तीच्या सोंडेंतील शस्त्र मागील पायास लागल्यामुळे प्रतापचा चेतक जखमी झाला.

६. प्रतापी अश्व चेतक

प्रताप मोगल सेनेच्या ऐन अंतरंगांत सापडल्यामुळे क्षणभर अवाक् झालेल्या मोगल सेनेने आता त्यावर चांगलाच हल्ला चढविला. परंतु आपल्या निवडक स्वारांच्या मदतीने व मानसिह झाला नामक सरदाराच्या चातुर्याने इतक्याही गर्दीतून बचावून व मोगल सेनेच्या बाहेर पडून तो आपल्या सेनेस मिळाला; व जखमेने घायाळ झालेल्या चेतकने आता आपला स्वामी सुरक्षित आहे असें पाहून प्राण सोडले. ज्या घोड्याने जखमी झाल्यावरही आपल्या धन्यास इतक्या बिकट प्रसंगांतून बचावलें त्या चेतकाची धन्य होय! त्याचा तेथेंच चबुतरा बांधून कायमचें स्मारक करण्यांत आलें आहे.

७. हळदीघाटच्या लढाईंतील जयापजय

मुसलमान लेखकांनी यद्यपि बादशाहाची तारीफ करण्याच्या भरांत या लढाईंत प्रतापचा पराजय झाला म्हणून लिहिलें असलें तरी पुढे अलबदायुनीच म्हणतो की, "दुसऱ्या दिवशीं आम्ही गोगुंद्यास जाऊन पोचलों. तेथील राण्याच्या महालांचे व मंदिरांचे जे संरक्षक होते व ज्यांची संख्या फक्त वीसच होती ते आपल्या प्राचीन हिंदु रीतीच्या अनुसार आपल्या प्रतिष्ठेचें रक्षण करण्यासाठी आमच्याशीं लढाई करूं लागले व सर्वच्या सर्व धारातीर्थी पतन पावले. अमीरांना अद्याप भय वाटत होतें की, रात्रीच्या वेळीं येऊन राणा पुनः त्यांच्यावर तुटून न पडो. म्हणून त्यांनी शहराभोवतीं भिंती उभारून व खंदक खणन स्वसंरक्षणाची योजना केली." मोगलांच्या जवळ खाण्याचा कांहीच बंदोबस्त नव्हता, त्यांची रसदही त्यांस येऊन पोचत नव्हती, असें याच लेखकाच्या वर्णनावरून आढळून येतें. "त्यांना झाडांचीं पानें खाऊन निर्वाह करण्याची पाळी आली होती, व त्यामुळे मोगल शिपायी बिमार पडूं लागले होते." मुसलमान लेखकांच्या या वर्णनावरूनही मोगल सेनेचाच वस्तुतः पराजय झाला होता

असें दिसतें. जगदीश मंदिराच्या प्रशस्तिकाव्यांत तर मोगल सेनेचा पराजय झाल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तो येणें प्रमाणें–

कृत्वा करे खड्गलतां स्ववल्लभां
प्रतापसिंहे समुपागते प्रगे ।
सा खंडिता मानवती द्विषच्चमूः
संकोचयन्ती चरणौ पराङ्मुखो ॥

म्हणजे "आपली प्रिय तलवार हातांत घेऊन प्रतापसिंह प्रातःकाळीं जेव्हा युद्धांत आला तेव्हा मानसिंहाची सेना छिन्नभिन्न होऊन व पाठ दाखवून पळूं लागली." राणा रासा इ. राजपूत ग्रंथांत प्रतापचाच विजय झाला असें म्हटलें आहे. वर सांगितल्याप्रमाणे चार महिनेपर्यंत मानसिंहाची फौज एखाद्या कैद्याप्रमाणे गोगुंद्यास पडून राहिली व तेथे तिची भयंकर उपासमार झाली. अखेरीस मोठया मुश्किलीने लढत झगडत ती तेथून निघून बादशाहाजवळ अजमीरास जाऊन पोचली. या भयंकर पराजयाने अकबर मानसिंहावर अतिशय अप्रसन्न झाला.

८. अकबर स्वतः चालून गेला

याप्रमाणे मानसिंहाचा पराभव करून नंतर प्रतापने गुजरातेंतील मोगल मुलुखावर आक्रमण करून लूटमार चालविली. हा समाचार ऐकून अकबराने स्वतः प्रतापवर चालून जाण्याचें ठरवून तो जातीने अजमीराहून निघून गोगुंद्यास येऊन तळ देऊन राहिला. त्यानेही सहा महिने प्रतापचा पिच्छा केला, पण कांही उपयोग झाला नाही व तो निराश होऊन परत चालला; त्याची पाठ वळल्याबरोबर प्रतापने पुनः पहाडांतून बाहेर येऊन आपलीं ठाणीं काबीज केलीं.

९. प्रादेशिक बहिष्कार

अकबराचाही प्रतापला जिंकण्याचा संकल्प दृढ होता. दोन प्रचंड आक्रमणें विफल गेल्याचें शल्य त्यास सारखें बोचत होतें. यानंतर त्याने पुनः वारंवार मिर्जाखां खानखानान, कासिमखां, मीरबहादूर, शहाबाजखां, मानसिंह, पायन्दखां, सैय्यद कासीम, गाजीखां बदख्शी इ. सेनापतींना वेळोवेळीं प्रतापवर चढाई करून पाठविलें. सन १५७२ पासून १५८६

पर्यंत सतत १४ वर्षे अकबर एकामागून एक सेना मेवाडवर रवाना करीत होता; व प्रताप त्यांस तोंड देऊन स्वातंत्र्यसंरक्षण करीत होता. बादशाही फौजेचा हा अविरत ओघ मेवाडवर वळून त्याने मेवाडचा वहुतेक सपाट प्रदेश काबीज केलेला पाहून प्रतापनेंही त्याचा पूर्वज महाराणा हंमोर याने वापरलेलें प्रादेशिक बहिष्काराचें शस्त्र या वेळीं पुनः उपयोगांत आणलें. त्याने मुसलमानांनी काबीज केलेल्या मेवाडी प्रदेशांत राजपूत प्रजेने बिलकूल राहतां कामा नये अशी आज्ञा प्रचलित करून तिची सक्तीने अंमलबजावणी करविली. तिचें उल्लंघन करणारांस त्याने प्राणदंड देण्यासही कमी केलें नाही. मेवाडचा सुपीक सपाट प्रदेश त्याने अगदी उजाड करून टाकला. दिवा लावण्यासही तेथे कोणी उरला नाही. प्रतापचें हें शस्त्र म्हणजे साक्षात करबंदीचेंच हत्यार होय. त्यामुळे मेवाडी मुलुखांतून मिळणारें मोगल बादशहाचें सर्व उत्पन्न एकदम बंद झालें व ठिकठिकाणचीं ठाणीं व्यापून बसलेल्या मोगल फौजेचा खर्च चालविण्यासाठी बादशाही तिजोरींतून पैसा व दाणागोटा मागविण्याची पाळी आली. ह्या बाहेरून येणाऱ्या खजिन्यावर व रसदीवर मेवाडचे स्वतंत्र राजपूत वारंवार हल्ला करीत व लुटीत. अशा तऱ्हेने आंतील कराचें उत्पन्न बंद व बाहेरील मदत लुटून नाहीशी करून प्रतापने व्यापारविषयक बहिष्काराकडे आपलें लक्ष वळविलें. राजस्थानच्या प्रदेशांतून गुजरात व सिंधचा व्यापार मोगली मुलुखाशीं चाले. त्याचप्रमाणें सुरतच्या बंदरांतून मोगल साम्राज्याबरोबर होणाऱ्या युरोपियन व्यापारी दळणवळणाचे मार्गही हेच असत व त्यापासून मोगल साम्राज्यास फार मोठें उत्पन्न असे. प्रतापने आपल्या भिल्लांच्या व राजपुतांच्या साहाय्यानें व्यापाराचे सर्व हमरस्ते व वाटा रोखून टाकल्या. प्रतापच्या भीतीने गांगरलेल्या व्यापाऱ्यांनी मोगलांच्या उत्तर प्रदेशाशीं आपला व्यापार बंद केला व त्यामुळे मोगल बादशाहीचें चांगलेंच आर्थिक नुकसान होऊं लागलें. प्रतापने आपल्या दराऱ्याने व कौशल्याने हा व्यापारविषयक बहिष्कारही उत्तम रीतीने यशस्वी करून दाखविला. अशा तऱ्हेने जातीय उर्फ धार्मिक बहिष्कार, प्रादेशिक उर्फ राजकीय बहिष्कार व व्यापारविषयक उर्फ आर्थिक बहिष्कार या बहिष्कारत्रयीच्या शस्त्रांचा प्रतापाने अकबराशीं त्याच्या झालेल्या स्वातंत्र्य-

युद्धांत अनेकवार उपयोग केला. प्रत्येक परतंत्र राष्ट्राला स्वतंत्र होतांना अथवा स्वतंत्र राष्ट्राला परकीय आक्रमणापासून आपल्या स्वातंत्र्याचें रक्षण करतांना ह्या बहिष्कारत्रयीचा अवलंब करावाच लागतो. हें आधुनिक युगांतील इतिहासांत दिसून येणारें तत्त्व महाराणा प्रतापसिंहानें चारशें वर्षांपूर्वी ओळखून यशस्वी रीतीने आचरणांत आणून दाखविलें.

१०. मोगल सेनेची रेवडी

सतत चौदा वर्षें अव्याहतपणें परिश्रम करून व मार खाऊन मोगल सेना अगदी संत्रस्त होऊन गेली होती व प्रतापचें बळ वाढत होतें. त्याने पुढे पुढे ज्या तडाख्याने मोगल फौजेस चोप दिले त्याचें टॉडने मोठें सुन्दर वर्णन केलें आहे. त्याचा सारांश असा की, "जासुदांनी बातमी आणली की, प्रतापने शहाबाजखांच्या तळावर अचानक रीतीने हल्ला चढवून एकूण एक मोगल सैनिक कापून काढला आहे. (सम्राटपदाच्या मनोराज्यांत गर्क झालेला) बादशहा जागा झाला तोंच पुनः खबर आली की, अमेटच्या तळावरही प्रतापने हल्ला चढविला असून मोगल सेनेची कत्तल उडविली आहे. हा आहे तरी काय प्रकार ह्याचा नीट उमज पडण्यापूर्वीच विद्युच्चापल्याने प्रतापने सेनापति अब्दुल्ला व त्याचे सैनिक यांना आपल्या तरवारीने यमसदनास पाठवून कोमळमीरचा किल्लाही सर केला; व त्यानंतर एकामागून एक बत्तीस मजबूत किल्ले तेथील मोगल सेनापतींस ससैन्य कापून काढून त्याने ताब्यांत घेतले." प्रतापच्या ह्या भीमवेगाचें व रुद्रप्रतापाचें चारण वर्णन करतो—"त्याने मेवाडला रुक्ष रान करून टाकलें. मेवाडच्या मैदानावर जें जें म्हणून (मोगली) असेल त्या प्रत्येकाचा नैवेद्य त्याने आपल्या (चंड) समशेरीस चढविला." सारांश, १५८४ पर्यंत त्याने चितोड व मंगळगड सोडून उदयपुरासह बाकीचा संपूर्ण मेवाड जिंकून आपल्या ताब्यांत घेतला आणि अंबरपर्यंत मजल मारून मालपुऱ्याचा बाजार लुटून फस्त केला.

११. स्वास्थ्याचे दिवस

ह्या चौदा वर्षांच्या अवधींत प्रतापच्या तेजाची पर्याप्त परीक्षा होऊन चुकली होती. त्याला नमविण्याचा प्रयत्न करण्यांत साम्राज्य-

शक्तीचा एकसारखा व्यय होत होता. अखिल आर्यावर्ताचा सम्राट बनले-ल्या अकबराचें सामर्थ्य सागराप्रमाणें अफाट असेल. पण प्रताप खडका-प्रमाणें निश्चल–अभंग–होता. त्यामुळे इत:पर त्याच्यावर प्रहार करणें म्हणजे दगडावर फणा आपटणाऱ्या भुजंगाप्रमाणेंच आपली शक्ति क्षीण करणें होय, हा पाठ अकबराने चौदा वर्षांच्या अनुभवाने ग्रहण केला व त्यानंतर पुन: प्रतापवर आक्रमण करण्याचा साहसी प्रयत्न त्याने करून पाहिला नाही. म्हणून या नंतरचें सुमारें एक तप प्रतापला बाह्यतः स्वास्थ्याचें आणि मेवाडच्या प्रजेस शांतीचें व सुखाचें गेलें व त्यांत तिने आपली शक्ति भरून काढण्याचा झपाट्याने उद्योग चालविला.

अकबरासारख्या प्रबळ बादशहाच्या तडाख्यांतून प्रतापाने मातृदेश सोडविला हें कांही लहान कार्य नव्हे. अकबरापेक्षा कमी योग्यतेचा पुरुष मोगल सिंहासनावर असता तर मराठ्यांच्या आधी प्रतापनेच यावनी साम्राज्य धुळीस मिळविलें असतें. तो नेहमी म्हणत असे की, "उदय-सिंहाच्या ऐवजी मीच एकदम महाराणा संगाच्या पोटीं जन्मास आलों असतों तर राजस्थानांत एक देखील तुर्क शिल्लक राहूं दिला नसता." "बाप्पा रावळच्या वंशजाने कोणाही मर्त्य मानवापुढे आपलें मस्तक नमवावें" ही कल्पनाच त्यास असह्य होती. "माझ्या मातेच्या दुधाचा प्रताप मी केव्हाही कमी होऊं देणार नाही" अशी त्याची प्रतिज्ञाच होती.

त्याची ही प्रतिज्ञा उभा आर्यावर्त जाणून होता. एकदा प्रताप शरण येण्याच्या विचारांत आहे ही गोष्ट अकबराने राठोड सरदार पृथ्वीराज यास सांगितली. पृथ्वीराजास प्रतापची बहीण किरणमयी दिलेली होती. त्या दोघांचाही मोगल दरबारांत चांगला दरारा असे. पृथ्वीराजाने ही गोष्ट साफ खोटी असली पाहिजे असें सांगून तिचें प्रत्यंतर दाखविण्याचें कबूल केलें. त्या उभयतां कवी पतिपत्नींनी प्रतापला पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें:—

पातल जो पतसाह, बोले मुखहूंतां बयण ।
मिहर पछमदिस मॉंह, ऊगे कासप रावउत ॥
पटकूं मूंछा पाण के पटकू निजतण करद ।
दीजो लिख दीवाण, इण दो महली बात इक ॥

याचा अर्थ असा की, "महाराणा प्रतापसिंह जर अकबरला आपल्या तोंडाने बादशाह म्हणेल तर सूर्य पश्चिमेस उगवेल. हे दीवाण (महाराणा) मी आपल्या मिशावर ताव देऊं की, आपल्या तलवारीने आपल्याच शरीरावर प्रहार करून घेऊं; या दोहोंतली एक गोष्ट कळवा."

प्रतापही कवि होता. त्याने या पत्राचें पुढीलप्रमाणें उत्तर पाठविलें—

तुरक कहासी मुखपतौ, इण तन सूं इकलिंग।
ऊगै जांही ऊगसी, प्राची बीच पतंग॥
खुसी हूंत षीतल कमध, पटको मूंछां पाण।
पछटण है जेतै पतौ, कलमॉ सिर केवाण॥

"एकलिंगजी या शरीराकडून अकबरास तुर्कच म्हणवितील व सूर्याचा उदय पूर्वेसच होत राहील. हे राठोड पृथ्वीराज! जोपर्यंत प्रतापसिंहाने आपली तलवार यवनांच्या शिरावर धारण केली आहे तोपर्यंत आपण खुशीने आपल्या मिशीवर ताव देत रहा." यावरून त्याच्या दृढनिश्चयाची व बाणेदार वृत्तीची कल्पना येते. तो जसा वीर व निर्भय सेनानी होता तसाच मोठा क्षमाशील, उदार अंतःकरणाचा व नीतिपरायण महानुभावही होता. धोक्याने त्याने कोणाचा घातही केला नाही. त्याचा पुत्र अमरसिंह याने पकडून आणलेल्या मुसलमान सरदारांच्या बेगमांना त्याने सन्मानपूर्वक वागवून त्यांच्या पतींकडे पाठवून दिलें. त्याच्या योग्यतेविषयीं क. टॉड म्हणतो, "प्रबळ महत्त्वाकांक्षा, शासननिपुणता आणि अपरिमित साधनसंपत्ति यांच्या जोरावर अकबराने दृढनिश्चयी, अदम्य वीर्यशाली, उज्ज्वल कीर्तिमान व साहसी आणि अत्यंत उद्यमशील अशा प्रतापला नमविण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. आल्प्स पर्वताप्रमाणेंच अरवलींतही अशी एक खिंड नाही की, जी प्रतापच्या कोण्या न कोण्या वीरकार्याने, उज्ज्वल विजयाने अथवा त्याहून अधिक कीर्तियुक्त पराजयाने पवित्र झाली नसेल" पं. ओझाजी म्हणतात "महाराण्याचें नांव केवळ राजपुतान्यांतच नव्हे तर संपूर्ण भारतवर्षांत अत्यंत आदर व श्रद्धेने घेतलें जातें. इंग्रजी, तसेंच भारतवर्षाच्या प्रायः सर्वच देशी भाषांत प्रतापच्या वीरत्वाचें यशोगान करणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले आहेत व होत

आहेत. भारताच्या भिन्न भिन्न भागांत महाराणाजयन्ती साजरी करण्यांत येऊं लागली आहे. जोंपर्यंत जगांत वीरपूजा कायम राहील तोंपर्यंत महाराण्याचें उज्ज्वल यश व अमर नांव लोकांना स्वतंत्रतेचा व देशाभिमानाचा पाठ पढवीतच राहील."

१२. अंतकाळ

इ. स. १५८४ पासून १५९७ तेरा वर्षें शांतीचा उपभोग घेऊन महाराणा प्रतापसिंह आंतड्याच्या विकाराने आजारी पडून त्यांतच त्याचा अंत झाला. वाघाची शिकार करीत असतां त्याच्या आंतड्यास झटका पडला व त्यांतूनच त्याचा विकार उद्भवला. 'महाराणायश:प्रकाश' नामक ग्रंथांत शेखावत भूरसिंह म्हणतो, " ईश्वराची माया अपार आहे की, जो वीर मुसलमानांच्या बरोबर अनेक लढायांत कधी घायाळ झाला नाही व जो आपल्या तलवारीने अनेक वीरांना मृत्युशय्येवर निजवीतच राहिला तोच वीर (धनुष्याची) कमान ओढण्याने आजारी होऊन या जगांतून नेहमीकरितां रवाना झाला." मरतेवेळीं त्यास चितोड घेण्याची व मेवाडच्या स्वातंत्र्याचीच चिंता वाटत होती. जेव्हा त्याच्या सरदारांनी आपण निश्चयपूर्वक मेवाडचें स्वातंत्र्य रक्षण करूं असें त्यास प्रतिज्ञेवर आश्वासन दिलें तेव्हाच सुखाने त्याने प्राण सोडले. त्याच्या मृत्यूचा समाचार ऐकून अकबरास मोठा उद्वेग वाटला. कारण प्रतापसिंहाची खरी योग्यता तोच ओळखून होता.

प्रतापच्या जीवनाबरोबरच १६ व्या शतकाचाही अंत झाला. हें शतक मेवाडच्या दृष्टीने अतिशय आपत्तीचें गेलें. तथापि त्याच्या उत्तर पादांत राणा प्रतापने मेवाडचा यशोदुन्दुभि सर्वत्र श्रवण करविला.

प्रकरण नववें

१. कार्पण्याचें भाकीत

राणा प्रतापसिंहास एकूण १७ पुत्र होते. त्यांपैकी अमरसिंह सर्वांत वडील असल्याने प्रतापच्या मृत्यूनंतर तोच मेवाडच्या गादीवर बसला.

मेवाडच्या सर्व राजांपेक्षा तो शरीराने उंच व बलिष्ठ होता. आपल्या पूर्वजांप्रमाणें तो तितकासा सुंदर नसला तरी औदार्य, शौर्य, दाक्षिण्य, न्यायप्रियता, दयालुत्व व प्रेमळपणा यांत तो कोणासही हार जात नव्हता. बालपणापासूनच प्रतापसारख्या असामान्य महापुरुषाच्या तालमींत तो तयार झाला असल्याने बापाचे बहुतेक गुण त्याच्या ठिकाणीं उतरले होते; तथापि विपत्तीमुळे गांजलेल्या मनास ज्या एका नाजुक क्षणीं कार्पण्याचा दोष स्पर्श करतो त्या वेळीं मात्र तो कसोटीस उतरणार नाही तर पथभ्रष्ट होईल असें त्याचें भविष्य प्रतापसिंहाने मृत्युशय्येवरून केलें होतें. अमरसिंहाचीही कारकीर्द प्रतापसारखीच अद्‌भुत व रोमांचकारी घटनांनी भरलेली असली तरी प्रतापचें भाकित अखेरीस खरें ठरून त्याने अंशत: पारतंत्र्याची बेडी आपल्या पायांत अडकवून घेण्याचें पाप केलें असल्याने स्वातंत्र्यप्रेमी लोकांना तिचें महत्त्व कमी दर्जाचें वाटणें स्वाभाविक आहे.

२. सेलीमचा पराजय

राणा प्रतापसारखा राजशार्दूल मेवाडच्या गुहांतून डुरकाळ्या फोडीत या पर्वतावरून त्या पर्वतावर जोंपर्यंत निर्भयपणें संचार करीत होता तोंपर्यंत अकबरासारख्या शहानशाहाची बारा वर्षेपर्यंत मेवाडकडे वर डोळा करून पाहण्याची छाती झाली नव्हती. परंतु प्रतापच्या मृत्यूनंतर आता आपण अमरसिंहास हां हां म्हणतां नेस्तनाबूद करून टाकूं व आजपर्यंत स्वातंत्र्याचा डौल मिरविणाऱ्या देशास आता निश्चयपूर्वक गुलामगिरीच्या पंकांत बुडवून टाकूं अशी अकबरास पुनश्च आशा वाटूं लागली. म्हणून त्याने सेलीमच्या सैन्यापत्याखाली अनेक मुसलमान सरदारांना जंगी फौजेसह मेवाडवर पाठविलें. पण प्रतापने दिलेले टोमणे अमरच्या कानांत अहर्निश निनाद करीत असल्याने व प्रतापच्या तालमींत तयार झालेल्या राजपूत सरदारांच्या बरेच दिवस विश्राम पावलेल्या समशेरी पुन: शत्रूचें रुधिर प्राशन करण्यास उत्सुक झाल्या असल्यामुळे अमरसिंहाने सेलीमचा फारच जोराचा प्रतिकार केला व मोगल फौजेचा निव्वळ धुव्वा उडविला. इतकेंच नव्हे तर मोगलांच्या ताब्यांत असलेला उंटाळ्याचा किल्ला जिंकून उत्तरेस मालपुऱ्यापर्यंत मजल मारली. व तेथील बाजार लुटून फस्त केला. मोगली मुलुखावरील या स्वारींत त्याने

मांडल, नागौर वगैरे कित्येक शाही ठाणीं लुटलीं; व राजपुतांचा चोहोकडें इतका दरारा बसविला की, मोगल ठाणेदार आपलीं ठाणीं सोडून पळून गेले. अबुल फाजल म्हणतो, "जेव्हा शहाजादा सेलीम यास राणा अमरसिंहास शासन करण्यासाठी पाठविण्यांत आलें तेव्हा वाईट संगतींत सापडलेला तो राजपुत्र दारूचे प्याले उडवीत व आरामांत व आळसांत वेळ घालवीत कांही काळ अजमीरास राहून उदयपुरावर चालून गेला. परंतु महाराण्याने दुसरीकडेच झुकांडी देऊन मालपुरा व बादशाहाचे दुसरे उत्पन्नाचे इलाखे लुटून मारले. तसाच तिकडून परत येतांना रात्रीं त्याने शाही फौजेवर हल्ला चढविला." अशा तऱ्हेने सेलीमच्या या आक्रमणांत अमरसिंहाने त्यास खासे चुरमुऱ्याचे लाडू खावयास लावले.

३. देशद्रोह्याचा पश्चात्ताप

इ. स. १६०५ सालीं अकबराचा देहांत होऊन सेलीम 'जहांगीर' ही पदवी धारण करून गादीवर बसला. स्वतःच्या पराजयाचें शल्य तर त्याच्या मनांत सारखें टोचत होतेंच. मेवाड दमन करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा त्याच्या अंतःकरणांत फार तीव्रतेने जागृत झाली होती. यानंतरच्या त्याच्या कार्यक्रमांत साम्राज्याची सर्व शक्ति एकवटून मेवाडवर चढाई करणें हें एक महत्त्वाचें अंग होऊन बसलें होतें. टॉडच्या म्हणण्याप्रमाणें सतरा वेळां जहांगीरच्या सेनासागराच्या प्रचंड लाटा मेवाडवर आदळल्या; पण सतरा वेळां आत्यंतिक पराजयाशिवाय त्याच्या वाट्यास दुसरें कांहीच येऊं शकलें नाही. मेवाडदमन करण्याच्या बाबतींत त्याने साम, दाम, भेद व दंड या सर्व नीतींचा उपयोग करून पाहिला, पण व्यर्थ. अखेरीस रिपुहृदयांत शल्य उत्पन्न करण्यासाठी प्रतापचा भाऊ सागर यास मेवाडचा राणा बनवून त्याने चितोडच्या गादीवर बसविलें. परंतु या भेदनीतीस मेवाडचा एकही सरदार बळी पडला नाही व अमरसिंहास सोडून सागरपक्षास मिळाला नाही. राजपुतांनी चितोडचा किल्ला निर्जन करून मोगलांच्या ताब्यांत दिला होता. आपल्या देशासाठी स्वप्राणांचेही बळी अर्पण करणाऱ्या अनेक पराक्रमी राजपूत वीरांच्या रुधिर-

धारांनी अभिषिक्त झालेल्या त्या गौरवस्तंभांची, मंदिरांची व महालांची सागरजीने जों जों अधिक सजावट करावी तों तों त्यास त्यांची भीषणता भयप्रद रीतीने वाढत आहे असें वाटावें. अखेरीस त्याच्या आंतरिक स्वातंत्र्याकांक्षेने त्याच्या पाशवी गुलामी वृत्तीवर विजय मिळविला व कांही वर्षांच्या लज्जान्वित जीवनानंतर त्याने चितोडच्या किल्ल्या राणा अमरच्या स्वाधीन करून गत पापाचें प्रायश्चित्त म्हणून स्वत: जंगलचा रस्ता धरला.

४. जय की पराजय

सतरा वेळा जहांगीरच्या सेनेने मेवाडवर प्रचंड आक्रमणें केलीं व सतराही वेळ वीर राजपुतांनी तिचा पराजय केला. पण या सतरा विजयांनी मेवाडचा कोणता लाभ झाला? जहांगीर अद्याप मेवाडजयाची आकांक्षा बाळगून अजमीरास तळ देऊन बसलाच होता. सतरा पराजयांनीही हतोत्साह होऊन तो क्षेत्र सोडून गेला नाही. मोगल फौजेची झालेली हानि साम्राज्याच्या अन्य भागांतून पैसा व मनुष्यबळ आणून तो भरून काढी. परंतु प्रत्येक लढाईंत मेवाडचा एकेक वीर धारातीर्थी पतन पावला त्याची जागा पुन: भरून निघत नव्हती. कारण मेवाडचें क्षेत्र संकुचित होतें, तर मोगल साम्राज्याचें अफाट! अशा तऱ्हेने प्रत्येक खेपेस जय होऊनही अमरसिंहाचें मनुष्यबळ व द्रव्यबळ, विशेषत: मनुष्यबळ, प्रत्येक खेपेस कमी होत गेलें. त्यामुळे या सतरा विजयांच्या उदरांतूनच अठराव्यांदा त्याचा पराजय जन्मास आला.

५. अठरावें आक्रमण

सतरा पराजयांनी चेकाळलेल्या जहांगीरने पुन: एकदा मेवाडवर आक्रमण करण्याची प्रचंड तयारी केली. या खेपेस आक्रमणसेनेचें संचालन त्याने राजपुत्र खुर्रम उर्फ शहाजहान याजकडे सोपविलें. दक्षिणच्या व अफगाणिस्थानच्या अनेक युद्धांत शहाजहानचें सेनासंचालननैपुण्य शाबीत झालें होतें.

मोगल सेनेचा प्रचंड प्रवाह पाहून अमरसिंहाने मोठी सेना उभारण्याची आकांक्षा धरली व मेवाडच्या कोन्याकोपऱ्यांतून प्रत्येक वीराने

मातृभूमीच्या संरक्षणासाठी रणमैदानांत यावें अशी घोषणा सर्वत्र झाली खरी ! पण ती श्रवण करण्यास मेवाडांत तो पूर्वीचा राजपूतांचा अखंड झरा वाहत होता कोठे ? तो तर आटून पार शुष्क झाला होता ! गेल्या सतरा युद्धांत राजपूत तारुण्याचा मेवाडच्या भूमीवर इतका सडा पडला होता की, आता मेवाडांत बाल व वृद्ध यांशिवाय मनुष्यच उरला नव्हता म्हटलें तरी चालेल. तथापि उरलेसुरले तरुण व प्रौढ आपल्या राजाची घोषणा श्रवण करून समशेरी हातांत धरून पुढे आलेच. पण त्यांची संख्या अत्यल्प होती. राणा अमरसिंहाने पुनः घोषणा केली, "प्रसंग आणीबाणीचा आहे. गेल्या एक सहस्र वर्षांत बाप्पारावळच्या सिंहासनास परकीयांचा स्पर्श झाला नाही. आज त्या आकांक्षेने शत्रु मेवाडवर येत आहे. मेवाडचा देशाभिमानी व स्वातंत्र्यप्रिय राजपूत आपल्या हाताने आपल्या देशास गुलामींत ढकलणार, की आदित्यध्वजाखाली जमा होऊन आपल्या पूर्वजांचा कित्ता गिरविणार ?" पण व्यर्थ ! देशांत वीर राहिलेच नव्हते तर येणार कोठून ? अखेरीस जमले तितक्या लोकांनिशीं मोगल फौजेशीं टक्कर देण्याचा त्याने निश्चय केला.

जन्मभूमीच्या मानरक्षेकरितां अमरसिंह आपली चिमुकली सेना घेऊन रणांगणांत उतरला खरा ! पण खुर्रमच्या प्रचंड सेनेने त्याचा केव्हाच धुव्वा उडविला. आता अमरसिंहासमोर त्याच्या पित्याप्रमाणेंच स्वातंत्र्य हवे असेल तर वनवास पत्करून त्यांतील अपार कष्ट सहन करण्यास तयार व्हावें अथवा पारतंत्र्याची शृंखला एकदा अडकवून ऐषआरामाच्या गाद्यागिरद्यांवर लोळत पडावें असा प्रश्न उपस्थित झाला. याच वेळीं प्रताप व अमर यांच्यांतला फरक प्रकट झाला. अखेरीस प्रताप तो प्रताप व अमर तो अमरच ठरला ! प्रतापचें भाकितच बरोबर ठरलें. कार्पण्याने अमरच्या मनांत प्रवेश केला. वनवासाच्या कंटकाकीर्ण परंतु स्वच्छंद जीवनापेक्षा पारतंत्र्याची रेशमी दोरी गळचाभोवतीं बांधून घेणें त्याने पसंत केलें.

त्याच्या सरदारांनी त्यास या कृत्यास प्रोत्साहित करून त्याचें पाप वाटून घेतलें. बादशाहाचें मांडलिक होण्यांत कोणकोणती मानहानि सहन करावी लागते याची सरदारांना पूर्ण कल्पना होती. तथापि राणा प्रता-

पच्या वेळचा कणखरपणा सरदारांत उरला नव्हता. वृद्ध सरदार गलितगात्र झाले होते आणि नवीन व ताज्या दमाचे सरदार उरले नव्हते. सरदारांच्या आग्रहास त्याचें कार्पण्यदोषोपहत मन बळी पडलें व जहांगीरबरोबर संधि करण्यास त्याने मोठ्या कष्टाने व खिन्न अंतःकरणाने संमति दिली. आपल्या पित्याचें आपल्याबद्दलचें भविष्य अखेरीस खरें ठरलें याचें त्यास मरणप्राय दुःख झालें.

जहांगीरच्या बरोबर अमरसिंहाने जो मांडलिकत्वाचा तह केला त्याच्या अटी खालीलप्रमाणें होत्या.

(१) महाराणा स्वतः बादशाहाच्या दरबारांत कधीही जाणार नाही. त्याच्या ऐवजी त्याचा ज्येष्ठ पुत्र दरबारांत हजर राहील.

(२) शाही सेनेंत महाराण्यातर्फे एक हजार राजपूत स्वार चाकरी करतील.

(३) चितोडच्या किल्ल्याची डागडुजी करून त्यास मजबुती आणण्यांत येणार नाही.

६. जहांगीरचा आनंद

खुर्रमने आपल्या पराक्रमाने व राजनीतिपटुत्वाने अमरसिंहासारख्या मेवाडच्या राण्यास संधि करण्यास भाग पाडलें याने जहांगीरला आत्यंतिक आनंद झाला. गेल्या हजार वर्षांत मेवाडच्या राण्याचें दलन करण्याचें महत्कार्य कोणाही मुसलमान बादशाहास साधलें नाही तें आपणास साधलें याबद्दल जहांगीरला अत्यानंद होणें स्वाभाविक होतें. ह्या आनंदाचें व भाग्याचें वर्णन ‘तुजुके जहांगिरी’ नामक आपल्या रोजनिशींत जहांगीरने स्वतःच पुढील प्रमाणें केलें आहे–

“माझ्या स्वतःच्या कारकीर्दींत ही घटना घडत असल्यामुळे मला अत्यानंद झाला. वस्तुस्थिति अशी की, राणा अमरसिंह व त्याचे पूर्वज ह्यांना आपल्या पहाडी देशाच्या व त्यांतील किल्ल्यांच्या दुर्लंघनीयत्वाचा सगर्व विश्वास वाटत असे. त्यांनी हिंदुस्थानच्या कोणाही राजासमोर मान वाकविली नाही. माझ्या भाग्यपूर्ण आयुष्यांत माझ्या हातून असली संधि दवडली जाऊं नये अशी माझी उत्कंठा होती. त्यामुळे माझ्या पुत्राने

(खुर्रमने) मला कळविल्याबरोबर मी राण्यास क्षमा केली; आणि मैत्रीचें फर्मान पाठवून त्याला मी तुझें काळजीपूर्वक संरक्षण करीन असें आश्वासन दिलें व त्यावर माझ्या सदिच्छेची पवित्र खूण म्हणून माझ्या पंजाचा (केशरांत बुचकळून) छाप मारला. मी माझ्या पुत्रास आणखी असेंही लिहीलें की, अमरसिंह अंत:करणापासून संतुष्ट राहील अशासाठी ज्या ज्या उपायांचा अवलंब करावा लागेल तें सर्व कर."

७. कर्णाचा मोगल दरबारांतील गौरव

युवराज कर्ण ज्या वेळीं मोगल दरबारांत गेला त्या वेळीं त्याचा स्वत: जहांगीरने व नूरजहानने आजपर्यंत कोणाही जेत्याने जिताचा केला नसेल इतका गौरव केला. त्याच्यावर देणग्यांचा सन्मानाचा व पाहुणचारांचा वर्षाव करण्यांत आला. "खरें पाहिलें असतां" सर टॉमस रो ह्या जहांगीरच्या दरबारांतील इंग्रज वकिलाने वर्णन केल्याप्रमाणें––"त्याला जिकण्यांत आलें नसून द्रव्यवश करून घेण्यांत आलें होतें. भुजबळाचें श्रेष्ठत्व ओळखून त्याने जहांगीरला सम्राट म्हणून मान्य केलें नसून जहांगीरच्या नजराण्यांनी हें कार्य घडवून आणलें होतें." ह्यावरून ध्यानांत येईल की, अमरसिंहाला आपल्या शक्तीने जिंकणें अशक्य आहे याची जहांगीरला बालंबाल खात्री होती; व त्याच्या एका दुर्बळ मन:स्थितीचा फायदा घेऊन मानसन्मानांच्या भपक्याखाली त्याने त्यास आपलेंसें करून घेण्याचा प्रयत्न केला होता. विजेत्या शासकाकडून पददलित राजसत्तेचा इतका आदर क्वचितच झाला असेल.

अमरसिंहाने आपले उरलेले सर्व सरदार एकत्र जमवून कर्णाच्या कपाळीं युवराजपदाचा टीका लावला. व "आता मेवाडचा सर्व गौरव तुझ्या हातीं आहे" असें बजावून व राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें त्याच्या हातीं देऊन तो नौचौकीच्या एकांत प्रदेशांत उर्वरित आयुष्य व्यतीत करण्यास निघून गेला.

८. पारतंत्र्यांतील शांतता

याप्रमाणें इ. स. १६२० सालीं राजपुत्र कर्णास यौवराज्याभिषेक होऊन तो राज्यकारभार करूं सागला. तो जहांगीर व शहाजहान या

उभयतांच्या प्रेमांतला असल्याने त्याची सर्वच कारकीर्द मेवाडच्या प्रजेच्या दृष्टीने अंतस्थ सुखाची, समृद्धीची व शांततेची गेली. कर्ण जातीने मोठा शूर व कुशल सेनानी असला तरी आता युद्धाचें कारणच नाहीसें झालें असल्याने त्यास इतःपर या गुणाचा विकास करण्यास अवसरच सापडला नाही. मिळालेल्या संधीचा उपयोग करून त्याने आपल्या आयुष्याचीं वर्षे मेवाडची अंतर्व्यवस्था करण्यांत घालविलीं. सतत दोन तपांवर अविरत लढायांनी झालेली मेवाडची क्षति भरून काढण्याचा त्याने कसून प्रयत्न केला. बादशाहाच्या कृपेने त्यास मेवाडचा सर्व मुलूख परत मिळाला होता. म्हणून त्याने प्रथम मेवाडच्या भग्न किल्ल्यांची दुरुस्ती करविली. सरकारी कोष समृद्ध केला. प्रजाहिताचीं अनेक कामें सुरू केलीं. उदयपूरच्या सभोवारच्या टेकड्यांवरही अधिक तटबंदी केली. शहरासभोवार तट उभारून त्याभोवतीं खंदक खणविले. महाराणा अमरसिंहाने सुरू केलेली शेतीच्या लागवणीची पद्धत अमलांत आणली.

कर्णानंतर त्याचा पुत्र जगतसिंह गादीवर आला. त्याच्यावरही शहाजहानचा फार लोभ असे. त्याने १६५२ पर्यंत राज्य केलें. त्याच्याही कारकीर्दींत मेवाडला अतिशय सौख्याचे दिवस लाभले. त्याने मेवाडचें पूर्वीचें नुकसान बहुतेक भरून काढलें. त्याचा राजस्थानांत मोठा आदर असे. तो विद्वानांचा व शूरांचा मोठा चाहता असे. त्याची अभियुक्त वागणूक, उच्च चारित्र्य, भाषणांतील माधुर्य व आकर्षकता, व्यक्तित्वाचें तेज इ० गुणांनी ज्यांचा ज्यांचा म्हणून त्याच्याशीं एकदा सहवास घडला—मग तो दिल्लीचा बादशाहा असो, इंग्लंडचा वकील असो अथवा हिंदुस्थानांतला कोणीही मोठा सरदार अथवा सेनापति असो— त्या सर्वांवर त्याच्या पौरुषाची चटकन छाप पडत असे. खुद्द जहांगीरने व त्याच्या दरबारांतील इंग्रज वकिलाने त्याची फार प्रशंसा लिहून ठेविली आहे. परंतु त्याच्या इतक्या सर्व गुणांचें केवळ एकट्या पारतंत्र्याच्या दोषाने विशेषसें चीज होऊं शकलें नाही.

त्याच्या कारकीर्दींतली महत्त्वाची गोष्ट म्हणजे बादशाहाशीं झालेलीं तहाचीं कलमें उल्लंघूनही त्याने चितोडच्या किल्ल्याची डागडुजी करण्याचें काम सुरू केलें.

प्रकरण दहावें

१. सामान्य परिस्थिति

जगतसिंहानंतर महाराणा राजसिंह गादीवर आला. मेवाडच्या उत्तर काळांत हाच एक अश्रुतपूर्व कीर्तीचा पुरुष होऊन गेला असें म्हणण्यास हरकत नाही. त्याच्या राज्यारोहणाच्या काळांत हिंदुस्थानच्या भाग्यचक्राचे काटेही बरेच निराळ्या दिशेने फिरूं लागले होते. मोगल साम्राज्याचा समस्त हिंदुस्थानावर अप्रतिहत अधिकार बसलेला दिसत होता. अकबर व जहांगीर जें कार्य करूं शकला नाही तें शहाजहानने करून दाखविलें होतें. व मलिकंबर, चांदबिबी व महाराजा शहाजी यांच्यासारख्या धुरंधर मुत्सद्द्यांनी व सेनानींनी संरक्षिलेलें अहमदनगरचें निजामशाही राज्य नेस्तनाबूद करून आपल्या साम्राज्यांत सामील करून घेतलें होतें. दक्षिणचा नवा सुभा निर्माण करून औरंगाबाद येथे नव्या सुभेदाराची योजना केली होती. काबूलकंदाहारकडच्या कडव्या लोकांच्या बंडाचा स्वतः शहाजहानने उपशम करविला होता आणि आसामच्या बाजूस सतत उपद्रव देणारे आहोम लोकही त्याच्या कारकीर्दींत शक्य तितकी बाह्य शांतता बाळगून होते. उदयपूरचे महाराणे त्याचे अंकित झाले असल्याने राजस्थानांत भीति बाळगण्याजोगी परिस्थिति राहिली नव्हती. एवंच, शहाजहानला शांतताप्रिय ही पदवी प्राप्त होण्यासारखी शांततेची परिस्थिति त्याच्या राज्यांत नांदत होती, हें खरें असलें तरी दक्षिणेंत दूर पुणें व सुपे परगण्यांत बाह्यतः आत्मसंरक्षणाचा आभास उत्पन्न करणारा शिवाजी विजापूरच्या मुलखांतील किल्ले हस्तगत करून तेथील तटबंदी व शिबंदी वाढवीत होता, व महाराष्ट्रांतील तरुण मावळ्यांच्या अंतःकरणांत महाराष्ट्रस्वराज्याचें बीजारोपण करीत होता. एवंच, ह्या सतराव्या शतकाच्या प्रथमार्धांत भारतवर्षाच्या भावी भाग्य-

वृक्षाचीं बीजें सर्वत्र रोवलीं गेलीं असून महाराष्ट्रांत तर त्यास अंकूरही फुटूं लागले होते.

अशा या भारतीय स्वातंत्र्याच्या मंगलमय उषःकाळींच राजसिंहा-सारखा कर्तबगार पुरुष राजस्थानांत मेवाडच्या सिंहासनावर यावा हाही योगायोगच होय.

२. भावी बंडखोरीची प्राथमिक तयारी

राजसिंहाच्या अंतःकरणांत मोगली पारतंत्र्याचें शल्य अहर्निश सलत होतें व तें त्याने आपल्याच हाताने उपटून टाकण्याचा निश्चयही केला होता. जगत्सिंहाने सुरू केलेलें चितोडच्या डागडुजीचें काम त्याने अतिवेगाने पुढे चालविलें. पंधरा दरवाजे व बुरूज दुरुस्त करून त्याने तें कार्य बहुतेक संपवीतच आणलें होतें. परंतु मेवाडचा राणा अटींचें अशा तऱ्हेने उल्लंघन करतो आहे ही गोष्ट शहाजहानला कळतांच त्यानें ३००० मोगल गड पाडण्यासाठी पाठविले. राजसिंह नुकताच सिंहासना-सीन झाला असल्याने त्याची अद्याप मोगल तरवारीशीं तरवार भिडविण्या-ची तयारी नव्हती. म्हणून त्याने ह्या वेळीं नमतें घेतलें. मोगल फौजेने पंधरा दिवसांतच गडाची नासधूस करून त्याचें काम मातींत मिळविलें. यानंतर दुसरें महत्त्वाचें कार्य राजसिंहाने केलें तें असें.

त्याच्या बापाच्या व आजाच्या कारकीर्दींत मेवाडच्या सरहद्दीवरील त्याचे जहागीरदार व मांडलिक संस्थानिक हळूहळू बंडखोर बनून तो गादीवर आला त्या वेळीं स्वतंत्र झाले होते. राजसिंहाने प्रथमतः त्यांनाच ताळ्यावर आणण्याचें ठरवून त्यांच्यावर जोराचीं आक्रमणें केलीं. या बाबतींत त्याने व शिवाजीने स्वीकारलेल्या धोरणांत विलक्षण साम्य आहे. शिवाजीने प्रथम महाराष्ट्रांतील त्याला विरोध करणाऱ्या मराठा सरदारांना ताळ्यावर आणून सबंध महाराष्ट्रांत आपला वचक व दरारा बसविला. तद्वतच राजसिंहाने या बंडखोर सरदारांना व जहागीरदारांना आपल्या शौर्याने व मुत्सद्दीपणाने लगाम घालून राजस्थानांत स्वतःविषयीं वचक व दरारा निर्माण केला. या त्याच्या प्रयत्नांतील विशेष हा की, हे सर्व सरदार आपणास मोगल बादशाहाचे साक्षात् अंकित म्हणवून घेत व

उदयपूरच्या महाराण्यास करभार देण्याऐवजी दरसाल दिल्लीच्या खजिन्यांत तो जमा करीत. त्यामुळे त्यांना जिंकून त्यांचा मुलुख आपल्या राज्यास जोडणें म्हणजे मोगल साम्राज्याचीच प्रत्यक्ष आगळीक करणें होतें. चितोडच्या बाबतींत त्यास जी नमती बाजू घ्यावी लागली तिचा बदला त्याने अशा तऱ्हेने घेतला. १६५८ पर्यंत म्हणजे औरंगजेब शहाजहानला पदच्युत करून तख्तनशीन होईपर्यंत राजसिंहाने मांडल, दरीबा, बनेडा, शाहपुरा, जहाजपूर, सावर, फुलिया, केकडी, टोडा, टोंक सांभर, लालसोट व चाटसू इतक्या ठिकाणच्या बंडखोरांचा बंदोबस्त करून व त्यांच्या जवळून खंडणी वसूल करून त्याने मालपुऱ्यावर भरारी मारली व नऊ दिवस तेथे राहून मोगली मुलखांतलें तें शहर त्याने मनसोक्त लुटलें. या बाबतींत त्याचें शिवाजीच्या आक्रमणाशीं व सुरत शहर लुटण्याशीं बरेंच साम्य आहे.

३. गाठ पडली ठका ठका

सन १६५८ सालीं त्याचा औरंगजेबाशीं समक्ष सामना येऊन पडला. सामूगढच्या लढाईंत विजयी झालेला औरंगजेब शहाजहानला पदच्युत करून मोगल साम्राज्याचा अधिकारी बनमार हें त्यास निश्चित दिसत होतें. परंतु स्वतःच्या मुलखांत आपला पाय स्थिर झाल्याशिवाय या बापलेकांच्या भांडणांत आपण लुडबूड करूं नये असा शिवाजीप्रमाणेंच त्यानेही विचार केला होता. या संधीचा फायदा घेऊन मेवाडच्या सरहद्दीवरील मुलखावर अधिकाधिक आक्रमण करून तो आपल्या राज्यांत समाविष्ट करीत होता. व 'मी आपल्यातर्फे लढाईंत मदत करतों' अशीं औरंगजेबास आश्वासनें देऊन केवळ त्याच्याच भरवशावर जिकलेले प्रदेश आपल्या राज्यास कायमचे जोडण्याची त्याची संमति तो घेत होता हा एक ठकाठकांचाच सामना होता. औरंगजेब राजसिंहास पूर्ण ओळखून होता. राजसिंहाने आपल्या विरुद्ध जाऊं नये एवढ्याच एका हेतूने तो त्याच्या शहाजहानविरुद्ध केलेल्या बंडखोरीच्या कृत्यास संमति देत होता. एकदा राज्यपद आपल्या हातीं आलें म्हणजे पाहून घेऊं असा

याचा डाव; तर एकदा आपला राज्यविस्तार व अंतःस्थ मजबुती झाली म्हणजे पाहून घेऊं असा त्याचा डाव. एवंच, अशा तऱ्हेने राज्याधिकाराच्या लढाईच्या काळांत औरंगजेबास झुलवत ठेऊन राजसिंहाने त्याच्याकडून स्वतःच्या राज्यास बराच मूलुख मात्र मिळवून घेतला. औरंगजेबानेही विरुद्ध पक्षास न मिळाल्यास काय घेशील या न्यायाने दक्षिणेंतून निघाल्यापासून तों गादीवर बसेपर्यंत सतत राजसिंहावर स्तुतिपर पत्रें, नजराणे, इनाम व देणग्या इत्यादिकांचा सारखा वर्षाव केला.

४. सापाच्या दाढेंतलें माणिक उपटलें

परंतु ही बनावट मैत्री किती दिवस टिकणार? थोडक्याच काळांत म्हणजे १६६० सालींच तिचा भंग होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली. किशनगढचा सरदार रूपसिंग याची कन्या चारुमती ही त्या काळांतली राजस्थानांतली अत्यंत लावण्यवती स्त्री समजण्यांत येत असे. औरंगजेबाचा प्रथमपासूनच तिच्यावर डोळा असे. त्यामुळे बादशहा झाल्याबरोबर प्रथमतः त्याने तिला मागणी घातली व तिला आणण्यासाठी एक सेनेची तुकडी रवाना केली. परंतु त्या स्वाभिमानी व तेजस्वी राजपूत कुमारीची अशा तऱ्हेने संस्कृतिभ्रष्ट होण्याची मुळीच इच्छा नसल्याने तिने त्याची 'माकडतोंडचा जंगली जठ' म्हणून संभावना केली व रुक्मिणीप्रमाणें महाराणा राजसिंहास एका ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून आपणास या धर्मसंकटांतून सोडविण्याची प्रार्थना केली. त्याबरोबरच राजसिंहासारख्या नरश्रेष्ठाच्या चरणाची दासी होऊन राहण्यांत आपणास भूषण वाटेल अशी आपली अनुरक्तीही तिने त्यांतच प्रकट केली. वास्तविक पाहतां तिचा बाप रूपसिंह हा मेवाडशीं बंडखोरी करणाऱ्या सरदारांपैकी एक होता व त्याबद्दल राजसिंहाने त्यास थोड्याच दिवसापूर्वी प्राणदंड दिला होता. परंतु राजपूतरमणी ह्या नेहमी गुणावर लुब्ध होत असल्याने राजसिंहाचा हा पराक्रमच चारुमतीचें चित्र त्याच्या ठायीं वेधून येण्यास कारण झाला होता. औरंगजेबासारख्या शहानशहाने मागणी घातलेल्या या कन्येचें स्वतः ग्रहण करणें म्हणजे त्याच्याशीं उघड सामना करण्यास आपण तयार आहोंत असें त्यास आव्हान देणेंच होतें. पण स्त्रीदाक्षिण्याचा पुरस्कर्ता

हाडाचा राजपूत वीर राजपूत स्त्रियांच्या शीलसंरक्षणासाठी वाटेल तें दिव्य करण्यास तयार असतो, या गोष्टीचें प्रत्यंतर राजसिंहाने त्या प्रसंगीं आणून दिलें. त्याने आपल्या निवडक स्वारांसह रातोरात किशनगडावर चाल करून मोगल सेना कापून काढली व चारुमतीस आपल्याबरोबर उदयपुरास आणून तिचें पाणिग्रहण केलें. राजसिंहाच्या या साहसाने तो राजस्थानांत एकदम चमकन उठला व त्यास सर्व राजपूत राजांत अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें स्थान मिळालें.

या धाष्ट्यांबद्दल औरंगजेबानें त्यास जाब विचारला असतां त्याने त्यास तितक्याच निर्भयपणें पुढीलप्रमाणें बाणेदार उत्तर दिलें. "राजपुतिनींचा विवाह नेहमी राजपुतांच्याच बरोबर होत असतो. त्या-करितां तुमची परवानगी मागण्याची जरूर काय ?" अशा तऱ्हेने त्यानें किशनगडचें हें लावण्यमाणिक औरंगजेबाच्या दाढेखालून ओढून काढलें. त्यामुळे दिल्लीच्या साम्राज्याशीं त्यास उघड वैर पत्करावें लागलें असलें तरी राजपूत जातीच्या मनांत हाच आपला उद्धारकर्ता आहे अशी आशेची ज्योत प्रज्वलित झाली; व त्यांच्या या तेजस्वी कृत्याने औरंगजे-बाशीं त्याच्या झालेल्या पुढील युद्धांत राजपूत सरदारांचें व राजांचें स्वतः-च्या नेतृत्वाखाली तो संघटन करूं लागला.

५. युद्धाचे मेघ जमा होऊं लागले

औरंगजेबाने या दिवसांत हिंदूंच्या धर्मभावनांविरुद्ध सारखी मोहीम चालविली होती. हिंदूंचीं देवालयें पाडा, मूर्ती फोडा, धर्मशिक्षणाच्या पाठशाळा बंद करा; हिंदूंच्या धार्मिक ग्रंथांचें पठन व पाठन करण्याचीं सर्व स्थानें भ्रष्ट करा, अशा प्रकारचीं फर्मानें जारी करण्याचा त्याने नुसता सपाटा चालविला होता. आपल्या फर्मानांची अंमलबजावणी करण्यासाठी त्याने मुद्दाम खास अधिकारी नेमले होते. परंतु औरंगजेबा-च्या या धार्मिक आक्रमणास न जुमानतां राजसिंहाने हिंदु जातीचें पुढारी-पण पत्करलें व अनेक पवित्र देवतांच्या मूर्तींना आपल्या राज्यांत आश्रय दिला. एवढेंच नव्हे तर त्यांची प्राणप्रतिष्ठा करून मंदिरें व वतनें बांधून दिलीं. विशेषेंकरून मथुरेच्या श्रीनाथजींच्या मूर्तीस आश्रय देण्यांत

याने जें धाष्टर्य दाखविलें त्यामुळे तर सर्व राजपूत जाति थक्कच झाली. कारण नाथजींची मूर्ति भग्न करण्याचा औरंगजेबाचा निश्चय होता व बुन्दी, कोटा, जोधपूर इ. ठिकाणच्या राजांनी औरंगजेबाने छळलेल्या या मूर्तीस आश्रय देण्याचें नाकारलें होतें. त्यामुळे राजसिंहाच्या हिंमतीने सर्व लोक दिपून गेले. व हें शल्य उपटण्याशिवाय गत्यंतर नाही असें खुद्द बादशाहासही वाटूं लागलें.

६. औरंगजेबास पत्र

ह्याच सुमारास बादशाहाने सर्व हिंदु जातीवर अन्याय्य असा जजीया कर बसविला. बादशाहाच्या या जुलमाचा राजसिंहाने उघड निषेध करून त्यावाबत त्यास एक सविस्तर पत्रही पाठविलें. हें पत्र म्हणजे राजसिंहाच्या वक्तृत्वपूर्ण भाषेचा, राजकारणपटुत्वाचा, राष्ट्रीय व ऐतिहासिक ज्ञानाचा, स्वदेशबांधवांच्या अभिमानाचा व स्वतःच्या आत्मविश्वासाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. त्यांत त्याने प्रारंभींच बादशाहा आपणाशीं लढाई करण्याची तयारी करीत आहे ही गोष्ट सूचित केली आहे. तो म्हणतो, "माझ्याविरुद्ध होणाऱ्या कारवाईसाठी पुष्कळ पैसा खर्च होऊन आपला खजिना रिकामा झाल्यामुळे तो भरून काढण्यासाठी आपण जजीया कर लादण्याचें फर्मान काढलें आहे. आपणास विदितच आहे की, आपले पूर्वज मुहंमद जलालुद्दीन अकबरशाह यांनी बावन वर्षे न्यायपूर्वक राज्य करून प्रत्येक जातीस आरामांत व सुखांत ठेवलें–मग तो ईसाई, मुसाई, दाऊदी, मुसलमान, ब्राह्मण, अथवा नास्तिक का असेना–त्यां सर्वांवर त्यांनी साम्यबुद्धीने कृपा केली.

"त्यांनी पुष्कळ देश व किल्लेही जिंकले. परंतु आपल्या राजवटींत आपल्या हातांतून बराच प्रदेश गेला आहे व आता अधिकच अत्याचारी धोरण आपण स्वीकारल्याने अधिकाधिक प्रदेशास आपणास मुकावें लागेल. आपली प्रजा पायाखाली तुडविली जात आहे व साम्राज्यांत प्रत्येक प्रांत कंगाल होत आहे. लोकसंख्या घटत आहे व आपत्तीचें परिमाण वाढत आहे. सेना असंतोष प्रकट करीत आहे. व्यापारी गाऱ्हाणीं गात आहेत. मुसलमान असंतुष्ट आहेत. हिंदु दुःखी आहेत आणि कित्येक रात्रीचें जेवण

सुद्धा न मिळाल्यामुळे निराशेच्या क्रोधानें आपलेंच कपाळ बडवून घेत आहेत.

"अशा कंगाल प्रजेजवळून जो बादशाहा जबरदस्त कर वसूल करण्यांत आपलें सामर्थ्य खर्च करतो त्याचें मोठेंपण कसें स्थिर राहूं शकेल? पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत ही एक अवाई उठली आहे की, बादशाहा हिंदूंच्या धर्मपुरुषांचा द्वेष करतो व ब्राह्मण, जोगी, बैरागी व संन्याशी यांच्या जवळूनही जजिया घेऊं इच्छितो. ज्या धार्मिक ग्रंथांवर आपला विश्वास आहे तेच आपणास असें सांगतील की, परमात्मा सर्व मनुष्यमात्राचा ईश्वर आहे, एकट्या मुसलमानांचा नाही. तो मूर्तिपूजक व मुसलमान यांच्याकडे समान दृष्टीने पाहतो. त्यानेच सर्वांना उत्पन्न केलें आहे. आपल्या मशिदींत त्याचेंच नांव घेऊन नमाज पडण्यांत येतो व मंदिरांत जेथे मूर्तीसमोर घंटा वाजविली जाते–तेथेंही त्याचीच प्रार्थना करण्यांत येते. म्हणून कोणत्याही धर्माचा नाश करणें म्हणजे ईश्वराच्या इच्छेस विरोध करणेंच होय.

"लिहिण्याचा मतितार्थ असा की, आपण जो कर हिंदूंवर लादीत आहांत तो न्याय व नीति यांच्या विरुद्ध आहे. त्याने सर्व देश दरिद्री होईल. शिवाय तो हिंदुस्थानच्या कायद्याविरुद्ध आहे. अथापि स्वधर्माच्या फाजील अभिमानाने जर आपण ह्या गोष्टीस प्रवृत्त झालां असाल तर आपण प्रथम त्याची वसुली रामसिंहाजवळून व माझ्याजवळून करून पाहावी. मुंग्या व माशांचा छळ करणें हें कोणाही वीर व उदार हृदयाच्या मनुष्याला शोभत नाही. आपणास ही सल्ला देणाऱ्या आपल्या मंत्र्यांनी न्याय व प्रतिष्ठा यांचा बिलकूल विचार केला नाही हें आश्चर्य होय."

राजसिंहाच्या पत्राने अगदी आगींत तेल ओतण्याचें काम केलें. तशांत जोधपूरच्या महाराणा जसवंतसिंहाची विधवा पत्नी व अज्ञान बालक अजितसिंह व त्यांचा एकनिष्ठ सेवक राठोड वीर दुर्गादास यांच्या नाशास बादशाहा प्रवृत्त झाला असतां त्यांनाही आश्रय देऊन राजसिंहानें बादशहाच्या शेपटीवरच पाय दिला व त्यामुळे हा भुजंग चिडून उठला. जसवंतसिंहाची पत्नी राजसिंहाची भगिनी असल्याने तीस आश्रय देणें त्याचें कर्तव्यच होतें. परंतु त्यांना आपल्या स्वाधीन करण्याविषयी बाद-

शाहाने राजसिंहास वारंवार फर्माऊनही जेव्हा तो ऐकेना तेव्हा औरंगजेबाने त्यावर चढाई करून जाण्याचें ठरविलें.

७. मोगलांची सेनासज्जता

चारुमतीचें पाणिग्रहण, मोगली मुलखांतली लूट, हिंदु देवतांना आश्रय, जजीया कराचा निषेध व अजितसिंहाचा पाठपुरावा ह्या सर्व गोष्टींनी वारंवार पदाघात करून चिडविलेल्या भुजंगाप्रमाणें औरंगजेबाने आपल्या संपूर्ण शक्तीने राजसिंहास दंश करण्याचें ठरविलें असल्यास नवल नाही. राजसिंहाच्या या धाष्टर्यामुळे औरंगजेब समजला की, आपणाशीं सामना करूं इच्छिणारा हा शत्रु कांही सामान्य नाही. भरतवर्षांतील मांडलिक राजेही समजले की, बादशाहास खासा प्रतिस्पर्धि भेटला आहे. मेवाडच्या या स्वारीसाठी त्याने विराट सेना निर्माण केली. प्रांतोप्रांतीचे सेनापति व धुरंधर वीर एकत्र करण्यांत आले. बंगाल्यांतून अकबर, काबूलहून अजीम, दक्षिणेंतून मुअज्जम हे राजपुत्र मुद्दाम तातडीने बोलावण्यांत आले होते. यावरून या युद्धाच्या गंभीर तयारीची कल्पना येईल. प्रचंड तोफखाना, बंदुका चालविणारें एक लक्ष पायदळ आणि तितकेच घोडेस्वार, एवढें मोठें सैन्य घेऊन बादशाहाने मेवाडवर स्वारी केली.

८. राजसिंहाची प्रतिकाराची सिद्धता

मोगली आक्रमणाचा हा प्रचंड आवेग पाहून राजसिंहानेही त्यास कसून तोंड देण्याची तयारी केली. आपले विश्वासू भिल्ल व मीना जातीचे वन्य लोक त्याने एकत्र केले. वीर दुर्गादासाच्या सैनापत्याखाली मारवाडची सेना तर त्याला साथ देतच होती, पण राजसिंहाचा व मेवाडचा नाश झाल्यास त्यानंतर आपणावरही हीच आपत्ति कोसळणार हें भाकित ओळखून त्याकाळचे बहुतेक राजपूत राजे राजसिंहाच्या ध्वजाखाली जमा झाले होते. पर्वत कुळांपैकी मलिंदे व पालिपत हे आपल्या हजारों धनुष्यबाणांसह हिंदु जातीच्या साहाय्यार्थ धावून आले होते.

९. राजपुरोहिताची मंत्रणा

आपल्या सर्व साहाय्यकांची, सरदारांची व राजपुत्रांची व राजपुत्रांची सभा बोलावून राजसिंहाने पुढील धोरणाचा निश्चय केला.

त्या वेळीं राजपुरोहित गरीबदास याने एकंदर हिताहिताचा व स्वपरपक्षांच्या बळाबळाचा विचार करून असा सल्ला दिला की, "बादशाहाची सेना आपल्या सेनेहून फार मोठी आहे. म्हणून तिच्या बरोबर खुल्या मैदानावर सामना घेणें युद्धनीतीस धरून होणार नाही. या वेळीं गनीमी काव्याचा आश्रय करावा. महाराणा व त्याचे सरदार यांनी पहाडांत जाऊन लपून बसावें व मोगल फौजेचा अडचणीच्या जागीं कोंडमारा करून तिची तहानभूक व उपासमार यांनी धूळधाण उडवावी आणि बाहेरून बादशाही मुलखाची लूटमार करावी." राजपुरोहिताची ही मंत्रणा सर्वसंमत ठरून त्याप्रमाणे राजसिंहाने सैन्याची रचना केली. ह्या प्रसंगीं त्याने ज्या कौशल्याने रणांगण सजविलें त्याबद्दल कोणाही युद्धशास्त्रज्ञास त्याची अप्रतिम सेनानी म्हणून प्रशंसाच करावी लागेल.

आपल्या एकंदर फौजेचे तीन विभाग करून राजसिंहाने युवराज जयसिंहास एका विभागाचा अधिपति केला; व त्याने अरवलीच्या शिखरावर पसरून असावें व मोगलांनी पहाडांत प्रवेश केल्याबरोबर त्यांवर तुटून पडून त्यांची लांडगेतोड करावी अशी कामगिरी त्याजवर सोपविली. राजपुत्र भीमसिंह याजकडेस पश्चिमेच्या बाजूस राहून गुजराथचे दळणवळणाचे सर्व मार्ग मोकळे राखण्याची कामगिरी सोपविण्यांत आली. आणि स्वतः राजसिंह फौजेचा एक मोठा विभाग हाताशीं घेऊन दुर्लंघनीय अशा नायन खोऱ्यांत तळ देऊन बसला. नायन खोरा हाच मेवाडचें मुख्य प्रवेशद्वार असल्याने त्यांतून शत्रू आंत आल्याबरोबर कापून काढण्याचा त्याने निश्चय केला.

औरंगजेब व राजसिंह यांच्यामधील हा सामना १६७८ ते १६८० याप्रमाणें दोन वर्षे चालू होता. हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक अत्यंत बहारीचा प्रसंग म्हणून त्याचें थोडेंबहुत तरी वर्णन करणें जरूर आहे.

१०. राजपुतांनी जाळें पसरलें

उदयपूरच्या दक्षिणोत्तर सुमारें १४ मैल लांब व पूर्वपश्चिम ११ मैल रुंद असा वर्तुळाकृति प्रदेश असून त्याच्या सभोवार पर्वताच्या रांगा पसरल्या आहेत. ह्या निसर्गरक्षित प्रदेशाच्या मध्यभागीं पिशोल्याचें बिस्तीर्ण व रमणीय सरोवर बांधलेलें आहे. कोणत्याही दिशेने ह्या पर्वतराजीचें

उल्लंघन केल्याशिवाय उदयपुरास जाणें अशक्य आहे. ह्या नैसर्गिक तटाची उंची कोठेंही ८०० फुटांपेक्षा कमी नसून कोठे कोठे तर १२०० फुटांपर्यंत गेली आहे. पर्वताचे उंच कडे ह्या तटाच्या बुरुजाप्रमाणें विराजमान होत असून घाट लहानमोठ्या प्रवेशद्वारांचें काम करीत आहेत.

पश्चिमेच्या बाजूस सुमारें दोन हजार फूट उंच असलेलीं कांही शिखरें कोणत्या बाजूने शत्रु आक्रमण करणार याचें जणू काय निरीक्षणच करीत उभीं आहेत. पूर्वेच्या बाजूने पर्वताची उंची जरा कमी असून याच बाजूने आंत प्रवेश करण्यासाठी तीन घाट अथवा खिंडी पडलेल्या आहेत. वरचा देलवाड्याचा घाट, मधला देवारीचा घाट व तिसरा नायनचा घाट.

मेवाडनाशाचें कार्य पूर्ण करावयाचें म्हणजे उदयपूरवर चढाई केलीच पाहिजे व तसें करावयाचें म्हणजे अनाहूतपणें चोहों बाजूंनी पर्वतांनी वेष्टित अशा दुर्गम प्रदेशांत प्रवेश करावा लागणारच. राणा राजसिंहाने या वेळीं जो युद्धाचा डाव रणपटावर मांडला तो असा की, मोगलसेनेचा ह्या बिकट प्रदेशांत पूर्ण प्रवेश होईपर्यंत तीस बिलकूल विरोध करावयाचा नाही. उलट उदयपूरच्या आसपासचा सर्व मुलुख स्वतःच बेचिराख करून सर्व बाजूंनी पहाडांत दडून बसावयाचें व एकदा खुल्या दिसणाऱ्या घाटांतून मोगल फौज आंत उतरली व आपल्या दराऱ्याने राजपूत घाबरले व देश सोडून चालते झाले अशा भ्रामक विजयोन्मादांत मोगल सेना उन्मत्त झाली म्हणजे मग सर्व घाट रोखून धरावयाचे, दळणवळण बंद पाडावयाचें, शत्रूची रसद मारून फस्त करावयाची आणि उपासमारीने वरेच दिवस शत्रूची अन्नान्नदशा होऊन हाल हाल झाले म्हणजे जेव्हा तो परत जाण्याचा प्रयत्न करूं लागले तेव्हा चारही बाजूंनी त्यावर तुटून पडून लांडगेतोड करावयाची. कसेंही करून औरंगजेबाने स्वतः या जाळ्यांत प्रवेश करावा म्हणजे त्याच्या पायांत खोडा अडकविलाच म्हणून समजा, अशी राजसिंहाची आकांक्षा होती. त्याच्या अपेक्षेप्रमाणें आपल्या सेनेचें संचालन करीत बादशाहा देवारीच्या घाटापर्यंत येऊन पोहचलाही. परंतु टॉडच्या मतें तेथे क्षणभर थांबून त्याने जेव्हा एकंदर परिस्थितीचें निरीक्षण केलें तेव्हा या पुढच्या खाईंत प्रवेश करणें म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या दाढेंतच प्रवेश करणें होय हें त्याने ओळ-

खलें व त्या संशयात्म्याने स्वतः मागे राहून आपल्या अकबरनामक पुत्रास मृत्युमुखांत लोटलें.

११. अकबराची दुर्दशा

राजसिंहाच्या अपेक्षेप्रमाणें अकबर देबारी उतरून अल्प सायासाने थेट उदयपुरापर्यंत पोचला. प्रतिपक्षी भिऊन पळून गेला आहे, त्याच्या राजधानीवर आपला कब्जा झाला आहे, त्याची मोठमोठीं मंदिरें उध्वस्त करून आपण गाजी बनलों आहोंत, इत्यादि प्रकारच्या विजयी भावनांनी मोगल शिपायांचीं मनें फुगून गेलीं. उदयपुरांतील मोठमोठे महाल व त्यांतील विलाससामुग्री पाहून त्यांच्या जिभांना पाणी सुटलें; व ते तेथेच राहून त्यांचा उपभोग घेऊं लागले. चारण म्हणतो, "कांही नमाज पढत होते, कांही मेजवान्या झोडीत होते, कांही बुद्धिबळाचे डाव खेळण्यांत दंग झाले होते." अशा वेळीं मेवाडचा युवराज जयसिंह हा झंझावाताप्रमाणें एकाएकी त्यांच्यावर येऊन आदळला व अत्यंत निर्दयपणें ह्या बेफाम राजपुतांनी मोगल सेनेची कत्तल सुरू केली. ज्या मार्गाने अकबराची सेना पळण्याचा प्रयत्न करी तो अवरुद्धच होता. अखेरीस गोगुंड्याच्या वाटेनें ती पळूं लागली. पण हाच मार्ग सर्वांत अधिक बिकट होता. अकबराच्या सबंध सेनेला नाल नांवाच्या खोऱ्यांत कोंडून धरण्यांत आलें. दरीच्या दोहोंबाजूंनी भिल्ल इत्यादि वन्य लोक बाण व धोंडे यांचा वर्षाव करून सरोवरांतल्या बेडकांप्रमाणें मोगल सेनेस बडवून काढीत होते. ज्या मार्गानें मोगल सेना दरींत आली होती तो आधीच जयसिंहाच्या राजपूत वीरांनी अडविला होता. अशा तऱ्हेने सर्व बाजूंनी कोंडल्या गेलेल्या मोगल सेनेंत अन्नपाण्यावाचून आकांत माजला. उपासमारीने, दरींतील दूषित वायूमुळे, भिल्लांच्या बाण व धोंड्यांच्या वर्षावामुळे व राजपुतांच्या तरवारी व भाले यांच्या मारामुळे मोगलांना जिकडे पाहावें तिकडे मृत्यूशिवाय दुसरें कांहीच दिसेनासें झालें, असें या लढाईचें वर्णन क० टॉडने केलें आहे.

१२. राजपूतांचे विजय

जयसिंहाप्रमाणेंच भीमसिंह व स्वतः राजसिंह यांनीही मोगल-सेनेची दुर्दशा उडविली. भीमसिंहाने गुजरातेंतील मोगल मुलुखांवर

टोळधाडीसारखें आक्रमण करून अपार लूट मिळविली व राजसिंह खुद्द औरंगजेबावरच तुटून पडला. त्याच्या सोसाटयाच्या आवेगापुढे औरंगजेबास तीन वेळां जीव बचावून पळ काढावा लागला. या युद्धाचीं वर्णनें स्वाभाविकपणें राजपूत लेखकांनी फुगवून लिहिलीं असल्याचा संभव आहे. पण मुसलमान लेखकांनी मोगल बादशाहाचा ह्या पराजय शक्य तितका कमी करून सांगण्याचा प्रयत्न केला असणार हेंही तितकेंच उघड आहे. सर्वस्वी फारशी तवारिखांच्या आधारें लिहिणारे प्रो. जदुनाथ सरकारही म्हणतात, "राजपूत पहाडांतून निघून येत व मोगलांच्या ठाण्यांवर हमला करीत. त्यांची रसद अडवून धरीत व मूळ फौजेपासून इकडेतिकडे भटकणाऱ्या मोगलांची कत्तल उडवीत. त्यामळे मोगलांचीं ठाणीं अगदीच अरक्षित झालीं होतीं." अकबराने लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें की, राजपुतांना बादशाही सेनेस भयभीत करण्याच्या कामांत इतकें यश मिळालें होतें की, मोगल ठाण्यांची ठाणेदारी पत्करण्यास देखील प्रत्येक सरदार अळंटाळ करूं लागला. मोगल सेना दऱ्याखोऱ्यांत प्रवेश करण्यासही तयार होईना.

मेवाडप्रमाणेंच जी मोगल सेना मारवाडांत उतरली होती तिचाही राठोडांचा सेनापति दुर्गादास याने खासा समाचार घेतला व तेथेही औरंगजेबाचा हेतु पूर्णपणें निष्फळ ठरला.

१३. मोगली मुलुखावर चढाई

पण या लढाईंतील आणखी ज्या एका विशेष गोष्टीचें क. टॉडनें मोठें बहारदार वर्णन केलें आहे तिचा आशय असा—"यच्चयावत् राजपुतांच्या ठिकाणीं यावनी द्वेष रोमारोमांत भिनला होता. याला औरंगजेबाची राजनीति कारण झाली होती. हिंदूंवर जजीया कर बसवून, त्यांना जबरदस्तीने बाटवून, हिंदु व्यापाऱ्यांवर मोठमोठे कर लादून, हिंदूंचीं मंदिरें व पवित्र स्थानें भ्रष्ट करून आणि सर्व हिंदूंवर आपल्या अधिकाऱ्यांमार्फत अनन्वित अत्याचार करून सर्व हिंदु जातीची सहानुभूति त्याने गमाविली होती. इतकेंच नव्हे तर ह्या जुलमाचा सूड उगविण्यास ती समुत्सुक झाली होती. राजसिहाबरोबर झालेल्या ह्या लढाईने असली संधि आणून

दिली. त्याचा मुलखी प्रधान दयाळशाह याने एकंदर परिस्थितीचें निरीक्षण करून अनुकूल काळ ओळखला. राजपूत सेनेचा एक विभाग आपल्या हाताखाली घेऊन त्याने माळव्यावर भरारी मारली. वेत्रवतीपासून तों नर्मदा नदीपर्यंतच्या मोगल मुलुखांत त्याने सारखे धावते हल्ले करून एकच आकांत करून सोडला. दयाळशाहाने शत्रुमुलुखांत मांडलेल्या आकांताचें चारण वर्णन करतो, "नवऱ्यांनी बायकांचा त्याग केला. आयांनी पोटचीं मुलें काढून टाकलीं व स्वतःचा जीव वाचविण्याकरितां त्या पळूं लागल्या; आणि जें जें कांही आपल्या बरोबर नेणें अशक्य होतें तें सर्व त्यांनी अग्निनारायणास अर्पण करून टाकलें. काजी व मुल्ला यांना पकडून बांधून टाकण्यांत आलें; व त्यांच्या दाढ्या जबरदस्तीने मुंडण्यांत आल्या. जेथे जेथे म्हणून कुराणाच्या प्रती सापडतील तेथे तेथे त्या विहिरींत फेकण्यांत आल्या."

वरील सर्व वर्णनाचा निष्कर्ष एकच निघूं शकतो की, महाराणा राजसिंहाने आपल्या युद्धकौशल्याने औरंगजेबासारख्या प्रचंड सम्राटास असा खरपूस मार दिला की, त्याची त्यास जन्मभर आठवण रहावी. राजपूत खुद्द आपल्याच जीवावर उठले आहेत हें लक्षांत आल्याबरोबर त्याने मेवाडांतून पळ काढला व तो अजमीर येथेच जाऊन कायमचा तळ देऊन राहिला. त्यावरही राजसिंहाने अकबरास फितवून औरंगजेबास पदच्युत करण्याचाच घाट घातला होता; पण तो फसला व अकबर राजपुतांस सोडून मराठ्यांचा आश्रय करण्यासाठी दक्षिणेंत निघून गेला.

१४. इ. स. १६८०

हें वर्ष भारतवर्षांतील अखिल हिंदु जातीस अत्यंत दुर्दैवाचें गेलें. दक्षिणेस केलेल्या दिग्विजयाचें फळ हातीं पडतां पडतां महाराजा छत्रपति श्रीशिवाजी यांचा अंत झाला व उत्तरेस औरंगजेबाचा संपूर्ण मोड करण्याचें श्रेय पदरांत पडण्याच्या ऐन मोक्यावर महाराणा राजसिंहाचें निधन झालें. ह्या दोन्ही वार्तांमुळे त्या धूर्त बादशाहास आनंद झाला खरा; पण लगेच आणखी संकट आपल्यापुढे ठेवलें जात आहे याची त्यास कल्पना आली. शिवाजीचा पुत्र संभाजी याचें साहाय्य घेऊन शहाजादा अकबर आपणावर जर चालून आला तर आधीच विजयो-

त्साहानें फुरफुरलेले राजपूतही त्यास मिळतील व नंतर मराठे व राजपूत यांच्या संयुक्त बळापुढे आपला टिकाव न लागून आपणास सिंहासनासही मुकावें लागेल ही चिंता त्यास व्यग्र करूं लागली. त्यामुळे राजपुतांशीं तह करून तेथे झालेल्या अपमानाचा बदला आता शिवाजीच्या मरणोत्तर दक्षिणेंत जाऊन मराठ्यांवर काढावा असें त्याने ठरविलें.

१५. राजसमुद्र

महाराणा राजसिंहाच्या आयुष्यांतील आणखी एक अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्याने राजसमुद्र नांवाचें एक विस्तीर्ण सरोवर बांधलें ही होय. १६६१ सालीं मेवाडांत भयंकर दुष्काळ पडला. ह्या दुष्काळाने मेवाडांतच काय, पण उभ्या राजवाड्यांत एकच कहर उडवून दिला. या दुष्काळाचें चारणांच्या मुखांतून ऐकलेलें वर्णन टॉडनें खालीलप्रमाणें दिलें आहे. "आकाशांतून पाण्याचा एक सुद्धा थेंब पडला नाही. बरसातीचे सर्व महिने निघून गेले. जग नैराश्यांत बुडून गेले व लोक भुकेने वेडे होऊं लागले. अन्न म्हणून कधीही माहित नसलेल्या वस्तु लोक खाऊं लागले· नवरा बायकोस व बायको नवऱ्यास सोडून गेली. आईस लेकरूं भारी झालें. आईबापांनी पोटचीं मुलें विकलीं.

"जसजसा काळ जाऊं लागला तसतसा दुष्काळ अधिक जाणवूं लागला. भक्षण करण्यास कांही न मिळाल्याने किडे सुद्धा नाश पावले. सहस्रावधि आबालवृद्ध स्त्री–पुरुष अन्नअन्न करून प्राण सोडूं लागले. पश्चिमेकडच्या वाऱ्याबरोबर साथीचा रोगही आला व तो सर्वत्र पसरला."

वरील काव्यमय व करुणापूर्ण वर्णनांतला अतिशयोक्ति अलंकार वगळला तरीही या दुष्काळाचें स्वरूप किती रौद्र होतें याची कल्पना येते. अशा वेळीं प्रजेचें पोषण करण्याकरितां व भविष्य काळांत असला दुष्काळ पडलाच तर प्रजेचें रक्षण व्हावें या हेतूने त्याने हा विस्तीर्ण तलाव बांधला. राजसमुद्र अत्यंत विशाल आहे व त्यावर कोट्यवधि रुपये खर्च झाला आहे हें सर्व खरें ! पण त्याचें खरें सौंदर्य ह्यांत नसून ज्या प्रजा-हिताच्या भावनेने व ज्या दुर्भिक्षाच्या काळांत तो बांधला गेला त्यांत आहे· अन्नान्न करणाऱ्या लक्षावधि लोकांच्या पोटांत अन्नाचा घास घाल-

ण्यासाठी त्याचा उपक्रम झाला ह्या गोष्टींत त्याची वास्तविक भव्यता भरलेली आहे.

१६. राजसिंहाची योग्यता

सतराव्या शतकांत भरतवर्षांत जे कांही थोडे महापुरुष निर्माण झाले. त्यांतच राजसिंहाची गणना होते. छत्रपति शिवाजी, राठोडवीर दुर्गादास, शिखांचा गुरु तेजबहादूर, बुन्देल्यांचा राजा चंपतराय व त्याचा मुलगा छत्रसाल इत्यादि त्याच्या समकालीन लोकांनी आपापल्या परीने यावनी राज्याच्या उच्छेदाकरितां भरतवर्षांत जो एक प्रचंड उद्योग आरंभिला होता, त्यांत राजसिंहाने पूर्ण शक्तीने हातभार लावला व तेजस्वी व स्वातंत्र्यप्रिय राजांच्या पुण्यकीर्तननामावलींत स्वतःकरितां उच्चस्थान संपादन केलें, यांत बिलकूल शंका नाही.

त्याच्या चरित्राचें छत्रपति शिवाजीशीं असलेलें साम्य वेळोवेळीं दाखविलेंच आहे. एकाच वेळीं म्हणजे १६५४ च्या सुमारास दोघांचेही प्रयत्न सुरू झाले व दैवदुर्विलासाने एकाच वेळीं प्रयत्नांचा परिपाक उतरण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली असतां दोघांवरही निर्घृण काळानें घाला घातला. स्वातंत्र्यप्रस्थापनेच्या प्रयत्नांत दोघांनीही स्वीकारलेल्या मार्गांमध्ये विलक्षण साम्य असल्याचें मागे दाखविलें आहे.

शिवाजीशीं राजसिंहाचें जितकें साम्य तितकेंच औरंगजेबाशीं वैसादृश्य. औरंगजेबाने नीतिदृष्टया घोर पातकें केलीं असें इतिहासकारांचें मत आहे. भावांचे खून केले, बापास कैदेंत टाकलें व प्रजेवर अनन्वित जुलूम केला. उलट राजसिंहाचें वर्तन नीतिदृष्टया अत्यंत शुद्ध व पवित्र असून राजसमुद्रासारखीं प्रजाहिताचीं कामें करून त्याने आपलें प्रजावात्सल्य प्रकट केलें. प्रसंगीं हातीं सापडलेल्या शत्रूवरही दया दाखविली. राजनीतिकौशल्य, उत्कृष्ट सेनानीत्व, अलौकिक शौर्य, धाडस व पौरुष इ० गुणांमधील त्याचें अप्रतिम श्रेष्ठत्व औरंगजेबाबरोबर झालेल्या लढाईंत चांगलेंच प्रकट झालें. अतुलनीय स्त्रीदाक्षिण्य, परोपकारतत्परता, सुसंस्कृत वागणूक, परिणामकारक वक्तृव, मर्मभेदक लेखनशैली व विद्या, सौंदर्य व कला यांची प्रीति इत्यादि गोष्टी त्याच्या चरित्रांत सर्वत्र व्यक्त झाल्या आहेत.

पं. देवीदासाचा पुत्र श्री लालभट्ट नांवाच्या कवीने राजसिंहाच्या प्रशस्तिपर केलेल्या काव्यांत त्याचें पुढीलप्रमाणें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे.

संग्रामे भीमभीमो विविधवितरणे यश्चकर्णोपमेयः
सत्ये श्रीधर्मसूनुः प्रबलरिपुजये पार्थ एवापरोऽयम् ।
श्रीमान् वाजींद्रशिक्षानयविधिकुशलः शास्त्रतत्त्वेतिहासे
देवोऽयं राजसिंहो जयतु चिरतरं पुत्रपौत्रैः समेतः ।

१७. महाराणा जयसिंह

महाराणा राजसिंहाच्या मृत्यूनंतर महाराजा जयसिंह गादीवर आला. त्याने मोगलांबरोबर चालू असलेला संग्राम आणखी पांच महिने नेटाने पुढे चालविला. जयसिंह संभाजीप्रमाणेंच शूर असला तरी राजसिंहाइतकें राजनीतिकौशल्य त्याच्या ठिकाणीं नव्हतें. त्यामुळे मिळालेल्या विजयाचा पूर्ण फायदा घेऊन राजपूत राज्यांत संघटना निर्माण करण्याचें कार्य तो करूं शकला नाही. शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीनेही प्रारंभीं प्रारंभीं मोगली मुलुखावर हल्ले चढवून खानदेशपर्यंत चढाई केली होती. त्यामुळे राजपुतां-बरोबर तह करून आपण दक्षिणेंत जाणें जरूर आहे असें औरंगजेबास वाटलें व त्याने तहाचीं बोलणीं लावलीं. जयसिंहानेही तहास संमति दिली व अशा तऱ्हेने राजसिंह व औरंगजेब यांनी पेटविलेल्या रणयज्ञाची समाप्ति झाली.

जयसिंहाने यानंतर सुमारें वीस वर्षें राज्य केलें. त्यानेही बापाप्रमाणें जयसमुद्र नांवाचा एक विस्तीर्ण तलाव बांधला. त्याच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळांत त्याच्या राज्यांत बंडाळी माजली. त्याच्या मुलानेच त्याच्याविरुद्ध बंडाळी चालविली होती. परंतु ती दबली. यापेक्षा विशेष उल्लेखनीय अशी कोणतीच गोष्ट त्याच्या कारकीर्दींत घडली नाही. तो १७०० सालीं मरण पावला.

१८. सतराव्या शतकाचें सिंहावलोकन

सतराव्या शतकांत मेवाडच्या गादीवर अमरसिंह, कर्णसिंह, जगत्-सिंह, राजसिंह व जयसिंह हे पांच राजे मेवाडच्या गादीवर आले. याच काळांत दिल्लीच्या मोगल तख्तावर जहांगीर, शहाजहान व औरंगजेब हे तीन बादशाहा बसले. बाह्यतः हें शतक म्हणजे मोगल साम्राज्यास पर-मोत्कर्षाचें गेलें असें म्हणण्यास हरकत नाही. पण त्याच्या नाशाचीं बीजेंही

याच शतकांत रोवली गेलीं असें म्हणतां येईल. महाराणा राजसिहानें मोगल सत्तेस जो धक्का दिला होता तो तर जबरदस्त होताच. पण याच काळांत मोगल साम्राज्याच्या अगदी नजीक शिखांचा उदय झाला. शीख पंथाचें केवळ भक्तिमार्गी स्वरूप नष्ट होऊन त्यास कडव्या लढवय्याचें स्वरूप याच काळांत प्राप्त झालें. राजसिहाच्या व शिवाजीच्या मृत्यूनंतर औरंगजेब स्वत: दक्षिणच्या स्वारीवर गेला तो सुमारें २७ वर्षे तिकडेच राहिला व तिकडेच त्याचा मृत्यूही झाला. पण मराठ्यांचें अदम्य उत्थान त्यास दाबतां आलें नाही. किंबहुना या उण्यापुऱ्या त्रिशतिवर्षात्मक स्वातंत्र्याच्या युद्धांत राजपुतांच्या बरोबर लढाया खेळून जर्जर झालेली त्याची सर्व शक्ति क्षीण झाली. राजपुतांना हा काळ वस्तुत: शांततेचा मिळाला. पण राजसिहा-सारखा एकही समयज्ञ पुरुष त्या काळांत राजस्थानांत नसल्याने त्यांच्यांत संघटना तर निर्माण झाली नाहीच, पण उलट त्यांच्यांतील वैमनस्यें मात्र वाढलीं. दुहीचें व परस्पर विद्वेषाचें बी या काळांत त्यांच्यांत अधिक रुजलें.

सतराव्या शतकाचा राष्ट्रीय दृष्टीने विचार करतां आणखी एक गोष्ट ठळकपणें लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही की, पाश्चिमात्य सत्तांचा उदय हळूहळू या देशांत याच शतकात होत गेला. हिंदी राजांनी एकमेकां-विरुद्ध लढतांना त्यांच्या सुधारलेल्या शस्त्रसामुग्रीचा उपयोग केला असला तरी त्यासाठी त्यांना गोऱ्या लोकांच्याच स्वाधीन राहावें लागलें. पोर्च्युगीझ, फरेंच व इंग्रज या तीन जातींपैकी कोणती जात अधिक प्रबळ होणार याचा नक्की अंदाज करतां येण्यासारखा नसला तरी शिवाजी-सारखा दूरदृष्टीच्या पुरुषाच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाही. राजपूतांच्या उज्ज्वल व उत्थानशील परंपरेंतील राजसिह हा शेव-टचा दुवा होता व तो निखळल्यानंतर आतापर्यंत सुमारें एक हजार वर्षे म्हणजे सातव्या शतकापासून तो सतराव्या शतकापर्यंत परकी आक्रमणाशीं मोठ्या तेजस्वितेने व निर्भयतेने टिकाव धरून राहिलेली ही जाति विस्खळित होऊं लागली. अमरसिंह, व राजसिंह, जसवंतसिह, दुर्गादास इत्यादिकां-सारखा कांही महनीय व्यक्तींनी राजस्थानचा सार्वत्रिक गौरव वाढविला असला तरी त्या जातीचें पतनशील स्वरूप त्यानंतर लगेच व्यक्त होऊं लागलें होतें असें म्हणण्यास हरकत नाही.

प्रकरण अकरावें

१. महाराणा अमरसिंह दुसरा

इ. स. १७०० सालीं जयसिंहाचा बंडखोर पुत्र दुसरा अमरसिंह गादीवर बसला. तो १७१६ सालीं मरण पावला. ह्या १६ वर्षांत भारत-वर्षाच्या राज्यपटावर अद्भुत स्थित्यंतरें घडून आलीं. १७०७ सालीं दक्षि-णेंत मराठ्यांशीं लढणारा औरंगजेब अत्यंत विषण्ण व निराश अंत:करणाने मरण पावला. त्यानंतर त्याच्या शाहाजाद्यांत सिंहासनासाठी युद्धें होऊन मुअज्जम, बहादूरशहा हें नांव धारण करून, गादीवर बसला. पांच वर्षांतच तोही पैगंबरवासी झाला. त्यानंतर पुन: त्याच्या पुत्रांत सिंहासनप्राप्त्यर्थ घनघोर युद्धें झालीं व जहांदरशहा गादीवर बसला. पण एक वर्षाच्या आंतच त्याचा पाडाव करून सय्यदबंधंच्या मदतीने फरुक्शिअर गादीवर बसला. या पांचसहा वर्षांत दिल्लीच्या तख्तासाठी मोगल शाहाजाद्यांमध्यें झालेल्या तीन मोठमोठ्या युद्धांत मोगल बादशाहीचा बोज बराच कमी झाला होता. दक्षिणेंत मराठे, पंजाबांत शिख व मध्यहिंदुस्थानांत बुंदेले व जाट यांच्या नवीन सत्तांचा उदय होऊन त्यांनी मोगल सिंहासन बरेंच खिळखिळें करून टाकलें होतें व बादशाही सत्तेपासून स्वतंत्र होऊं पाहणाऱ्या निरनिराळ्या प्रांतांवरील मोगल सुभेदारांनी तें आंतून पोखरून काढलें होतें.

देशांत अशा प्रकारची परिस्थिति असली तरी राजस्थानांत मागें सांगितल्याप्रमाणें तिचा फायदा घेऊन राजपुतांचें संघटित राष्ट्र निर्माण करण्याच्या योग्यतेच्या पुरुषाचा अभाव होता. मोगल बादशाहीच्या या पडत्या काळाचा फायदा घेऊन बिकानेर, अंबर, जोधपूर इत्यादि ठिका-णच्या राजांनी मोगल कारस्थानांत व राजकारणांत सामील होऊन आपला प्रादेशिक विस्तार साधून घेतला होता. स्वातंत्र्याची भावना तितक्या

तीव्रतेने त्यांच्या ठिकाणीं राहिली नव्हती. वारंवार मोगल दरबारांत राहून मोगलांतर्फे निरनिराळ्या प्रांतावर सुभेदाराचीं कामें केल्याकारणाने व निरनिराळ्या लढाया मारल्याकारणाने त्यांचीं नांवें भारतवर्षांतील राजकारणांत जास्त प्रामुख्याने पुढे येत होतीं व त्या मानाने मेवाडचें महत्त्व कमी होत चाललें होतें. राजसिंहानंतर जयसिंहाने गादीवर येऊन विलास-साधनांत जें कालहरण केलें व अमरसिंहाच्या बंडाळीने आपसांत जी यादवी माजली तिने मेवाडची शक्ति बरीच क्षीण झाली व महाराण्यांचें राजकारणांतील वजन नष्ट झालें. त्याच्यापेक्षा जोधपूरचा अजितसिंह व अंबरचा सवाई जयसिंह यांचीं नांवें प्रामुख्याने झळकूं लागलीं.

अशा एकंदर परिस्थितींत अमरसिंहास मेवाडचें तारूं पुढे हाकावयाचें होतें. प्रतापसिंहाच्या वेळेस स्वातंत्र्याच्या निस्सीम उपासनेचें कट्टरपणाचें पाणी मेवाडच्या सरदारांतून व प्रजेंतून हळूहळू नष्ट होत चाललें होतें आणि महाराण्याने स्वतः मोगल दरबारांत हजर न राहण्याचें स्वातंत्र्य राखून बाकी मोगलसार्वभौमत्व स्वीकारलें तरी त्यांच्या भावनेस फारशी इजा होत नव्हती. म्हणून अमरसिंहाने आपल्या आयुष्याच्या अखेरीस फरुक्शिअरबरोबर दुसरा तह करून ह्या गोष्टी मान्य केल्या व आपल्या प्रजेसाठी बऱ्याच सवलती मिळविल्या.

एकंदरींत जयसिंहाच्या कारकीर्दींत मेवाडला प्राप्त झालेला दुय्यम दर्जा पालटून त्यास पहिल्या प्रतीचें स्थान मिळविण्याच्या कामांत अमरसिंहास यश आलें नाही. तो मोठा चपळ, उद्योगी, कलाप्रिय, होता व उद्योगधंद्यास उत्तेजन देणारा असा राजा झाला. त्यासंबंधीं मेवाडच्या प्रजेंत आदर आहे. पण येथून पुढे मेवाडचा भाग्यभानु अस्ताचलाकडे ढळला तो कायमचाच !

२. संग्रामसिंह दुसरा

सन १७१६ मध्ये दुसरा महाराणा संग्रामसिंह गादीवर आला. त्यानें एकूण अठरा वर्षे म्हणजे १७३४ पर्यंत मेवाडचा राज्यकारभार हाकला. ह्या अठरा वर्षांत हिंदी राजकारणांत पुनश्च अनेक घडामोडी घडून आल्या.

सय्यद बंधूंचें प्राबल्य या काळांत दिल्लीस माजलें होतें. मोगली तख्तावर या काळांत एकामागून एक बादशाहा बसविण्यांत आले. राजसत्तेस स्थिरता नसल्याकारणाने सर्व साम्राज्य विस्कळित होऊन त्याचे तुकडे पडण्यास सुरुवात झाली होती. बंगाल, औध व हैद्राबाद हे मोगली सुभे बळकावून तेथील सुभेदार स्वतंत्र बनले. अब्दुल गफ्फारखान, कोकी, हाफीज खिदमतगारखान यांसारख्या हलकट, बदफैली, दुर्व्यसनी, बदमाष, लाचखाऊ व नीच लोकांच्या तंत्राने बादशाहा चालूं लागल्याकारणाने अन्य प्रतिष्ठित मोगल सरदारांचीही बादशाहावरची निष्ठा उडून जो तो आपल्याच पोळीवर तूप ओढूं लागला. प्रथमतः बाळाजी विश्वनाथ व नंतर बाजीराव बल्लाळ यांसारख्या कर्तृत्ववान पेशव्यांच्या नेतत्वाखाली मराठ्यांनी माळवा प्रांत सर करून हिंदुस्तानवर स्वाऱ्या करण्याचा धडाका चालविला; आणि या सर्व गडबडगुंड्यांत महत्त्वाकांक्षी असे निरनिराळे राजपूत राजे आपलाही स्वार्थ साधून आपापल्या राज्यांचा प्रादेशिक विस्तार साधून घेत होते.

अशा एकंदर परिस्थितींत मेवाडचें धोरण फारच निराळें होतें. प्रत्यक्ष परिस्थितीशीं तोंड देऊन भारतीय राजकारणांत महत्त्व साधन करणें अथवा आपला प्रादेशिक विस्तार करणें यांपैकी एकही हेतु संग्रामसिंहाने धारण केला नव्हता. राणा संग, प्रतापसिंह अथवा राजसिंह यांसारखा महत्त्वाकांक्षी राणा ह्या वेळीं मेवाडच्या गादीवर असता तर मोगल राज्यकारभारांत हात शिरकावून अथवा बाजीराव पेशव्याच्या खांद्याशीं खांदा भिडवून महाराष्ट्राइतकेंच महत्त्व मेवाडला प्राप्त करून देता. पण संग्रामचें धोरण निराळेंच होतें. हिंदी राजकारणापासून शक्य तितकें अलिप्त राहून प्रादेशिक विस्ताराकडे लक्ष न देतां आहे तोच मुलूख उत्तम रीतीने सांभाळावयाचा, मुसलमानांच्या विशेष संपर्कांत न येतां घराण्याचा पूर्वापार धार्मिक व सामाजिक लौकिक कायम ठेवावयाचा, प्रजेला सुखी करून शेतीची वृद्धि करावयाची व आपल्या राज्याच्या संपत्तींत भर घालण्यासाठी व्यापार व उद्योगधंदे यांना उत्तेजन द्यावयाचें अशा प्रकारच्या नीतीचा त्याने अवलंब केला होता. मोगल दरबारच्या संघर्षांत येऊन आपलें धार्मिक स्वातंत्र्य व महत्त्व गमविण्यापेक्षा

राजकीय महत्त्वहानि त्याने पसंत केली. अंबरने आपला विस्तार यमुनेस नेऊन भिडविला होता. जोधपूर अजमीरास जाऊन टेकलें होतें. पण मेवाड मात्र अबू, ईडर, डोंगरपूर व वंशवाडा यांच्या पलीकडे सरकूं शकला नाही.

एकंदरींत राणा संग्रामने बाहेरच्या घालमेलींत जरी फारसें लक्ष घातलें नाही. तरी राजस्थानांतील राजे अद्याप धार्मिक व सामाजिक दृष्टचा त्यास मोठा मान देत. स्वतःला व मेवाडला सन्मानार्ह अशा रीतीने त्याने राज्यशकट हाकला. संरक्षक धोरणाच्या अशा कांही यशस्वी लढायाही त्याने मारल्या. प्रजेवर त्याचें प्रेम होतें व बाहेरचे लोक त्याचा आदर करीत होते. बाप्पारावळच्या गादीचा मान अप्रतिहतपणें कायम राखणाऱ्या पुरुषांची जी एक परंपरा मेवाडांत निर्माण झाली तिच्यांतील तो अगदी अखेरचा घटक होता, असें क. टॉडने त्याचें वर्णन केलें आहे. त्याच्या प्रजाहितैषी व स्वयंतंत्र धोरणाचें श्रेय त्याचा प्रधानमंत्रि बिहारीदास पांचोळी यास देण्यांत येतें. बिहारीदासाने यानंतर तीन पिढ्यांपर्यंत मेवाडचें मंत्रिपद चालविलें. त्या काळचे सर्व मुत्सद्दी त्यास मान देत व त्याच्या बुद्धिमत्तेची तारीफ करीत.

संग्रामसिंहाच्या न्यायनिष्ठुरतेच्या, प्रजाहिततत्परतेच्या, पुरुषपरीक्षेच्या व गुणगौरवाच्या अनेक आख्यायिका राजस्थानांत प्रसिद्ध आहेत.

३. जगत्‌सिंह दुसरा

संग्रामसिंहानंतर जगत्‌सिंह गादीवर बसला. त्याने १७३४ ते १७५२ पर्यंत राज्य केलें. त्याच्या कारकीर्दींतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे राजस्थानांतील बहुतेक प्रमुख राजांचें फिरून एकवार सख्य होऊन त्याचें पर्यवसान खालीलप्रमाणें तहांत झालें. या तहावर उदयपूर, जोधपूर, जयपूर, कोटा, बिकानेर, किशनगड व नागोर इत्यादि ठिकाणच्या राजांच्या सह्या होत्या. तहाच्या शर्ती पुढीलप्रमाणें होत्या.

(१) सर्व राजांनी धर्माची शपथ घेऊन एकमेकांच्या सुखदुःखांत भागीदार असावें. एकाचा मानापमान तो सर्वांचा मानापमान समजण्यांत यावा. (२) एकाच्या शत्रूस दुसऱ्याने आश्रय देऊं नये. (३) राजस्थानच्या शत्रूंना तोंड देण्याचा सर्वांनी मिळून प्रयत्न करावा.

परंतु या तहाचा योग्य परिणाम होऊं शकला नाही. रा. ब. ओझाजी म्हणतात, "राजपूत राजांचा स्वार्थ समान नव्हता. महाराणा जगत्‌सिंह विषयविलासांत मग्न होता. त्याच्या सरदारांतील अंत:कलहा-मुळे मेवाडला दुसरीकडे लक्ष देण्यास वेळच नव्हता. राजे एकास दुसऱ्याहून श्रेष्ठ मानण्यास नाकारीत होते." राजपुतांचा संकुचित कुलाभिमान व पारस्परिक ईर्षा व असूया इतकी प्रबळ आहेत की, त्यापुढे राष्ट्रीय हिताचा उदय झाला तरी तो फार काळ टिकूं शकत नाही.

४. बाजीरावाशीं मुलाखत

जगत्‌सिंहाच्या कारकीर्दीत घडलेली दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे साताऱ्च्या छत्रपतीचे पेशवे पंतप्रधान बाजीराव बल्लाळ यांनी मेवाडवर केलेली स्वारी ही होय. मेवाडशीं मराठ्यांचा प्रत्यक्ष असा संबंध प्रथम ह्याच वेळीं आला. मोगल बादशाहांनी आपल्या मुलुखांतून चौथ व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मराठ्यांना बहाल केल्यापासून त्यांनी मोगल साम्राज्याखाली असलेल्या प्रत्येक मुलुखावर स्वाऱ्या करून वरील पैका वसूल केला होता. सबंध राजस्थान मोगल साम्राज्यांत मोडतो असें मोगल बादशाहा म्हणत असल्याकारणाने बाजीरावाने आपला मोर्चा तिकडे वळविला होता.

या स्वारीच्या निमित्ताने मेवाडमध्ये जाण्याचा त्याचा आणखी एक हेतु असला पाहिजे. अंबरच्या सवाई जयसिंहाने बाजीरावचें धोरण ओळखून इंदूरच्या नंदलाल मंडलोईच्या मार्फत बाजीरावशीं संगनमत करून माळव्यांतून व गुजरातेंतून मोगली सत्तेचें उच्चाटन करण्याचे बेत पुढे तडीस नेले. त्याच हेतूने प्रथम मेवाडच्या महाराण्याशीं मैत्री जोडून त्याच्या मार्फत राजपूत राजांचें एक प्रबळ संघटन निर्माण करतां आलें तर मराठे व राजपूत यांच्या संयुक्त बळावर मोगल पातशाहीस सहज उलथून पाडतां येईल अशी बाजीरावाची कल्पना असावी. राजस्थानची नाडी म्हणजे मेवाड. एकदा मेवाडच्या राण्याने हिंदुपदपादशाहीचा भार आपल्या शिरावर घेऊन राजपूत जातीचें संघटन करण्याचें ठरविलें तर परकी सत्तेचा उच्छेद होण्यास विलंब लागणार नाही असें बाजीरावास वाटत

होतें. म्हणून प्रथमतः त्यानें मेवाडचीच यात्रा करण्याचें ठरविलें असल्यास नवल नाही. परंतु त्याची अपेक्षा अगदीच फसली. मेवाडचा महाराणा त्यास केवळ लुटारू समजला. त्याने त्याच्या भेटीची शक्य तितकी टाळाटाळ केली. बाजीरावच्या आक्रमणाकडे जगत्‌सिंह कोणत्या दृष्टीने पाहत होता याची कल्पना येण्यासारखें त्याने आपल्या मुख्य प्रधानास लिहिलेलें एक पत्र टॉडने दिलें आहे. तो म्हणतो, "बाजीराव आलाच आहे. माझ्या सारख्यास खंडणी देण्यास भाग पाडल्याचें यश तर तो पदरांत पाडीलच; पण शिवाय प्रदेशही मागेल. मागच्या वेळीं मल्हार आला. ह्या खेपेस बाजीराव येत आहे. तो फार प्रबळ आहे. परमेश्वराने माझी प्रार्थना ऐकली तर त्यास प्रदेश देण्याचा प्रसंग येणार नाही." यावरून बाजीरावाचें येणें म्हणजे पैसा उकळण्यासाठी व प्रदेश लाटण्याकरितांच होय असें जगत्‌सिंह समजला हें उघड आहे.

अर्थात् ज्या आशेने बाजीराव मेवाडकडे मुद्दाम आला होता ती पूर्ण होणें शक्य नव्हतें. राणा संग अथवा प्रतापसारखा पुरुष जगत्‌सिंहाच्या जागीं मेवाडच्या गादीवर असता तर मराठ्यांच्या उदयोन्मुख सत्तेचा अवश्य फायदा घेता व बाजीरावाशीं मैत्री करून यावनी शासन कायमचें नष्ट करता. परंतु 'भवितव्यता बलीयसी' याशिवाय दुसरें काय ? बाजीरावास मेवाडच्या महाराण्याकडून मुलुख अथवा पैसा उपटावयाचा नव्हता हें त्याने केलेल्या तहनाम्यावरून स्पष्ट होतें. केवळ वार्षिक एक लक्ष साठ हजारांची खंडणी बसवून त्याने मेवाडमधून दुसरीकडे मोर्चा वळविला.

राणा जगत्‌सिंहाच्या कारकीर्दींत अखेरीस त्याचा मराठ्यांशीं संघर्ष आल्याविना राहिला नाही. अंबरच्या गादीवरील सवाई जयसिंहाच्या मृत्यूनंतर तंटे उत्पन्न झाले; त्यांत एका बाजूस मराठे व दुसऱ्या बाजूस महाराणा असून त्या प्रसंगीं झालेल्या लढाईंत महाराण्याचा मराठ्यांनी पूर्ण पराजय केला. त्यामुळे त्यास फार दुःख झालें. जगत्‌सिंह विलासी व ऐषआरामी असून राज्यकारभारास अयोग्य होता. होळी व रंगपंचमीचे उत्सव करणें व हत्तींच्या साठमाऱ्या करविणें ह्या गोष्टी बाजीरावाची भेट घेऊन हिंदुस्तानचें राजकारण ठरविण्यापेक्षा त्यास अधिक महत्त्वाच्या वाटत होत्या. त्याच्या कारकीर्दीपासून मेवाडच्या अधःपातास

झपाट्याने प्रारंभ झाला. नादिरशाहाची स्वारी त्याच्याच कारकीर्दीत झाली; व तिने म्रियमाण मोगल साम्राज्यावर एक अतिशय जोराचा तडाखा दिला. नादिरशाहाविरुद्ध झालेल्या प्रतिकाराच्या तयारींत एकाही राजपूत राजाने भाग घेतला नाही.

५. १७५२ ते १७६२

ह्या दरम्यान राणा प्रताप (दुसरा) व राजसिंह (दुसरा) यांनी अनुक्रमें तीन व सात वर्षें मेवाडवर राज्य केलें. यांच्या आमदानींतला विशेष म्हणजे मराठ्यांनी वारंवार या राष्ट्रावर स्वाऱ्या करून अतोनात खंडणी वसूल केली. त्यामुळे व अंतस्थ बंडाळ्यांमुळे राष्ट्रास अतोनात दारिद्र्य येत गेलें. राजसिंहाने राठोड राजकुमारीशीं लग्न लावलें त्या वेळीं मेवाडच्या खजिन्यांत पैसा नसल्याने त्यास मराठे सरदारांकडून कर्ज काढावें लागलें. यावरूनच मेवाडच्या दारिद्र्याची कल्पना सहज येऊं शकेल.

६. अठराव्या शतकांतील उत्तरार्ध

सन १७६२ मध्ये राजसिंह मरण पावला. त्या वेळीं हिंदी राजकारणांत पुनश्च महत्त्वाचीं स्थित्यंतरें घडन आलीं होतीं. मराठ्यांची सत्ता बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत आपल्या उत्कर्षाचें शिखर गाठीत होती. शिखांचें शल्यही दिल्लीपासून ऐन पस्तीस मैलांच्या आंत सरहिंदपर्यंत म्हणजे मोगल बादशाहीच्या ऐन काळजांत शिरलें होतें. जाटांची जमात मोगली मुलखांत धुमाकूळ घालीत होती. बंगाल, औध, हैद्राबाद, सिंध, काबूल, पंजाब, इत्यादि ठिकाणचे सुभेदार आपापल्या ठिकाणीं स्वतंत्र होऊन मध्यवर्ती सत्तेस जुमानीनातसे झाले होते.

अशा रीतीने ढासळलेली ही मोगल साम्राज्याची इमारत सावरून धरण्यासाठी सर्व इस्लामधर्मीयांच्या सहकार्याने १७६१ ह्या वर्षी प्रयत्न करण्यांत आला. ह्या प्रयत्नाचा रोख अर्थातच त्या काळांतील सर्वांत प्रबलतम जी मराठ्यांची सत्ता तिला प्रतिबंध घालण्याकडे होता. अहमदशहा अब्दालीच्या नेतृत्वाखाली संघटित होऊन मुसलमानांनी कुरुक्षेत्राच्या उर्फ पानिपतच्या रणभूमीवर मराठ्यांशीं जंगी संग्राम केला. त्यांत मराठ्यांचा पराजय झाला खरा परंतु त्यामुळे मोगल बादशाहीची सत्ता दृढ झाली असें मुळीच नाही. उलट मराठीसत्तेच्या तुटक्या खोडास मात्र

पालवी फुटली आणि थोरले माधवराव यांच्यासारख्या जवान पेशव्याच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी पुनश्च उत्तर भारतावर व दिल्लीवर आपला कब्जा बसविला. पानपतांत झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई करण्यासाठी मराठ्यांनी ठिकठिकाणांहून पुन: मोठमोठ्या खंडण्या वसूल करण्याचा सपाटा चालविला. त्यांतच पानिपतच्या संग्रामांतून प्रथम काढता पाय घेणारे मल्हारराव होळकर यांनी त्या निमित्ताने मेवाडच्या महाराण्यापासून साठ लाख रुपयांची जबरदस्त खंडणी वसूल करून आधीच वाळत चाललेल्या या राष्ट्राचें अधिक तीव्र शोषण केलें.

७. मराठ्यांशीं संबंध

थोरल्या बाजीराव पेशव्यानंतर त्याच्या सरदारांचे व राजपूत राजांचे संबंध इतकेसे मैत्रीचे राहिले नाहीत. हे संबंध बिघडविण्यास बहुतांशीं मल्हारराव होळकरच कारण झाला. त्याने आपला प्रादेशिक विस्तार मोगलांच्या मुलुखांत साधण्याऐवजी राजपुतांच्या राज्यांत चालविला. दुर्बळ झालेल्या मेवाडचा बराच प्रदेश त्याने जिंकून ताब्यांत घेतला; व वेळोवेळीं स्वाऱ्यांच्या धमक्या देऊन अतोनात पैसा खंडण्यांच्या रूपाने वसूल केला. राजपूत लोकांना आपलेंसें करून त्यांच्या साहाय्याने हिंदुपदपादशाहीची उभारणी करण्याचें श्रीछत्रपति शिवाजी महाराज अथवा थोरले बाजीराव यांचें धोरण अजिबात सुटून राजपुतांचें–नव्हे उत्तर भारतांतील सर्व हिंदु जातीचेंच–अर्थशोषण करण्याची दुर्बुद्धि मराठ्यांना होऊं लागली. अशा सरदारांत मल्हारराव हा प्रधान होय. पानिपतावरून निसटल्यापासून त्याचा बहुतेक काळ राजपुतान्यांतील उलाढाली करण्यांत व नाना प्रकारचीं कारस्थानें रचण्यांत गेला. सालीना अठ्ठावीस ते तीस लक्ष रुपये उत्पन्न असलेल्या हिंदु राज्यांमधून साठ साठ लक्ष रुपये खंडणी वसूल करणाऱ्या मराठ्यांबद्दल हे हिंदूंचे तारक आहेत अशी भावना कायम राहणें कसें शक्य होतें? ज्या वर्षीं मल्हाररावने ही खंडणी वसूल केली त्याच वर्षीं मेवाडांत एक दुष्काळ पडून धान्याची किंमत रुपयास दोन शेर झाली. ह्यानंतर चार वर्षें सतत चाललेल्या गृहकलहांच्या वणव्यांत मेवाडच्या पूर्वपुरुषांनी संपादन केलेला लौकिक जळून खाक झाला. ह्या गृहकलहाच्या विषादमय

वृत्तांतानेंच ह्यापुढचीं पृष्ठें काळीं करावीं लागणार आहेत; एक हजार वर्षांहून अधिक काळपर्यंत अबाधित राहिलेला मेवाडसिंहासनाचा गौरव व त्याबरोबरच राजपूत जातीचें यश कलंकित करावें लागणार आहे.

८. अरिसिंहाचें राज्यारोहण व घोर यादवीस प्रारंभ

दुसरा राजसिंह निपुत्रिक वारला. म्हणून त्याचा चुलता अरिसिंह १७६२ सालीं गादीवर बसला. त्याच्या ठिकाणीं कर्तृत्व तर नव्हतेंच, पण सरदारांना आपल्या बरोबर घेऊन चालण्याइतका मनमिळाऊपणाही नव्हता. गादीवर आल्याबरोबर त्यांचा सूड घेण्याच्या भरांत त्याच्या हातून मेवाडचे अनेक एकनिष्ठ व शूर सरदारही घातपाताने मारले गेले. अरिसिंहाच्या या छळणुकीने मेवाडचे बहुतेक सरदार त्याच्या विरुद्ध झाले. इतक्यांत राजसिंहाच्या गरोदर राणीस पुत्र झाल्याची वार्ता त्यांस समजल्याबरोबर त्यांनी त्यास ताब्यांत घेऊन कुंभलगडच्या किल्ल्यावर बंदोबस्तांत ठेवलें; व तो थोडा मोठा झाल्यावरोबर तो मेवाडचा राणा म्हणून जाहीर करून अरिसिंहाविरुद्ध बंड उभारलें. येथूनच मेवाडच्या यादवीस ऊत येऊं लागला.

सरदारांचें व रत्नसिंहाचें बंड अशा तऱ्हेने वाढत आहे हें पाहून अरिसिंहाने गुजरात व सिंधच्या भाडोत्री मुसलमानांना आपल्या सैन्यांत भरती करण्याचा नवाच उपक्रम सुरू केला. या भाडोत्री मुसलमानांची नारायणराव पेशव्याच्या पदरीं असलेल्या गारद्यांशीं तुलना करतां येईल. राजपूत व मराठे यांनी या विषवल्लीचें आपल्या हाताने आपल्या आंगणांत आरोपण करून ठेवलें. या बाबतींत दोघांचेंही दुर्दैव सारखेंच ! अशा तऱ्हेने अरिसिंहाने सिंधी मुसलमान भरती केलेले पाहून रत्नसिंहाच्या पक्षाच्या सरदारांनी दहा लक्ष रुपये देऊं करून शिंद्याची मदत घेतली. तसेंच राजस्थानांतील मठामंदिरांतून राहणारे सुमारें पंधरा हजार नागे साधू–ज्यांना राजपूत लोक महापुरुष म्हणून ओळखतात–त्यांचीही मदत घेतली. अरिसिंहाचा प्रबळ सरदार जालीमसिंह याने रघूजी पयगावाले व दौलतमिया या मराठे सरदारांना वीस लक्ष रुपये देऊं करून आपल्या पक्षास मिळविलें. अखेरीस दोन्ही पक्षांची क्षिप्रा नदीच्या किनाऱ्यावर भयंकर

लढाई होऊन अरिसिंहाचा पराभव होऊन त्याच्या पक्षाच्या उरल्यासुरल्या सरदारांपैकीही बरेचसे सरदार मारले गेले.

९. उदयपूरचा वेढा व अमरचंद बडवा

या लढाईनंतर महादजी शिंदे उदयपुरावर चालून गेला व शहरास वेढा देऊन बसला. ह्या वेळीं अरिसिंहाचा खजिना अगदी रिकामा झाला होता. पगार न चुकविल्यामुळे सिंधी मुसलमान त्यास तोडीत होते. त्यांनी त्याच्या महालास गराडा देऊन पैशाची मागणी केली. शहरांत धान्याचाही दुष्काळ इतका झाला, की रुपयास शेरभर धान्य मिळणें कठीण झालें. अशा वेळीं ज्या एका राष्ट्रनिष्ठ वीर पुरुषाने मेवाडचीं अब्रू बचावली तो म्हणजे अमरचंद बडवा हा होय. पूर्वी तो प्रधानपदावर असतां त्यास अरिसिंहाने काढून टाकलें होतें. पण मुसलमान व मराठे ह्यांच्या कचाटींत आपला राजा व राष्ट्र सापडलें आहे हें दिसतांच त्याच्या राष्ट्रभक्तीने उचल खाल्ली. अरिसिंहाने त्यास सर्वाधिकार देऊन आपला बचाव करण्याची विनंती केली. अमरचंदाने सर्व प्राचीन कोषागारें व त्यांतील मोठमोठीं सोन्याचीं व रुप्याचीं भांडीं बाहेर काढून तीं टांकसाळींत ओतलीं व नाणीं पाडलीं. रत्नें व माणकें गहाण टाकून त्यावर बराच पैका जमविला व शिपायांचा पगार चुकवून त्यांस वेढा लढविण्यास उद्युक्त केलें. तसेंच त्याने शहरांतील व आसपासचीं सरकारी व खाजगी धान्यागारें जबरदस्तीने उघडून सर्व धान्य बाजारांत आणविलें व नगारे वाजवून लोकांना सहासहा महिन्यांचा धान्यसंग्रह करण्यास बजाविलें. त्यामुळे धान्य अत्यंत स्वस्त झालें. अमरचंदाचें हें साहस पाहून सिंध्यांचा नायक आदिलबेग ह्याने राण्यासाठी आपला प्राणदेखील अर्पण करण्याची प्रतिज्ञा केली. "आम्ही पुढचा पगार मागणार नाही," आदिलबेग बोलूं लागला, "धान्य संपलें तर पशु मारून खाऊं; व पशूही संपतील तर हातांत तरवारी घेऊन दक्षिण्यांवर तुटून पडून त्यांना भक्षण करूं." ह्यावरून शिपायांच्या ठिकाणीं अमरचंदाने किती जोम निर्माण केला होता याची कल्पना येते. राजपुतांनी एक वर्षभर वेढा लढविला. अखेरीस साडेत्रेसष्ट लक्ष रुपये घेऊन महादजीने वेढा उठवून अरिसिंहाशीं तह केला.

ह्या रकमेप्रीत्यर्थ महादजीस मेवाडच्या तिजोरींतून तेहतीस लक्षांचें जवाहीर, सोनें व चांदी देण्यांत आली. व बाकीच्या रकमेची फेड होईपर्यंत जावर, जीरण व मोरवण हे परगणे गहाण ठेवण्यांत आले व त्यांचा कारभार दोघांनीही पाहावा असें ठरलें. परंतु पुढे लवकरच शिंद्याने राजपूत अधिकाऱ्यांना हाकून लावून स्वतःच तो सर्व मुलूख बळकावला व गहाणाचा अपहार केला. शिंद्यास खूष करण्यासाठी पुढे अखेरच्या तहांत इंग्रजांनीही या गोष्टीस संमति देऊन आपल्या न्यायबुद्धीचें प्रदर्शन केलें.

याप्रमाणें अरिसिंहाचा नक्शा उतरला तरी त्याचा स्वभाव बदलला नाही. त्याने सरदारांचा छळ पूर्ववत् चालू ठेवला. अखेरीस १७७३ सालीं शिकारीच्या निमित्ताने दूर जंगलांत नेऊन बुंदीच्या अजितसिंहाने त्यास ठार मारलें. अरिसिंहाच्या कारकीर्दींत झालेल्या यादवीने मारवाडला अत्यंत क्षीण करून सोडलें.

१०. महत्त्वाकांक्षी राजमाता

अरिसिंह मारला गेला तेव्हा त्यास हंमीर व भीमसिंह नांवाचे दोन राजपुत्र होते. ते लहान असल्याने राज्याचा सर्व कारभार राजमाता सरदार कुंवरी–जिला बाईजीराज म्हणत–हिच्या हातीं आला. ही तरुण विधवा मोठी महत्त्वाकांक्षी, सत्तालोलुप व कारस्थानी होती. रामप्यारी नांवाच्या एका हलकट गुर्जरदासीच्या तंत्राने ती वागत असे. ह्या रामप्यारीचें व मुख्य प्रधान अमरचंद बडवा याचें चांगलें नसल्या-मुळे तिने अमरचंदाविरुद्ध कारस्थान करण्यास राणीस प्रवृत्त केलें. सरदार कुंवरीच्या कारस्थानी स्वभावाने पुनः गृहयादवीस ऊत आला. सिंधी मुसलमान शिपायांचे पगार थकल्याने त्यांनी पगारासाठी पुनः बंड उभारलें. अशा वेळीं अमरचंदाने केवळ देशहितैकबुद्धीने आपल्या स्वतःच्या घरांतील सोनेंनाणें, रुपें, जडजवाहीर जें जें कांही होतें तें सर्व सिंध्यांचा पगार चुकता करण्यासाठी राणीच्या स्वाधीन केलें. इतकें असूनही तरुण बाईजीराज कारस्थानी व महत्त्वाकांक्षी असल्याने तिने अमरचंदाचा काटा आपल्या मार्गांतून दूर करण्याचा प्रयत्न केला. तिने विषप्रयोगाने अमरचंदास ठार मारविलें अशी बोलवा आहे.

११. राष्ट्रभक्त अमरचंद बडवा

अमरचंद मेला त्या वेळीं अंत्यविधीपुरतेंही द्रव्य त्याजपाशीं शिल्लक नव्हतें. त्याने आपल्या जवळची पैन्पै सिंध्यांचें बंड शमविण्यासाठी राष्ट्रास अर्पण केली होती. ज्याच्या उत्तरक्रियेसाठीही वर्गणी करावी लागली अशा प्रकारचा अमरचंद हाच भारतवर्षाच्या आधुनिक इतिहासांतील पहिला देशभक्त समजला जाईल. कोणत्याही सुसंस्कृत देशांत, इतक्या वीरतेने जगणारा व इतक्या त्यागाने मरणारा, हा थोर पुरुष जन्मास आला असता तरी तो आपल्या देशास भूषणावह व गौरवास्पदच झाला असता. त्यांतून अठराव्या शतकांत पूर्णपणें अध:पतित झालेल्या आमच्या या देशांत जन्मास येऊन ज्याने फलाकांक्षारहित अशा केवळ निष्काम भावनेने राष्ट्रसेवा केली व आपल्या संपूर्ण संपत्तीचा व जीविताचा राष्ट्र-सेवेंत होम केला त्या अमरचंदाची योग्यता किती वर्णन करावी !

वयांत येण्याच्या आधीच राजपुत्र हंमीरचा मृत्यु इ. स. १७७८ सालीं झाला.

प्रकरण बारावें

१. पांचोळी देशभक्ताचें पत्र

हंमीरच्या नंतर त्याचा धाकटा भाऊ भीमसिंह गादीवर बसला. त्या वेळीं तो फारच अल्पवयी होता. गृहकलहाचें जें बीज यापूर्वी मेवाडांत पेरलें गेलें होतें त्याचा आता मोठा वृक्ष होऊन त्यास कटु फलेंही येऊं लागलीं होतीं. भीमसिंहाची कारकीर्द म्हणजे शक्तावत व चुण्डावत घराण्यांतील सरदारांनी परस्परांत मारलेल्या लढाया व स्वजनांचा केलेला रक्तपात, ह्या गृहच्छिद्रांत मराठे इत्यादि बाह्यसत्तांनी केलेले हस्तक्षेप व कधी या पक्षाकडून, तर कधी त्या पक्षाकडून द्रव्य उकळण्याचा केलेला उपद्व्याप, सिंधी शिपायांचें प्राबल्य व या सर्व गोष्टींचा मिळून झालेला देशविघातक परिणाम इत्यादि विविध गोष्टींची लांबलचक जंत्रीच होय. ज्या बिहारीदास पांचोलीने आपल्या कर्तृत्वाच्या व शहाणपणाच्या जोरावर तीन पिढ्या मेवाडचें सिंहासन तोलून धरलें, त्याच्या योग्य व

कर्तबगार वंशजांचें अंतःकरण मेवाडची दुःस्थिति पाहून तिळतिळ तुटत होतें. अशाच एका पांचोळ्याने भीमसिंहास पाठविलेलें एक मोठें वस्तु-स्थितिबोधक पत्र टॉडने दिलें आहे. तें मोठें उद्‌बोधक असल्याने त्यांतील शेवटचा भाग येथे दिला आहे.

"आता राणाजी तुम्ही सलुम्ब्याचा सरदार व त्याचा भाऊ यांच्या तंत्राने वागून परकी लोकांना पैसे देऊन नोकरीस ठेवलें आहे व मागील सर्व चुकांवर कळस चढविला आहे. आपण व 'बाईजीराज' यांनी परकीय दक्षिणी यांच्यावर विश्वास ठेवून ह्या रोगास संसर्गजन्य बनविलें आहे. तुमचेंच मन तुमच्या स्वाधीन नसल्याने आता काय करणें शक्य आहे? अद्यापदेखील औषधी सापडणें शक्य आहे. पण आपण सर्वजण एकत्रित होऊं तर! व मंत्रिपदाचे अधिकार ताब्यांत घेण्याची खटपट करूं तर! आपणांस यश मिळूं शकेल; निदान रोगाची वाढ तरी खास थांबेलच! आता जर उपेक्षा केली तर मग आवरणें मनुष्यशक्तीच्या बाहेर जाईल. दक्षिणी म्हणजे मोठेंच शल्य होय. त्यांचा हिशोब करून टाका व कसेंही करून त्यांची एकदाची पिडा टाळा. अन्यथा आपण कायमचे आपल्या देशास अंतरलों (म्हणून समजा).

"बहुतेक प्रश्नांचा मी उल्लेख केलाच आहे. आपण भविष्य-काळावर नजर ठेवूं या! सरदार, मंत्री व सर्वजण संघटित होऊं या! देशाच्या कल्याणाबरोबरच सर्वांचेंही कल्याण होईल. पण लक्षांत ठेवा, हा रोग असा आहे की, आता जर आपण त्याचा नाश केला नाही तर तो आपलाच नाश केल्याशिवाय राहणार नाही."

जी स्थिति मेवाडची तीच या वेळीं इतर बहुतेक राजपूत राष्ट्रांची होती. वरील पत्रांतून आत्यंतिक देशप्रीतीचा रस निथळत आहे. भावी विनाश–भयाने लेखकाचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे व अद्याप देखील सर्व लोकांनी मनावर घेतल्यास भावी अनर्थापात टळूं शकेल अशी आशा दिसून येत आहे. मराठ्यांनी राजपूत देशभक्तांच्या मनांत कोणतें स्थान संपादन केलें होतें याची कल्पना येण्यासही हें पत्र पुरेसें आहे. मराठे म्हणजे शल्य होत व तें उपटन टाकण्यांत देशाचें कल्याण आहे अशी भावना त्यांत स्पष्ट आहे. हिंदुपदपादशाहीची स्थापना करूं पाहणाऱ्या

शिवाजी महाराजांचे व बाजीराव बल्लाळाचे आंतरिक उद्देश ह्या काळांतल्या मराठे सरदारांनी किती अमलांत आणले होते याची वरील पत्रावरून स्पष्ट कल्पना येते.

२. शिंद्यांच्या भांडणांत मेवाडची रस्सीखेच

राणा भीमसिंह गादीवर आल्यानंतर त्याच्या दुर्दैवाने एकामागून एक गोष्टी अशा घडत गेल्या की त्यामुळे मेवाडवर अधिकाधिक आपत्तीच कोसळल्या. उदाहरणार्थ, महादजी शिंदे वारल्यावर त्याच्या जागीं दौलतराव शिंद्यास सुभेदारी मिळाली. परंतु त्याच्याविरुद्ध महादजीच्या स्त्रियांनी बंड केलें. त्यांना भीमसिंह व त्याचे शक्तावत सरदार यांनीं साहाय्य केलें. त्याबरोबर शक्तावतांचे परंपरागत वैरी चोंडावत सरदार यांनी दौलतराव पक्षास साहाय्य दिलें. दौलतरावाने बाईचें बंड मोडण्याची कामगिरी त्यांच्यावरच सोपविली. अर्थात त्यामुळे शिंद्यांच्या घरगुती रणधुमाळीचेंही क्षेत्र मेवाडच बनलें. ह्या लढाईंत दोन्ही पक्षांच्या वतीने अनेक शूर राजपूत सरदार कामास आले. मराठ्यांनी मात्र त्यांचा मुलूख लुटून व पैसा उकळून ह्या भांडणांत आपले हात धुवून घेतले. महादजी शिंद्याने आपल्या फौजांना कवायती शिक्षण देण्याकरितां जे युरोपियन अधिकारी ठेवले होते त्यांनीही या बाईच्या बंडाचा फायदा घेऊन राजस्थानांत आपला पाय रोवला. त्यांच्या तोफांनी मेवाडचे अनेक किल्ले उध्वस्त झाले. कत्तल, लूट व वैयक्तिक आघातप्रत्याघात यांनी मेवाडचें वातावरण कित्येक दिवस हादरून गेलें. भांडण शिंद्याचें पण त्याकरितां तोशीस मात्र बिचाऱ्या मेवाड देशास ! ह्या एकंदर भांडणाचा निष्कर्ष असा निघाला की, दौलतराव शिंद्याची मेवाडवर पूर्वीपेक्षाही अधिक मजबूत पकड बसली.

३. होळकरांचा धुमाकूळ

मल्हारराव होळकराप्रमाणेंच अहल्याबाईच्याही नीतीचें राजपूत राजांना त्रस्त करणें हें एक अंग होतें. पण यशवंतरावाच्या वेळीं व त्यानंतर त्याचा अगदी कळस झाला. १८०२ सालीं इंग्रजांशीं झालेल्या लढाईंत पराजय होऊन यशवंतराव पळाला तो मेवाडांत घुसला. त्याच्या पाठीवर शिंदे व इंग्रज होतेच. पळतां पळतां यशवंतरावाने रतलाम लुटलें व राण्याजवळ खंडणी मागितली. तेथून निघून तो नाथद्वाऱ्यास गेला व

तेथील महंताकडून त्याने तीन लक्ष रुपये खंडणी मागितली. महंताने मूर्ति उदयपुरास पळविली. नाथद्वाऱ्याहून होळकर बनेरा व शहापुरास गेला व तेथील लोकांजवळून खंडणी वसूल करून त्याने अजमीरच्या मार्गे जयपुराकडे भरारी मारली. इकडे होळकराचा पाठलाग करणाऱ्या शिंद्याच्या सरदारांनीही उदयपुरास आल्यावर राण्याकडून तीन लाख रुपये खंडणी वसूल केली. त्या वेळीं त्या हतभागी राजास आपल्या घरांतील दागिने व हिरेमाणकें विकून रक्कम पुरी करून द्यावी लागली. त्याच वेळीं शिंद्यातर्फे मेवाडच्या सुभेदारीवर असलेला सरदार जसवंतराव भाऊ यानेही निराळ्या खंडणीची राण्यास मागणी केली; आणि निरनिराळ्या सरदारांच्या इस्टेटीवर हल्ले करून, शेतकऱ्यांचीं घरें लुटून, त्यांचीं जनावरें जप्त करून व राण्यास कैद करण्याची धमकी देऊन त्याने आपला पैसा वसूल करून घेतला.

४. बाळारावचें प्रकरण

यानंतर बाळाराव नांवाच्या मराठा सरदाराची मेवाडच्या कारभारावर नेमणूक झाली. ह्या बाळारावाने चोंडावत सरदारांच्या इस्टेटींची अत्यंत क्रूरतेने नासधूस केली. मौजीराम नांवाच्या एका इसमास स्वाधीन करण्याचें राण्याने नाकारलें, म्हणून बाळारावाने खुद्द राजवाड्यावर शिपाई घातले. परंतु राण्याने मौजीरामच्या एका मित्राच्या साहाय्याने बाळारावाला कैद करवून त्याची फौज मारून काढली. तेव्हा बाळारावाची मुक्तता करण्यासाठी जालमसिंहाच्या नेतृत्वाखाली शक्तावत सरदारांनी उदयपुरावर चाल केली. सिंधी, अरब व गोसावी यांची सेना उभारून राण्याने छैंजाघाटापाशीं त्यांना सामना दिला. परंतु पांच दिवस लढाई चालून राण्याचा पूर्ण पराभव झाला. अखेरीस राण्यास बाळारावाची सुटका तर करावीच लागली पण वर पुनः त्यास जबरदस्त खंडणीही द्यावी लागली.

५. स्त्रिया लुटल्या

इकडे यशवंतराव होळकर पुनः फौजा जमा करून भेंडीरवर चालून आला व तें शहर लुटून उध्वस्त करून व तेथील सरदारांकडून दोन लाख रुपये खंडणी घेऊन त्याने पुनः उदयपुरावर झडप घातली व चाळीस लक्ष रुपये खंडणीची मागणी केली. राणा अर्थातच एवढी मोठी रक्कम देण्यास

असमर्थ होता. तेव्हा होळकराने राजवाड्याचा कब्जा घेतला व जी जी म्हणून सोन्यारुप्याची चीजवस्त सापडेल ती ती सर्व मोडून त्याने आपला पैसा वसूल केला. पण एवढ्यानेच त्याचें समाधान झालें नाही. राजकुळांतील स्त्रियांच्याही खाजगी उपयोगाची व ऐषआरामाची सोन्यारुप्याची प्रत्येक वस्तु त्याने लुटली. शिवाय शहरवासीयांजवळूनही त्याने बराच पैका वसूल केला. असा एकंदर बारा लाखांचा ऐवज घेऊन व बाकीच्या रकमेसाठी राजकुलांतील माणसें ओलीस ठेवून त्याने तेथून लावा, बदनूर व देवगडावर हल्ले चढवून लूटमार केली व खंडण्या घेतल्या. अशा तऱ्हेने सतत आठ महिने मेवाडांत धुडगूस घालून व मेवाडचा बहुतेक भाग उध्वस्त करून त्याने वायव्येकडे कूच केलें.

६. मेवाडचा शनि

या वेळीं राजकारणाचा डाव पुनः पालटला. शिंदे, होळकर एक झाले व त्यांनी इंग्रजांशीं सामना करण्याचा निश्चय केला. हा सामना ऊणापुरा दहा वर्षें चालला, आणि अशा तऱ्हेने आतापर्यंत होळकराच्या तरवारीस बळी पडलेला मेवाड यानंतर इंग्रजांच्या तोफांचें भक्ष्य बनला. एवंच पारस्परिक कलहाचें व दोन प्रबळ शत्रूंच्या लढायांचें क्षेत्र बनून मेवाडचा सर्वनाश झाला. इंग्रज होळकराच्या पाठीस लागलेले पाहून शिंद्याने मेवाडवर पुनः १६ लक्ष रुपयांची खंडणी लादली व सदाशिवराव नांवाच्या आपल्या सरदारास उदयपुरास पाठवून ती पूर्वीप्रमाणेंच जुलमी पद्धतीने वसूल करून घेतली.

७. कृष्णाकुमारी

मराठे व इंग्रज यांसारख्या प्रबळ लढवय्यांच्या तडाख्यांत सापडून मेवाडची भूमि उध्वस्त व्हावी, त्यांतील शेतकरी, जमीनदार, सरदार व महाराणा यांचे वाडे लुटले जावेत, त्यांतील प्रत्येक मोलवान वस्तूचा भरबाजारांत विक्रय व्हावा, राजकुलांतील स्त्रियांच्या अंगावरील जवाहीर विकून खंडण्या भरण्याची पाळी यावी व त्यांची विटंबना व्हावी, चंद्रावत व शक्तावत कुळांतील सरदारांनी आपापसांतील वैरामुळे परस्परांच्या कत्तली कराव्यात व या समग्र धांगडधिंग्याने त्रस्त झालेल्या या प्राचीन भूमींतून राष्ट्रीय सद्‌गुणांचा–ज्यांची सतत एक

हजार वर्षे अभिवृद्धि झाली होती त्यांचा—अवघ्या शंभर सव्वाशें वर्षांत पार ऱ्हास व्हावा; आणि हें सर्व पतन, हा सर्व नाश, हरतऱ्हेने पाहण्याची पाळी महाराणा भीमसिंहावर यावी, यापेक्षा दैवाचा दुर्विलास तो कोणता? परंतु दुर्भाग्य त्याच्या हात धुवून पाठीस लागलें होतें. त्याच्यावरील आपत्तींचा कळस व्हावयाचा होता व तो कृष्णाकुमारीच्या प्रकरणाने झाला. द्रौपदीच्या निमित्ताने जसें भारतीय युद्ध झालें अथवा संयोगितेच्या निमित्ताने जयचंद व पृथ्वीराज यांच्यांत वैमनस्यें माजून त्यांचा यावनी सत्तेची स्थापना होण्यांत परिणाम झाला, तद्वतच कृष्णाकुमारीच्या सौन्दर्याने राजस्थानांत लाखो राजपुतांच्या फौजा जमा केल्या व तिच्या सौन्दर्यपिपासु राजपुत्रांनी पारस्परिक लढायांत रक्ताचे पूर वाहवन राजस्थानच्या भूमीस सदाचें कलंकित करून ठेवलें. परंतु इतक्यानेही या शोकपूर्ण नाटकाचा अंत झाला नाही. स्वदेशाचें रक्षण करण्याच्या हेतूने राणा भीमसिंहाने कृष्णाकुमारीस विषप्राशन करविलें. तथापि अखेरीस पेंढाऱ्यांचा सरदार अमीरखान याने मेवाडची लूट करावयाची ती केलीच व अशा तऱ्हेने या नाटकाचा अंत झाला. कृष्णकुमारीच्या वधास राजपूत राजपुत्रांची सौन्दर्यपिपासा, राणा भीमसिंहाची दुर्बलता अमीरखानाची दुष्ट बुद्धि जशी कारण झाली तद्वतच मेवाडचा वकील अजितसिंह याचें देशद्रोही कारस्थानही कारणीभूत झालें. कृष्णेच्या भयंकर वधाने तिच्या मातेने हाय खाल्ली व तीही लवकरच मरण पावली.

८. संग्रामसिंहाची भविष्यवाणी

ह्या सर्व प्रकरणानंतर चारच दिवसांनी होळकराच्या दरबारीं असलेला मेवाडचा वकील संग्रामसिंह उदयपुरास परत आला. संग्रामसिंह मोठा शूर पुरुष होता. त्यास आपल्या राण्याच्या क्रोधाची अथवा शत्रूच्या तरवारीची कधीच भीति वाटली नाही. स्पष्टवक्तेपणा हाच त्याचा प्रधान गुण होता. शत्रु व मित्र दोघांच्याही तोंडावर तो सारखाच निर्भीडपणें बोलत असे. शहरांत आल्यावर कृष्णेची वार्ता समजांच तो एकदम राजवाड्यांत शिरला. भीमसिंहाजवळ कुलाधम अजितसिंह बसलाच होता. त्या दोघांसही पाहून संग्राम क्रोधाने जळूं लागला. तो म्हणाला, "आमच्या परंपरेंत हा कलंक इतका

घाणेरडा आहे की, त्यामुळे कोणाही शिसोदियास यापुढे आपलें मस्तक वर काढतां येणार नाही. आमच्या वंशाचा अंत जवळ येत चालला आहे. बाप्पा रावळच्या पवित्र कुलाचा नाश होणार ! आमच्या नाशाची घंटा परमेश्वराने वाजविलेली दिसते." संग्राम शूर असला तरी तो मर्त्य होता. त्याचा मर्त्य देह लौकरच या भूमीस सोडून गेला. पण त्याची भविष्यवाणी खरी ठरली. यानंतर कोणाही मेवाडच्या राजपुरुषाचें मस्तक उन्नत झालें नाही.

९. अत्याचारी परंपरा

कृष्णाकुमारीच्या वधानंतर अमीरखानाने भीमसिंहास नऊ लक्ष रुपये खंडणी मागितली; पण नऊ लक्ष रुपये तरी राणा देणार कोठून ? उदयपुरास येणारे सर्व रस्ते रोखून अमीरने आपल्या जमशीद नांवाच्या सहकाऱ्यासह शहरांत प्रवेश केला. महालांत जाऊन भीमसिंहाची त्याने नानाप्रकारें मानखंडना केली. त्याच्या रोहिल्यांनी व पठाणांनी शहरवासीयांवर अनन्वित अत्याचार केले. एकाही सभ्य स्त्रीस घराबाहेर पाऊल टाकणें अशक्य होतें. एकही सभ्य राजपूत डोक्यावर पगडी घालून रस्त्याने भटकूं शकत नव्हता. 'छिद्रेष्वनर्था बहुलीभवंति' हा प्रकृतीचा नियमच आहे. ह्यानंतर १८१० सालीं बापूराव शिंद्याची मेवाडच्या कारभारावर नेमणूक झाली. १८१० ते १८१४ पर्यंत अमीरखान व बापूराव यांनी अवशेष मेवाडची धूळधाण पूर्ण करून टाकली. टॉड म्हणतो, "मेवाडचा झपाट्याने भंग होऊं लागला. सुधारणेचें प्रत्येक चिन्ह नाश पावलें. शेतें ओस पडलीं, शहरें उध्वस्त झालीं. नागरिक वनवासांत निघून गेले सरदारांचा अधःपात झाला आणि राणा व त्याचें कुटुम्ब यांना जीवनोपयोगी वस्तूंचाही अभाव भासूं लागला. बापू शिंद्याने खंडणी वसूल करण्याच्या निमित्ताने मेवाडचें वाळवंट बनविलें. शेंकडो सरदार, व्यापारी व शेतकरी यांना कैद करून त्यांच्या हातापायांत बेड्या ठोकल्या व त्यांना अजमीरच्या अंधकारमय कारागृहांत डांबून टाकलें. त्यांचेपैकी कित्येक तेथेच मरण पावले व उरलेसुरले इंग्रजांबरोबर तह झाल्यानंतर मुक्त करण्यांत आले."

ह्या ठिकाणीं मेवाडच्या इतिहासाची व त्याबरोबरच राजस्थानच्या तेजस्वितेचीही जवळ जवळ समाप्ति झाली असें म्हणण्यास हरकत नाही. ह्यानंतर आता फक्त एकच गोष्ट वर्णन करण्याची राहिली आहे. ती

म्हणजे एक सहस्त्रकाहून अधिक काळ स्वातंत्र्य उपभोगिलेल्या या राष्ट्राने गुलामीची शृंखला पायांत कशी अडकवून घेतली ही होय. हाच अखेरचा इतिहास पुढील प्रकरणांत निवेदन करावयाचा आहे.

प्रकरण तेरावें

१. भग्न मेवाड

महाराणा भीमसिंह इ. स. १७७८ सालीं गादीवर बसला आणि सन १८१८ मध्ये पेशवाईबरोबरच एक सहस्त्रकाहून अधिक काळपर्यंत टिकलेल्या मेवाडच्या स्वातंत्र्याचाही कायमचा नाश झाला. ह्या चाळीस वर्षांची भीमसिहाची कारकीर्द अत्यंत करुणापूर्ण झाली. आपत्तीचा एक असा प्रकार नाही व अध:पाताचा असा एक नमुना नाही की, जो त्या दुर्दैवी राण्याने अनुभवला नसेल. चाळीस वर्षांच्या अनन्यसामान्य आपत्तींनी मेवाड अगदी भग्न भग्न होऊन गेला होता. राजसत्ता नांवापुरतीच उरली होती. राजपुतांचें इतकें नैतिक पतन झालें होतें की, त्यांना पापपुण्याची बिलकुल चाड उरली नव्हती. जंगली जातींबरोबर संगनमत करून आपल्याच देशबांधवांची लूटमार करण्याचा उद्योग त्यांनी आरंभिला होता. बाबर, अकबर व औरंगजेब यांसारख्या धुरंधर बादशाहांशीं शतकानुशतकें टकरा घेणाऱ्या शिसोदिया वंशांतील या राजाच्या तबेल्यांत पन्नासपेक्षा अधिक घोडा शिल्लक नव्हता. अशा अवस्थेंत स्वत:चा कमकुवतपणा व नादानपणा ओळखून, आपल्या अक्कलहुशारीने व तरवारीने शांतता व सुव्यवस्था राखण्याचें अभिवचन देणाऱ्या इंग्रजी आधिपत्याचें त्याने मुक्त हृदयाने स्वागत केलें असल्यास नवल काय ?

२. पेशवाईच्या नाशाचा परिणाम

वास्तविक त्या काळांतील भारतीय सत्तांमध्ये पेशव्यांचीच सत्ता सर्वांत प्रबळ समजण्यांत येत असे. इतर अनेक लहान मोठे संस्थानिक तिच्याविरुद्ध भांडत असले तरी अन्त:करणांत त्यांना कबूल करावें लागे की, पेशवाई हीच आजची सार्वभौम सत्ता होय. ह्या असल्या प्रबलतम सत्तेचाच जेव्हा इंग्रजांनी नाश केला तेव्हा साहजिकच त्याचा सर्व हिंदु-

स्थानभर विजेचा धक्का बसावा तसा परिणाम झाला. पेशवाईच्या नाशाचा तत्कालीन हिंदु संस्थानिकांवर जादूसारखा परिणाम होऊन प्रत्येकाने कोणताही प्रतिकार न करतां इंग्रजांचें सार्वभौमत्व मान्य केलें. "यात्रेकरूच्या समाधानाने पेशव्यांनी पत्करलेल्या देशनिर्वासनाच्या देखाव्याचा नैतिक परिणाम वीस हजार सांगिनींपेक्षाही राजपुतांवर अधिक झाला," असें याबाबत क० टॉडने वर्णन केलें आहे.

३. इंग्रज शिष्टमंडळाचें आगमन.

मराठ्यांचा नाश झालेला पाहून भीमसिंहाने इंग्रजांचें आधिपत्य स्वीकारण्याचें कबूल केलें; व त्याप्रमाणें आपला वकील दिल्लीस इंग्रजांकडे पाठविला. त्यानंतर तहाच्या वगैरे अटी ठरविण्यासाठी इंग्रज वकिलांचें शिष्टमंडळ मेवाडकडे जावयास निघालें. वाटेंतील मेवाडभूमीचें त्यांपैकी एकाने वर्णन केलें आहे. "सर्व कांही उजाड होतें. मनुष्याच्या पायवाटा-सुद्धा बुजून गेल्या होत्या. कांटेरी बाभळी व राक्षसोपम उंच बांबू यांनी राजरस्ते भरून गेले होते व त्यांच्या आश्रयाने वाघ व आस्वलें राहूं लागलीं होतीं. पूर्वी भरभराटलेली भूमि आज नाशच नाश दर्शवीत होती. वास्तविक भीलवाडा म्हणजे राजपुतान्याचें व्यापारी केंद्र! दहा वर्षांपूर्वी सहा हजार कुटुम्बें तेथे नांदत होतीं. पण आज! आज तेथे मनुष्यवस्ती असल्याचेंही चिन्ह दिसत नव्हतें. त्यांतील सडकांवर सर्व कांही शांत होतें. एकही जिवन्त प्राणी दिसत नव्हता. नाही म्हणावयास एका देवळांत दडून बसलेला एकटाच एक कुत्रा कधी न दिसणारीं माणसें दृष्टीस पडल्या-बरोबर तिरपीट उडून तेथून बाहेर पडला व पळाला."

शिष्टमंडळांत सरचार्लस मेटकाफ, कॅप्टन वॉग, ले. कॅरी, डॉ. डंकन व कर्नल टॉड ही प्रमुख मंडळी असून त्यांच्याबरोबर शंभर शंभर पायदळाच्या दोन तुकड्या व पन्नास घोडेस्वारांचें एक पथक होतें. राणा भीमसिंहाने शिष्टमंडळास दुपारीं भेटीस बोलावलें. जुलम, लूट, मारामार, जाळपोळ, लढाया यांना कंटाळलेल्या व शांततेस हपापलेल्या मेवाडच्या प्रजेने नवसम्राटाच्या ह्या प्रतिनिधींचें मोठ्या सोत्कंठ व सकुतूहल दृष्टीने स्वागत केलें. त्यांना पाहण्याकरितां हजारो लोकांचा समु-दाय नीटनेटका पोषाख करून राजपथांत उभा होता आणि हा अदृष्टपूर्व देखावा पहात होता. जसजसें शिष्टमंडळ पुढे पुढे जात होतें तसतसा

"जय ! जय !! फिरंगीका राजा !!!" अशा गर्जना प्रत्येकाच्या मुखांतून निघत होत्या. मेवाडांतील ज्या चारणांनी आपली वाक्शक्ति आजपर्यंत आपल्या देशांतील तरुणांच्या ठिकाणीं स्वातंत्र्याप्रीत्यर्थ लढण्यासाठी व प्रसंगीं प्राणत्यागही करण्यासाठी स्फूर्ति उत्पन्न करण्याकडे खर्च केली होती त्याच चारणांनी आता काळ बदलल्याबरोबर गुलामीचे पोवाडे गाऊन नवीन दिसणाऱ्या आंग्लशक्तीचा उदोउदोकार प्रारंभिला होता.

दरबार भरला; दोन्ही पक्षांतील लोकांचीं दरबारी थाटाचीं गौरवपर भाषणें होऊन नजराणे वगैरे झाल्यावर शिष्टमंडळास दरबारांतून बिदा करण्यांत आलें. पुढे राण्याने स्वतः शि ष्टमंडळाच्या बिऱ्हाडीं जाऊन परत भेट दिली. अशा प्रकारें भेटी व परतभेटी, देणग्या व परत देणग्या यांचे शिष्टाचार कित्येक आठवडे चालून व खुलीं संभाषणें होऊन तहाचीं कलमें तयार करण्यांत आलीं; व त्यावर उभयपक्षांच्या सह्या करण्यांत आल्या.

४. तहाचीं कलमें

(१) आपल्या दोन्ही सरकारांत सख्य व एकोपा पिढ्यानुपिढ्या नांदेल व एकाचे शत्रु व मित्र तेच दुसऱ्याचे शत्रुमित्र बनतील. (२) उदयपूरचें राज्य व त्याचा अधिकारी या उभयतांचें संरक्षण करण्यास ब्रिटिश सरकार करारानें बद्ध आहे. (३) उदयपूरचा महाराणा ब्रिटिश सरकारचें सार्वभौमत्व मान्य करून त्याच्याशीं सदैव मांडलिकत्वाच्या नात्याने सहकार्य करील आणि इतर सरदारांशीं अथवा राष्ट्रांशीं कोणताही संबंध ठेवणार नाही. (४) ब्रिटिश सरकारची पूर्व संमति घेतल्यावाचून दुसऱ्या कोणाही सरदाराबरोबर अथवा राष्ट्राबरोबर उदयपूरचा महाराणा तहाची वाटाघाट करणार नाही. परंतु मित्र व नातेवाईक यांच्याबरोबरचा नित्याचा पत्रव्यवहार चालू ठेवण्यास त्यास हरकत नाही. (५) उदयपूरचा महाराणा कोणावरही हल्ला करणार नाही आणि जर योगायोगाने त्याचें कोणाबरोबर भांडण उभें राहिलें तर त्यावेळीं ब्रिटिश सरकारच मध्यस्थी करील व त्यांचा निकाल त्यास मान्य करावा लागेल. (६) यापुढे पांच वर्षेपर्यंत उदयपूरच्या साक्षात मुलखांतून येणाऱ्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश प्रतिवर्षी खंडणीच्या रूपाने ब्रिटिश सरकारला देण्यांत येईल. पांच वर्षांनंतर ही खंडणी नित्याकरितां तीन अष्टमांश हिश्याइतकी राहील. खंडणीच्या कारणाने महाराणा कोणत्याही सत्तेशीं संबंध ठेवणार नाही; आणि जर

कोणी अशा प्रकारचे हक्क पुढे आणील तर ब्रिटिश सरकार त्यांना उत्तर देण्यास कराराने बद्ध आहे. (७) उदयपूरच्या प्रदेशाचा कांही भाग इतरांनी अयोग्य साधनांनी आपल्या ताब्यांत घेतला आहे असें महाराण्याचें म्हणणें आहे व ते प्रदेश आपणास मिळवून द्यावेत असें त्याचें मागणें आहे; परंतु ब्रिटिश सरकार निश्चित माहितीच्या अभावीं आपणास या बाबतींत बांधून घेऊं इच्छीत नाही. तथापि ब्रिटिश सरकार उदयपूर संस्थानाच्या उत्कर्षाचा प्रश्न नेहमी दृष्टीसमोर ठेवील व योग्य दिसेल त्या प्रसंगीं प्रत्येक प्रकरणाची नीट माहिती घेऊन हा उद्देश पूर्ण करण्याचा शक्य तो प्रयत्न करील. (८) ब्रिटिश सरकार मागणी करील त्यावेळीं उदयपूर संस्थानाच्या ऐपतीप्रमाणें सैन्याची सिद्धता करण्यांत येईल. (९) स्वतःच्या प्रदेशांत उदयपूरचा महाराणा अनियंत्रित सत्ताधारी आहे व त्याच्या प्रदेशांत ब्रिटिशांची हुकमत चालू करण्यांत येणार नाही.

५. सोन्याचा मुलामा चढविलेली दास्यशृंखला

अशा तऱ्हेने इंग्रजी संरक्षणाचा खोडा पायांत अडकवून घेतल्यानंतर अंतःस्थ शांतता निर्माण करण्याच्या कामीं शिष्टमंडळाने त्यास पूर्णपणे मदत केली. दंगेधोपे व लढाया यांना कंटाळलेली प्रजा शांतता निर्माण करण्यासाठी एका पायावर तयार होती. मराठी सत्तेसही रसातलास पोचविणारी इंग्रजी सत्ता राजपुतांना विशेष भीतिप्रद वाटून तिच्या दराऱ्यानेच त्यांनी एकदम शांतता धारण केली. अनिर्बंध व स्वच्छंदी प्रवृत्तीच्या लुटारू व जंगली भिल्ल इत्यादि लोकांवरसुद्धा आंग्लशासनाचा यक्षिणीच्या कांडीसारखा परिणाम झाला. गोऱ्या लोकांच्या जवळ कांही विलक्षण जादू आहे व तीमुळे खिशांत भरून ठेवलेल्या कागदांच्या तुकड्यांपासून लढाऊ व कधीही पराभव न पावणारीं अशी हजारो माणसें त्यांना तयार करतां येतात अशा समजुती त्यांच्यांत पसरल्या व त्यामुळे त्यांनीही आपला आनुवंशिक लूटमारीचा धंदा सोडून शेती व व्यापार यांसारखा व्यवसाय पत्करला. व्यापारी, कारखानदार व सावकार यांना संरक्षणाचीं आश्वासनें देणारे जाहीरनामे सर्व वाटण्यांत येऊन हिंदुस्थानांतल्या सर्व लोकांना व्यापार उद्योगधंद्यासाठी मेवाडांत पाचारण करण्यांत आलें.

शिष्टमंडळाने सरदारांच्यावर वचक आणून त्यांना राण्याचा अधिकार मान्य करण्यास भाग पाडलें. त्यांच्या जहागिरी व इस्टेटींच्या

भांडणांची चौकशी करून त्यांचा बंदोबस्त करून दिला. त्यामुळे थोड्याच दिवसांत राण्याचा दरबार पूर्वीप्रमाणेंच भरगच्च दिसूं लागला.

यानंतरचें कठीण काम म्हणजे देश सोडून गेलेल्या प्रजेस स्वदेशीं परत बोलावणें व तिला आश्वासनपूर्वक शेती इत्यादि उद्योगास लावणें हें होय. त्याकरितांही जाहीरनामे लावून, परत येणाऱ्या लोकांना घरें, जमिनी वगैरे सवलतीने देऊन मोठा प्रयत्न करण्यांत आला. बाजारपेठा, पेढ्या व सावकारी दुकानें उघडण्यांत आलीं. उत्सव समारंभ सुरू करण्यांत आले. चोऱ्या, दंगेधोपे करणारांना कडक शासन करण्यांत आलें. अशा तऱ्हेने इंग्रजांच्या मदतीने मेवाडची नष्ट झालेली शांतता परत मिळविण्यांत आली. ंततेबरोबर प्रजा परत आली, प्रजेबरोबर व्यापार, व्यापारामागून अंशतः कला, उद्योगधंदे व समृद्धि सर्व कांही परत आलें. पण एकदा नष्ट झालेलें स्वातंत्र्य कधी परत येईल काय ? परकी सत्तेवर कितीही सोन्याचा मुलामा चढविला तरी त्या सुवर्णाचा दुसरा कोणताही अलंकार न बनतां त्याची फक्त शृंखलाच तयार होत असते. ही दुःस्थिति पत्करण्यापेक्षा राणा प्रतापसिंहाने पत्करलेला मार्ग भीमसिंहास मोकळा नव्हता काय? त्याच्या हंमीर, प्रताप व राजसिंहासारख्या पूर्वजांनी असल्या आपत्प्रसंगीं घरदारांचा व सर्वस्वाचा त्याग करून वर्षानुवर्षें वनवासांतील कंटकाकीर्ण जीवन घालविण्याचें शिक्षण आपल्या प्रजेस दिलें नव्हतें काय ? एकदम अग्निस्फुलिंगाप्रमाणें चमकून उठून व चिर-कीर्तीचा लाभ संपादन क न इहलोकचा त्याग व स्वर्गांत अढळपद त्यास संपादन करता आलें नसतें काय ? पण असलें दिव्य करण्यास मोठें उदार हृदय, अगाध साहस व अविनाशी स्वातंत्र्यप्रेम हवें असतें. भीमसिंहाच्या ठिकाणीं ह्या सर्वच गोष्टींचा अभाव होता. कोणतेंही काम हातीं घेऊन पार पाडण्याची चिकाटी त्याच्या ठिकाणीं नव्हती. तो परमावधीचा स्त्रैण असल्याने स्त्रियांचें त्याच्यावर फार वजन होतें. चाळीस वर्षांच्या अव्यवच्छिन्न आपत्तींनी हा असला विलासी, दुबळा, कर्तृत्वशून्य व बेगडी राणा जर्जर होऊन शांतीचा व सुखाचा भुकेला झाला असल्यास व त्यासाठी परक्यांच्या गोठ्यांतला शृंगारलेला बैल होऊन बसण्याचें त्याने पत्करलें असल्यास त्यांत कांहीच आश्चर्य करण्याचें कारण नाही.

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

विभाग दुसरा

अंबर, हाडावती, मारवाड, बिकानेर व जेसलमीर

प्रकरण पहिलें

अंबर उर्फ जयपूर

मेवाडचे महाराणे आपणास श्रीरामचंद्राच्या एका पुत्राचे—लवाचे—वंशज मानतात. तसे अंबर उर्फ जयपूरचे राजे आपणास त्याच श्रीरामचंद्राच्या द्वितीय पुत्राचे म्हणजे कुशाचे वंशज म्हणवितात. एकाच पवित्र कुशींत उत्पन्न झालेले हे दोन वंश आहेत असा निखिल राजपुतांचा विश्वास आहे. स्वातंत्र्य, शील व पावित्र्य यांच्या संरक्षणासाठी, जगानें तोंडांत बोट घालावें असा महान स्वार्थत्याग एक नव्हे, दोन नव्हे, सतत हजार वर्षेपर्यंत मेवाडने करून दाखविला व इतिहासांत परम आदराचें स्थान संपादन केलें. म्हणून त्याच उच्च भावनेने प्रेरित होऊन जेव्हा एखादा राजपूत रामचंद्राच्या अंबर येथील वंशजांचा इतिहास अवलोकन करूं लागतो तेव्हा मात्र त्याची पूर्ण निराशा होते. राजपुतांच्या इतिहासांत स्वातंत्र्य, शील व पावित्र्य यांची सर्वांत प्रथम स्वार्थाच्या आगींत राखरांगोळी करणारें राष्ट्र म्हणून अंबरचें नांव निरंतरचें कलंकित झालेलें आहे.

वरील वर्णनाचा अर्थ, अंबरच्या इतिहासांत आपणास पराक्रमी, चारित्र्यसंपन्न, कर्तबगार, विद्याप्रेमी व कलाप्रिय राजे निर्माण झालेले दिसणारच नाहीत, असा नाही. सामान्य इतिहासाच्या वाचकासही महाराजा मानसिंह, मिर्झा राजा जयसिंह, व महाराजा सवाई जयसिंह यांचीं नांवें विदित असतात. पण दुर्भाग्यविलसिताचा चमत्कारिक योगायोग असा आहे की, ह्या विख्यात पुरुषांचीं नांवें तितक्याच किंबहुना त्यांहून विख्यात असलेल्या अशा कांही पुरुषांच्या नांवांशीं निगडित झालेलीं आहेत व तींही अशा रीतीने की, एकाच्या तुलनेंत दुसऱ्याचा गौरव हीन दिसूं लागावा. मेवाड–स्वातंत्र्याचलावरील देदीप्यमान भास्कर म्हणून महाराणा प्रतापसिंहाचें नांव ऐकतांच आपलें मस्तक आदराने नम्र होतें; तर त्याच भास्कराचा ग्रास करूं इच्छिणारा राहू व मोगल

सम्राटाच्या सेवेंत आपलें जीवित, वित्त व भगिनीच्या रूपाने पावित्र्य अर्पण करणारा कुलांगार राष्ट्रभंजक म्हणून मानसिंहाचें नांव निघतांच तिरस्काराने भ्रुकुटी वक्र होते. महाराष्ट्रस्वातंत्र्याचा आद्य संस्थापक म्हणून छत्रपति शिवाजी महाराजांच्या नांवाचा आपण जयघोष करतों; तर त्याच भोसले कुलावतंसास पकडून आणण्यासाठी औरंगजेबासारख्या जुलमी व हिंदूंच्या परम द्वेष्ट्या सम्राटाचा सेनानी बनून मिर्झा राजा जयसिंह दक्षिणेवर स्वारी करतांना दिसतो, तेव्हा त्याच्या संबंधींचा आदर नष्ट होतो. शिवाजीने स्थापन केलेल्या स्वराज्याचा साम्राज्यवृक्ष बनविण्याच्या आकांक्षापूर्तीसाठी अद्भुत पराक्रम गाजविणारा अखंड विजयी सेनानी म्हणून श्रीमंत पेशवे थोरले बाजीराव आपल्या दृष्टीसमोर उभे राहतात; तर त्याच्याच हिंदवी साम्राज्यविस्तारास प्रतिरोध करण्यासाठी मोगल सम्राटाचा प्रतिनिधि म्हणून महाराजा सवाई जयसिंहाची योजना झालेली आढळून येते. असा हा अंबरच्या गादीवरील पराक्रमी पुरुषांचा योगायोग आहे.

श्रीरामचंद्राच्या कुशनामक पुत्राच्या वंशांत राजा नळ उत्पन्न झाला व त्याच्या वंशांतील **धोलराय** नामक एका पुरुषाने इसवी सनाच्या १०व्या शतकांत राजस्थानांत येऊन धुंडारच्या गादीची प्रस्थापना केली. ह्याच लहानशा धुंडारच्या राज्याचा विस्तार म्हणजे हल्लीचें जयपूरचें राज्य होय. ह्या धोलरायचा राजस्थानांतील मूळ रहिवाशी अशा मीनानामक जातीच्या लोकांशीं बराच संघर्ष आला व त्यांशीं झालेल्या अशाच एका लढाईंत तो मारला गेला आणि धुन्डारचें राज्य पुनरपि मीनांनी जिंकून घेतलें. धोलराय मारला गेला त्या वेळीं त्याची राणी गरोदर होती. तीस पुढे **कंकल** नांवाचा पुत्र झाला. ह्या कंकलने तारुण्यांत आल्यावर आपल्या वीरमातेच्या प्रोत्साहनावरून मीनांचा पराजय करून पुनः धुंडारचें राज्य जिंकून घेतलें. पुढे बराच काळपर्यंत कंकलच्या वंशजांचा ह्या मीनांच्याबरोबर संघर्ष चालूच होता. त्याचा पुत्र **मैदुलराय** याने अशाच एका मीना सरदारास मारून अंबर शहर जिंकलें व तेथे आपली राजधानी करून थोडासा राज्यविस्तारही केला.

दहाव्या शतकापासून बाराव्या शतकाच्या अंतापर्यंत धोलरायच्या कुलांत जितके पुरुष उत्पन्न झाले त्यांत विशेष नांव घेण्यासारखा असा

कोणीच झाला नाही. त्यांच्या कुळांतील ज्या राजपुरुषाचें नांव राजपूत इतिहासांत प्रथम चमकतें तो म्हणजे **पूजन** हा होय. 'पृथ्वीराजरासो'मध्ये चांदकवीने त्याचें नांव अमर करून ठेवलें आहे. पृथ्वीराज चव्हाणाने जयचंद राठोडाच्या भर स्वयंवरमंडपांतून संयोगितेचें हरण केलें त्या वेळीं त्याच्याबरोबर असलेल्या निवडक, विश्वासू व पराक्रमी पुरुषांत पूजनची गणना करण्यांत येते. पूजन, त्याचा पुत्र मालशे, व त्याचे पांचही भाऊ पृथ्वीराजाच्या या अद्‌भुत साहसांत सहभागी होते. पृथ्वीराजाचा पुढे जयचंदाच्या सेनेने पाठलाग केला असतां जी लढाई झाली तींत अद्‌भुत पराक्रम प्रकट करून पूजन धारातीर्थीं पतन पावला. पूजनने पृथ्वीराजाचें मांडिलकत्व मान्य केलें होतें व गोंडवनांतील महोबाचें राज्य जिंकण्याची कामगिरीही त्याने त्याच नात्याने पार पाडली होती. जयचंदाच्या सेनेबरोबर झालेल्या लढाईंत पूजन, त्याचे बंधु व पुत्र मालशे यांनी गाजविलेल्या पराक्रमाचें चांदभाट वर्णन करतो--"गोविंद मृत्युमुखीं पडल्यावर गर्जना करीत पूजन रणरंगांत उतरला. दोन्ही हातांनी खड्‌ग चालवून त्याने शत्रूंचीं डोकीं कापलीं. तेव्हा चारशें शत्रू एकदम त्याच्या अंगावर धावले. भाले व बरछ्या यांचे प्रहार सुरू झाले. शत्रूंचीं मस्तकें चेंडूसारखीं जमिनीवर पडूं लागलीं व रक्ताचे पाट वाहूं लागले. पूजनने जयचंदाच्या सेनेचा मुसलमान सरदार इतिमादखान याजवरच एकदम चाल केली. पूजनच्या खड्‌गाने इतिमादचें मस्तक जमिनीवर पडलें, पण त्याच वेळीं इतिमादचा भाला पूजनच्या छातींतून आरपार निघून गेला होता. यमराजाने पूजनला आलिंगन दिलें त्या वेळींही पूजनच्या दृष्टीं-समोर आपला मुलगा शत्रूंचीं डोकीं कापीत आहे हेंच दृश्य दिसत होतें. देह सोडीत असतांना त्याच्या आत्म्यास संतोष झाला. मालशीच्या अंगावर सात जखमा लागलेल्या होत्या व त्याच्या घोड्याचें अंगही जखमांनी भरून निघालें होतें. (अशा रीतीने) पूजनच्या ह्या पुत्रानेही अद्‌भुत पराक्रम गाजविला."

पूजनच्या ह्या वीरमृत्यूनंतर धुंडारच्या गादीवर त्याचा हा पराक्रमी पुत्र **मालशी** बसला. मालशीच्या नंतर म्हणजे तेराव्या शतका-पासून तों बाबराच्या स्वारीपर्यंत म्हणजे सोळाव्या शतकापर्यंत सुमारें

बारातेरा राजे धुंडारच्या गादीवर आले. ह्या काळांत दिल्लीचें हिंदुराज्य नष्ट होऊन मुसलमानी अंमल स्थिर झाला होता व त्याचा विस्तारही बराच झाला होता. परंतु धुंडारच्या राजांनी या सुमारें ३०० वर्षांच्या काळांत आपल्या लहानशा राज्याचें स्वातंत्र्य कायम राखलें. यद्यपि त्यांनी व्यापक राजकारणांत फारसा भाग घेतला नाही अथवा राज्य-विस्ताराच्याही भानगडींत ते पडले नाहीत तथापि होतें तेवढें सांभाळून ठेवण्याच्या कामीं ते निःसंशय यशस्वी झाले. त्यांच्यापैकी पृथ्वीराज नामक एका अंबराधिपतीच्या पौत्रांनी अमृतसरच्या जवळचा पंजाबांतील प्रदेश जिंकून तेथे शेखावतीच्या स्वतंत्र संयुक्त राज्याची स्थापना केली. हें शेखावतीचें संयुक्त राज्य म्हणजे ह्या एकाच वंशांतील पुरुषांनी स्थापन केलेल्या अनेक लहान लहान राज्यांचा संघ होता. राज्यशास्त्राच्या दृष्टीने हिंदुस्थानांतील शासनसंस्थांचा अभ्यास करणाऱ्याच्या दृष्टीने शेखावतीचें हे संयुक्त राज्य बरेंच महत्त्वाचें आहे.

बाबराच्या स्वारीच्या वेळीं अंबरच्या सिंहासनावर धोलरायच्या वंशांतील **बहारमल्ल** नामक पुरुष आरूढ होता. इतर राजपूत राजांच्या अगोदर या बहारमल्लानेच बाबराचें आधिपत्य मान्य केलें होतें व हुमायूनने तर त्यास पांच हजारांची मनसबदारी अर्पण केली होती. बहार-मल्लापासून पुढे झालेल्या अंबरच्या वंशजांनी मोगल सम्राटांच्या सेवेंतच आपलें कर्तृत्व व पराक्रम अर्पण केला. बहारमल्लाचा पुत्र राजा **भगवानदास** याने अकबराची बरीच मैत्री संपादन केली व त्या धूर्त बादशहानेही हिंदु राजांना मांडलिक बनवून पुनः त्यांशीं मित्रत्व राख-ण्याची एकही संधि वाया जाऊं दिली नाही. अकबराने भगवानदासावर कोणतें दडपण आणलें होतें हें सांगणें कठीण आहे. परंतु एवढें मात्र खरें की, मुसलमान सम्राटास आपली मुलगी अर्पण करणारा पहिला पतित राजपूत राजा म्हणून भगवानदासाचें नांव राजपुतांच्या इतिहासांत कायमचें कलंकित झालेलें आहे.

भगवानदासाच्या नंतर त्याचा पुतण्या **मानसिंह** अंबरच्या गादीवर बसला. मोगलसाम्राज्यविस्ताराच्या कामीं अकबरास मानसिंहाच्या कर्तृत्वाचा व पराक्रमाचा अतिशय उपयोग झाला. वीस हजार राजपुतांची

कडवी सेना बरोबर घेऊन तो अकबराच्या सेवेस सज्ज असे. अकबराच्या अव्वल दर्जाच्या सेनानींपैकी तो एक होता. पश्चिमेस काबूलकंदाहारपासून तों पूर्वेस आसामपर्यंतचा मुलूख जिंकून मोगलसाम्राज्यास जोडण्याचें श्रेय मानसिंहाच्या तरवारीनेच संपादन केलें. कठिणांतल्या कठीण कामगिरीवर त्याची नेमणूक झाली पण प्रत्येक ठिकाणीं त्याची समशेर विजयीच राहिली. फक्त महाराणा प्रतापसिंहाच्या विरुद्ध मात्र तिची धार कशी बोथट पडली व ह्या राष्ट्रद्रोही व धर्मद्रोही पुरुषास शासन करण्यासाठी प्रतापचें रक्त कसें सळसळत असे ह्याचा वृत्तांत मागे मेवाडच्या इतिहासांत आपण पाहिलाच आहे. बंगाल, बिहार, दक्षिण व काबूल इतक्या सुभ्यांवर प्रधान अधिकारी म्हणून मानसिंहाने काम केलें. पण एवढा महत्पदाचा अधिकार, एवढी बलाढ्य सेना व इतकें उत्कृष्ट सेनासंचालन-कौशल्य त्याच्याजवळ असतांना त्यांचा उपयोग तो स्वतःचा राज्यविस्तार साधून घेण्याच्या कामीं करूं शकला नाही. अकबराच्या मृत्यूनंतर खुश्रूस गादीवर बसवून मोगल साम्राज्याचीं सर्व सूत्रें स्वतःच्या हातीं घेण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तो फसून अखेरीस जहांगीरच गादीवर आला.

मानसिंहाच्या नंतर त्याचा पुत्र **भाऊसिंह** अंबरच्या सिंहासनावर आरूढ झाला. तोही मोगल बादशहाचा पंचहजारी मनसबदार होता. मदिरासक्तीच्या व्यसनाने तो लवकरच मरण पावला. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र **महासिंह** गादीवर बसला. हाही बापाप्रमाणेंच मदिराप्रिय होता. ह्या दोन कर्तृत्वशून्य राजांच्या कारकीर्दींत मोगल दरबारांतलें अंबरचें महत्त्व बरेंच कमी झालें होतें. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र जयसिंह गादीवर बसला. ह्यासच **मिर्झा राजा जयसिंह** ह्या नांवाने इतिहास ओळखतो. हा मिर्झा राजा मोठा चारित्र्यसंपन्न व कर्तबगार पुरुष होता व औरंगजेबासारख्या हिंदूंच्या कट्टर द्वेष्ट्या बादशहाच्या दरबारांतही त्याने आपल्या कर्तृत्वाने बरेंच वजन व मान संपादन केला होता. औरंगजेबाने त्यास सहा हजारांचा मनसबदार केलें होतें. छत्रपति शिवाजीस पकडून आणण्याच्या कामीं शाहिस्तेखान, शहाजादा मुअज्जम इ० मोठमोठे सरदारही जेव्हा अपयश घेऊन परत आले तेव्हा त्याने जयसिंहावर ती कामगिरी सोंपविली. त्याच्या व शिवा-

जीमहाराजांच्या झालेल्या मुलाखतीचा वृत्तांत मराठा इतिहासाच्या वाचकांना विदितच आहे. त्याच्या मनावर ज्याप्रमाणें शिवाजीने आपल्या स्वातंत्र्याकांक्षेची व स्वधर्मप्रीतीची छाप पाडली, त्याचप्रमाणें त्यानेही स्वतःची स्वधर्मप्रीति प्रकट करून शिवाजीच्या स्वातंत्र्याकांक्षेशीं सहानुभूति व्यक्त करून तत्कालीन राजकारणाची व परिस्थितीची त्यास योग्य जाणीव करून देऊन त्याचा विश्वास संपादन केला व ह्या विश्वासावरच शिवाजी औरंगजेबाच्या भेटीस जाण्यास तयार झाला. शिवाजीच्या उत्तरेच्या प्रवासांत जयसिंहाने त्याची सर्वत्र एखाद्या शहाजाद्यासारखी बरदास्त ठेवविली व आपलें वचन पाळण्याचा प्रयत्न केला. पण अखेरीस बादशहाने विश्वासघात केलाच. शिवाजीची औरंगजेबाच्या कैदेंतून सुटका होण्याच्या कामीं जयसिंहाचा पुत्र रामसिंह यानेच मदत केली असा मुसलमान इतिहासकारांचा आरोप आहे.

मिर्झाराजा जयसिंहाच्या पदरीं बावीस हजार राजपूत घोडेस्वार असत व बावीस राजपूत सरदारांचा तो अधिपति असे. राजपूत इतिहासलेखकांनी वर्णन केलें आहे की मिर्झा राजा जयसिंह जेंव्हा आपल्या दरबारांत बसत असे तेव्हा काचेचीं दोन भिंगें तो आपल्या हातीं धारण करी. एकास तो दिल्ली म्हणत असे व दुसऱ्यास सातारा; आणि म्हणत असे— " दिल्लीचें नशीब माझ्या हातीं आहे व मी तें सहज चूर्ण करून टाकूं शकतों." यावरून त्याच्या आंतरिक आकांक्षांची कल्पना येते. पण औरंगजेबही त्यास पूर्णपणें ओळखून होता. इकडे आग्र्यास शिवाजीस कैद करून त्याने तिकडे दक्षिणेहून परत येत असतां जयसिंहासही विषप्रयोग करून ार मारविलें असें राजपूत इतिहासलेखकांचें म्हणणें आहे.

मिर्झा राजा जयसिंहाच्या नंतर त्याचा पुत्र **रामसिंह** अंबरच्या गादीवर बसला. हा मेवाडचा महाराणा राजसिंहाचा समकालीन होता. शिवाजीच्या सुटकेबद्दलचा दंश मनांत धरून औरंगजेबाने त्यास फक्त चार हजारांचाच मनसबदार केलें. रामसिंहासही औरंगजेब किती वचकून होता ह्याचा उल्लेख महाराणा राजसिंहाने औरंगजेबास लिहिलेल्या पत्रांत आलाच आहे. 'गरीब हिंदू रयतेवर बसविलेला जिजीया कर रामसिंहाजवळून वसूल करून पहा—' असा ह्या पत्रांत बादशाहास मारलेला टोमणा

वाचकांच्या स्मरणांत असेलच. रामसिंहाच्या नंतर त्याचा पुत्र **बिशनसिंह** गादीवर आला. पण हा कर्तृत्वशून्य असल्याने बादशहाने त्यास फक्त तीन हजारांचीच मनसबदारी दिली. तो लवकरच मरण पावला व त्याच्या मागून दुसरा जयसिंह अंबरचा स्वामी बनला. हाच महाराजा **सवाई जयसिंह** म्हणून मोगल व मराठा इतिहासांतही प्रसिद्ध आहे.

ह्या सवाई जयसिंहाच्या ठिकाणीं पराक्रमापेक्षा धोरण व मुत्सद्दी-पणा हे दोन गुण विशेष उत्कटत्वाने वास करीत. औरंगजेबाच्या मृत्यू-पूर्वी सहा वर्षे तो गादीवर बसला व त्याच्या पुत्रांत, पौत्रांत व प्रपौत्रांत-ही झालेल्या राज्याधिकाराच्या लढाया त्याने पाहिल्या. मोगल बादशा-हांच्या चार पिढ्यांत सतत सवाई जयसिंह म्हणजे दिल्ली दरबारांतलें एक फार बडें प्रस्थ होतें. आपल्या कारस्थानी स्वभावाने व मुत्सद्देगिरीच्या धोरणाने, विशेष लढायांच्या भानगडींत न पडतां व रणांगणांतल्या शौर्याचा प्रभाव न पाडतांही तो त्या काळांतला एक अतिशय वजन-दार व महत्त्वाचा राज्यचालक गणला जात असे. बादशाहीच्या उतरत्या काळाची जाणीव त्यास पूर्णपणें झाली होती. शाही दरबारच्या दुर्बलतेचा व स्वतःच्या वर्चस्वाचा, त्याने आपला राज्यविस्तार साधण्याच्या कामीं भरपूर उपयोग करून घेतला. वेळोवेळीं निरनिराळ्या कामगिऱ्यांचीं निमित्तें करून अंबरच्या लगतचा बराच मोठा प्रदेश बादशाही सनद मिळवून त्याने आपल्या राज्यास जोडला व आपल्या पूर्वजांचें एवढेंसें राज्य त्याने मेवाड व मारवाडपेक्षा मोठें करून सोडलें.

जयपूर शहराची स्थापना त्यानेच केली व अंबरहून आपली राज-धानी तेथे नेली. जयपूरची रचना अगदी आधुनिक नगररचनाशास्त्राच्या धर्तीवर करण्यांत आली आहे असें म्हणतात. त्यांतील महाल, राजवाडे, बगीचे, तलाव व रस्ते आपल्या सौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहेत. विद्या व कला यांचा जयसिंह उपासक होता. प्राचीन विद्यांच्या पुस्तकांचा फार मोठा संग्रह त्याने निरनिराळ्या पंडितांच्या साह्याने निर्माण केला होता. विशेषेंकरून ज्योतिर्विद्येचा तो अतिशय भोक्ता असून तिच्या उत्कर्षासाठी त्याने महनीय प्रयत्न केले. तो स्वतः ज्योतिर्विद्येंतील जाडा पंडित असून पाश्चिमात्य देशांतील नामांकित ज्योतिषी त्याने या देशांत

बोलाविले व दोन्ही जोतिषांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. उज्जैन, बनारस, मथुरा, दिल्ली इ० ठिकाणीं त्याने फारच उत्कृष्ट वेधशाळा बांधल्या.

अंबरच्या सिंहासनावर आरूढ झालेल्या पराक्रमी व कर्तृत्वसंपन्न पुरुषांनी यद्यपि आपलीं आयुष्यें मोगल साम्राज्याच्या सेवेसच अर्पण केलेलीं असलीं, तरी त्यांच्या ठिकाणीं स्वाभिमान, राष्ट्रभक्ति व धर्मप्रेम मुळीच नव्हतें असें समजणें चुकीचें होईल. सवाई जयसिंहाच्या कारकीर्दीचें वर्णन करीत असतांना त्याच्या व त्याच्या पूर्वजांच्या ह्या गुणांचाही येथे उल्लेख करणें अनाठायीं होणार नाही. महाराणा प्रतापसिंह अकबरासारख्या बलाढ्य सम्राटाशीं लढून आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य व राजपूत जातीचा गौरव कायम राखीत होता व इतर राजपूत राजांनी आपापल्या मुली बादशाहास दिल्या असल्या तरी मेवाडाधीशांनी आपलें कुल अकलंकित राखलें होतें ह्या गोष्टीबद्दल मानसिंहासही मोठा अभिमान वाटत असे व त्याचेंही अंतःकरण प्रतापचें यशश्चिंतन करीत असे. परंतु एका भोजनाच्या प्रसंगीं प्रतापने त्याचा जो अपमान व धिक्कार केला त्यामुळे चिडून जाऊन मानसिंह प्रतापवर सुडाच्या भावनेने उलटला असें क० टॉडने वर्णन केलें आहे. मिर्झा राजा जयसिंहाच्या अंतःकरणांतील राष्ट्रप्रेम व धर्मप्रेम यांचा परिचय शिवाजीच्या मुलाखतीच्या प्रसंगानें पूर्वीच वाचकांना झालेला आहे. सवाई जयसिंहानेही आपल्या मुत्सद्दीपणाचा व अधिकाराचा फायदा मराठ्यांना दिला व त्यांच्या उत्तरेकडील राज्यविस्तारास क्षेत्र मोकळें करून दिलें अशी इतिहास साक्ष देत आहे. मोगल बादशाहीची मोडकळीस येत चाललेली स्थिति पाहून व बाजीरावासारख्या पराक्रमी पुरुषाच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र मराठी साम्राज्याची इमारत उठत असलेली पाहून ह्या पवित्र कार्यांत आपणही थोडाफार हातभार लावावा असें त्यास स्वाभाविकपणेंच वाटूं लागलें; व तीस सहस्र फौजेचा सेनानी व माळवा व गुजराथच्या सुभ्यांचा अनिर्बंध अधिकारी म्हणून त्याची नेमणूक करून बादशहाने बाजीरावाच्या आक्रमास पायबंद घालण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली असतां बाजीरावाबरोबर एकही लढाई तो लढला नाही व माळव्यांतील नंदलाल मंडलोईच्या मार्फत

पेशव्याशीं कारस्थानें करून खुद्द बादशहाच्या सनदेने माळवा प्रांत त्याने बाजीरावाच्या स्वाधीन केला. जयसिंहाच्या मुत्सद्देगिरीचें बाजीरावास साहाय्य झालें म्हणूनच इतक्या सुलभतेने मालवा प्रांत त्यास मिळूं शकला व उत्तरेचें महाद्वार मराठ्यांच्या आक्रमणास एकदम खुलें झालें याबद्दल इतिहासज्ञांत मुळीच दुमत नाही.

सवाई जयसिंहाने १७०० पासून १७४३ पर्यंत एकूण ४३ वर्षें राज्य केलें. ह्या प्रदीर्घ कारकीर्दीत मोगल दरबारांत चाललेल्या प्रत्येक घटनेंत व कारस्थानांत त्याने महत्त्वाचा भाग घेतला. मोगल शहाजाद्यांच्या राज्याधिकाराच्या लढाया, मराठ्यांच्या स्वाऱ्या, राजपूत राजांचीं भांडणें, सय्यदबंधूंचीं कारस्थानें, जाटांचें उत्थान व दरबारचें राजकारण इ० अनेक मामल्यांत जयसिंहाचा महत्त्वाचा संबंध आला. बादशहाच्या आज्ञेवरून निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रांतांच्या सुभेदारीवर स्वतः जाण्याचा त्यास अनेक वेळां प्रसंग आला. परंतु इतक्या सर्व भानगडी करूनही स्वतःचा राज्यविस्तार व राज्यसुधारणा करण्याकडे त्याने अविरत लक्ष्य ठेवलें. कर्नल टॉड तर असें म्हणतो की, जयपूर शहर व जयपूरचें राज्य यांतील आज दिसणारी प्रत्येक सुधारणा व चांगली गोष्ट सवाई जयसिंहाने केली. त्याच्या मुत्सद्दीपणाच्या व राजनीतिकौशल्याच्या १०९ गोष्टी राजस्थानांत प्रसिद्ध आहेत व त्यांचा संग्रह लिहून ठेवण्यांत आला आहे.

सवाई जयसिंहाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांत तंटे माजले. ईश्वरसिंह हा त्याचा सर्वांत वडील पुत्र म्हणून गादीवर हक्क सांगून ती बळकाऊन बसला. पण मेवाडच्या राजकन्येपासून त्यास माधवसिंह नांवाचा मुलगा झालेला होता व मेवाडच्या राजकन्येस होणाऱ्या मुलासच मी अंबरसिंहासनाचा उत्तराधिकारी करीन असें अभिवचन दिल्यानंतरच त्याचा शिसोदिया कुलाशीं शरीरसंबंध घडला होता. त्यामुळे अर्थात् माधवसिंह गादीवर हक्क सांगूं लागला. माधवसिंहाने होळकरांचें साहाय्य घेतलें. गादीच्या ह्या भांडणांत अम्बरच्या राज्याचें अतिशय नुकसान झालें. मराठे सरदारांनी कोणी ह्याचा तर कोणी त्याचा पक्ष धरून दोन्ही पक्षांकडून भरपूर खंडण्या वसूल करून घेतल्या. ह्या वेळेपासून ह्या

राजपूत राज्यांतही मराठ्यांचा हात कायमचा शिरला व कछवाहांच्या सिंहासनाचा बचाव करण्यासाठी राजपुतांना वेळोवेळीं जबरदस्त खंडण्यांचा भूदंड मराठ्यांना भरावा लागला.

अखेरीस **माधवसिंह** गादीवर बसला. पण त्याचेंही मराठ्यांशीं लवकरच बिनसलें. परंतु मराठ्यांपेक्षाही अधिक जवळचा शत्रु त्यास उत्पन्न झाला होता व तो म्हणजे भरतपूरचे जाट होत. शेतकी करून नांदणाऱ्या ह्या लोकांची प्रथम चूडामण जाटाने आपल्या नेतृत्वाखाली संघटना करून त्यांच्या हातांत तरवारी दिल्या व तेव्हापासून मोगल बादशहांना व बलाढ्य इंग्रज सेनापतींनाही जाटांचा बंदोबस्त करण्याच्या कामीं आपली बरीच शक्ति खर्च करावी लागली. जयपूर राज्याच्या अगदी सीमेवरच ह्या जाटांचा उदय होऊं लागल्यामुळे जयपूरच्या महाराजांशींच त्यांचा प्रथम संघर्ष आला व त्यांचा उपद्रव शमविण्याकडेच माधवसिंहास आपले परिश्रम लावावे लागले. बापाची विद्याभिलाषा व कलाप्रियता यांचा अंश त्याच्या ठिकाणींही उतरला होता. रणथंभोरच्या सुप्रसिद्ध किल्ल्याजवळ माधोपूर नांवाचें एक नवीन व्यापारी शहर त्याने वसविलें. सतरा वर्षें राज्यकारभार करून हगवणीच्या विकाराने तो मरण पावला. मराठ्यांच्या इतिहासांतही ह्या माधवसिंहाचा उल्लेख बराच आढळतो. कारण होळकरांच्या राजकारणांतील तो एक महत्त्वाचा दुवा होता.

या पुढच्या काळांत इतर राजपूत राज्यांप्रमाणेंच जयपूरलाही अत्यंत कष्टाचे व दुर्दैवाचे दिवस गेले. माधवसिंहानंतर आपला सावत्र मुलगा **पृथ्वीसिंह** दुसरा यास गादीवर बसवून त्याची राणी कारभार करूं लागली. परंतु लवकरच पृथ्वीसिंह घोड्यावरून पडून मरण पावला. तेव्हा तिने आपल्या प्रताप नांवाच्या पुत्रास गादीवर बसविलें. अज्ञान प्रतापच्या ह्या महत्त्वाकांक्षी राजमातेने लवकरच दरबारचे जुने सरदार नाराज केले. खुशालीराम व पीरोज नांवाचा एक पीलवान या दोघांच्या तंत्राने ती वागूं लागली. खुशालीरामास तिने मुख्य प्रधान नेमलें तर पीरोजला सरसेनापतित्वाचा अधिकार दिला. पुढे ह्या दोघांतच भांडणें जुंपलीं व त्यांनी आपापल्या पक्षास साहाय्य घेण्यासाठी

मुसलमान व मराठे सरदारांचा आश्रय घेतला. त्यांच्या भांडणांत दरबारचा कारभार तर बिघडलाच, परंतु राज्याचेंही अतिशय नुकसान झालें. वर्षानुवर्षें हीं भांडणें चाललीं. अखेरीस **प्रतापसिंह** वयांत आल्यावर त्याने त्यांचा बंदोबस्त केला.

प्रतापसिंहाने १८०३ पर्यंत म्हणजे एकण पंचवीस वर्षें राज्यकारभार केला. पुन: एकवार राजपूत राज्यांचा प्रबळ संघ बनवून कांही कालपर्यंत मुसलमान व मराठे यांच्यापासून त्याने राजपूत राज्यांची सुटका केली. पण तो संघ फार काळ टिकूं शकला नाही. महत्त्वाकांक्षा, पराक्रम व दूरदर्शित्व हे तीनही गुण त्याच्या ठिकाणीं असले तरी प्रबळ मराठ्यांच्या धामधुमीपासून बचाव करण्यासारखी त्या काळांत त्याची स्थिति नव्हती. शिंदे व होळकर यांनी वारंवार त्याच्या राज्यांत धुमाकूळ घातला. टॉड म्हणतो, एकट्या होळकरानेच त्याच्या जवळून ८४ लक्ष रुपये खंडणीच्या रूपाने वसूल करून नेले. अशा रीतीने सवाई जयसिंहाने जमविलेल्या अपार संपत्तीचा नाश होत गेला. पुढे पुढे होळकराने आपली वार्षिक खंडणी वसूल करण्याचें काम अमीरखानावर सोपविलें व या अमीरखानाचा जयपूर राज्यांत प्रवेश हें एक अतिशय मर्मभेदक व विनाशक असें शल्य ठरलें.

१८०३ सालीं प्रतापच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र **जगतसिंह** गादीवर बसला. १८१८ पर्यंत त्याने राज्य केलें व ब्रिटिश राजसत्तेशीं अंकितत्वाचा तहनामा करून लवकरच तो मरण पावला. त्याची ही सोळा वर्षांची कारकीर्द अत्यंत किळसवाण्या गोष्टींनी भरलेली आहे. कर्नल टॉड–जो तत्कालीन राजकारणांत प्रत्यक्ष वावरत होता–असें म्हणतो की, "जगतसिंहाच्या कारकीर्दींत घडलेल्या सर्वच दुष्कृत्यांचा पाढा वाचतों म्हटलें तर ग्रंथच लिहावे लागतील." त्याच्या लाजीरवाण्या कारकीर्दीचें टॉडने अतिसंक्षेपाने वर्णन केलें आहे तें असें–"परक्यांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्या, शहरांना पडलेले वेढे, पराजय, खंडण्या, दरबारांतलीं कुटिल कारस्थानें, भर दरबारांत होणारीं द्वंद्वें व त्यासाठी उपसल्या जाणाऱ्या तरवारी (यांचा हा इतिहास आहे!) जनानखान्यांत रासकूपर नांवाच्या रखेलीबरोबर जगतसिंहाने केलेल्या बीभत्स चेष्टा हा रोजच्या बाजारगप्पेचा विषय असे. राजपूतस्वभावसुलभ असा एकही सद्गुण जगतच्या अंगीं

नव्हता. त्याचें चारित्र्य स्त्रैणपणाच्या दुराचारांनी बरबटलें आहे. मेवाडच्या भीमसिहाच्या कन्येसाठी (कृष्णाकुमारीसाठी) त्याने केलेल्या कृष्णकार-स्थानांचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. त्यांत त्याने निदान दहा लक्ष रुपये तरी बरबाद केले असतील........व्यापार सुरळीत चालेनासा झाला. शेती झपाट्याने पडीत पडूं लागली. आज एखादा शिंपी राजाचा मुख्य सल्लागार बने, तर उद्या एखादा बनिया व परवा एखादा भाट! व दुसरा आला की पहिल्यास नहरगढच्या तुरुंगांतील अंधारकोठडीची हवा खावी लागे. दरबारचे सरदार व जहागिरदार त्याचा अधिकार मानीनातसे झाले व त्यास तिरस्कारानें वागवूं लागले. रासकूपर नांवाची जी मुसलमान रखेली त्याने ठेवली होती तिला त्याने आपलें अर्धें राज्य बहाल केलें होतें. सवाई जयसिहाने जमविलेला मूल्यवान ग्रंथसंग्रहसुद्धा त्याने तिच्या स्वाधीन केला व तिच्या साजिद्यांनी त्याची नासधूस करून टाकली. तिच्या नांवाचीं त्याने नाणींसुद्धा पाडलीं. तिच्या बरोबर हत्तीवर बसून तो शहरांत फिरत असे." ह्या रखेलीने एक वेळ खुद्द राजासच पदच्युत करण्याचा घाट जमविला होता. पण त्याच्या कांही हितचिंतकांनी वेळेवर सावधगिरी राखून त्याचा बचाव केला व रासकूपरलाच नहरगढच्या अंधारकोठडींत नेऊन डांबली.

सन १८१८ मध्ये पेशव्यांकडून मराठी राज्याचा कारभार आपल्या हातीं घेतल्यावर इंग्रजांनी राजपूत राजांशीं आपले मांडलिक होण्याबद्दल बोलणें लावलें. मेवाडचा महाराणा भीमसिह याने त्यांचें पारतंत्र्य कसें स्वीकारलें ह्याचा रोमांचकारी इतिहास आपण पूर्वी पाहिलाच आहे. जगत-सिंह प्रथम इंग्रजांच्या बोलण्यास कबल होईना. परंतु अजमीरच्या किल्ल्या-वरही जेव्हा इंग्रजांचें निशाण फडकलेलें त्याने पाहिलें तेव्हा २ एप्रील १८१८ रोजीं त्यानेही अखेरीस इंग्रजांचें सार्वभौमत्व मान्य करून इतर अनेकांच्या बरोबर तोही त्यांच्या गोठ्यांतील एक बैल होऊन बसला.

ह्यानंतरचा जयपूरचा इतिहास म्हणजे लवकरच घडलेला जगत-सिंहाचा मृत्यु, त्यानंतर दरबारांत माजलेली अनास्था, इंग्रजांची मध्यस्थी व राज्यांत व्यवस्था व शांतता यांची प्रस्थापना इ० समांतर घटनांनीच भरलेला असल्याने त्याची पुनरुक्ति करणें व्यर्थ होय.

प्रकरण दुसरें

हाडावतीचा इतिहास

अरवली पर्वताच्या पूर्वेकडील दोन राजपूत राज्यांचा इतिहास पाहिल्यानंतर त्याच विभागांतील तिसरें जें हाडा राजपुतांचें हाडावतीचें राज्य त्याच्याकडे वळणें जरूर आहे. हाडावतीचें मूळ राज्य–ज्याचे आज बुन्दी व कोटा असे दोन विभाग झालेले आहेत–अजमीरच्या चौहान उर्फ चाहमान राजवंशांतील पुरुषांनी स्थापन केलें. हे चाहमान वास्तविक सांभरचे. परंतु पुढे त्यांनी अजयमेरु उर्फ अजमीरचा दुर्ग उभारून तेथे आपली राजधानी नेली. दिल्लीचा सुप्रसिद्ध पृथ्वीराज चौहान उर्फ रायपिठोरा हाही या सांभर–अजमीरच्या चौहान वंशांतलाच. परंतु त्यास त्याच्या तुवर अथवा तोमर वंशांतील आजाचें दिल्लीचें राज्य मिळाल्याने तो दिल्लीपति बनला. राजस्थानच्या राजकीय इतिहासांत अजमीरचें स्थान अतिशय महत्त्वाचें आहे. किंबहुना राजस्थानांत प्रवेश करण्याचें तें पहिलें व महत्त्वाचें द्वार आहे. व म्हणूनच प्रत्येक आक्रमकाने व हिंदुस्थानच्या प्रधान शासनसत्तेने त्याच्यावर आपली नजर ठेवलेली आढळते. मोगलबादशहांनी तें शक्य तोंवर आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न केला व आज इंग्रजांनीही नेमका तेवढाच टापू आपल्या खास शासनाखाली ठेवलेला आहे. अजमीरच्या गादीवर बसलेल्या या पुरातन चाहमान राजवंशाचा वृत्तांत विद्वत्कुलशेखर कुलपति चिं. वि. वैद्य यांनी आपल्या मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत दिला आहे. परंतु आपणास तूर्त हाडावतीच्या राज्यस्थापनेपासूनच प्रारंभ करावयाचा असल्याने तत्पूर्वीच्या चाहमानांच्या महत्त्वपूर्ण व स्फूर्तिप्रद इतिहासाकडे लक्ष देतां येत नाही.

अजमीरच्या ह्या चाहमान वंशांतील **अनुराज** नांवाचा राजा राज्य करीत असतांना ११ व्या शतकांत अजमीरवर मुसलमानांची स्वारी झाली.

ती गजनीच्या महमूदाची अथवा त्याच्या एखाद्या प्रबल सरदाराची असावी असा कांही इतिहासलेखकांचा तर्क आहे. ह्या स्वारीचे उपलब्ध वृत्तांत बरेच घोटाळ्याचे असले तरी स्थूलमानाने असें दिसतें की, तींत अजमीरचा नाश झाला. परंतु अनुराजचा पुत्र **इष्टपाल** याने मुसलमानांचा पिच्छा पुरवून त्यांचीही कत्तल उडविली. हाच इष्टपाल हाडावतीच्या राजवंशाचा मूळ पुरुष समजण्यांत येतो. त्याने आशीर येथे आपल्या राज्याची उभारणी केली. त्याचे **हंमीर** व गंभीर नामक दोन पुत्र पृथ्वीराजाच्या वतीने जयचंद राठोडाशीं झालेल्या लढाईंत मोठ्या पराक्रमाने लढून मरण पावले. हंमीरच्या नंतर **कालकर्ण, महामगध, रावव्रत्स रावचंद** हे अनुक्रमें आशीरच्या गादीवर बसले. अल्लाउद्दीनच्या स्वारींत रावचंदाच्या राज्याचा नाश झाला. त्याचा दोन वर्षांचा पुत्र **रैणसी** चितोडच्या राण्याच्या आश्रयास जाऊन राहिला. तारुण्यांत आल्यावर त्याने भैंसरोर येथील डूंगा नांवाच्या एका भिल्ल राजास जिंकून तेथे आपल्या गादीची स्थापना केली. अल्लाउद्दीनची चितोडवर स्वारी झाली असतां रैणसी कृतज्ञपणें चितोडच्या साहाय्यास धावला परंतु त्यांत त्याचा नाश झाला. रैणसीला **कोलण** व कंकल असे दोन पुत्र होते. त्यांपैकी कोलणने मध्यभारतांतील पठारावरील मूळ रहिवाशी अशा मीना जातीच्या लोकांना—ज्यांनी अल्लाउद्दीनने चितोडचा ध्वंस केल्यावर मेवाडच्या राज्यांतील बराच मुलुख कावीज केला होता—परास्त करून त्यांचा प्रदेश जिंकला. कोलणचा नातू **रावबंगो** याने आपल्या आजाचें कार्य पुरें करण्याच्या हेतूनें बहुतेक पठारभाग काबीज केला. हा रावबंगो मोठा पराक्रमी पुरुष होता. त्याने बमौदाचा किल्ला बांधून तेथे आपली राजधानी केली. मंडलगढ, बिजोली, रतनगड इ० अनेक दुर्ग जिंकून त्याने आपल्या राज्यास जोडले. त्याच्या मागून त्याचा पुत्र **रावदेवा** बमौदाच्या गादीवर बसला. त्यानेही उरल्यासुरल्या मीनांना परास्त करून सबंध पठार आपल्या शासनाखाली आणला. इ. स. १३४२ च्या सुमारास बांदोचें खोरें जिंकून त्याने बूंदी शहराची स्थापना केली व एव्हापासून बूंदी हीच ह्या राज्याची राजधानी झाली. रावदेवानेच पठारावरील आपल्या सर्व राज्यास हाडावतीचें राष्ट्र अशी संज्ञा दिली व अशा तऱ्हेने राजपूत

इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या ह्या हाडावतीच्या राष्ट्राची स्थापना झाली. या राजवंशांतील पुरुष आपला राष्ट्राभिमान प्रकट करण्यासाठी स्वतःस हाडा राजपूत म्हणवूं लागले व त्यामुळे पूर्वीचें चौहान हें नांव मागे पडलें.

रावदेवाचा पुत्र **सामरसी;** सामरसीचा द्वितीय पुत्र जैतसी याने चंबळ नदीच्या पलीकडील तीरावरही स्वाऱ्या करून भिल्लांच्या ताब्यांत असलेला प्रदेश जिंकून हाडावतीच्या राज्यास जोडला व आपल्या विजयभूमीवर एक किल्ला बांधला. जैतसीचा पुत्र **सूरजन** यानें याच विजयभूमींत कोटा शहराची स्थापना करून बापाच्या विजयास स्थायी स्वरूप दिलें. जैतसीच्या नंतर त्याच्या पांच वंशजांनी कोटाचें सौंदर्य वाढवून त्याच्या ऐश्वर्यांतही भर घातली. जैतसीपासून पांचवा वंशज **भोणंगसी** कोटयास शासन करीत असतां त्याच्या व्यसनासक्तीचा फायदा घेऊन पठाणांनी तें शहर जिंकलें. भोणंगसी पळाला. पुढे त्यास पश्चात्ताप होऊन त्याने व्यसनासक्ति सोडून दिली. त्याच्या पत्नीने त्यास पुनः कोटा जिंकण्यास प्रवृत्त केलें. त्या वीर-रमणीने ज्या विलक्षण धाडसाच्या युक्तीने कोटा शहरावर पुनः हाडांचा ध्वज फडकविला ती अशी——

प्रबळ पठाणांच्या बरोबर उघड्या मैदानावर दोन हात करण्या-इतकें मनुष्यबळ भोणंगसीजवळ नव्हतें. त्यामुळे आपल्या निवडक अनु-यायांचा उपयोग करण्याचें त्यांनी ठरविलें. भोणंगसीच्या पत्नीने पठाणांना तुमच्या बरोबर होळीच्या दिवशीं रंग खेळण्याची माझी व माझ्या मैत्रि-णींची इच्छा आहे, अशी विनंती केली. पठाण उल्लू बनले व त्यांनी होळीच्या दिवशीं किल्ल्यामध्ये रंगबाजीची सर्व तयारी केली. भोणंगसी आपल्या ३०० निवडक व शूर हाडांच्या सह स्त्रीवेश धारण करून आपल्या पत्नीबरोबर रंगाच्या निमित्ताने पठाणांच्या महालांत शिरला. रंगाचा खेळ ऐन रंगांत आलेला पाहून व पठाण आता चांगलेच उल्लू बनले आहेत हें पाहून भोणंगसीच्या पत्नीने आपल्या कमरेची कटचार बाहेर काढली. त्यासरशीं भोणंगसीने व त्याच्या हाडांनी आपापले स्त्रीवेश फेकून देऊन तरवारी उपसल्या व पठाण सरदार व त्यांचे शिपायी यांना कापून काढून कोटाचा ताबा घेतला.

अतिशय शूर व इमानी राजपूत म्हणून हाडांची प्रसिद्धि आहे. त्यांचा स्वाभिमान अतिशय तीक्ष्ण आहे. त्यास धक्का लावणारास, मग तो कोणीही का असेना, ते कधीच क्षमा करणार नाहीत. हाडावतीचे राजे प्रायः मेवाडचे मांडलिक राहिले. मेवाडच्याच कृपेने त्यांचा पूर्वज रैणसी ह्याचा बचाव झाला होता व एकदा मेवाडच्या अधिराज्याखाली असलेला जो मुलुख मीनांनी जिकला होता तोच जिंकून त्यांनी हाडावतीच्या राष्ट्राची स्थापना केली होती, म्हणून कृतज्ञतेच्या बुद्धीने ते स्वतःस मेवाडचेच अंकित म्हणवीत. ह्या शूर व इमानी पुरुषांचा मेवाडला अतिशय उपयोग झाला व मेवाडच्या अनेक आपत्तींत स्वतःच्या जिवाचीही तमा न धरतां त्यांनी मेवाडला साहाय्य केलें.

सामरसीच्या नंतर **नप्पूजी** बुन्दीच्या सिंहासनावर आरूढ झाला. १३४२ च्या सुमारास रावदेवाने बुन्दीचें सिंहासन स्थापन केल्यापासून १४८६ पर्यंत म्हणजे सुमारें दीडशें वर्षांच्या काळांत बुन्दीच्या गादीवर रावदेवा, सामरसी, नप्पूजी, हम्मूजी, वीरसिंह व बंदो मिळून एकूण सहा राजे बसले. त्या सर्वांनी आपलें शौर्य मेवाडच्या सेवेंतच अर्पण केलें. **रावबंदोच्या** शासनकालांत इ. स. १४८६ च्या सुमारास राजस्थानांत एक भयंकर दुष्काळ पडला. त्या वेळीं बंदोने स्वतःजवळचा अपरंपार धान्यनिधि उघडा करून आपल्या राज्यांतील तर हजारों जीवांचें संरक्षण केलेंच पण राजस्थानांतील इतर राज्यांतील प्रजेलाही धान्यदान व त्याबरोबरच प्राणदान केलें. त्यामुळे हाडा राव बंदो याची कीर्ति उभ्या राजस्थानांत पसरली. ह्या सर्व काळांत हाडावंशाचा विस्तारही अतिशय मोठा झाला. हाडावंशांतील हजारो शूर व इमानी राजपूत स्वतःच्या व मेवाडच्या सेवेसाठी नित्यसिद्ध अशी तरवार कमरेस बांधून सज्ज राहूं लागले. बंदोच्या कारकीर्दीतील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे त्याच्या सात भावांपैकी दोघे धाकटे भाऊ अधिकारलालसेने धर्मत्यागाचें पातक पत्करून मुसलमान बनले. दिल्लीच्या सुलतानाच्या पदरीं नोकरी पत्करून व त्याचें साहाय्य संपादन करून त्या हाडा कुलास कलंक लावणाऱ्या पुरुषांनी बुन्दीवर आक्रमण केलें. बंदोचा पराजय झाला व बुन्दीचें सिंहासन त्या कुलांगारांनी भ्रष्ट केलें. बंदोचे अंतिम दिवस वनवासांत

गेले. परंतु त्याचा पुत्र **नारायणदास** याने वयांत आल्याबरोबर आपल्या कुलाधम व कृतघ्न चुलत्यांना देहांत प्रायश्चित्त देऊन पुनः बुन्दीच्या सिंहासनावर आरोहण केलें.

हा राव नारायणदास आपल्या शक्तीबद्दल व शौर्याबद्दल फार प्रसिद्ध असे. मंडच्या सुलतानाने राणा रायमल्लाच्या शासनकालांत मेवाडवर स्वारी करून चितोडगडास वेढा दिला. त्यावेळीं नारायणदास आपल्या कडव्या हाडांच्या सेनेसह सुलतानावर एकाएकी जाऊन तुटून पडला व सुलतानाच्या सेनेची साफ कत्तल करून त्याने चितोडचा बचाव केला. या त्याच्या पराक्रमाबद्दल राणा रायमल्लाची कन्या नारायण-दासावर अनुरक्त झाली व महाराण्यानेही कृतज्ञताबुद्धीने तिचा त्या हाडारावाबरोबर विवाह करून दिला. बावीस वर्षें राज्य करून नारायणदास इ. स. १५३४ सालीं मरण पावला.

त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र **सूरजमल्ल** गादीवर बसला. बापा-सारखेंच त्याचेंही शरीर मोठें धिप्पाड, शक्तिमान व कसलेलें होतें व त्याचें धैर्यही तसेंच अभंग होतें. तो आजानुबाहु होता असें म्हणतात. परंतु त्याच्या शक्तीचा व पराक्रमाचा राष्ट्रकारणीं व्यय होण्याचा योग नव्हता. त्याची बहीण सूजाबाई मेवाडच्या राण्याची पत्नी होती. चितोडास एके-दिवशीं आपला भाऊ व पति एकत्र भोजनास बसले असतां सूजाबाईने "माझ्या भावाचा आहार एखाद्या वाघासारखा असून पतीचा एखाद्या बालकासारखा" अशी राण्याची थट्टा केली. ही थट्टा असह्य वाटन आता ह्या सिंहाच्या छाव्याचें शौर्य ह्या वाघास दाखविलेंच पाहिजे असा विचार योजून त्याने पुढील आहेरियाच्या प्रसंगीं ह्या थट्टेचा सूड उगविण्याचें ठरविलें. आहेरियाची शिकार बुंदीच्या जंगलांतच करण्याचें ठरलें व त्या ठिकाणीं बुंदीचा राव व मेवाडचा राणा एकमेकांच्या हातून मारले गेले. दोघांच्याही स्त्रिया सती गेल्या. अशा तऱ्हेने थट्टेचा निकुर होऊन ज्या दोन पुरुषांचें शौर्य व कर्तृत्व एकाच राष्ट्राच्या कारणीं लागावयाचें त्यांचा सिंहासनावर आल्यापासून एक वर्षाच्या आंतच एकमेकांच्या हातून अंत झाला.

सूरजमल्लाच्या मागून त्याचा पुत्र **सूरतन** बूंदीच्या गादीवर बसला. हा अत्यंत व्यसनी असून कालभैरवाचा उपासक होता त्याच्या हातून राज्यकारभार होईना म्हणून सरदारांनी त्यास पदच्युत करून रावबंदोचा द्वितीयपुत्र राव **अर्जुन** यास राज्यतिलक केला. ह्याच्या कारकीर्दींत गुजराथच्या सुलतानाने चितोडला वेढा दिला. राणी कर्मवतीने आपला पति अयोग्य पुरुष आहे हें जाणून गड लढविण्यासाठी राष्ट्रांतील सरदारांना व शूर पुरुषांना स्वतःच निमंत्रण दिलें. तिने ह्या प्रसंगीं सरदारांना लिहिलेलें पत्र केवढें प्रज्वलित देशभक्तीने भरलेलें होतें हें पूर्वी मेवाडच्या इतिहासांत सांगितलेंच आहे. हाडा राव अर्जुन ह्याच्याही देशभक्तीने ह्यावेळीं उचल खाल्ली व राव सूरजमल्लाचें व मेवाडच्या राण्याचें वैर विसरून आपल्या शूर हाडांच्या सह तो राणी कर्मवतीच्या नेतृत्वाखाली चितोडच्या सेवेस तत्परतेने दाखल झाला. गडाचें संरक्षण करीत असतां तोफांच्या गोळ्याखाली त्याने व त्याच्या प्रत्येक अनुयायाने आपला देह ठेवला, पण गडावरची आपली नियोजित जागा सोडली नाही व अखेरचा हाडा जिवंत असेपर्यंत शत्रूचा गडांत प्रवेश होऊं शकला नाही. ह्या वेढ्याच्या वेळीं ज्या राष्ट्रभक्त सरदारांनी राष्ट्राच्या संरक्षणासाठी आपल्या प्राणांच्या आहुति दिल्या त्यांत हाडाराव अर्जुन याची प्रामुख्याने गणना केली पाहिजे.

त्याच्यानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र **सूरजन** बुन्दीच्या गादीवर बसला. राव सूरजनची कारकीर्द हाडावतीच्या इतिहासांत अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण अशी झाली. अकराव्या शतकानंतर म्हणजे इष्टपालच्या काळानंतर मध्यभारतांतील पठारावर आल्यापासून व राव देवाने हाडावतीचें राष्ट्र निर्माण केल्यापासून हाडांनी आपलें स्वातंत्र्य अबाधित ठेवलें होतें. यद्यपि मेवाडच्या सेवेस याची समशेर सदैव सज्ज असे व मांडलिक या नात्याने मेवाडच्या राण्यास राज्यभिषेकप्रसंगीं राजतिलक लावण्यास हाडा रावांना जावें लागे, तथापि त्यामुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर कोणतेंच नियंत्रण आजपर्यंत निर्माण झालेलें नव्हतें आपल्या राष्ट्रांत ते पूर्णपणें स्वतंत्र असत. राव सूरजनच्या कारकीर्दीपर्यंत म्हणजे सुमारें ४५० वर्षें त्यांनी अविच्छिन्न स्वातंत्र्याचा उपभोग घेतला. या काळांत दिल्लीच्या तख्तावर घोरी, गुलाम, तघलख, खिलजी, लोदी व पठाण इ. अनेक मुसलमान घराणीं

येऊन नष्ट झालीं. गुजरात, माळवा, सिंध या प्रांतांतही सुलतानशाहया स्थापन झाल्या. पण त्यांपैकी कोणाचीही शूर हाडांच्या स्वातंत्र्यास धक्का लावण्याची हिंमत झाली नाही. बाबर व हुमायूनच्या काळांतही हाडांची मेवाडनिष्ठा अभंग राहिली. परंतु राव सूरजनच्या कारकीर्दीत मात्र इतक्या दिवसांच्या मेवाडनिष्ठेचा व हाडावतीच्या स्वातंत्र्याचा हा प्रवाह विच्छिन्न झाला. ती हकिकत येथे निवेदन केली पाहिजे.

मुसलमानांनी जिंकलेल्या रणथंभोरच्या किल्ल्यावर हाडारावांची पुष्कळ दिवसांपासून नजर होती. सूरजनच्या शासनकलांत त्याच्या एका शूर हाडा बांधवाने स्वःच्या पराक्रमाच्या जोरावर तो तेथील पठाण अंमलदारास मारून जिंकला आणि मेवाडनिष्ठेची शपथ घेवून तो हाडाराव सूरजनाच्या स्वाधीन केला. सूरजनच्या या शूर बांधवास भविष्याचें स्वप्नच पडलें होतें की काय नकळे! म्हणून मुद्दाम मेवाडचें आधिपत्य कधीही सोडणार नाही ही अट सूरजनकडून प्रथम कबूल करून घेतली व नंतरच रणथंभोरचा दुर्ग सूरजनच्या स्वाधीन केला. ह्या विजयाने स्वाभाविकपणेंच सर्व हाडा राष्ट्रास मोठा आनंद झाला. पण ह्याच सुमारास अकबर दिल्लीच्या गादीवर बसला होता व साम्राज्यविजयाच्या त्याच्या दृष्टीला रणथंभोरचा एवढा महत्त्वपूर्ण दुर्ग न दिसणें अशक्य होतें. पण गाठ हाडांशीं आहे हेंही तो जाणून होता. म्हणून प्रचंड सेना बरोबर घेऊन त्याने रणथंभोरवर आक्रमण केलें व गडास वेढा दिला. ह्या स्वारींत बादशहाबरोबर अंबरचा राजा भगवानदास व त्याचा पुतण्या मानसिंह हेही आलेले होते. पारतंत्र्याचें जू स्वतःच्या मानेवर धारण केल्यापासून इतर राजपूत राजांनीही आपल्या दावणींत येऊन बसावें असा ते प्रयत्न करीत. असाच प्रयत्न त्यांनी ह्या वेळेस सूरजनच्या बाबतींत करून पाहिला व हा हाडा राव थोडयाच वर्षांपूर्वी घेतलेली शपथ विसरून त्यांच्या मंत्रणेस बळी पडला. अंबराधिपतीच्या मध्यस्थीने हाडावतीचे राव व मोगल बादशहा यांच्यांत एक तहनामा ठरला व अकबरानेही तो मंजूर केला. अशा रीतीने राव सूरजन याने, त्याच्या पूर्वपुरुषांनी इतके दिवस जतन करून ठेवलेलें हाडावतीचें स्वातंत्र्य व दर्शविलेली मेवाडनिष्ठा, यांचा महाराणा प्रतापसिंहाच्या ऐन आपत्तीच्या

काळांत त्याग करून मोगलांची चाकरी पत्करली. रणथंभोरचा गड जिंकणाऱ्या त्याच्या बांधवास त्याच्या राष्ट्रद्रोहाचें हेंच भविष्यसूचक स्वप्न पडलें होतें काय ? म्हणून त्याने मुद्दाम मेवाडनिष्ठेची शपथ त्याच्याकडून घेवविली होती ?

राव सूरजन याने बादशहाचें मांडलिकत्व पत्करून जरी तह केला, तरी त्याने घातलेल्या तहाच्या अटी पाहिल्या म्हणजे अंबरच्या राजापेक्षा त्याने किती तरी पट अधिक तेजस्विता दाखविली होती व त्याचें सख्य संपादन करण्यास अकबरासही आपले नित्याचे शिरस्ते सोडून केवढी तरी किंमत द्यावी लागली होती हें दिसून येतें. त्याच्या तहाच्या तेजस्वी शर्ती पुढीलप्रमाणें होत्या--

१. हाडारावावर आपली कन्या मोगल बादशाहास देण्याबद्दल कधीही सक्ती करण्यांत येणार नाही. २. हाडा राष्ट्रावर जिजीया कर बसविला जाणार नाही. ३. अटकेच्या पलीकडे कोणत्याही कामगिरीसाठी जाण्याची हाडा रावावर सक्ती करण्यांत येणार नाही. ४. कोणीही हाडा स्त्री नौरोजाच्या सणासाठी शाही राजधानीस जाणार नाही व मीना बाजारांत बसणार नाही. ५. दीवाण-इ-आममध्ये प्रवेश करतांना हाडाराव शस्त्रत्याग करणार नाही. ६. हाडांच्या धार्मिक स्थळांचा मोगल बादशाहांना आदर करावा लागेल. ७. हाडा राजपूत आपल्या घोड्याच्या पाठीवर बादशहाच्या गुलामीचा डाग मारून घेणार नाही. ८. दिल्लीच्या राजधानींत लाल दरवाज्यापर्यंत स्वतःचे नगारे वाजवीत जाण्याचा मान हाडा रावांना राहील. ९. कोणीही हाडा राव दरबारांत बादशहापुढे साष्टांग प्रणिपात करणार नाही. १०. दिल्लीचे बादशहा जितका दिल्लीचा मान राखतील तितकाच हाडा राव बुन्दीचा मान राखतील. राजधानी बदलण्याचा आग्रह बादशहाकडून त्यांना कधीही होणार नाही.

वरील तहाच्या अटींरून मोगल बादशहाचें सार्वभौमत्व मान्य करीत असतांही राव सूरजन याने आपलें अंतर्गत स्वातंत्र्य कायम राखलें होतें असें दिसतें. विशेषतः या तहांतील १, २, ४, ५, ७ व ९ ह्या अटी म्हणजे अकबराच्या आंतरिक आकांक्षांचीं मर्मस्थळेंच होत व अंबरच्या

राजांचा तो स्पष्ट धिक्कार होय. कारण त्यांनी त्यांतील गोष्टी मंजूर केल्या होत्या. अंबरच्या मुली बादशहास दिल्या होत्या. अंबरच्या स्त्रिया नौरोजाच्या उत्सवास जाऊन मीना बाजारांत बसत होत्या व बादशहा आपल्या नेत्रांनी त्यांचें लावण्यलुण्ठन करीत होता. अंबरच्या घोड्यांच्या पाठीवर बादशहाच्या गुलामीचा डाग मारण्यांत येत होता. अंबरच्या मागोमाग मोगली पारतंत्र्य कबूल करणाऱ्या इतर बहुतेक हिंदु राजांनीही ह्या नामुष्कीच्या गोष्टी मंजूर केल्या होत्या. पण हाडाराव सूरजन याने त्या स्पष्टपणें नामंजूर केल्या. राजपुतांच्या इतिहासांत पारतंत्र्याचा असला तरी इतका तेजस्वी तह असा हाच पहिला होय.

या मैत्रीच्या मोबदल्यांत वरील अटी कबूल करून शिवाय, बादशहाने राव सूरजन यास बावन जिल्ह्यांचा मुलूख बहाल केला व त्यांतील उत्पन्नावर सर्वस्वी हाडारावांचाच अधिकार मान्य केला व हाडारावांना रावराजे अशी पदवी दिली. हाडासारख्या पराक्रमी व तेजस्वी राष्ट्राच्या मैत्रीसाठी एवढी जबरदस्त लांच देण्यास भाग पडण्याइतकें त्यांचें सामर्थ्य अकबराच्याही प्रत्ययास आलें असलें पाहिजे हें उघड आहे.

अशा तऱ्हेने हाडाराव सूरजन याने मानसिंहाच्या मध्यस्थीने बादशहाबरोबर तह करून प्रतिज्ञाभंग केला असतां हाडा सावंतसिंहने—ज्याने रणथंभोरचा किल्ला स्वपराक्रमाने जिंकून राव सूरजनच्या स्वाधीन केला होता—तहास मान्यता देण्याचें नाकारून गड बादशहाच्या स्वाधीन करण्यास विरोध केला. मेवाडशीं कृतघ्न होऊन व प्रतिज्ञाभंग करून हाडावतीचें स्वातंत्र्य विकल्याबद्दल सूरजनचा त्याने धिक्कार केला आणि आपल्या शरीरांत रक्ताचा अखेरचा थेंब असेपर्यंत गड लढविण्याचा आपला निश्चय त्याने जाहीर केला. राष्ट्रभक्त व स्वातंत्र्यप्रेमी सावंतसिंह व त्याचे तितक्याच निष्ठेचे हाडा अनुयायी धारातीर्थी पतन पावले तेव्हाच मोगल सेनेचा किल्ल्याच्या आंत प्रवेश होऊं शकला. सावंतसिंहानें आपलें नांव हाडावतीच्या इतिहासांत चिरंजीव करून ठेवलें आहे यांत शंका नाही.

ह्यानंतर सूरजनने बादशहाच्या वतीने गोंडवनावर स्वारी करून तींत यश संपादन केलें. या त्याच्या कामगिरीबद्दल प्रसन्न होऊन बादशहाने

त्यास बनारस व चुनारसह आणखी सात जिल्ह्यांची देणगी दिली.

सूरजन याने आपल्या कारकीर्दीत प्रजाहिताचीं अनेक कामें केलीं. राजा या दृष्टीने तो फारच योग्य पुरुष होता असें म्हणावें लागतें. तो परम धार्मिक असून उदारधी होता. आपला राज्यशकट त्याने हाणपणाने हाकला. ह्याच्या शासनकालांत राज्याचा बंदोबस्त उत्तम राहून प्रजेने सुख व शांति यांचा उपभोग घेतला. बुन्दी नगरची शोभाही त्याने बरीच वाढविली. त्यास तीन पुत्र होते. रावभोज, धूंडा (त्यास अकबराने लाकर-खान असें उपनांव दिलें होतें) आणि रायमल्ल. राव सूरजनच्या मृत्यूनंतर त्याचा जेष्ठ पुत्र **रावभोज** गादीवर बसला.

सूरजनप्रमाणेंच, अकबराच्या साम्राज्यविजयांत, रावभोज व त्याचे शूर हाडा राजपूत यांचें बरेंच साहाय्य झालें. सुरतच्या वेढ्यांत हाडांचें शौर्य बादशहाच्या चांगलेंच उपयोगीं पडलें. इतिहासप्रसिद्ध चांदबीबीपासून अहमदनगरचा किल्ला जिंकताना रावभोजाने दाखविलेलें शौर्य पाहून बाद-शहा इतका प्रसन्न झाला की, ज्या बुरजावर राव भोजानें हल्ला चढविला होता, त्यास त्याने "भोजबुरूज" असें नांव दिलें.

मोगलांच्या पारतंत्र्यांत असतांनाही हाडाराव आपल्या सन्मानाचें व गौरवाचें संरक्षण करण्याच्या बाबतींत कसे दक्ष राहत याची एक मोठी स्फूर्तिप्रद आख्यायिका क० टॉडने बुन्दीच्या बखरीमधून घेऊन आपल्या इतिहासांत उद्धृत केली आहे. ती अशी—

अकबराची आवडती राणी जोधाबाई मरण पावली. तेव्हा तिच्या मृत्यूबद्दल शोकप्रदर्शन म्हणून आपल्या दरबारांतील सर्व हिंदुमुसलमान सरदारांनी व नबाबांनी क्षौर करावें असा अकबराने हुकूम सोडला. इतकेंच नव्हे तर हुकमाची तामिली करण्यासाठी प्रत्येक नवाबाच्या व सरदाराच्या बिऱ्हाडावर शाही हजाम पाठविण्यांत आले. त्याप्रमाणें हाडा रावराजे भोज यांच्याही बिऱ्हाडावर जेव्हा हे रोमशत्रू जाऊन पोचले तेव्हा त्याने आपल्या दाढीमिशा काढण्याचें स्पष्ट नाकारलें. शाही हुकमाची अशा रीतीने अवज्ञा करण्याचा परिणाम काय होईल हें रावभोज ओळखून होता व म्हणून येणाऱ्या प्रसंगास तोंड देण्याची त्याने तयारीही केली. त्याच्या शत्रूंनी ही संधि साधून बादशहाचे कान फुंक-

ण्यास कमी केलें नाही व बादशहानेही आपल्या हुकमाची जबरदस्तीनें तामिली करण्याचा हुकूम सोडला. रावभोज व त्याचे हाडा राजपूत यांनी आपल्या तरवारी उपसून बादशहाच्या दुसऱ्या हुकमाचा सत्कार केला व इतक्या त्वेषाने ते प्रतिकारास सज्ज उभे राहिले की शाही अंमलदार घाबरले. व तेव्हाच आपण विस्तवाशीं खेळ करीत आहोंत हें बादशहाच्या ध्यानांत आलें. बादशहाने स्वतः रावभोजाच्या छावणीवर जाऊन त्यास आलिंगन दिलें व त्याचें समाधान करून आपले हुकूम मागे घेतले.

ह्यानंतरच्या बहुतेक बुन्दी नरेशांची कारकीर्द, बादशहाच्या वतीने निरनिराळ्या स्वाऱ्यांवर जाणें व निरनिराळ्या ठिकाणीं सुभेदारीचीं कामें करणें यांतच व्यतीत झाली असें म्हटलें तरी चालेल. शाहजाद्यांच्या उत्तराधिकाराच्या लढायांत ते तख्तनशीन बादशहाच्या अथवा त्याच्या कायदेशीर वारसांच्या वतीने लढले. अकबराच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनी रावभोज आपल्या राजधानींत मरण पावला व त्याचा पुत्र हाडा **रावरतन** बुन्दीच्या गादीवर बसला. शहाजादा खुर्रम उर्फ शहाजहान याने आपल्या राजपूत सहायकांच्या जोरावर जहांगीर बादशहास पदच्युत करण्याचा प्रयत्न केला त्या वेळीं राव रतन जहांगीरच्याच पक्षास चिकटून राहिला व शहाजहानचा मोड करण्याच्या कामीं बादशहास रावरतन व त्याचे पुत्र माधोसिंह व हरिसिंह यांची अतिशय मदत झाली. त्यामुळे जहांगीरने माधोसिंहास कोटाचें शहर व जहागीर इनाम देऊन त्यास रावरतनच्या बरोबरीचा राजा बनविलें. अशा रीतीने माधोसिंहापासून कोटाची शाखा निराळी होऊन हाडावतीच्या राष्ट्राचे दोन तुकडे पडले व त्यामुळेच पुढे त्या मजबूत राष्ट्राचें बळ क्षीण होत गेलें.

रावरतनच्या नंतर त्याचा नातू राव छत्रसाल बुन्दीच्या गादीवर बसला. सुप्रसिद्ध भूषण कवीच्या काव्याचा विषय बनलेला बुन्देल्यांचा स्वामी व महंमदखान बंगषाने बुन्देलखंडावर स्वारी केली असतां "जो गत ग्राह गजेंदर की सो गत भई है आज" म्हणून पहिल्या बाजीरावास पत्र लिहून बुन्देल्यांची लाज राखण्याची विनंती करणारा बुन्देला वीर छत्रसाल आणि रावरतनच्या गादीवर बसणारा प्रस्तुत हाडाराव छत्रसाल हे दोन भिन्न पुरुष होत हें वाचकांनी लक्षांत ठेवावयास पाहिजे.

हाडाराव छत्रसाल हा देखील मोठा पराक्रमी पुरुष होऊन गेला. राज्याधिकारासाठी शहाजहानच्या पुत्रांत लढाया झाल्या तेव्हा राज्याचा न्याय्य वारस जो दारा त्याच्याच बाजूने हा लढला व सामूगढच्या समरांगणावर अद्भुत पराक्रम गाजवून आपल्या हजारो हाडा अनुयायांसह तो धारातीर्थी पतन पावला. त्याने एकंदर ५२ लढाया मारल्याचा बुन्दीच्या बखरींत उल्लेख आहे. बून्दीच्या राजवाड्याचाही त्याने बराच विस्तार केला होता.

त्याच्यानंतर राव **भाऊसिंह** बुन्दीच्या गादीवर बसला. हाडांचें सामर्थ्य औरंगजेबही जाणून होता. राव भाऊसिंह यास चारहजार स्वारांची मनसबदारी देऊन त्याने मुअज्जमच्या सुभ्यावर पाठविलें. भाऊसिंह शूर, दयाळू व उदार होता. त्याच्या वागणुकीने औरंगाबादेस त्याची बरीच कीर्ति झाली होती व तेथेच तो मरण पावला. तो निपुत्रिक असल्याने त्याच्या भावाचा भीमसिंहाचा नातु **अनिरुद्धसिंह** त्याच्या पश्चात् बुन्दीच्या गादीवर बसला. हा औरंगजेबाबरोबर दक्षिणच्या लढायांत होता. नंतर त्यास लाहोर येथे शहाआलमच्या हाताखाली पाठविण्यांत आलें व तेथेच तो मरण पावला. त्याच्या नंतर त्याचा ज्येष्ठपुत्र **बुधसिंह** गादीवर बसला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रांत ज्या राज्याधिकाराच्या लढाया झाल्या त्यांत यानेही राज्याचा कायदेशीर वारस जो बहादुरशहा त्याचाच पक्ष धरला. याही लढायांत बरेच हाडावीर कामास आले. त्याने केलेल्या साहाय्याने तो बहादुरशहाचा अगदी निकट मित्र बनला होता. बहादुरशहापासून फरूकशिअरच्या कारकीर्दीपर्यंत रावबुध याचे दिवस चांगले गेले. परंतु पुढे त्याला अनेक विपत्ती भोगाव्या लागल्या.

रावबुधाच्या आपत्तीचें दिग्दर्शन करण्यापूर्वी थोडक्यांत हें लक्षांत ठेवणें जरूर आहे की, राव सूरजनच्या काळापासून म्हणजे सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून तों रावबुधाच्या अंतापर्यंत म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सुमारे दोनशें वर्षांत सूरजन, रावभोज, राव रतन, राव छत्रसाल, राव भाऊसिंह, राव अनिरुद्धसिंह व राव बुधसिंह असे एकूण सात राजे बुन्दीच्या गादीवर बसले व त्या सर्वांनी इमानेंइतबारें मोगल साम्राज्याची सेवा करून आपल्या प्रजेस सुख देण्याचा प्रयत्न केला.

फर्रुकशिअर बादशहाच्या कारकीर्दीपासून मोगल दरबारांत जी अव्यवस्था माजली तिचा हाडांच्या राज्यावरही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. फर्रुकशिअरला पदच्युत करण्याचा सय्यदबंधूंनी प्रयत्न केला असतां राव बुधसिहाने त्याचें संरक्षण केलें. परंतु जहांगीरने हाडावतीच्या हृदयांत कोटाचा सवता सुभा निर्माण करून जें शल्य उत्पन्न केलें त्याचे दुष्परिणाम झाल्याविना राहिले नाहीत. मोगल राजपुत्रांच्या उत्तराधिकाराच्या लढायांत बुन्दीच्या रावांनी जो पक्ष धरावा त्याच्या विरुद्ध पक्षास कोटाच्या हाडांनी सामील व्हावें असा प्रकार सतत चालला. त्या दोन शाखांतील वैमनस्यें कधीच उपशम पावलीं नाहीत. ह्या वैमनस्यांचा फायदा, अंबरचा राजा सवाई जयसिंह याने घेण्याचा प्रयत्न केला. त्याने बुन्दीच्या कारभारांत हस्तक्षेप करून रावबुध यास त्याच्या राज्यावरून हाकून लावलें व दुलीलसिंह नांवाच्या दुसऱ्या एका हाडावंशांतील पुरुषास बुन्दीच्या गादीवर बसविलें. या भानगडींत हाडावतीच्या राज्यांतील बराचसा प्रदेशही त्याने स्वतःच्या राज्यास जोडला. रावबुधाचे अंतिम दिवस बायकामुलांसह वनवासांतील विपत्ति भोगण्यांत गेले.

चौदा वर्षांच्या वनवासानंतर व बुंदी घेण्याचे अनेक अयशस्वी प्रयत्न केल्यानंतर रावबुधाचा पुत्र राव **उमेदसिंह** याने होळकरांच्या साहाय्याने १७४९ सालीं पुनरपि बुंदीच्या सिंहासनावर आरोहण केलें. पण ह्या साहाय्याचा मोबदला म्हणून होळकरानेही त्याचा बराच मुलूख घेतला. या घटनेंतील आणखी एक संस्मरणीय बाब अशी की, कोटाचा राव दुर्जनसाल याने पूर्वापार भाऊबंदकी विसरून मोठ्या औदार्याने राव उमेदसिंहास बुन्दीचें राज्य मिळवून देण्याच्या कामीं साहाय्य केलें.

राज्य प्राप्त झाल्यावर राव उमेदसिंह आणखी शेचाळीस वर्षें जगला. त्याच्या आयुष्याचा सर्वच काळ अत्यंत अंदाधुन्दींत गेला. मोगलसाम्राज्यास लागलेली उतरती कळा, मराठ्यांचीं आक्रमणें, राजपूत राजांचीं व सरदारांचीं आपसांतील भांडणें, बुन्दी व कोटाच्या गाद्यांचीं वैमनस्यें इ० अत्यंत बिकट परिस्थितीच्या वादळांतून स्वराष्ट्राची नौका सुरक्षितपणें हाकारण्यांतच उमेदसिंहास आपलें सर्व कर्तृत्व कामीं लावावें

लागलें. म्हातारपणीं राज्यकारभाराच्या जिगजिगीस कंटाळून व पुत्रावर— **अजितसिंहावर**—राज्यभार सोपवून तो तीर्थयात्रेस निघून गेला. परंतु अजितसिंह मरण पावल्यानंतर आपल्या अज्ञान नातवाचा व त्याच्या राज्याचा प्रतिपाळ करण्यासाठी त्यास परत येऊन पुनरपि राज्य·कारभाराची धुरा स्वस्कंधीं धारण करावी लागली. उमेदसिंह १८०४ सालीं मरण पावला. त्याच्या तपस्येस, वार्धक्यास, ज्ञानास व अनुभवास राजस्थानांतील राजे व सरदार अतिशय मान देत. त्याने आपल्या आयु·ष्यांत अनेक आपत्ती भोगल्या. त्याच्या काळांत तो राजस्थानांतील अद्वितीय पूजनीय पुरुष बनलेला होता व त्याच्याइतका सार्वत्रिक आदर कोणीच उपभोगला नसेल.

राव उमेदसिंहाच्या मृत्यूनंतर आता आपण इंग्रजी अमदानीच्या प्रारंभकालांत येऊन पोचलों. या काळांत बुन्दीचा आणखी बराचसा मुलूख जयपूरचे राजे व मराठे यांनी घेतला. उमेदसिंहाचा नातू राव **बिशन-सिंह** हा आपलें अल्प सामर्थ्य जाणून होता. त्यामुळे आपल्या राष्ट्राचा होत असलेला नाश निमूटपणें पाहण्यापलीकडे तो कांहीच करूं शकला नाही. होळकर व इंग्रज यांच्यांत झालेला युद्धांत त्याने इंग्रजांस मदत केली. आणि मराठी सत्तेचा पाडाव झालेला पाहतांच त्याने इंग्रजी सत्तेचें सार्व-भौमत्व मान्य करून १८१८ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत कंपनीसरकार-बरोबर मांडलिकत्वाचा तहनामा केला. होळकर व शिंद्यांनी घेतलेले त्याचे कांही जिल्हे इंग्रजांनी त्यास परत देवविले.

बिशनसिंह हाही हाडा राजपुतांच्या शौर्याचा एक नमुना होता. शिकार खेळण्याचा त्यास अतिशय नाद असे. त्याने आपल्या हाताने १०० सिंह व शेंकडो वाघ–अस्वलें मारलीं होतीं असें म्हणतात. तो १८२१ सालीं मरण पावला. त्याच्या कारकीर्दीने वस्तुतः हाडावतीच्या या प्राचीन इतिहासावर पडदा पडला. परंतु याच वंशांतून वाढलेल्या दुसऱ्या **कोटाच्या** राज्याचा वृत्तांत संक्षेपतः का होईना पण पाहिल्याविना हाडावतीचें इतिहासकथन संपूर्ण होणार नाही.

जहांगीर बादशाहाने बुन्दीचा राव रतनसिंह याचा पुत्र **माधोसिंह** याच्यावर प्रसन्न होऊन त्यास कोटाचा राजा बनविल्याचा व कोटाची

गादी निर्माण केल्याचा वृत्तांत मागे दिलाच आहे. माधोसिंह व त्याच्या नंतर कोटाच्या गादीवर बसलेल्या पुरुषांनीही मोगल सिंहासनाचीच चाकरी केली. परंतु मोगल राजपुत्रांच्या उत्तराधिकाराच्या लढायांत त्यांनी बुन्दीच्या विरुद्ध पक्ष धरला व त्यामुळे लढाया जरी मोगल राजपुत्रांत झाल्या तरी मेले हाडाविरुद्ध हाडा लढून. अशा तऱ्हेने तिसऱ्याच्याच फायद्यासाठी शूर राजपुतांनी एकमेकांवर तरवारी चालवून हा आत्मनाश करून घेतला. ह्या लढायांत व ह्यानंतरच्या मोगल बादशहांच्या स्वाऱ्यांत हजारो हाडा वीर कामास आले.

माधोसिंहानंतर **मुकुंदसिंह, पायमसिंह, किशोरसिंह, रामसिंह** व **भीमसिंह** इतके पुरुष १७२४ पर्यन्त कोटाच्या गादीवर बसले. त्यांपैकी पायमसिंह नालायक असल्याने सरदारांनी त्यास पदच्युत करून किशोरसिंहास गादीवर बसविलें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ह्या सर्वांत भीमसिंह अतिशय कर्तृत्ववान निघाला. मोगल दरबारांतली अव्यवस्था पाहून त्याने आपल्या राज्याचा बराच विस्तार साधून घेतला. बन्दीच्या आपल्या वडील शाखेच्या गादीशीं त्याने अखंड वैर केलें व राव बुधसिंहास पदच्युत करण्याच्या कामीं त्याने सवाई जयसिंहास साहाय्य केलें. मोगल दरबारांतला तो पंचहजारी मनसबदार बनला होता व महाराव ही पदवी त्याने धारण केली होती.

१७२४ सालीं भीमसिंहाचा पुत्र महाराव **दुर्जनसाल** कोटाच्या गादीवर आला. याने मात्र रावबुधाचा पुत्र राव **उमेदसिंह** यास बुन्दीच्या गादीवर प्रस्थापित करण्याच्या कामीं उदार मनाने साहाय्य केलें. जयपूरच्या राजांचें मांडलिकत्व नाकारण्यांतही त्याने चांगलेंच धैर्य दाखविलें. तत्कालीन धामधुमीच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यानेही आपला राज्यविस्तार साधला. त्याच्या नंतर इ. स. १७६१ पर्यंत म्हणजे पानिपतच्या लढाईपर्यंत **अजितसिंह** व राव **छत्रसाल** हे आणखी दोन राजे कोटाच्या गादीवर बसले. छत्रसालच्या कारकीर्दीत जयपूरचा महाराजा माधवसिंह याने कोटाच्या राज्यावर स्वारी केली. परंतु त्याचा बटवारोच्या लढाईंत कोटाच्या हाडांनी खासा पराजय केला. याच लढाईंत कोटचाचा सरदार जालीमसिंह हा प्रथम प्रसिद्ध झाला. राजपूत, मराठे

यांच्या व इंग्रजांच्या इतिहासांतही जालीमसिंहाचें नांव अतिशय प्रसिद्ध आहे.

सन १७६६ मध्ये छत्रसालच्या मृत्यूनंतर महाराव **गोमनसिंह** कोटाच्या गादीवर बसला. १७६६ पासून १८१८ पर्यंतचा कोटाचा इतिहास इतर राजपूत राज्यांच्या इतिहासाहून फारसा वेगळा नाही. गोमनसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा १० वर्षांचा पुत्र **उमेदसिंह** गादीवर बसला. अंतकालीं गोमनसिंहाने जालीमसिंहास त्याचा पालक नेमून राज्याचा कारभार त्याच्या स्वाधीन केला. यापुढचा कोटाचा इतिहास म्हणजे वस्तुतः जालीमसिंहाचें चरित्रच होय. मेवाड, जयपूर व मारवाडचे राजपूत राजे, मराठे सरदार व इंग्रज या सर्वांच्या बरोबर त्याचे महत्त्वाचे संबंध आले. भांडखोर सरदारांना स्वतःच्या जरबेखाली वागविण्याचा त्याने सतत प्रयत्न केल्यामुळे त्याच्या जिवाविरुद्ध त्यांनी अनेक अयशस्वी कट व कारस्थानें केलीं. कोटयाच्या राज्यांत अनेक शेतकीविषयक व आर्थिक घडामोडी करून राज्याची पडती स्थिति त्याने ५० वर्षे सांभाळून धरली. तुलनात्मक दृष्टीने इतर राजपूत राज्यांपेक्षा कोटयाची एकंदर बरबादी त्याच्या प्रयत्नामुळे बरीच कमी झाली असें म्हणावें लागेल. कृषीच्या केंद्रीकरणाचा प्रयत्न करून सामुदायिक प्रमाणावर शेती करून दाखविण्याचा प्रयोग त्याने यशस्वी करून दाखविला. इंग्रजी आक्रमणाचें स्वरूप ओळखून त्यांशीं सामना करतां येण्यासारखी राज्यपद्धति निर्माण करण्याचा त्याने प्रयत्न केला. पण एकंदर हिंदवी वातावरणांतच त्यावेळीं एवढा प्रचंड क्षोभ उत्पन्न झाला होता की, त्यापुढे एवढ्याशा कोटयाच्या राज्यांतील जालीमसिंहाचे प्रयत्न टिकणें अशक्य होतें. लूट, खून, मारामाऱ्या, लढाया, विश्वासघात, कारस्थानें, राज्याची बरबादी, प्रजेवरील जुलूम व अत्याचार, दुष्काळ, दारिद्र्य यांनी सर्व देशाचें वातावरण नुसतें फदफदून निघालें होतें. आपत्तींचा कहर झाला होता. अशा सर्वत्र आभाळ फाटलेल्या परिस्थितींत एकटया बिचाऱ्या जालीमचे प्रयत्नच कितीसे सफल होणार ?

जालीमसिंहाच्या एकंदर कर्तृत्वाने तत्कालीन राजकारणावर केवढी छाप पाडली होती याचें एक उदाहरण येथे सांगण्यासारखें आहे. १८१८ सालीं सर्व राजेरजवाड्यांबरोबर मांडलिकत्वाचे तहनामे करून

इंग्रजांनी आपली सत्ता सार्वभौम बनल्याचें जाहीर केलें. लुटालूट, जाळपोळ, लढाया, दुष्काळ इ० अनेकविध आपत्तींनी गांजलेल्या प्रजेला आतां आपणास शांतता व स्वस्थता यांचा लाभ होणार म्हणून आनंद झाला. सुमारें दोन वर्षें ही परिस्थिति टिकली. परंतु त्यानंतर लवकरच देशांतील राजकारणी पुरुषांच्या डोळ्यावरील मायापटल दूर झालें आणि एका अनुल्लंघ्य अशा पारतंत्र्याच्या कर्दमांत आपण रुतलों आहोंत याची त्यांस जाणीव झाली. ह्या जाणिवेबरोबर हिंदी राजकीय वातावरणांत पुन: एक प्रचंड खळबळ सुरू झाली. हिंदुस्थानच्या या टोकापासून तों त्या टोकापर्यंत ही खळबळ थांतून पसरली. तिला व्यक्त स्वरूप येण्याला फक्त एकाच गोष्टीची गरज होती. व ती म्हणजे योग्य पुढाऱ्याची, जनतेची व देशी राजेरजवाड्यांची मन:स्थिति जाणणारा, अनुभवी व इंग्रजी मुत्सद्देगिरीचा परिचय असलेला असा एक जबरदस्त पुढारी यावेळीं पुढे सरसावता तर कदाचित १८५७ ची आवृत्ति १८२१-२२ सालींच निघाली असती. अशा लायकीचा व कर्तृत्वाचा एकच पुरुष त्या काळीं हिंदुस्थानांत हयात होता व तो म्हणजे कोटयाचा जालीमसिंह होय, असें क० टॉडने आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे. जालीमसिंहास स्वत:स ह्या गोष्टीची जाणीव नव्हती असें नाही व "मी २० वर्षांनी तरुण असतों तर जरूर–" असे त्याने काढलेले उद्गारही टॉडने आपल्या पुस्तकांत उद्धृत केले आहेत. पण ८२ वर्षांचा वृद्ध व दोन्ही डोळ्यांनी आंधळा बनलेला जालीमसिंह आता काय करूं शकणार होता ?

अखेरीस शांततेचा व स्वस्थतेचा ताम्रपट बरोबर घेऊन आलेल्या इंग्रज बहादुराबरोबर मांडलिकत्वाचा तहनामा करून जालीमसिंहानेही आपल्यावरील जबाबदारी संपविली. कोटयाच्या रावाने थोडीशी दांडगाई करण्याचा प्रयत्न केला. पण जेथे एवढे बलाढ्य मराठे परास्त झाले व एवढा राजकारणी जालीमसिंहही दीन बनला तेथे एकटया कोटयाच्या रावाचा कितीसा पाड लागणार? इंग्रजांच्या संगिनींपुढे तो किती टिकाव धरणार ? राज्य सोडून त्यास पलायन करावें लागलें. पण इंग्रजांनी दयावंत होऊन त्याचें राज्य त्यास परत दिलें व कोटाची गादी कायम ठेवली. येथेच हाडावतीच्या इतिहासास पूर्ण विराम मिळाला.

प्रकरण तिसरें

राठोड आणि त्यांची मरुभूमि

अरवली पर्वताच्या पूर्वेस असणाऱ्या प्रमुख राजपूत राज्यांचा इतिहास पाहिल्यानंतर आता आपणास अरवलीच्या पश्चिमेस असलेल्या मरुभूमीकडे वळणें जरूर आहे. मरुभूमीच्या या भयंकर वालुकामय प्रदेशांत येऊन वास्तव्य करणाऱ्या व तेथे वैदिक संस्कृतीचा ध्वज उभा करणाऱ्या लोकांत मारवाडच्या राजपूत राठोड यांचें नांव अग्रेसरत्वाने घ्यावें लागेल. राजस्थानच्या मरुस्थलींत आजही विद्यमान असणाऱ्या राजपूत राज्यांत मारवाडचें राज्य सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे. राठोडांच्या या मरुस्थलींत झालेल्या वास्तव्याचें कारणही महंमदी आक्रमण हेंच होय. किंबहुना महंमदी आक्रमणाने आर्यावर्तांतील सपाट प्रदेशाचा आश्रय तुटल्यावर गुलामीच्या पिंजऱ्यांत बद्ध होऊन राहण्याचें ज्यांनी नाकारलें व त्यासाठी मिळेल त्या बिकट प्रदेशांत वास्तव्य करूनही ज्यांनी आपल्या स्वातंत्र्याची तेजस्विता सतत पांचशें वर्षेपर्यंत टिकविली अशा स्वातंत्र्याकांक्षी चंडोलांमध्येच मारवाडच्या राठोड राजवंशाचीही प्रामुख्याने गणना केली पाहिजे.

मारवाडचे राठोड हे कनौजच्या जयचंद राठोडाचे वंशज होत. पृथ्वीराज चाहमानाचा नाश केल्यानंतर महंमद घोरीचा जयचंदाबरोबर सामना झाला. त्यांत जयचंदाचा पराभव होऊन घोरीने कनौजचें अतिश्रीमंत नगर मनसोक्त लुटलें. पराभूत जयचंदाने हत्तीसह नदीप्रवेश करून जलसमाधि घेतली. त्याचा आश्रयविहीन नातू **शिवजी** भटकत भटकत अखेरीस हिंदु संस्कृतीच्या त्याच आश्रयस्थानाकडे–राजस्थानकडे–वळला व मरुस्थलीच्या प्रदेशांतील कोलूमदच्या सोळंकी सरदाराच्या आश्रयास राहिला. त्याच्या पदरीं राहून शिवजीने गाजविलेल्या शौर्यामुळे प्रसन्न होऊन सोळंकीने आपल्या भगिनीबरोबर शिवजीचा विवाह लाऊन

दिला. मरुस्थलीच्या वाळवंटांत राज्य करणाऱ्या तत्कालीन लहान लहान राजांत शिवजीच्या पराक्रमाचा बराच दरारा बसला. मेर व मीना जातीच्या मूळ रहिवाशांकडून पालीवाल ब्राह्मणांचा छळ होत होता. तेव्हा त्या ब्राह्मणांच्या विनंतीवरून शिवजीने मेर-मीनांच्या सरदारांना मारलें व त्यांचा प्रदेश काबीज करून तेथेच आपल्या स्वतंत्र राज्याची प्रस्थापना केली. हा मारवाडच्या राज्याचा मूळारंभ होय.

सन ११९३ ते १४०० पर्यन्तच्या सुमारें दोन शतकांच्या काळांत शिवजीच्या नंतर **अश्वत्थामा, डूहर, रायमाल, कन्हल, जल्हण, चाडो, थीडो, सिल्को, बीरमदेव,** व **चोंडा,** इतक्या वंशजांनी त्यांनी स्थापन केलेल्या राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. मरुस्थलींतील पूर्वीच्या छोटयामोठया राजांना जिंकून व तेथील मूळरहिवाशांना परास्त करून त्यांचे प्रदेश त्यांनी आपल्या राज्यास जोडले. अश्वत्थाम्याचा पुत्र डूहर याने तर कनोजवर स्वारी करून आपल्या पूर्वपुरुषांची ती मातृनगरी मुसलमानांपासून जिंकून घेण्याचा धाडसी प्रयत्न करून पाहिला. परंतु पुनरपि कनोजची भूमि त्याच्याच रक्ताने रंजित झाली. ह्या अकरा पिढयांत शिवजीच्या राठोडवंशाचा वृक्ष मरुस्थलींत बराच मोठा वाढला होता व त्यास अनेक शाखोपशाखा फुटल्या होत्या.

चौदाव्या शतकाच्या अखेरीस चोंडा राठोडाने ह्या सर्वांचें संघटन करून पुरिहारांची राजधानी जी मंडावर उर्फ मंडोर शहर त्यावर स्वारी करून तें जिंकलें व तेथेच आपल्या राज्याची राजधानी नेली. राठोडांनी हा काळपर्यंत आपला राज्यविस्तार बराच साधला असला तरी मेवाडचें श्रेष्ठत्व ते मान्य करीत व त्याच्या सेवेसाठी आपली तरवार नेहमी सज्ज ठेवीत. मेवाडचे व त्यांचे शरीरसंबंधही सुरू झाले होते.

चोंडाच्या नंतर **रणमल्ल** मंडावरच्या गादीवर बसला. तो आपल्या काळांतील अत्यंत बलाढ्य शरीराचा पुरुष होता. मेवाडचा महाराणा लाखा यास त्याची बहीण दिली होती. त्याचा मृत्यु झाल्यानंतर आपल्या विधवा भगिनीच्या वतीने मेवाडचा राज्यकारभार चालविण्यासाठी रणमल्ल चितोडास जाऊन राहिला. परंतु तेथे त्यास दुर्बुद्धि सुचून आपल्या भाचाचें तें राज्य बळकावण्याचा त्याने प्रयत्न केला. पण मेवाडचा

प्रकरण तिसरें

राठोड आणि त्यांची मरुभूमि

अरवली पर्वताच्या पूर्वेस असणाऱ्या प्रमुख राजपूत राज्यांचा इतिहास पाहिल्यानंतर आता आपणास अरवलीच्या पश्चिमेस असलेल्या मरुभूमीकडे वळणें जरूर आहे. मरुभूमीच्या या भयंकर वालुकामय प्रदेशांत येऊन वास्तव्य करणाऱ्या व तेथे वैदिक संस्कृतीचा ध्वज उभा करणाऱ्या लोकांत मारवाडचे राजपूत राठोड यांचें नांव अग्रेसरत्वाने घ्यावें लागेल. राजस्थानच्या मरुस्थलींत आजही विद्यमान असणाऱ्या राजपूत राज्यांत मारवाडचें राज्य सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे. राठोडांच्या या मरुस्थलींत झालेल्या वास्तव्याचें कारणही महंमदी आक्रमण हेंच होय. किंबहुना महंमदी आक्रमणाने आर्यावर्तातील सपाट प्रदेशाचा आश्रय तुटल्यावर गुलामीच्या पिंजऱ्यांत बद्ध होऊन राहण्याचें ज्यांनी नाकारलें व त्यासाठी मिळेल त्या बिकट प्रदेशांत वास्तव्य करूनही ज्यांनी आपल्या स्वातंत्र्याची तेजस्विता सतत पांचशें वर्षेपर्यंत टिकविली अशा स्वातंत्र्याकांक्षी चंडोलांमध्येच मारवाडच्या राठोड राजवंशाचीही प्रामुख्याने गणना केली पाहिजे.

मारवाडचे राठोड हे कनौजच्या जयचंद राठोडाचे वंशज होत. पृथ्वीराज चाहमानाचा नाश केल्यानंतर महंमद घोरीचा जयचंदाबरोबर सामना झाला. त्यांत जयचंदाचा पराभव होऊन घोरीने कनौजचें अतिश्रीमंत नगर मनसोक्त लुटलें. पराभूत जयचंदाने हत्तीसह नदीप्रवेश करून जलसमाधि घेतली. त्याचा आश्रयविहीन नातू **शिवजी** भटकत भटकत अखेरीस हिंदु संस्कृतीच्या त्याच आश्रयस्थानाकडे–राजस्थानकडे–वळला व मरुस्थलीच्या प्रदेशांतील कोलूमदच्या सोळंकी सरदाराच्या आश्रयास राहिला. त्याच्या पदरीं राहून शिवजीने गाजविलेल्या शौर्यामुळे प्रसन्न होऊन सोळंकीने आपल्या भगिनीबरोबर शिवजीचा विवाह लाऊन

दिला. मरुस्थलीच्या वाळवंटांत राज्य करणाऱ्या तत्कालीन लहान लहान राजांत शिवजीच्या पराक्रमाचा बराच दरारा बसला. मेर व मीना जातीच्या मूळ रहिवाशांकडून पालीवाल ब्राह्मणांचा छळ होत होता. तेव्हा त्या ब्राह्मणांच्या विनंतीवरून शिवजीने मेर–मीनांच्या सरदारांना मारलें व त्यांचा प्रदेश काबीज करून तेथेच आपल्या स्वतंत्र राज्याची प्रस्थापना केली. हा मारवाडच्या राज्याचा मूळारंभ होय.

सन ११९३ ते १४०० पर्यन्तच्या सुमारें दोन शतकांच्या काळांत शिवजीच्या नंतर **अश्वत्थामा, डूहर, रायमाल, कन्हल, जल्हण, चाडो, थीडो, सिल्को, बीरमदेव,** व **चोंडा,** इतक्या वंशजांनी त्यांनी स्थापन केलेल्या राज्याचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला. मरुस्थलींतील पूर्वीच्या छोटयामोठ्या राजांना जिंकून व तेथील मूळरहिवाशांना परास्त करून त्यांचे प्रदेश त्यांनी आपल्या राज्यास जोडले. अश्वत्थाम्याचा पुत्र डूहर याने तर कनोजवर स्वारी करून आपल्या पूर्वपुरुषांची ती मातृनगरी मुसलमानांपासून जिंकून घेण्याचा धाडसी प्रयत्न करून पाहिला. परंतु पुनरपि कनोजची भूमि त्याच्याच रक्ताने रंजित झाली. ह्या अकरा पिढ्यांत शिवजीच्या राठोडवंशाचा वृक्ष मरुस्थलींत बराच मोठा वाढला होता व त्यास अनेक शाखोपशाखा फुटल्या होत्या.

चौदाव्या शतकाच्या अखेरीस चोंडा राठोडाने ह्या सर्वांचें संघटन करून पुरिहारांची राजधानी जी मंडावर उर्फ मंडोर शहर त्यावर स्वारी करून तें जिंकलें व तेथेच आपल्या राज्याची राजधानी नेली. राठोडांनी हा काळपर्यंत आपला राज्यविस्तार बराच साधला असला तरी मेवाडचें श्रेष्ठत्व ते मान्य करीत व त्याच्या सेवेसाठी आपली तरवार नेहमी सज्ज ठेवीत. मेवाडचे व त्यांचे शरीरसंबंधही सुरू झाले होते.

चोंडाच्या नंतर **रणमल्ल** मंडावरच्या गादीवर बसला. तो आपल्या काळांतील अत्यंत बलाढ्य शरीराचा पुरुष होता. मेवाडचा महाराणा लाखा यास त्याची बहीण दिली होती. त्याचा मृत्यु झाल्यानंतर आपल्या विधवा भगिनीच्या वतीने मेवाडचा राज्यकारभार चालविण्यासाठी रणमल्ल चितोडास जाऊन राहिला. परंतु तेथे त्यास दुर्बुद्धि सुचून आपल्या भाचाचें तें राज्य बळकावण्याचा त्याने प्रयत्न केला. पण मेवाडचा

भीष्मवीर चोंडा याने त्याचा प्रयत्न फसवून त्यासच ठार मारविलें व त्याच्या बरोबर चितोडच्या दुर्गावर असलेल्या सर्व राठोडांचा उच्छेद करविला.

या उच्छेदामधून रणमल्लाचा पुत्र **जोधा** फक्त बचावून निघाला व कालान्तराने पुनः आपल्या पैतृक राज्याचा कारभार त्याने हातीं घेतला. राठोडांच्या इतिहासांत हा जोधा फारच प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. त्याने जोधपूर शहराची प्रस्थापना करून तेथेच आपली राजधानी केली. तेव्हा-पासून ती तेथेच आहे. जोधाच्या १४ पुत्रांपैकी सहावा पुत्र बीका याने पश्चिमेकडच्या वाळ टांत दूरवर शिरून तिकडे बिकानेरच्या स्वतंत्र राज्याची प्रस्थापना केली. जोधपुरांत जोधाने ३० वर्षे राज्य केलें. म्हणजे पंधराव्या शतकाच्या अंतापर्यंत जोधाने मारवाडचें वैभव वाढविलें. त्याच्या शासनकालांत मारवाडची गणना मेवाडच्या खालोखाल होऊं लागली. यावरून जोधाची कर्तबगारी व्यक्त होते.

जोधाच्या नंतर त्याचा पुत्र **सूरजमल** जोधपूरच्या गादीवर बसला. त्याचा मुसलमानांशीं संघर्ष आला. १५१६ सालीं पीपरच्या यात्रेवर हल्ला करून पठाणांनी १४० राजपूत स्त्रिया पळवून नेल्या. ही बातमी कळतांच सूरजमल्लाने आपले राठोड वीर बरोबर घेऊन पठाणांचा पाठलाग केला व त्यांचें पारिपत्य करून राजपूत रमणींची सुटका केली. पण स्त्रीदाक्षिण्याच्या या शूर कृत्यांत सूरजमल्लास आपल्या प्राणांचा बळी द्यावा लागला. त्याच्या राठोड शिपायांनीही यच्चयावत पठाण कापून काढून आपल्या स्वामीच्या वधाचा सूड तेथल्या तेथेच घेतला.

सूरजमल्लाच्या नंतर त्याचा नातू **गंगा** मारवाडच्या सिंहासनावर बसला. गंगाचा चुलता संग याने दौलतखान लोदीच्या साहाय्याने मार-वाडची गादी हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. पण गंगाच्या राठोडांनी संगास त्याच्या राष्ट्रद्रोहाचें देहांत प्रायश्चित देऊन लोदीच्या पठाण सैनिकांना खासा चोप दिला. ही लढाई इ. स. १५१६ च्या सुमारास झाली. गंगाच्या कारकीर्दींतच बाबरची हिंदुस्थानवर चढाई झाली. त्याच्या प्रतिकारासाठी मेवाडचा महाराणा संग याच्या नेतृत्वाखाली राजपुतांचें जें संघटन तयार झालें होतें त्यांत मारवाडनेही महत्त्वाचा भाग

घेतला. बाबराशीं झालेल्या शिक्री येथील राजपुतांच्या लढाईंत गंगाचा नातू रायमल्ल व इतर अनेक राठोड सरदार राष्ट्रकारणीं कामास आले.

इ. स. १५३२ सालीं महाराजा गंगा मरण पावला व **मालदेव** गादीवर बसला. हा मालदेव फार कर्तृत्ववान व विख्यात पुरुष झाला. त्याच्या कर्तृत्वास अवसर मिळण्यासारखी राजकीय परिस्थितिही त्या वेळीं निर्माण झाली होती. महाराणा संग्रामसिंहाच्या मृत्यूनंतर मेवाडच्या सिंहासनावर जे दोन अयोग्य पुरुष बसले त्यामुळे त्या प्रभावी राष्ट्राचा गौरव बराच कमी झाला होता. दिल्लीच्या तख्तावर बाबरानंतर हुमायून बसला. पण त्यासही पठाणांनी हाकून लावल्यामुळे वनवासी जीवन कंठावें लागलें. प्रबळ राजसत्तेच्या अभावीं आर्यावर्तांत माजलेल्या अस्वस्थतेचा मालदेवाने भरपूर फायदा घेऊन मारवाडच्या राज्याचा चांगलाच विस्तार केला. नागोर व अजमीर जिंकून त्याने तीं आपल्या राज्यास जोडलीं. हीं दोन्हीं ठिकाणें ताब्यांत ठेवण्यासाठी मुसलमान व राजपूत यांच्यांत ४००।५०० वर्षें रस्सीखेच चाललेली आपणास आढळून येते. बीकाने स्थापन केलेल्या बीकानेरच्या स्वतंत्र गादीस मालदेवाने आपल्या अंकित बनविलें. केवळ राज्यविस्तार करूनच मालदेव थांबला नाही तर राज्याच्या मजबुतीसाठी त्याने अनेक किल्लेही बांधले. जोधपूर शहराच्या भोवती त्याने मजबूत तट बांधला. राजस्थानांतील एकंदर ३८ जिल्ह्यांवर त्याचा राज्यविस्तार झाला होता व त्यांत कित्येक सुपीक प्रदेशांचा अंतर्भाव होत होता. त्याशिवाय राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनेही त्याने बरीच सुधारणा केली. आजपर्यंत शिवजीच्या राठोड वंशांतले जे हजारों पुरुष इतस्ततः पसरले होते व त्यांतील कित्येक लहान लहान प्रदेश काबीज करून बसले होते त्या सर्वांना त्याने एका मारवाडच्या ध्वजाखाली संघटित करून जहागिरी व वतनें नेमून दिलीं आणि राज्यकारभारांतले अधिकार वाटून त्यांच्या ठिकाणीं मेवाडच्या गादीविषयीं जबाबदारी व निष्ठा निर्माण केली. राजकीय दृष्ट्या सभोवारची परिस्थिति अत्यंत धामधुमीची व क्रांतीची असतांनाही त्याने आपल्या राज्यांत इतकी अंतर्गत सुव्यवस्था निर्माण करून राज्यविस्तारही केला यावरून मालदेवाची योग्यता प्रकट होते.

हुमायूनने आपल्या वनवासांत मालदेवाचा आश्रय मागितला पण तो त्याने नाकारला. लवकरच दिल्लीचा सुलतान पठाण शेरशाह याने ८० हजार फौज घेऊन मारवाडवर आक्रमण केलें. त्याच्याबरोबर सामना करण्यास मालदेवाचे पन्नास हजार राठोड रणमैदानांत उभे राहिले. मालदेवाने या लढाईंत उत्तम सेनापतीचे गुण प्रकट केले असले तरी त्याचा पराभव झाला. परंतु पठाणही पुढे न सरकतां परत निघून गेला. लवकरच सूरवंशाचा उच्छेद होऊन मोगलवंश दिल्लीच्या गादीवर आला. हूमायूनच्या मागून अकबराने आपल्या हातीं कारभार घेतल्यावर आपल्या बापास आश्रय न दिल्याबद्दल मालदेवाचा सूड घेण्याचें ठरवून मारवाडवर आक्रमण केलें. इ. स. १५६१ पासून १५६९ पर्यंत अकबराने आपल्या संपूर्ण शक्तीने राठोडांचें दमन करण्याचा प्रयत्न केला व अखेरीस त्यास यश आलें. या बाबतींत मेवाडने दाखविलेली चिकाटी व अतुलनीय स्वार्थत्याग मारवाडला दाखवितां आला नसला, तरी अकबरासारख्या सम्राटास मारवाडचें दमन करण्यास नऊ वर्षें लागलीं यावरूनच राठोडां-नीही आपल्या स्वातंत्र्यसंरक्षणाचा तीव्रतेने प्रयत्न करून पाहिला याबाबत शंका राहत नाही. मालदेवाने अकबराचें सार्वभौमत्व मान्य केलें व आपल्या द्वितीय पुत्राच्या नांवाने साम्राज्याची मनसबदारी स्वीकारली.

अशा तऱ्हेनें मालदेवाने राठोडांचें स्वातंत्र्य स्वहस्ताने पददलित करून घेतलें असलें तरी त्याचा ज्येष्ठ पुत्र **चंद्रसेन** याने बापाच्या या स्वातंत्र्यविक्रयाचा स्पष्ट धिक्कार केला आणि मारवाडच्या अगदी पश्चिम कोपऱ्यांतील रेताड प्रदेशांत जाऊन तो आपणास मारवाडचा स्वतंत्र राजा म्हणवून घेऊं लागला. आपल्या सम्राटपदाचा हा अपमान अकबरास सहन झाला नाही व त्याने चंद्रसेनाचें दमन करण्यासाठी मोगल सेनेची योजना केली. स्वतंत्रतादेवीचा उपासक राठोड वीर चंद्रसेन आणखी सतरा वर्षें मोगलांशीं लढत राहिला. त्याच्या स्वातंत्र्यनिष्ठेचे पुजारी असे हजारों राठोड वीर आपल्या घरादारांचा त्याग करून त्या भीषण मरुभूमींत वास्तव्य करण्यास व त्याच्या प्राणाबरोबर प्राण अर्पण करण्यास त्याच्या स्वतंत्र छत्राखाली जमा झाले होते. राठोडांच्या ह्या स्वातंत्र्ययुद्धाचा शेवट सतरा वर्षांनंतर चंद्रसेनाच्या धारातीर्थीं पतन

पावण्यामुळेच झाला. राठोडांच्या इतिहासांत चंद्रसेनाची स्वातंत्र्यनिष्ठा व त्याच्या राठोड अनुयायांचा स्वार्थत्याग चिरस्मरणीय राहील यांत शंका नाही.

अशा रीतीनें एकदा मोगलांचा मांडलिक बनलेला मारवाड पुढें कायमचा तसाच राहिला असेल व गुलामीची शृंखला तोडण्याचा त्याने प्रयत्नही करून पाहिला नसेल अशी अम्बर व हाडावतीच्या इतिहासावरून वाचकांनी आपली समजूत करून घेण्याचें कारण नाही. तेराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंत ३०० वर्षे जतन केलेलें राठोडांच्या स्वातंत्र्याचें माणिक जरी ह्या खेपेस मोगल बादशहाने हिरावून नेलें असलें तरी तें परत मिळविण्याचा यापुढे राठोडांनी अनेकवार प्रयत्न केला. त्याच्या स्वातंत्र्याकांक्षेचें पाणी पुनः पुनः कसें उसळून येत असे ह्याचाच इतिहास आता यापुढे पाहावयाचा आहे. हा इतिहास केवळ अनिवार स्वातंत्र्यलालसेच्या एकाच रंगाने रंजित असता तर फार निराळा झाला असता. पण गुलामगिरीमुळे उत्पन्न होणाऱ्या हीन मनोवृत्तीच्या अनेकरंगी छटा त्यांत मिसळलेल्या आहेत हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. निर्माण झालेल्या प्रत्येक परिस्थितीचा आपल्या स्वातंत्र्यप्रस्थापनेच्या दृष्टीने कसा उपयोग करून घेतां येईल ह्याच एका गोष्टीचा अहर्निश विचार करणारे पुरुष जसे यानंतर शिवजीच्या वंशांत निर्माण झालेले दिसतात, त्याचप्रमाणें पादशहाची पदधूली आपल्या मस्तकीं धारण करून त्याच्या सेवेंत आपल्या भगिनी व कन्या अर्पण करणारे कुलाधमही उत्पन्न झालेले दिसतात. त्यामुळेच यापुढच्या मारवाडचा इतिहास कधी स्फूर्तीच्या वारूवर आरोहण करण्यास लावतो तर कधी अनुकंपा व लज्जेच्या कृष्णपटाआड आपलें तोंड लपविण्याचें वाचकाच्या नशिबीं आणतो.

परकी सत्तेच्या समोर मान झुकवून परवशतेचें लाजिरवाणें जिणें कंठण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी लढत लढत मालदेवाच्या ज्येष्ठपुत्राने चंद्रसेनाने धारातीर्थीं देह ठेवला; तर त्याच्याच द्वितीयपुत्राने—**उमेदसिंहाने**—अकबराचा गुलाम म्हणून मोहक साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा उपभोग घेत घेत मारवाडचा राज्यशकट हाकला. एवढेंच नव्हे तर त्याने राठोड राजकन्या जोधाबाई सुद्धा सम्राट अकबरास अर्पण केली. राठोड सुन्दरीच्या ह्या

तनुविक्रयाचें बक्षीस म्हणून अकबराने त्याचा जिंकलेला सर्व मुलूख, अजमीर खेरीजकरून, त्यास परत दिला.

उमेदसिंहाच्या अनेक पुत्रांनी आपापल्या पराक्रमाने निरनिराळा प्रदेश संपादन केला. त्यांपैकी किशनसिंहाने स्थापन केलेलें किशनगढचें लहानसें राज्य ब्रिटिशसार्वभौमाचें साक्षात मांडलिक या नात्याने आजही नांदत आहे. उमेदसिंह इ. स. १५९५ सालीं मरण पावला व त्याच्यानंतर त्याचा पुत्र **सूरसिंह** मारवाडच्या गादीवर बसला. अकबराच्या साम्राज्य-विजयांत त्याने बरीच महत्त्वाची कामगिरी बजावली. तीवर प्रसन्न होऊन अकबरानेही त्यास सवाई राजा अशी पदवी बहाल केली होती. मारवाड-च्या गादीवर बसण्यापूर्वी व नंतरही त्याचा सर्व जन्म शाही फौजांबरो-बर स्वाऱ्यांवर जाण्यांतच गेला व शेवटीं दक्षिणच्या स्वारीवर असतां तिकडेच तो मरण पावला. राजोपभोगास अनुकूल असें सर्वैश्वर्यसंपन्न स्वतःत्रें राज्य असतांना त्यास परकी सम्राटाच्या सेवेंत मातृभूमीपासून शेंकडो कोस दूर जन्म घालवावा लागला व मरतांना देखील मातृभूमीचें दर्शन त्यास होऊं शकलें नाही. हें आपल्या गुलामीच्या पापाचेंच जणूं काय प्रायश्चित्त होय असा मृत्युसमयीं त्यास मोठा विषाद वाटला व यापुढे आपल्या कोणाही वंशजाने नर्मदेच्या दक्षिणेस आपल्या मातृभूमीस सोडून जाऊं नये असे त्याने मरतेवेळीं उद्गार काढले.

सूरसिंहाच्या कारकीर्दींत मारवाडच्या वैभवांत बरीच भर पडली. त्याने जोधपूर शहराच्या सौंदर्यसंवर्धनाकडेही बरेंच लक्ष्य पुरविलें होतें. सूरसागर नांवाचा एक सुन्दर तलाव मारवाडच्या मरुभूमींत खोदवून त्याने आपलें नांव अमर करून ठेवलें आहे.

सूरसिंहाच्या नंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र **गजसिंह** गादीवर बसला त्याने १६२० ते १६३८ पर्यंत राज्य केलें. त्याचेंही शौर्य मोगल साम्रा-ज्याच्याच कारणीं लागलें. त्याने आपला ज्येष्ठ पुत्र अमरसिंह यास त्याच्या उतावळ्या स्वभावामुळे मारवाडच्या भूमींतून हद्दपार केलें व मातृभमीवरचे त्याचे सर्व हक्क नष्ट केले. अमरसिंह उतावळ्या स्वभावाचा असला तरी मोठा पराक्रमी व बाणेदार तरुण होता. बापाने स्वदेशांतून काढून लावल्यामुळे तो दिल्लीस जाऊन शहाजहान बादशहाच्या

दरबारीं नोकरीस राहिला. पण त्याच्या बाणेदारपणाने तेथेही आपली चमक मारलीच. एकदा भरदरबारांत त्याने खुद्द बादशहावरच आपली तरवार उपसली ! त्यामुळे दरबारांत एकच हलकल्लोळ झाला. बादशहा सिंहासन सोडून राजमहालांत पळून गेला. प्रतिरोधास आलेल्या अनेक यवन सरदारांना व त्यांच्या शिपायांना अमरसिंहाने आपल्या क्रुद्ध खड्ग देवतेस बळी दिलें. याप्रमाणें भर दरबारांत मारकाट करून व आडवा येईल त्या प्रत्येकास यमलोकचा मार्ग दाखवीत तो किल्ल्याच्या दारांतून बाहेर जाऊं लागला असतां त्याच्याच एका ज्ञातिबांधवाने समजावण्याच्या निमित्ताने जवळ जाऊन व धोक्याने सुरी भोकसून त्यास ठार मारलें. बादशाहाच्या भर दरबारांत एवढें अपूर्व साहस प्रकट करणारा हा वीर आग्र्याच्या किल्ल्याच्या ज्या दारांतून बाहेर जात असतांना अशा हलकट रीतीने मारला गेला त्याचीं कपाटें तेव्हापासून मोगल बादशहांनी कायमचीं बंद करून घेतलीं. पुढे तीं इंग्रजांनी आग्रा ताब्यांत घेतल्यावर उघडण्याचा प्रयत्न केला, त्यावेळीं सदर्हू वीर अमरसिंह राठोड येथे भयंकर भुजंगांच्या रूपानें वावरत असून तो हीं द्वारें कोणासही उघडूं देत नाही असें तेथील रहिवाशांनी इंग्रज एंजिनिअर कॅ० स्टील यास सांगितलें. आणि परम आश्चर्याची गोष्ट ही की, कॅ० स्टील याने जेव्हा तीं २०० वर्षांचीं गंज खाल्लेलीं दारें तशीं उघडेनात म्हणून मोडून पाडलीं, तेव्हा खरोखरच त्यांच्या खालून एक भयंकर नाग निघून स्टीलच्या अंगावर आला. स्टीलचा प्राण बचावला हीच मोठी खैर झाली. स्वतः स्टीलने आपला हा अनुभव आपणास कळविला असें क० टॉडने म्हटलें आहे. असो.

गजसिंहाच्या पश्चात् त्याचा कनिष्ठ पुत्र **जसवंतसिंह** इ. स. १६३८ सालीं मारवाडच्या सिंहासनावर आरूढ झाला. छत्रपति शिवाजी व मेवाडचा महाराणा राजसिंह यांच्याप्रमाणेंच तो परधर्मीयांच्या शासनाचा कट्टर द्वेष्टा होता. मुसलमान इतिहासकारांचें मत प्रमाण मानलें व त्यांच्याच भिंगांतून पाहण्याचें ठरविलें तर जसवंतसिंहाचें चारित्र्य मोगल तख्ताशीं बेइमानी, दगाबाजी, कपट, विश्वासघात व छल यांनी भरलें आहे असें म्हणावें लागेल. पण थोडा दृष्टिकोण बदलला तर त्याच्या त्याच चारित्र्यांतून हिंदुत्वाचा परम अभिमान, परकी शासनाचा तीव्र

विद्वेष व शठास शाठ्याच्या न्यायाची वागणूक आपणास आढळून येईल. मोगल बादशाहीस शक्य त्या सर्व मार्गांनी त्याने अडचणींत आणण्याचा प्रयत्न केला. विशेषत: त्याचा प्रतिस्पर्धी जो औरंगजेब तो कोणत्या कूट-नीतीचा पुतळा होता हें लक्षांत ठेवलें म्हणजे त्याच्याशीं वागतांना जस-वंतसिहानें आचरलेल्या कूटनीतीबद्दल त्यास बिलकुल दोष देतां येत नाही. शहाजहान व औरंगजेब या दोन बादशहांच्या कारकीर्दींत तो मोगल साम्राज्याचा मनसबदार व मांडलिक म्हणूनच वागला. परंतु दोघांच्याही पुत्रांत कलह लावून देऊन हिंदु जातीचें शल्य उपटण्याचा त्याने प्रयत्न केला. म्हणूनच क्षणांत दाराची, तर क्षणांत औरंगजेबाची तर क्षणांत सुजाची बाजू धरून त्यांच्यांतील कलह कायम ठेऊन तो वाढवीत असतांना जसवंतसिह आपणास आढळतो. दक्षिणेंत असतांना शहाजादा मुअज्जम यास औरंगजेबाच्या विरुद्ध भडकविण्याचाही त्याने प्रयत्न केलाच. मुसलमान लेखकांच्या म्हणण्याप्रमाणें प्रतिक्षणीं तो औरंग-जेबाचा विश्वासघात करीत असतांना त्याचा प्रकटपणें मोड करण्याची हिंमत औरंगजेबास झाली नाही, यावरूनच जसवंतसिहाच्या सामर्थ्याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. उलट प्रत्येक वेळेस बादशहास, कधी दक्षिणच्या, तर कधी गुजरातच्या, तर कधी काबूलच्या अशा महत्त्वाच्या सुभ्यावर त्याची नेमणूक करून त्याचा आपण सन्मान करतों असाच देखावा दाखवावा लागला. 'शठं प्रति शाठ्यं'चा हा दोघांचाही खेळ सतत चाळीस वर्षें चालला होता. परंतु अखेरीस औरंगजेबच त्यांत जिंकला असें म्हणावें लागतें. जसवंतसिह जिवंत आहे तोंपर्यंत औरंगजेब सुखाचा नि:श्वास कधीच सोडूं शकणार नाही असें मेवाडचा महाराणा राजसिह म्हणत असे व त्याच्या या उद्‌गारांतच जसवंतची खरी योग्यता व चारित्र्यसार प्रकट झालेलें आहे यांत शंका नाही.

औरंगजेबाच्या कूटनीतीचें सार जर कशांत भरलें असेल तर आपल्या कोणाही दोन तुल्यबल विरोधकांना एकत्र न येऊं देण्याच्या नीतींत ! त्याने जसवंतसिहास शिवाजीच्या दमनासाठी दक्षिणेवर पाठविलें खरें. पण शिवाजीचा बंदोबस्त बाजूलाच ठेऊन शहा-जादा मुअज्जमला औरंगजेबाविरुद्ध भडकविण्याचीं कारस्थानें तो

खेळत बसला. ह्या त्याच्या खेळांत त्याचें जर शिवाजीशींच मेतकूट जमलें तर कठीणच प्रसंग ओढवायचा ! या संशयाने बादशहाने त्याची ताबडतोब गुजरातच्या सुभ्यावर बदली केली. पण तेथे असतांना मेवाडच्या राजसिंहाच्या तो निकट येऊं शकत होता. म्हणून तेथून काढून त्यास माळव्याच्या सुभ्यावर पाठविला. परंतु त्यामुळे मिर्झा राजा जयसिंहाच्या तो अधिक जवळ येऊं लागला. म्हणून अखेरीस त्यास काबूलच्या सुभ्यावर पाठविण्यांत आलें. जसवंतसिंहाचा उघड विरोध करण्याची औरंगजेबास हिंमत झाली नसली तरी त्याचा सूड घेण्याचा त्याने सारखा प्रयत्न केला. त्याचा जेष्ठ पुत्र पृथ्वीसिंह यास विषारी पोषाख देऊन औरंगजेबानेच ठार मारविला असा राजपूत इतिहासांत प्रवाद आहे. त्याचीं दोन मुलें तो काबूलच्या सुभ्यावर असतांना मरण पावलीं. व खुद्द जसवंतलाही काबुलास विषप्रयोगानेच ठार मारविलें असाही राजपूत इतिहासलेखकांचा आरोप आहे. अशा तऱ्हेनें सुमारें ४० वर्षें औरंगजेबासारख्या बादशहास आपल्या वर्तनाने झुलवीत ठेवणारा व पराक्रमाने दाबांत धरणारा हा राठोडाधिपति अखेरीस अफगाणच्या भूमीवर मरण पावला. त्यासही त्याच्या आजाप्रमाणेंच केवळ परिस्थितीस वश होऊन परवशतेचेंच जिणें कंठत सर्व जन्म मातृभूमीपासून शेंकडो कोस दूर अशा ठिकाणीं घालवावा लागला. आणि मरतांना देखील मातृभूमीच्या अंकावर मस्तक ठेऊन प्राण सोडण्याचें समाधान त्यास लाभूं शकलें नाही. औरंगजेब बादशहा भाग्यवान खरा. कारण अपयशाचीं चिन्हें समोर दिसत असतांना इ. स. १६८० च्या सुमारास जसवंतसिंह, राजसिंह व शिवाजी हे त्याचे तीनही भयंकर शत्रु कालवश झाले. पण त्यामुळे औरंगजेबाचा मार्ग निष्कंटक झाला असें मानण्याचें मुळीच कारण नाही.

औरंगजेबाने यावज्जन्म राठोडांचें जें शत्रुत्व केलें होतें आणि महाराजा जसवंतसिंहाने आपल्या राष्ट्रांत परकी राजसत्तेसंबंधीं जो दुर्दम्य असा द्वेष उत्पन्न केला होता त्याचा जसवंतसिंहाच्या मृत्यूने एकाएकीं स्फोट झाला. आपल्या महाराजास कूटनीतीच्या ह्या बादशहाने विषप्रयोग करून ठार मारविलें असा प्रत्येक राठोडाचा समज झाला. मेवा-

डच्या राजसिंहाची भगिनी जसवंतसिंहाची पत्नी होती व पतीच्या मृत्युसमयीं ती गरोदर होती. ह्या राजपुतिनीच्या तेजस्वितेच्या व प्रखर स्वाभिमानाच्या अनेक कथा राजस्थानांत प्रचलित आहेत. जसवंतच्या मृत्यूनंतर ती प्रसूत होऊन राठोड राष्ट्राच्या भाग्याने तीस **अजितसिंह** नामक पुत्र झाला. राजमातेस व बालराजपुत्रास घेऊन जसवतचे राठोड वीर काबूलहून दिल्लीस आले व मारवाडच्या गादीचीं वस्त्रें अजितसिंहाच्या नांवाने त्यांनी बादशहास मागितलीं. परंतु तीं देण्याऐवजीं औरंगजेबाने राजपुत्रास व राजमातेसच कैद करण्याचा कपटी प्रयत्न केला. पण, ह्याच प्रसंगाने पुढे आलेला व पुढे राजपुतांच्या इतिहासांत आपली कीर्ति अमर करून ठेवणारा राठोड वीर दुर्गादास याने आपल्या अनुयायांच्या अपूर्व शौर्यावर विश्वासून विलक्षण धाडसाने बादशाच्या हातावर तुरी दिल्या व राजमातेसह अजितला घेऊन तो महाराणा राजसिंहाच्या आश्रयास जाऊन राहिला. त्या राजशार्दूलाने त्यांना आश्रय देऊन औरंगजेबाचा क्रोध व तदनुसारी केवढें प्रचंड आक्रमण स्वतःवर ओढवून घेतलें ह्याचा रोमांचकारी इतिहास मेवाडच्या कथनांत आलाच आहे.

राजपुत्र अजितसिंहास व राजमातेस पकडण्याच्या ह्या घटनेने राठोडांची समजूत पक्की झाली की, बादशाह त्यांना नेस्तनाबूद करूं चाहतो व त्यांचें राष्ट्र जमीनदोस्त करून तो आपल्या साम्राज्यास जोडूं इच्छितो. ह्या कल्पनेने त्यांच्या ठिकाणच्या स्वतंत्र्याच्या व देशप्रेमाच्या भावना अत्यंत प्रबळतेने उचंबळून आल्या. त्यांच्या समोर आता जीवन-मरणाचाच प्रश्न उभा राहिला. स्वातंत्र्यप्रेमी राठोडांनी आपल्या राष्ट्राच्या जीवनमरणाचा लढा लढविण्यास कंबर कसली. महाराणा राजसिंहाच्या नेतृत्वाखाली मेवाड–मारवाडच्या राजपुतांनी एक होऊन औरंगजेबाबरोबर केवढा तुमुल संग्राम केला, व त्याचें सिंहासनही कसें डळमळून सोडलें आणि अखेरीस प्राणभयाने त्या छद्मी बादशहास कसें अजमीरास पलायन करावें लागलें इ० वृत्तांत पूर्वी मेवाडच्या कथनांत आलेलाच असल्याने त्याची पुनरावृत्ति करण्याचें प्रयोजन नाही.

विजयाचा घास पूर्णपणें राजपुतांच्या गळचांत उतरण्यापूर्वीच इ. स. १६८० या वर्षी महाराणा राजसिंहाचा मृत्यु झाला व त्यामुळे मेवाड-

बरोबर त्याचा तहनामा होऊन मेवाडचें युद्ध समाप्त झालें. अशा रीतीने मेवाडने आपली तरवार म्यान केली असली तरी राठोडांनी आपली तरवार अद्याप म्यान केली नव्हती–नव्हे त्यांची तशी इच्छा असती तरी बादशाह त्यांना तसें करूं देण्यास थोडाच तयार होता? राठोडांचा त्याने पुराच सूड उगविण्याचें ठरविलें व तो स्वतः जरी महाराष्ट्रावर चालून गेला असला तरी प्रचंड सेना बरोबर देऊन मोगल सेनापतींना त्याने पुनरपि मारवाडवर रवाना केलें.

मारवाडच्या व महाराष्ट्राच्या या स्वातंत्र्यसंग्रामांत अनेक घटना विलक्षण साम्यदर्शक आहेत. महाराजा जसवंतसिंहाच्या मृत्यूने मारवाडचें युद्ध सुरू झालें तर छत्रपति शिवाजीच्या मृत्यूने महाराष्ट्राचें! तसेंच दोन्ही युद्धें औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच संपलीं. जसवंतसिंहाचा विषप्रयोगाने वध करून त्याच्या स्त्रीपुत्रास कैद करण्याचा औरंगजेबाने प्रयत्न केला, तर संभाजी महाराजांचा अमानुष वध करून त्याच्या स्त्रीपुत्रांनाही त्याने पकडून कैदेंत टाकलें. कमीअधिक सुमारें तीस वर्षेपर्यंत दोन्ही युद्धें चाललीं. या दृष्टीने दोन्ही युद्धांना त्या त्या राष्ट्राचा "त्रिशतिवार्षिक स्वातंत्र्यसंग्राम" असें नांव देतां येईल. दोन्ही राष्ट्रांनी आपला लढा अविरत परिश्रमाने व महान स्वार्थत्यागपूर्वक लढवून आपल्या राष्ट्रप्रेमाची पराकाष्ठा प्रकट केली. दोन्ही राष्ट्रांनी हा जीवनमरणाचाच प्रश्न समजून लढा चालविला. औरंगजेब जसा राठोडांच्या ह्या मरुस्थलींतील झोपड्यादेखील जाळून टाकूं इच्छीत होता, राठोडाचें बीजही शिल्लक ठेऊं इच्छीत नव्हता, त्याचप्रमाणे तो त्या शिवभूपालाने उभारलेलें महाराष्ट्राचें तें स्वतंत्र राष्ट्र–समर्थ रामदासांचें आनंदवनभुवन–पायासुद्धा जमीनदोस्त करूं चाहत होता.

राठोडांचा सेनापति दुर्गादास याने आपल्या निवडक विश्वासू लोकांच्या सल्ल्याने राजमाता व राजकुमार अजितसिंह यांना एका अत्यंत गुप्तस्थळीं सुरक्षितपणें ठेवलें होतें. तर मराठ्यांचा राजकुमार शाहू व राजमाता येसूबाई मोगलांची कैद होतीं. एवंच दोन्ही राष्ट्रांनी कैक वर्षे आपल्या राजाच्या गैरहजेरींतच आपला लढा अविरतपणें

लढविला. लवकरच राजकुमार मोठा होईल व नंतर त्याचें साक्षात् नेतृत्व आपणास मिळूं शकेल अशा भावी आकांक्षेमुळे राठोडांना स्फूर्ति मिळत होती; तर आपण आपल्या राजकुमारास मोगलांच्या कैदेंतूनही सोडवून आणूंच व छत्रपतीच्या सिंहासनावर बसवूंच असा प्रबळ आत्मविश्वास मराठ्यांना युद्धाचें स्फुरण देत होता. दुर्गादास, त्याचा बंधु सोनिंग व पुत्र रामसिंग हे राठोडांचे दुर्दमनीय सेनापति होते, तर राजाराम व त्याची पत्नी ताराबाई यांच्याकडे महाराष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धाचें नेतृत्व आलेलें होतें. अशीं हीं दोन स्वातंत्र्ययुद्धें एकाच कालीं भारतवर्षांत चालू होतीं. व अफाट सामर्थ्यसंपन्न, विलक्षण कूटनीतिज्ञ, अत्यंत पराक्रमशाली व अभंगधैर्याचा औरंगजेब बादशहा या दोघांचाही समान प्रतिस्पर्धी होता.

औरंगजेबाचा पुत्र शहाजादा अकबर यास बादशहा पुकारून औरंगजेबास पदच्युत करण्याचा जो व्यूह राजपुतांनी रचला होता तो त्या बादशहाच्या आत्यंतिक धूर्तपणामुळे ढासळला व नंतर अकबराची अत्यंत अनुकंपनीय अशी स्थिति झाली. परंतु इतक्याही बिकट परिस्थितींत दुर्गादासाने त्यास आश्रय दिलाच. आपल्या निवडक शूर राठोडांना बरोबर घेऊन त्याने औरंगजेबाचा उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत पसरलेला अफाट सेनासागर स्वबाहुबलावर अमानुष धैर्याने ओलांडला व शहाजादा अकबरास संभाजीच्या आश्रयास पोचवून देऊन दुर्गादास मारवाडांत परत आला. दुर्गादासाच्या या विलक्षण धाडसाने औरंगजेबास देखील तोंडांत बोटच घालावें लागलें.

अकबरास दक्षिणेंत पोचवून परत आल्यावर दुर्गादासाने आपल्या सेनेची संघटना करून शाही फौजेस पद्धतशीर प्रतिकार सुरू केला. ह्या प्रतिकाराच्या बाबतींतही त्यांचें मराठ्यांशीं विलक्षण साम्य दिसतें. शाही सेनेने आपल्या पाशवी शक्तिबलाने मारवाडचा कोपरान् कोपरा जिंकला, प्रत्येक महत्त्वाचें ठाणें काबीज केलें, हजारो मंदिरांचा विध्वंस केला व त्यांतील मूर्ति फोडून टाकल्या आणि राठोडांचें जिणें त्राहि भगवान् करून सोडण्याच्या हेतूने भयंकर लुटालूट, मारकाट व जाळपोळ केली. पण इतक्याही भयंकर आक्रमणापुढे मानी राठोडांनी आपली मान बाकवली नाही. त्यांनी पुनः अरवलीच्या दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेऊन गनिमी-

काव्याने आपला लढा चालू ठेवून शाही सेनेचा छळ करण्यास प्रारंभ केला. अनेक प्रसंगीं उघडया मैदानावरही त्यांनी शाही फौजेशीं सामना करून हजारों मुसलमान शिपाई व सरदार कापून टाकले

याप्रमाणे वर्षानुवर्षे युद्ध चालल्यावर राठोड राष्ट्राची आपल्या राजकुमाराचें दर्शन घेण्याची इच्छा अनिवार झाली. राजकुमाराचें एक दर्शन म्हणजे आणखी एक तप युद्ध चालविण्यास राठोडांना पुरेसें प्रोत्साहन होतें. अखेरीस दुर्गादासाने अरवलीच्या पहाडावर सर्व राठोडांना त्यांच्या प्रिय राजकुमाराचें दर्शन करविलें. राठोडांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. शिथिल झालेल्या त्यांच्या गात्रांत आता दुप्पट बळ चढलें व त्यांच्या ठिकाणीं एवढया विलक्षण स्फूर्तीचा संचार झाला की, तिच्या भरांत त्यांनी यापुढे विजयश्री शत्रूच्या गोटांतून ओढून आणली. तरुण राजा जिवंत आहे—इतकेंच नव्हे तर तो स्वत: हातांत समशेर घेऊन आता रणरंगांत उतरला आहे हें कळतांच इतस्तत: पांगलेले सर्व राठोड व त्याचे सहायक राजपूत पुन: संघटित होऊन जोराचा प्रतिकार करूं लागले. थोडक्याच कालांत ते आक्रमक बनले. चढाईचें धोरण स्वीकारून त्यांनी दुर्गांमागून दुर्ग व नगरांमागून नगर मोगलांच्या ताब्यांतून जिंकून घेतलें. बादशहाने सेनापतीमागून सेनापति बदलला. पण व्यर्थ! बहादूर राठोड अखेरीस विजयीच राहिले. **सत्याचा, धर्माचा व स्वातंत्र्यप्रेमाचाच शेवटीं जय झाला.**

औरंगशहाच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्रांत राज्याधिकाराच्या लढाया होऊन त्यांत हजारों शिपायांचा व सरदारांचा नाश झाला व साम्राज्याची शक्ति अधिकच क्षीण झाली. ह्या लढायांत यशस्वी होऊन बहादुरशहा मोगल तख्तावर आरूढ झाला. त्याच्या ठिकाणीं बापाचा धर्मपिसाटपणा नव्हता. शिवाय तीस तीस वर्षांच्या लढायांनी मोगल सैनिकही त्रस्त झाले होते. बहुतेक महत्त्वाचे नबाब व सरदार त्यांत मारले गेले होते. शिवाय मराठे व राठोड यांचें बळ नि:संशय वाढत होतें. त्यामुळे बहादुरशहाने त्यांच्याबरोबर संधि करून घेतला. राठोड राष्ट्राचें मांडलिक म्हणून अस्तित्व कबूल करून जसवंतसिंहाच्या गादीचीं वस्त्रें बादशहाने अजितसिंहास द्यावीं एवढीच प्रथमपासून राठोडांची मागणी होती. तीही अमान्य करून औरंग-

जेबाने त्यांच्या जीवितावरच शस्त्र उगारलें होतें. पण आता बहादूरशहानें ती मान्य केली व अजितसिंहास मारवाडचा **महाराजा** म्हणून वस्त्रें दिलीं. अशा तऱ्हेने राठोडांचा विजय झाला. शाहूची सुटकाही बहादुरशहाने याच अटीवर केली होती. इ. स. १६८० सालीं सुरू झालेल्या मारवाड-महाराष्ट्राच्या स्वातंत्र्ययुद्धांचा अशा तऱ्हेने १७०९ मध्ये शेवट झाला.

राठोडांच्या या त्रिशतिवार्षिक स्वातंत्र्यसंग्रामाचें मारवाडच्या चारणांनी मोठें रसभरित व स्फूर्तिप्रद वर्णन केलें आहे. राठोडांचा सेनापति दुर्गादास याने ह्या युद्धांत जें असामान्य कर्तृत्व प्रकट केलें त्याबद्दल चारणांनी त्याजवर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आणि राठोड मातांच्या समोर "ऐ माता पूत ऐसा जन जैसा दुर्गादास" असा आदर्श निरंतरसाठी घालून ठेवला. बादशहाने दुर्गादासासही अजितसिंहाच्या बरोबरीने पांच हजार स्वारांची मनसबदारी देऊं केली. पण त्या त्यागी वीराने तिचा इन्कार करून मारवाडच्याच सेवेंत आपला देह अर्पण करण्याचा आपला निश्चय प्रकट केला. वीर दुर्गादासाची योग्यता खरोखर अपूर्व आहे. राजपुतांच्या खनींत निर्माण झालेलें तें अमूल्य रत्न आहे.

याप्रमाणें मारवाड राष्ट्राच्या ३० वर्षांच्या युद्धश्रमास व स्वार्थत्यागास विजयाचें सुमधुर फळ आल्याने 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या न्यायाने सर्व राठोड वीरांनी राजधानीप्रवेशाचा समारंभ आपल्या महाराजासह व सेनापतीसह मोठ्या थाटाने साजरा केला. सबंध राष्ट्रांत आनंदमय वातावरण पसरलें. चारण दुर्गादासाचे व त्याच्या राठोड सैनिकांचे पोवाडे गाऊं लागले. **अजितसिंह** मारवाडवर राज्य करूं लागला.

अजितसिंहाच्या कारकीर्दीचें मारवाडच्या चारणाने साररूपानें वर्णन केलें आहे तें असें-"पुनः एकदा मंदिरादेवळांतून प्रार्थनेच्या घंटा वाजूं लागल्या व मशिदीमधील मुसलमानांचे निमाज ऐकूं येईनासे झाले. जेथे कुराण म्हटलें जात होतें तेथे आता पुराणें वाचलीं जाऊं लागलीं. मशिदींच्या जागीं मंदिरें उभारलीं गेलीं. काजींच्या जागा ब्राह्मणांनी पटकावल्या व जेथे गोहत्या करण्यांत येत होत्या त्या ठिकाणीं यज्ञीय वेदी उभारण्यांत आल्या." अजितसिहाने आपल्या समोर कट्टर हिंदुत्वाचें ध्येय ठेवलें होतें; तेंच त्या काळांतील राष्ट्रीय ध्येय होतें व परकीयांच्या जुलमापासून व

दास्यापासून हिंदु जातीस मुक्त करण्याचा त्याने यथाशक्ति प्रयत्न केला.

बहादूरशहाबरोबर झालेल्या तहाने मोगलसाम्राज्याशीं मारवाडचा लढा कांही काल थांबला तरी तो पुनः उत्पन्न झालाच. बादशहांच्या उलथापालथींत अजितसिंहाने आपल्या पराक्रमाने बादशाहीचीं सूत्रें अनेक वेळां आपल्या हातीं घेतलीं. कैकवेळां बादशाहीशीं बंड पुकारून तो स्वतंत्र झाला. पुनरपि अनेक मोगल सरदार त्यावर चालून गेले व अनेकांना त्याने राठोड समशेरीचें पाणी पाजलें.

फर्रुकशिअर बादशहाने अजितच्या इंद्रकुमारी नामक लावण्यवती कन्येस मागणी घातली. अजितने ती साफ नाकारून आपलें स्वातंत्र्य पुकारलें. त्यावेळीं सय्यद बंधूंनी त्याच्या राष्ट्रावर प्रचंड आक्रमण केलें. पुनः एकवार सर्व देश उजाड व बेचिराख झाला शूर राठोड याही खेपेस कसून लढले. पण सय्यदांनी फारच आतंक मांडला. तेव्हा राष्ट्राची होत असलेली बरबादी व प्रजेवरील अत्याचार थांबविण्यासाठी अखेरीस अजितसिंहास आपल्या कन्येच्या शीलाचा विक्रय करून आपल्या आजपर्यंतच्या चारित्र्यास कलंक लाऊन घ्यावा लागला. इंद्रकुमारीचा फरुकशिअरबरोबर विवाह झाल्यानंतर लगेच बादशहा भगंदराच्या विकाराने आजारी पडला. व हॅमिल्टन नांवाच्या इंग्रज डॉक्टराने त्याच्यावर शस्त्रक्रिया केली त्यांत तो नपुंसक बनला.

नाइलाजाने पत्कराव्या लागलेल्या ह्या अपमानाचा अजितनें लवकरच सूड घेण्याचें ठरविलें व आपले राठोड वीर एकत्र करून मोगलांच्या मुलखावर स्वाऱ्या करण्यास व त्यांचा मुलूख आपल्या राज्यास जोडण्यास प्रारंभ केला. सय्यदबंधूंशीं कारस्थानें करून फर्रुकशिअरला त्याने पदच्युत करविलें व तुरुंगांत टाकलें. तेथे त्याचा अमानुष रीतीने छळ होऊन शेवटीं सय्यदांनी त्याचा वध केला. अजितने आपल्या कन्येची सुटका करून तिला पुनरपि हिंदुत्वांत घेतली. इतकेंच करून तो थांबला नाही तर राजपुतांचीं पुरातन ठाणीं जीं नागोर व अजमीर तीं ही त्याने काबीज केलीं. व अजमीरास स्वतंत्र राजपूत राष्ट्राचें सिंहासन स्थापन करून त्याने आपणास बादशहाच्या बरोबरीचे राजे म्हणून घोषित केलें. या त्याच्या धाडसी उपक्रमाचें चारण वर्णन करतो—

"बातमी आली की, मोगलांनी सय्यदबंधूंना मारून अजीतवरही स्वारी करण्याचा घाट घातला आहे. अजितने आपली तरवार उपसली व अजमीर जिंकण्याची प्रतिज्ञा केली. बारा दिवसांत तो अजमीरास पोचला. दिवसाढवळ्या मुसलमानांना हाकून देऊन त्याने अजमीरवर कब्जा केला व शाही सुभेदारास ठार मारून तारागड (अजमीरचा किल्ला) ताब्यांत घेतला. सांभर व डिडवानाचीं खाऱ्या पाण्याचीं सरोवरेंही त्यानें जिंकून घेतलीं. अजमीरला त्याने आपल्या स्वतंत्र सिंहासनाची स्थापना केली. राजत्वाचें छत्र मस्तकीं धारण केलें. आपलीं स्वतंत्र नाणीं पाडलीं, वजनें व मापें चालू केलीं, न्यायालयें स्थापन केलीं आणि आपल्या सरदारांना नवीन पदव्या आणि नालक्या, मशाली, नौबती व निशाणें धारण करण्याचे अधिकार बहाल केले. फार काय चक्रवर्तित्वाचें प्रत्येक चिन्ह त्याने धारण केलें. अजमीरांत महाराजा अजितसिंह दिल्लीपतीच्या बरोबरीचा बनला—ही बातमी सर्व देशभर पसरली. मक्का व इराणला सुद्धा ती जाऊन पोचली. अजितने आपल्या धर्माचा ध्वज उभारला व मरूच्या सर्व भूमींतून इस्लामचीं सर्व धर्मकृत्यें बंद करून टाकलीं."

चारणाच्या वरील वर्णनांतला अतिशयोक्तीचा भाग कितीही वगळला तरी अजितसिंहाने राजपुतांच्या प्राचीन सार्वभौमत्वाचें ठिकाण जें अजमीर तें जिंकून तेथे हिंदु चक्रवर्तित्वाच्या गादीची स्थापना करण्याचा मोगल सम्राट महंमदशहाच्या कारकीर्दींत प्रयत्न केला होता एवढी गोष्ट कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाही. त्याचा प्रयत्न फार काळ टिकला नाही व राजपूत राष्ट्रांच्या ठिकाणीं आता पूर्वीचा तो कणखरपणा उरला नाही हें पाहून पुनरपि आपल्या पुत्राच्या—अभयसिंहाच्या—नांवाने मनसबदारी घेऊन मोगल बादशाहीशीं संधि करण्याची पाळी त्याच्यावर आली ही गोष्ट वेगळी. पण त्याच्या ठिकाणीं स्वधर्मस्थापनेची व स्वातंत्र्याची ती चमक होती, तें ध्येय व ती महत्त्वाकांक्षा दृष्टीसमोर अचल ठेऊन तो सारखा झगडत होता हें निःसंशय. त्याच्या या आकांक्षापूर्तीच्या प्रयत्नांत त्याचा पुत्र अभयसिंह याचा पराक्रम व कर्तृत्व त्यास अतिशय उपयोगीं पडलें. अभयच्या माऱ्यापुढे मुसलमान चळचळा कांपत असत. महंमदशहाशीं संधि करून अजितसिंहाने आपला प्रतिनिधि म्हणून

अभयसिंहास शाही दरबारांत पाठविलें, तेव्हा खालच्या दर्जाच्या सरदारांच्या रांगेंत त्यास उभें करण्यांत आलें. अभयसारखा मानी सिंह हा अपमान मुकाट्याने थोडाच गिळूं शकणार होता? त्याने लागलीच आपली समशेर उपसली व बादशहाच्या रोखाने सिंहासनाची एक पायरी तो चढला देखील. सर्व दरबार आश्चर्याने स्तिमित व भयाने कंपायमान झाला; परंतु महंमदशहाने प्रसंगावधान राखून आपल्या गळ्यांतला हार काढून अभयसिंहाच्या गळ्यांत घातला व त्यास शांत केलें. अभयच्या मानी व तेजस्वी वृत्तीची ही घटना वाचून शिवाजी महाराजांच्याही अशाच घटनेचें कोणास स्मरण होणार नाही.

अशा रीतीने अजितसिंह हिंदुत्वाच्या ध्येयावर अचल दृष्टि ठेऊन आपला राज्यकारभार हाकीत असताना एकाएकी त्याचा वध झाला. त्याचा द्वितीय पुत्र भक्तसिंह याने मोगलांच्या फुसलावण्यावरून बापाचा वध केला असें राजपूत इतिहासकारांचें म्हणणें आहे. भक्तसिंहाच्या या घोर पापकृत्याबद्दल मारवाडच्या चारणांनी त्याचें नांव कायमचें कलंकित करून ठेवलें आहे. हिंदुत्वाचा इतका प्रखर प्रतिपालक अशा रीतीनें पुत्राच्याच हातून मारला जावा याबद्दल कोणास विषाद वाटणार नाही? चारण म्हणतो--

" भक्ता! भक्ता!! बैरिया!!!
क्यों मारा अजमल।
हिंदुवानी का सहारा
तुर्कानी का साल॥ "

"हे भक्तसिंहा! वैऱ्या!! हिंदुत्वाचा आधारस्तंभ व तुर्की सत्तेचें शल्य अशा अजमलला (अजितसिंहाचें चारणांनी ठेवलेलें आवडतें नांव) तूं कां मारलेंस?" पण झाली गोष्ट होऊन गेली होती. अजितच्या शोकजनक निधनाने तत्कालीन हिंदुत्वाच्या राजकारणाची मोठीच हानि झाली असली पाहिजे यांत शंका नाही.

अजितसिंहाच्या नंतर **अभयसिंह** मारवाडच्या गादीवर बसला. त्याच्या पराक्रमाचें व तेजस्वी स्वभावाचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. ज्या महमुदशहावर त्याने भर दरबारांत तरवार उपसली होती त्यानेच, गुज-

रातेंत सरबुलंदखान नामक सुभेदाराने बादशाहीविरुद्ध बंड पुकारलें असतां त्याचा मोड करण्यासाठी, तीस लक्ष रुपये व प्रचंड सेनेचें आधिपत्य देऊन अभयसिंहाची नेमणूक केली. ह्या स्वारींत अभयसिंहाने सरबुलंदचा तर मोड केलाच, पण चार कोट रुपये व १४०० तोफा व बंदुका काबीज करून जोधपुरास आणल्या. शिवाय बराच मुलूखही त्याने आपल्या राज्यास जोडला. एवढ्या मोठ्या लुटीच्या बळावर त्याने आपल्या राज्यांतील किल्ले सुधारले व तोफाबंदुकांनी सज्ज करून ठेवले.

अभयसिंहाने इ. स. १७५० पर्यंत राज्य केलें. प्रारंभीं प्रारंभीं जरी तो मोगल दरबारांतला प्रथम श्रेणीचा सेनापति म्हणून वागला तरी पुढे लवकरच त्याने तिकडील लक्ष्य काढून आपल्या राज्याच्या कारभाराकडेच लावलें. १७३९ सालीं इराणच्या इतिहासप्रसिद्ध नादीरशहाने दिल्लीवर स्वारी करून तें शहर लुटलें, अमानुष कत्तली केल्या, मोगल बादशहाचे डोळे फोडले, स्वत: शाही सिंहासनावर आरोहण केलें व पुन: महंमदशहास त्याची बादशाही परत देऊन नादिरशहा इराणांत निघून गेला. पण लक्षांत ठेंवण्यासारखी गोष्ट अशी की, मोगल बादशहाच्या या भयंकर आपत्तीच्या प्रसंगीं एकही राजपूत राजा त्याच्या मदतीस धावून गेला नाही. त्यांच्यावरील बादशाहीचा दाब यापूर्वीच उडाला होता. तत्त्वत: ते बादशहाचे मांडलिक असले तरी वस्तुत: स्वतंत्रच बनले होते.

अभयसिंहाच्या दीर्घ कारकीर्दीत मारवाडच्या प्रजेने सुखसमृद्धीचा उपभोग घेतला असला तरी राजपुतांचीं पारस्परिक वैमनस्यें अधिक भडकदार रंग धारण करूं लागलीं होतीं व राजपूत राष्ट्रांत यादवी माजून त्यांच्या सर्वनाशाचा प्रसंग आला होता. पण मेवाडच्या महाराण्याच्या शहाणपणाने तो टळला. लेखनविस्ताराचा आरोप पतकरूनही हा प्रसंग येथे देण्यासारखा आहे. कारण राजपूत स्वभावाचा परिचय होण्यास तो उपयोगीं पडण्यासारखा आहे.

बापाचा खून करणारा मारवाडचा राजपुत्र भक्तसिंह यास त्याच्या या कृत्याबद्दल मोगलाकडून नागोरची जहागीर मिळाली. भक्तसिंहही अभयप्रमाणें अत्यंत विक्रमशाली पण उतावळ्या स्वभावाचा होता. मारवाडच्या गादीचा लोभ त्यास सुटला होता. बिकानेरच्या राठोडांच्या

बंदोबस्तासाठी अभयसिंह तिकडे गुंतला आहे हें पाहून भक्तसिहाने राज्य-लोभानें अंबरच्या सवाई जयसिंहास मारवाडवर स्वारी करण्यास चिथावलें. सवाई जयसिंह असली संधि पाहतच होता. मारवाडचे राठोड अंबरच्या कछवाहांना नेहमी कनिष्ठ लेखीत, त्याचें वैषम्य त्याच्या मनांत डाचत होतेंच. मारें एक लक्ष सेना जमा करून त्याने मारवाडवर स्वारी पुकारली व मोठ्या वेगाने मारवाडच्या हद्दीपाशीं ते येऊन थडकलाही. अभयसिंहास ही बातमी कळल्याबरोबर मरुस्थलीच्या पश्चिम कोपऱ्यांतून बिकानेरचा वेढा उठवून तो स्वराष्ट्राच्या संरक्षणासाठी धावतच परत आला.

आपल्या कळलावणीचा हा एवढा निकुर होत आहे हें पाहून भक्तसिहास पश्चात्ताप झाला. मारवाडची भक्ति व बंधुप्रेम यांनी त्याचें हृदय उचंबळून आलें. आपल्या आठ हजार राठोड वीरांसह तो आपल्या बंधूच्या जवळ राष्ट्रसंरक्षणासाठी धावून आला. पश्चात्तापदग्ध अंतःकरणाने बंधूची क्षमा मागून जयसिंहाचें पारिपत्य करण्याच्या कामीं आपली योजना करण्यांत यावी अशी त्याने मागणी केली. पण अभयसिंहाने त्याचा धिक्कार करून त्याची मदत नाकारली.

परंतु भक्तसिंहाचा पश्चात्ताप वरवरचा नव्हता. त्यामुळे बंधूच्या धिक्कारामुळेही त्याने आपला निश्चय बदलला नाही. 'मी उभें केलेलें हें भूत मीच गाडून टाकलें पाहिजे' असा विचार करून आपल्या आठ हजार राठोडांसह तो एकटाच अंबरच्या एक लक्ष सेनेवर तुटून पडला. कोणीही आश्चर्याने थक्क होऊन जाईल एवढा अद्भुत व अचाट पराक्रम त्याने या लढाईंत गाजविला. स्वराष्ट्रसंरक्षणाच्या पवित्र व उज्ज्वल भावनेने प्रेरित होऊन भक्तसिंहानें गाजविलेला भीम पराक्रम पाहून पितृवधाबद्दल काल त्याची निंदा करणारे मारवाडचे चारणच आज त्यावर स्तुतिसुमनें उधळूं लागले व तें स्वाभाविकही होतें. पण त्याच्या शौर्याची शत्रूच्या मनावर देखील इतकी विलक्षण छाप पडली की अंबरच्या चारणांनीही त्याचें मोठें अद्भुत व रसपूर्ण वर्णन केलें आहे.

"हा काय कालीचा रणनिनाद आहे? की हनुमंताची युद्धगर्जना आहे? की हा शेषनागाचा फूत्कार आहे? की सूर्याच्या चंड किरणांचा स्रोत आहे? की हें डाकिणीचें मृत्युदर्शन आहे? की शंकराने हा तृतीय

नेत्रच उघडला आहे ? भक्तसिंहाची तरवार जेव्हा कालाचा पाश होऊन बसते तेव्हा तिच्या ज्वालामुखींतून निघणाऱ्या ज्वालांत कोण उभा राहूं शकेल ?" भक्तसिंह आपल्या आवेगांत शत्रुसेनेच्या पार निघून गेला. एवढा कर्दनकाळासारखा लढणारा हा वीर अशा तऱ्हेने अफाट शत्रुसेनेचा मोड केल्यावर व आपल्या राष्ट्रावरील संकट टाळल्यावर एका शेताच्या काठीं जाऊन एखाद्या बालकासारखा रडत बसला. मानवी स्वभावपरीक्षणाचें कोणतें माप भक्तसिंहाच्या चरित्रास लावतां येण्यासारखें आहे ?

इतक्यांत अभयसिंहाची सेनाही तेथे येऊन पोचलीच. पुनः भयंकर संग्रामाची संभावना दिसूं लागली. पण राजपूत राष्ट्रांचा हा सर्वनाश समुत्पन्न झालेला पाहून मेवाडच्या महाराण्याने जबरदस्त मध्यस्थी केली व तो टाळला. इतकेंच नव्हे तर त्याने आपल्या मध्यस्थीने अम्बर, मारवाड व मेवाड या तीन राष्ट्रांत स्नेहसंधि घडवून आणला व परस्परांकडून मैत्रीच्या व साहाय्याच्या शपथा घेवविल्या. या घटकेस राजपुतांची ही प्रचंड यादवी टळली असली तरी त्या पिशाचिनीने पुनः लवकरच आपलें डोकें वर काढलें व तोच विषादमय वृत्तांत यापुढे आपणास पाहावयाचा आहे.

महाराजा अभयसिंहानंतर लगेच ह्या यादवीस पुनः प्रारंभ झाला. त्याचा पुत्र **रामसिंह** गादीवर बसला तेव्हा नागोरचा जहागीरदार या नात्यानें त्यास राजतिलक लावण्यास भक्तसिंह गेला नाही. हा मारवाडच्या गादीचा अपमान समजून भक्तसिंहावर स्वारी करण्याचा आपला निश्चय रामसिंहाने तेथेच घोषित केला. भक्तसिंहासारख्या अनेक लढायांतून विजयी झालेल्या पराक्रमी सेनापतीसमोर आपला निभाव लागणें शक्य नाही व अशा रीतीने आपसांतील हें वैमनस्य वाढविणें बरें नाही असा रामसिंहाच्या सरदारांनी त्यास उपदेश करून पाहिला. पण तरुणपणाचा उन्माद चढलेल्या त्याच्या मनावर ह्या बहुमोल उपदेशाचा कांहीही परिणाम झाला नाही व नागोरच्या रोखाने मारवाडच्या सेना चालू झाल्याच. भक्तसिंहाच्या सेनेशीं रामसिंहाची गाठ पडली तेव्हा त्याचे बहुतेक मोठमोठे सरदार त्यास सोडून गेले व उरलेल्यांचा पराजय करून व जोधपूर ताब्यांत घेऊन अखेरीस **भक्तसिंहाने** मारवाडच्या सिंहासनावर आरोहण केलें. रामसिंह मराठ्यांच्या आश्रयास पळाला.

भक्तसिंहाने तीन वर्षे राज्य केलें. पण एवढ्या अल्प मुदतींत त्याने आपल्या राज्याच्या सुधारणेकडे बरेंच लक्ष्य दिलें. नागोर व झालोरच्या आपल्या मूळ जहागिरींत पूर्वी मुसलमानांनी जे अत्याचार केले होते त्यांचा सूड म्हणून त्याने मशिदी पाडून तेथें देवळें बांधविलीं व मारवाडच्या सर्व राज्यांत मुसलमानांना ठेचाने ओरडून निमाज पढण्यास बंदी केली.

मराठ्यांच्या आश्रयास जाऊन राहिलेल्या रामसिंहाने तीन वर्षांतच जयाप्पा शिंद्यास बरोबर घेऊन मारवाडवर आक्रमण केलें. भक्तसिंहाने प्रतिकाराची सिद्धता केली. पण रामसिंहाच्या आतेने म्हणजे भक्तसिंहाच्या बहिणीनेच आपल्या बापाच्या वधाचा व पतीच्या–जयसिंहाच्या–पराभवाचा सूड घेण्याच्या बुद्धीने विषप्रयोग करून भक्तसिंहाचा वध केला. त्याच्या नंतर त्याचा पुत्र **विजयसिंह** गादीवर बसला व त्याने रामसिंहाशीं व त्याच्या साहाय्यास आलेल्या मराठ्यांशीं युद्ध सुरू केलें. आपसांतील यादवीस कंटाळलेल्या त्याच्या सरदारांनी समरांगणाचा त्याग करून आपापल्या जहागिरीचा मार्ग धरला व निराश्रय व निःसहाय झालेला विजयसिंह प्राण-संरक्षणासाठी पळून गेला. परंतु रामसिंहाचाही विजय पूर्ण होऊं शकला नाही. कारण लवकरच जयाप्पा शिंद्याचा वध झाला. त्यामुळे चिडलेल्या मराठ्यांनी शक्य तितकी सार्वत्रिक लटमार करून व पैसा गोळा करून आपला रस्ता धरला. रामसिंह पुनः निराश्रय झाला व त्यास वनवासी जीवन कंठावें लागलें. अशा रीतीने विजयसिंहच मारवाडचा अधिपति राहिला.

ह्या घटनेने आपण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत येऊन पोचलों. या शतकाच्या अंतापर्यंत विजयसिंहच मारवाडच्या गादीवर होता. त्याचीं त्याच्या सरदारांबरोबर झालेलीं भांडणें, मराठ्यांच्या स्वाऱ्या, जबरदस्त खंडण्यांची वसुली, प्रजेवरील अत्याचार, भाडोत्री रोहिले व सिंधी शिपायांच्या त्याने जमा केलेल्या फौजा, त्यांचे व राठोड सरदारांचे संघर्ष, विजयसिंहाची चारित्र्यशून्यता, वेश्यासक्ति इ० इ० समांतर घटनांनीच यापुढचा मारवाडचा इतिहास बनलेला आहे. अठराव्या शतकाच्या शेवटीं विजयसिंह मरण पावला. त्याच्या ३० । ३५ वर्षांच्या कारकीर्दीत अभयसिंहाने वाढविलेली मारवाडची समृद्धि पार नष्ट झाली. पैसा नाहीसा झाला, व्यापार बसला. शेती पडीत पडूं लागली. प्रजा देशनिर्वासन करूं लागली.

विजयसिंहाने आपल्या मानसिंह नामक नातवास आपल्या प्रिय वेश्येच्या मांडीवर दत्तक देऊन त्यासच मारवाडचा उत्तराधिकारी म्हणून घोषित केलें होतें. मारवाडच्या सरदारांना अर्थात आपल्या गादीची ही विटंबना कबूल नव्हती. विजयच्या मृत्यूची वातमी कळल्याबरोबर त्याच्या भौमसिंह नामक पांचव्या पुत्राचा पुत्र **भीमसिंह** याने एकदम जोधपूरवर ताबा करून सिंहासनारोहण केलें. गादीचे वारसदार असलेल्या आपल्या चुलत्यांना व भावांना त्याने ठार मारून टाकलें. विजयच्या वेश्येचा दत्तकपुत्र पळाला म्हणूनच बचावला. भीमसिंहही कर्तृत्वाने अयोग्य पुरुष होता. त्याचींही सरदारांशीं भांडणें होऊन त्याने कित्येकांच्या जहागिरी जप्त केल्या. आत्मसंरक्षणासाठी त्यानेही भाडोत्री सिंधी व रोहिल्यांच्या फौजा बाळगल्या. मानसिंहाचाही त्याने सारखा पिच्छा पुरवला. पण कांही वर्षांच्या या अंदाधुन्दी कारभारानंतर भीमसिंह मरण पावला व आता गादीला दुसरा कोणीच वारस न उरल्याने सरदारांनी **मानसिंहास** बोलावून गादीवर बसविलें.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं मेवाड, मारवाड व अंबरच्या गादीवर अनुक्रमें भीमसिंह, मानसिंह व जगतसिंह हे तीनही अत्यंत नालायक व कर्तृत्वशून्य पुरुष आरूढ होते. त्यांनी आपल्या चारित्र्यशून्यतेने आधीच म्रियमाण होत चाललेल्या आपापल्या राष्ट्रांच्या विनाशाचे खड्डे आपल्याच हातांनी खणून ठेवले व अखेरीस परकी ब्रिटिश सत्तेच्या गुलामगिरीत त्यांना कायमचें दफन करून टाकलें. मेवाडच्या कृष्णाकुमारीसाठी या तीनही राष्ट्रांत केवढा भयंकर संग्राम झाला याचा वृत्तांत पूर्वी मेवाडच्या इतिहासांत निवेदन केलाच आहे. कृष्णाकुमारीसाठी उल्लू बनलेल्या मारवाड–अंबरच्या राजांनी या युद्धांत लक्षावधि रुपये बरबाद केले व पठाणांनी प्रजेजवळून लक्षावधींची लूट केली. अखेरीस त्या बिचाऱ्या राजकन्येस विषप्राशन करून आत्मनाश करावा लागला.

सुमारें १८ वर्षेपर्यंत चाललेला हा प्रलय ब्रिटिश सत्तेच्या आगमनानेच थांबला. शेवटीं शेवटीं मानसिंहास वेडाच्या लहरी येऊं लागल्या होत्या. तरीही त्या वेड्या राजाच्या हातून आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें उदक १८१८ सालच्या डिसेंबर महिन्यांत इंग्रजांनी आपल्या हातावर सोडवून घेतलेंच

प्रकरण चवथें

बिकानेर

इ. स. च्या १५व्या शतकांत ज्या वर्षी मारवाडचा सुप्रसिद्ध राजा जोधा यानें जोधपूर शहराची स्थापना केली, त्याच वर्षी त्याचा सहावा पुत्र बीका याने आपल्या तीनशें राठोड साथीदारांसह राजस्थानांतील वायव्येकडील गहन मरुस्थलींत वास्तव्य करणाऱ्या मूळ रहिवाशांवर स्वारी करून स्वत:साठी स्वतंत्र भूमि मिळविली व कोरमदेसर येथे किल्ला बांधून तेथेच आपलें वास्तव्य ठेवलें.

राजस्थानच्या या विस्तीर्ण वाळवंटांत त्याही काळांत तेथील मूळ रहिवाशांचीं सहा प्रजासत्ताक राज्यें होतीं. आपल्या पूर्वपरंपरांना चिकटून राहणारे व स्वाभिमानाने वागणारे हे लोक आपल्यांतीलच कोणातरी लायक पुरुषास आपला नेता निवडत व त्याच्या आधिपत्याखाली राहत. बीकासारख्या पराक्रमी राठोडाने आपल्या प्रदेशांत वास्तव्य केलेलें पाहून त्यांच्यापैकी एका जातीने त्यासच आपला राजा निवडलें व अशा रीतीने **बीका** लोकनियुक्त राजा बनला. वाळवंटाच्या ह्या प्रदेशांत दूरदूर अंतरावर लहान लहान खेडीं असत व अशा हजारपांचशें खेड्यांचें एकेक राज्य असे. बिकट वहिवाटीच्या अशा या प्रदेशांतही कांही वर्षांच्या अवधींतच बीकान सुमारें २५०० खेडीं जिंकून आपल्या राज्यांत सामील केलीं. किंबहुना, ज्यांच्या स्वातंत्र्याला बिकट वास्तव्यप्रदेशामुळे आजवर कोणी धक्का लावूं शकला नव्हता अशा पूनिया, बेनिवाल, गोंडारा, आशियाग, सारण, जोहया इ० जातींच्या लोकांचीं राज्यें जिंकून स्वत:चा राज्यविस्तार करण्यांतच बीकाचा बहुतेक जन्म गेला असें म्हटलें तरी चालेल. जेसलमीरच्या भट्टी राजांपासून भागोरचा जिल्हा जिंकून त्यांत इ. स. १४८९ सालीं बीकाने बिकानेर शहराची स्थापना केली व तेथेच आपल्या राज्याची राजधानी ठेवली. ह्यानंतर सहा वर्षांनी बीका मरण पावला व त्याचा वडील मुलगा **नूनकर्ण** बिकानेरच्या गादीवर बसला. त्याचा दुसरा पुत्र गरसी यानेही स्वतंत्र प्रदेश जिंकन तेथे आपला वंश-

विस्तार केला. नूनकर्णाने भट्टींच्या राज्यावर स्वाऱ्या करून आणखी कांही प्रदेश आपल्या राज्यास जोडला. नूनकर्णाच्या नंतर **जैतसी, कल्याणसिंह** व **रायसिंह** हे पुरुष बिकानेरच्या गादीवर आले. बीकापासून एका शतकांत हे चार राजे झाले.

रायसिंहाच्या कारकीर्दींत त्याने जोधपूरच्या आपल्या वडील घराण्याचें अनुकरण करून अकबराचें मांडलिकत्व पत्करलें व अकबरानेंही आपल्या नित्याच्या धोरणास अनुसरून त्यास चार हजारांची मनसबदारी दिली व पंजाबांत हिस्सारची सुभेदारी दिली. तसेंच मारवाडच्या मालदेवापासून बिकानेरच्या बहुतेक राजांनी, यद्यपि ते कधी मारवाडच्या वडील गादीच्या अंकित रहात तर कधी स्वतंत्र होत, प्रायः मोगल सम्राटांचें मांडलिकत्व सोडलें नाही.

रायसिंह शूर पुरुष होता. बीकाने सुरू केलेलें, मरूच्या वाळवंटांतील मूळ रहिवाशांचीं प्रजासत्ताक राज्यें जिंकण्याचें कार्य, रायसिंहाने पूर्ण केलें. त्या वालुकामय प्रदेशांत आता त्याचा संपूर्ण अधिकार स्थापन झाला होता. पूर्वीच्या त्या मूळ रहिवाशांनीही राठोडांची प्रबल शक्ति पाहून तेव्हापासून ज्या आपल्या तरवारी टाकल्या व नांगर हातीं धरले ते आजतागायत तसेच कृषिकर्मनिरत असलेले दिसून येत आहेत.

अकबराच्या साम्राज्यप्रसाराच्या कार्यांत त्यास रायसिंहाच्या शौर्याचा चांगलाच उपयोग झाला. केवळ राजकीय पराधीनता स्वीकारण्यांतच रायसिंहाने जोधपूरच्या आपल्या वडील गादीचें अनुकरण केलें असें नव्हे; तर आपल्या कन्येचें शील शहाजादा सेलीमच्या सेवेस अर्पण करून त्यानेंही स्वसमान कुलांगारांच्या यादींत स्वतःसाठी स्थान संपादन केलें.

रायसिंहानंतर त्याचा एकुलता एक पुत्र **कर्ण** बीकाच्या गादीवर बसला. कर्णास चार पुत्र होते. त्यांपैकी दोघे शाही फौजेबरोबर दक्षिणच्या स्वारीवर असतांना लढाईंत मारले गेले. १६७४ पासून पुढील शंभर वर्षांत बिकानेरच्या गादीवर पांचसहा राजे बसले. पण यांच्या कारकीर्दींत म्हणण्यासारख्या महत्त्वाच्या कोणत्याच घटना घडल्या नाहीत. १७८७ सालीं **राजसिंह** नांवाचा राजा गादीवर बसला. पण त्याचा एका पंधरवाड्याच्या आंतच सावत्रमातेकडून विषप्रयोग होऊन अंत झाला.

राजसिंहाच्या मृत्यूपासूनच याही राज्यांत अंतःकलहास व यादवीस प्रारंभ झाला. राजसिंहाचा सावत्र भाऊ सुरतसिंह याने राज्याचा खरा वारस जो राजसिंहाचा बालराजपुत्र प्रतापसिंह त्याचा वध करून गादी बळकावली. बीकाच्या वंशांतील सरदारांनी त्याच्या या कृत्यास विरोध केला. पण सुरतसिंह मजबूत माणूस होता. त्याने भाडोत्री शिपायांच्या फौजा उभारून सरदारांचा मोड केला.

सुरतसिंह हा पराक्रमी व धाडशी परंतु क्रूर होता. बिकानेरच्या गादीची ज्यांनी आजवर इमनदारीने सेवा केली होती अशा अनेक सरदारांना त्याने क्षुल्लक कुरबुरीवरून ठार मारून टाकलें. सुरतसिंहाने एकूण एकेचाळीस वर्षें राज्य केलें. आपल्या लढाया चालविण्यासाठी त्याने गरीब प्रजेवर जुलूम व अत्याचार करूनच पैसा उकळला. त्याच्या जाचाने त्रस्त झालेल्या अनेक शेतकऱ्यांनी त्याच्या राज्यांतून निर्वासन केलें. हिंदुस्थानभर त्या काळांत चाललेल्या राजकीय खळबळीचा त्याच्या राज्यावर फारसा परिणाम झाला नसला तरी निसर्गकोपांचा परिणाम झालाच. हिंदुस्थानांतील इतर विभागांप्रमाणेंच अवर्षणें व दुष्काळ यांनी त्याच्या राज्यांत कहर करून दिला. इंग्रजी सत्तेच्या आगमनपूर्व काळांत सर्वत्र दृश्यमान होत असलेली बरबादी व विनाश त्याच्याही राज्यांत दिसत होता. अखेरीस प्रबळ ब्रिटिश सत्तेपुढे मान वाकवून त्याने कंपनी-सरकारचें सार्वभौमत्व मान्य केलें व मांडलिकत्वाचा तह करून आपलें स्वतंत्र जीवन संपविलें.

प्रकरण पांचवें

जेसलमीरचें भट्टी राज्य

अरवली पर्वताच्या पश्चिमेकडील मरुच्या भयंकर वालुकामय प्रदेशांतील याच एका राजपूत राज्याचा वृत्तांत आता पाहावयाचा राहिला आहे. त्याचें संक्षेपतः वर्णन केलें की राजस्थानांतील महत्त्वाच्या वर्तमान राज्यांचा इतिहास संपला असें म्हणण्यास हरकत नाही.

जेसलमीरचे भट्टीराजे हे आपणास यदुवंशोद्भव मानतात. द्वारकेच्या यदुकुलाचा अधिपति श्रीकृष्ण, त्याचा पुत्र प्रद्युम्न व त्याचा पुत्र वज्र. ह्या वज्रापासून भट्टीवंशाची उत्पत्ति झाली असें भट्टींच्या वंशावळ्यांचें म्हणणें आहे. यदुकुलाचा नाश झाल्यानंतर वज्राचे वंशज पंजाब, अफगाणिस्थान, झाबुलिस्तान इ० भागांत जाऊन वसले व तेंथे त्यांनी आपलें राज्य वाढविलें. परंतु इ स.च्या आठव्या शतकांत परकी आक्रमणाच्या माऱ्यामुळे मागे हटत हटत अखेरीस त्यांनी राजस्थानच्या मरुस्थलीचाच आश्रय घेतला. या वंशांतील **तुनो** नामक एका पुरुषास ह्या मरुस्थलींत एक भूमिगत द्रव्यनिधि सापडला. त्या आधारावर त्याने बिजनोरचा किल्ला बांधला व तेथेच तो राहूं लागला. हीच भट्टीराज्याची मूळ संस्थापना होय असें म्हणतां येईल. इ. स. ८१४ मध्ये तुनो मरण पावला व त्याचा पुत्र **विजयराय** भट्टींचा स्वामी बनला.

विजयरायच्या, पंजाबच्या हद्दीवरील बराह पठाणांबरोबर अनेक यशस्वी लढाया झाल्या. पण एका लग्नसमारंभाच्या निमित्ताने प्रवेश करून पठाणांनी सर्व भट्टींना कापून काढलें व बिजनोरवर ताबा केला. या कत्तलींतून विजयरायचा लहान पुत्र **देवराज** यास त्याच्या पुरोहिताने वाचविलें होतें. देवराजने तारुण्यांत आल्यावर भूटाच्या आपल्या मामाकडे थोड्या जमिनीची मागणी केली. एका रेड्याच्या चामड्याने झाकली जाईल इतकी वाळवंटांतील जागा त्यास देण्यांत आली व तीवरच देवराजने सुप्रसिद्ध भुटनेरच्या किल्ल्याची उभारणी केली. मध्य आशियांतून

येतांना पंजाब ओलांडला की राजस्थानच्या ऐन मार्गावर हा किल्ला वसलेला आहे. त्यामुळे पूवस जें महत्त्व अजमीरला तेंच पश्चिमेस या किल्ल्यास आहे. देवराजने आसपासच्या प्रदेशावर स्वाऱ्या करून बराच पैसा आणला. तसेंच त्याच्या वंशाच्या उच्छेदाचा प्रयत्न करणाऱ्या बराहा पठाणांचाही त्याने सूड घेतला. हळूहळू, मरुस्थली व पंजाब यांच्या सरहद्दीवर भट्टी-रावळ देवराज हा आपल्या हयातींत एक महत्त्वाचा राजा होऊन बसला.

देवराजच्या नंतर त्याचा पुत्र **वत्सराज** व नातू **दूसज** यांनी देवराजचें कार्य पुढे चालविलें. त्यांच्या कीर्तीचा परिमल सबंध राजस्थान-भर पसरल्यामुळे त्यांचे शरीरसंबंधही राजपूत राजघराण्यांशीं होऊं लागले. दूसजचा पुत्र **जेसल** याने एका साधूच्या सांगण्यावरून जेसनोहच्या जवळ असलेल्या त्रिकूटच्या मजबूत पहाडावर **जेसलमीर**च्या किल्ल्याची बांधणी केली व सुरक्षितपणाच्या दृष्टीने तेथेंच आपली राजधानी नेली. साधूनेच त्यास त्या पहाडावरील गोड पाण्याचीं सुन्दर झरीं दाखविलीं. तुनोने ९व्या शतकांत बिजनोरला आपला वंश स्थापन केल्यापासून ३०० वर्षांत जेसलने जेसलमीरची स्थापना करून आपल्या राज्यास बरेंच स्थायी स्वरूप आणून दिलें. एवढ्या काळांत भट्टींची गणना राजस्थानांतील शूर व पराक्रमी राज-पुतांत होऊं लागली होती व त्यांचा वंशविस्तारही बराच झाला होता. मुसल-मानांच्या बरोबर त्यांचे अनेक सामने येऊन पडले होते व म्हणूनच सुरक्षित-तेच्या दृष्टीने त्यांनी वायव्येकडील घोर वाळवंटाच्या सीमेवर जेसलमीरचा मजबूत किल्ला बांधून आपला राज्यविस्तार व वंशविस्तार चालविला होता.

ह्या भट्टीवंशांतील पुरुष सामान्यतः दीर्घायुषी झाले व त्यांपैकी बहुतेकांनी ३० ते ४०–४५ वर्षें राज्य केलें. जेसलच्या मागून **शालभान**, **कैलण** व **चाचिक** हे राजे झाले. चाचिकने आपली गादी आपला धाकटा नातू **कर्ण** यास दिली. त्यामुळे कर्णाचा वडील भाऊ जैतसी गुज-रातेंत मुसलमानांच्या पदरीं नोकरीस जाऊन राहिला. कर्णाचेही मुसलमान आक्रमकांच्या बरोबर अनेक सामने झाले असावेत. कर्ण आपल्या पूर्वजां-प्रमाणें शूर पुरुष असून त्याने मुजफरखान नामक मुसलमान सरदारास त्याच्या तीन हजार अनुयायांसह उघड लढाईंत ठार मारल्याचा भट्टींच्या वंशावळींत उल्लेख आहे. त्यानेही २८ वर्षें राज्य केलें.

कर्णानंतर त्याचा पुत्र **लाखनसेन** गादीवर बसला. पण तो वेडा निघाला. त्यामुळे सरदारांनी त्यास पदच्युत करून त्याचा पुत्र **पूनपाल** यास गादीवर बसविलें. पण हाही अतिशय तापट व उतावळ्या स्वभावाचा असल्याने सरदारांनी त्यासही पदच्युत केलें व गुजरातेंत गेलेला कर्णाचा वडील भाऊ **जैतसी** यास परत बोलावून इ. स. १२७६ सालीं गादीवर बसविलें.

जैतसीचा परिवार फार मोठा होता. त्याचा पुत्र मूलराज, नातू देवराज व पणतू हंमीर हे सर्व पराक्रमी पुरुष होते व त्यांनी जैतसीच्या कारकीर्दींत राज्याचा बराच विस्तार केला. त्या सर्वांत हंमीर हा विशेष पराक्रमी होता. जैतसीच्या ह्या पुत्रपौत्रांनी दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन याचा खजीना लुटला. या घटनेमुळे आतापर्यंत वाळवंटाच्या कोपऱ्यांत पडलेल्या भट्टींच्या राज्याकडे सुलतानाचें लक्ष जाऊन त्यानें त्यांना शासन करण्याचें ठरविलें. भट्टींनीही आपल्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी कंबर बांधून प्रतिकाराची तयारी केली. जेसलमीरच्या किल्ल्यांत धान्य व शस्त्रास्त्रें यांचा भरपूर साठा जमविण्यांत आला. राज्यांतील स्त्रिया, मुलें व वृद्ध माणसें यांना वाळवंटाच्या दूरच्या भागांत सुरक्षित ठिकाणीं पाठविण्यांत आलें व आक्रमकांना कांहीही लूट मिळूं नये म्हणून सर्व प्रदेश उजाड करून टाकण्यांत आला. राज्यांतील सर्व भट्टी तरुण जेसलमीरच्या संरक्षणासाठी जमा झाले. किल्ल्याच्या बचावासाठी त्यांनी उत्कृष्ट तयारी केली. बाहेरून शत्रूची रसद व दाणागोटा मारून आणण्याचें काम मूलराज व हंमीर यांनी अंगावर घेतलें व जैतसीने आपल्या इतर सरदारांसह किल्ला लढवावा असें ठरलें.

सुलतानाच्या सेनेने अखेरीस किल्ल्यास वेढा दिला. वेढ्याचें काम कैक दिवस चाललें व त्यांत कित्येक मुसलमान सरदार मारले गेले. मूलराज व हंमीरने गनिमी काव्याचा आश्रय करून शत्रूची रसद मारण्याचें व ती किल्ल्यांतील आपल्या देशबांधवांना पोचविण्याचें काम अतिशय यशस्वी रीतीने केलें. मुसलमान आक्रमकांना वारंवार अपयश यावें, त्यांनी वेढा उठवून निघून जावें व पुनरपि आणखी तयारी करून व मोठी सेना बरोबर घेऊन जेसलमीरावर हल्ला चढवावा असा क्रम सतत आठ वर्षें चालला. अशा तऱ्हेने हा स्वातंत्र्याच्या लढा चालूं असतांनाच जैतसी मरण पावला व **मूलराज** गादीवर बसला.

जैतसीच्या मृत्यूची बातमी कळल्यावर सुलतानाने पुन: जेसलमीरावर सेना पाठविली. भट्टींनी पुन: शौर्याची शिकस्त करून नऊ हजार शत्रूंचीं डोकीं रणदेवतेस अर्पण केलीं. आक्रमक पुन: एकवार पळून गेले. पण जिद्दी सुलतानाने लवकरच आणखी एक विराट सेना जेसलमीरावर पाठविली. आठदहा वर्षें सतत चाललेल्या या स्वातंत्र्यसंग्रामाने भट्टींचें मनुष्यबळ व द्रव्यबळही बरेंच क्षीण झालें होतें. त्यांच्या जवळील दाणावैरण अगदी संपून गेली होती व त्या वालुकामय प्रदेशांतून नवीन साठा मिळण्याची आशा उरली नव्हती. शत्रूने जबरदस्त वेढा दिलेला होता व गडाच्या आंत भट्टींची आता उपासमार होऊं लागली होती.

भट्टींच्या या हालाची बातमी लागल्यामुळे मुसलमानांनी वेढ्याचें काम अधिकच कसोशीने चालविले. अखेरीस जगण्याची कांही आशा नाही हें पाहून भट्टींनी निर्वाणीचा जोहार करण्याचें ठरविलें. किल्ल्यांतील स्त्रियांनी, मुसलमानांच्या हातीं पडून विटंबना करून घेण्यापेक्षा आत्मार्पण करणेंच अधिक पसंत केलें व सर्वांनी आपल्या पतींच्या समक्ष अग्निप्रवेश केला. त्यांचें हें दिव्य कृत्य पाहिल्यावर भट्टींनी किल्ल्याचीं दारें उघडून शत्रुसेनेवर अखेरचा हल्ला चढविला. आपल्या स्वभावाप्रमाणें पराक्रमाची शर्थ करून व अनेक शत्रूंना यमसदनीं पोचवून प्रत्येक भट्टी राजपूत धारातीर्थी पतन पावला. निर्जन अशा त्या किल्ल्यावर मुसलमानांनी प्रवेश केल्यावर त्याची अधिकच नासधूस करून टाकली व गडाचीं दारें बंद करून ते निघून गेले. अशा तऱ्हेने तेराव्या शतकाच्या अखेरीस जेसलच्या पुत्रांनी स्वातंत्र्याच्या रणयज्ञांत अत्यंत शौर्याने आत्मसमर्पण केलें.

जेसलमीरच्या भट्टींची याप्रमाणे शाका झाली तरी त्यांतून रावळ जैतसीचा पुत्र रतनसी याचे गरसी व कानूर नामक दोन लहान पुत्र वंशविस्तारासाठी वाचविण्यांत आले होते. त्यांनी पुनरपि लवकरच जेसलमीरवर कब्जा करून भट्टीराष्ट्राची पुनर्घटना चालविली. पुन: भट्टीवंशांतले सर्व राजपूत जेसलमीरास जमा होऊं लागले. **गरसी** रावळ बनला. त्याची राणी विमलादेवी हीस पुत्र नव्हता. म्हणून त्यांनी देवराजचा पुत्र **केहूर** यास दत्तक घेतलें व केहूरच्या नंतर हंमीरच्या जैता व नूनकर्ण नामक पुत्रांचा गादीवर अधिकार ठेवला. केहूरने व त्याच्या पुत्रांनी भट्टी राज्याचा पुन: बराच वि-

स्तार केला. सरहद्दीवरील राजपूत व मुसलमान सरदारांच्या बरोबर त्यांनी अनेक यशस्वी लढाया मारल्या व अनेक दुर्ग व परगणे जिंकून आपल्या राज्यास जोडले. केहूरच्या पुत्रांत कैलण हा विशेष पराक्रमी असून त्याच्या वीरतेच्या अनेक कथा भट्टीवंशावळींत आढळतात. कैलणचा पुत्र **चाचिक** हाही बापासारखाच साहसी व शूर होता. त्यानेही भट्टीच्या राज्यविस्ताराचें काम बरेंच जोराने केलें. १३०६ पासून १४७४ पर्यंत सुमारें पावणेदोनशें वर्षांत गरसीच्या वंशजांनी स्वतंत्र भट्टीराष्ट्र पुनः संघटित केलें.

भारतवर्षाच्या व्यापक राजकारणाच्या दृष्टीने भट्टींचें राष्ट्र कधीच महत्पदास चढलें नसलें तरी आपलें स्वतंत्र जीवन घालविण्यासाठी तें यथाशक्ति झगडलें एवढेंच नव्हे तर आपल्या वालुकामय प्रदे ाच्या बाहेर निघून भट्टींनी पंजाबांत सिंधुनदीपर्यंत आक्रमणेंही केलीं. निरनिराळ्या राजपूत व मुसलमान सरदारांना जिंकून मुलतानपर्यंतचा मुलूख त्यांनी वेळोवेळीं काबीज केला.

इ० स० १४७५ पासून आणखी एक शतक भट्टींचें अशाच तऱ्हेने गेलें. यद्यपि या काळांत भट्टींच्या स्वातंत्र्यावर कोणी घाला घालूं शकला नाही, तरी मुलतानच्या प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या केरोरकोट, धुनियापूर, पूगल, मारोत इ० ठिकाणच्या भट्टी राजपुतांनी आपापलीं वतनें सांभाळण्यासाठी इस्लामी धर्म स्वीकारून भट्टींच्या स्वधर्मनिष्ठेस कलंक लावला होता.

सोळाव्या शतकाच्या मध्यापासून दिल्लीस मोगलांचें राज्य स्थिर झालें होतें. अकबराने त्यास साम्राज्याचें स्वरूप दिलें होतें. त्याच्या धोरणामुळे, आपल्या लहानशा जहागिरीच्या चतुःसीमांत ज्यांची पराक्रमाची महत्त्वाकांक्षा कोंडून राहूं इच्छीत नव्हती असे अनेक राजपूत वीर मोगलांच्या साम्राज्यछत्राखाली जमा होऊं लागले होते. भट्टीकुलांतील **शबलसिंहा**चें नांव त्यांतच घेण्यासारखें आहे. मोगल सैन्यांत नोकरी करतां करतां पेशावरच्या सुभेदारीच्या हुद्यावर तो चढला होता. अखेरीस जेसलमीरच्या सिंहासनाचा वारसा जेव्हा त्याच्याकडे आला तेव्हा त्यानें मोगल बादशहाच्या वतीने मांडलिक म्हणूनच कारभार हातीं घेतला. शबलसिंह स्वभावाने उमदा व गोड पुरुष असल्याने त्याच्या शाहीसेनेंतील पूर्व कामगिरीबद्दल बादशहाकडूनही त्यास आणखी बराच मुलूख मिळाला.

शबलचा पुत्र **अमरसिंह** याच्या कारकीर्दीत भट्टींची बिकानेरच्या राठोडांबरोबर चाललेलीं भांडणें बरींच विकोपास गेलीं. ह्या दोन राज्यांच्या सरहद्दी एकमेकांस अगदी भिडलेल्या असल्याने बिकानेरचे नवीन विजिगीषु राठोड भट्टीराज्यावर वारंवार स्वाऱ्या करून त्यांचा प्रदेश जिकण्याचा प्रयत्न करीत. अमरसिंहाने राठोडांचा बंदोबस्त करण्यासाठी त्यांच्यावर स्वारी केली. राठोडांनी हिस्सारच्या पठाणांची मदत घेतली. पण अमरसिंहाने त्यांचा पराजय करून राठोडांच्या सरहद्दीवरील बराच प्रदेश काबीज केला व त्यांच्या अनेक शहरांची जाळपोळ केली. पण अमरच्या मृत्यूनंतर पुनः राठोडांनी आपला मुलूख जिंकून परत घेतला.

अमरच्यानंतर त्याचा पुत्र **जसवंतसिंह** व नातू **अक्षय्यसिंह** गादीवर आले. अक्षयचें राज्य त्याचा चुलता **तेजसिंह** याने बळकावलें, पण तेजसिंहासही त्याच्या चुलत्याने पापाचें प्रायश्चित्त दिलेंच. पुनः अक्षयसिंह गादीवर आला व ह्यानंतर सुमारें ४० वर्षें म्हणजे अठराव्या शतकाच्या सबंध प्रथमार्धात त्यानेच जेसलमीरचा कारभार हाकला. ज्या देवरावळ शहराची पहिल्या देवराजने स्थापना केली होती तें व त्याच्या भोवतालचा बराच प्रदेश अक्षयच्या कारकीर्दीत भावलपूरच्या मुसलमानांनी जिंकून घेतला. हल्लीचें पंजाबच्या सरहद्दीवरील भावलपूरचें संस्थान मुख्यतः भट्टींच्या राज्यांतून मुसलमानांनी जिंकलेल्या प्रदेशाचेंच बनलें आहे.

अक्षयसिंहाच्या मृत्यूनंतर **मूलराज** गादीवर बसला. त्याच्या कारकीर्दीत इतर राजपूत वंशांप्रमाणेंच भट्टींचेंही पतन वेगाने सुरू झालें. सरूपसिंह नांवाच्या एका मेथाजीस त्याने आपला प्रधानमंत्री बनविलें. ह्या मंत्र्याचें व भट्टी सरदारांचें कधीच जमलें नाही. त्यामुळे भांडणांना ऊत आला. सरदारांच्या आग्रहावरून मूलराजचा ज्येष्ठ पुत्र रायसिंह याने बापासमक्ष सरूपसिंहास यमलोकचा मार्ग दाखविला. मूलराजलाही मंत्र्याच्या पाठोपाठ रवाना करावें म्हणून सरदारांनी रायसिंहास पुनः आग्रह केला, पण त्याने पितृहत्येचें पातक करण्याचें नाकारलें. तेव्हा सरदारांनी मूलराजाला तुरुंगांत टाकून रायसिंहाच्या नांवें राज्य पुकारलें. पण रायसिंहाच्या पितृभक्तीने बापाच्या जिवंतपणीं त्यास गादीचा स्वीकार करूं दिला नाही.

सुमारें ३॥ महिने अशाच स्थितींत गेले. अखेरीस जोरावरसिंह नांवा-

च्या एका तरुण राठोड सरदाराच्या मातेने आपल्या पुत्राच्या व त्याच्या मित्रांच्या साहाय्याने मूलराजची तुरुंगांतून सुटका केली व त्यास पुनः गादीवर बसविलें. पितृभक्त रायसिंहाने बापाच्या आज्ञेवरून मातृदेशाचा त्याग केला. आपल्या राज्याच्या दक्षिण सरहद्दीपाशीं जेव्हा तो आला तेव्हा कांही सरदारांनी त्यास राज्यांत बंड उभारून बापास पदच्युत करण्याचा सल्ला दिला. पण रायसिंहाचें मातृभूमीवरील प्रेम फारच गाढ होतें. त्याने सरदारांना 'माझ्या मातृभूमीचा मी असा उध्वंस करण्यास कधीच तयार होणार नाही' असा जबाब दिला व मातृदेशाचा त्याग करून तो जोधपूरच्या आश्रयास जाऊन राहिला. कांही कालाने मातृभूमीच्या प्रेमाने त्यास परत जेसलमीरास आणलें. पण मूलराजने त्यास एका किल्ल्यांत बंद करून ठेवलें.

मूलराजने पुनः आपल्या मृत मंत्र्याच्या सलीमसिंह नांवाच्या २१ वर्षांच्या मुलास प्रधानकीचीं वस्त्रें दिलीं. हा सलीमसिंह अगदी बापसे बेटा सवाई निघाला. असें म्हणतात की, बाह्य आक्रमणांनी व युद्धांनी जेसलमीरच्या सरदारांचा जितका विनाश झाला नसेल तितका सलीमच्या दुष्ट कारस्थानांनी करून दाखविला. आपल्या राष्ट्रासाठी ज्यांनी आजपर्यंत जरूर पडेल तो स्वार्थत्याग केला होत व गादीची इमानाने सेवा केली होती अशा अनेक सरदारांना केवळ बापाच्या वधाबद्दल सूड म्हणून त्याने क्रूरपणाने ठार मारलें. रायसिंहाचा व त्याच्या पुत्रांचाही या सलीमसिंहाने अतिशय छळ केला. इमानदार सरदारांनी त्यांच्या बचावाचे पराकाष्ठेचे प्रयत्न केले. पण सलीमच्या कारस्थानांपुढे ते सर्व व्यर्थ गेले. रायसिंहाच्या पुत्रांस त्याने विषप्रयोगाने ठार मारविलें. याच ५० वर्षांच्या काळांत आपल्या कर्तृत्वाने ब्रिटिश मुत्सद्यांनाही सतत झुलवीत ठेवणारा व विनाशापासून आपल्या राज्याच्या बचावाचे शक्य तितके प्रयत्न करणारा कोटच्याचा जालीमसिंह कोणीकडे व आपल्या दुष्ट कारस्थानांनी व क्रर कृत्यांनी आपल्या राज्याचा विनाश ओढवून घेणारा जेसलमीरचा हा सलीमसिंह कोणीकडे? अठराव्या शतकाचा सबंध उत्तरार्ध लोलांडून अखेरीस एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादांत मूलराजनेही आपल्या राज्याचें उदक कंपनीसरकारच्या हातावर सोडलें व त्याबरोबरच भगवान श्रीकृष्णाच्या वंशाचें स्वतंत्र अस्तित्व समाप्त झालें.

राजपूत राज्यांचा उदय व ऱ्हास

विभाग तिसरा

ऱ्हासाची मीमांसा

१. सात सहस्त्र वर्षांची प्राचीन आर्यजाति. भरतवर्षावर मुसलमानांचें प्रथम आक्रमण झाल्यापासून गेल्या हजार बाराशें वर्षांत येथील आर्य जातीचा एकसारखा अपकर्ष होत गेला ही गोष्ट सामान्यत्वें-करून खरी आहे. महंमदी आक्रमणाच्या पूर्वी आसेतुहिमाचल भरतवर्षांत एक शासनसत्ता जरी कायम झालेली दिसत नसली, तरी विंध्याचलाच्या उत्तरेकडचा एक व दक्षिणेकडचा दुसरा असे भारताचे दोन स्थूल विभाग जर मानलें तर ज्यांनी सबंध उत्तरभारतावर राज्य केलें व ज्यांनी सबंध दक्षिण भारतावर आधिपत्य गाजविलें असे राजे व राजघराणीं या देशांत जन्मास आलींच नाहीत असें समजणें फार चुकीचें होईल. आ र्यांनी आपल्याबरोबर आणलेला वैदिक संस्कृतीचा ध्वज आसेतुहिमाचल भरत-वर्षावर फडकविला होता; व धर्म, समाजरचना, संस्कृति व तत्त्वज्ञान यांच्या बंधनांनी त्यांनी सबंध भारत देश एकाच ग्रंथींत बांधून टाकला होता यांत मुळीच शंका नाही. भरतवर्षाचा गौरव कमी दाखविण्याच्या हेतूने येथील आर्यसंस्कृतीच्या उदयाचा व विकासाचा काल शक्य तितका अलीकडे ओढण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाश्चात्य लेखकांचें मत प्रमाण मानलें तरी देखील आमचें प्राचीनत्व आजपासून कमींतकमी सात सहस्त्र वर्षें तरी पाठीमागे न्यावेंच लागतें. विद्यमान जगतीतलावर इतकी प्राचीन अशी दुसरी कोणतीही जाति आपल्या संस्कृतिविशेषांच्या अवशेषांसह अस्तित्वांत असलेली दिसत नाही. तेव्हा एवढी गोष्ट निर्विवादपणें सिद्ध मानतां येते की, भारतीय आर्यांनी आपलें स्वातंत्र्य, आपला धर्म, आपली संस्कृति व आपलें तत्त्वज्ञान निदान महंमदी आक्रमणापर्यंत म्हणजे कमींत कमी सहा हजार वर्षें तरी खास कायम राखलीं होतीं. अशा रीतीने अवि-च्छिन्नपणें सहा सहस्त्र वर्षें उन्नतावस्था कायम टिकविणारी जाति म्हणून तिची अद्वितीय विशेषता कोणीही हिरावून नेऊं शकत नाही.

२. दुर्गतीचीं भासमान कारणें. संस्कृतीच्या व सुधारणेच्या दृष्टीने एवढी पुढारलेली ही आर्यजाति गेल्या हजार बाराशें वर्षांतच

इतकी कशी दुर्बल झाली की, तिला आजची दुर्गति व अवनतावस्था प्राप्त व्हावी ? ह्या प्रश्नाने अनेक विद्वानांना विचारप्रवण केलें आहे. निरनिराळ्या लेखकांनी आपापल्या परीने आर्यांच्या विनाशाचीं निरनिराळीं कारणें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. कोणी, भारतीय आर्यांचा नाश त्यांच्या वेदांतामुळे व संन्यासपर तत्त्वज्ञानामुळे झाला, असें म्हणतो. कोणी भूतदया, अहिंसा, सत्य, क्षमा इ० नीतितत्त्वांचें फाजील स्तोम माजविण्यांत आल्यामुळे व भारतीय हिंदू राजांना त्यांचीच शिकवण मिळाल्यामुळे त्यांचा नाश झाला, असें प्रतिपादन करतात. कोणी, हिंदुस्थान हें एक राष्ट्र कधीच बनूं शकलें नाही, म्हणजे आज पाश्चात्य देशांत ज्या अर्थाने राष्ट्रीयतेचा विकास झाला आहे त्या अर्थाने तो आमच्याकडे केव्हाच होऊं शकला नाही, त्यामुळे आमचा नाश झाला, असें समजतात. कोणाच्या मतें, आमच्या आक्रामकांच्यापेक्षा आमची युद्धपद्धति व युद्धसामग्री हिणकस होती व नवीन आक्रमणाकडे लक्ष देऊन आम्ही आमच्या जुन्यापुराण्या युद्धपद्धतीचा व युद्धसामग्रीचा त्याग करून नवीन पद्धतीचा व शस्त्रास्त्रांचा स्वीकार केला नाही, म्हणून आम्ही पराजित व परतंत्र झालों आहोंत. तर कोणाच्या मतें जातिभेद, मूर्तिपूजा इ० हींच आमच्या विनाशाचीं खरीं कारणें आहेत. हीं व यासारखींच कारणें दर्शविणाऱ्या विद्वान लेखकांचीं नांवें जरी येथे घेतलीं नाहीत तरी त्यांच्याबद्दल आम्हांस पूर्ण आदर आहे व तो नमूद करूनही आम्हास असें सांगणें अवश्य वाटतें की, त्यांनी केला त्यापेक्षाही अधिक मूलग्राही पद्धतीने ह्या प्रश्नाचा विचार होणें अगत्याचें आहे. तसा विचार करण्याच्या अगोदर वर निर्दिष्ट केलेल्या भिन्न भिन्न उपपत्तींचा विचार करून त्यांत ग्राह्यांश कितपत आढळतो हें पाहूं.

३. वेदांत व तत्त्वज्ञान. वेदांततत्त्वज्ञानामुळे आमचा नाश झाला असें म्हणणाऱ्यांचा मुख्य रोख संन्यासपर तत्त्वज्ञानावर असतो हें उघड आहे. वेदांत तत्त्वज्ञान संन्यासपर आहे की कर्मपर, असल्या चर्चेंत पडण्याचें हें स्थळ नव्हे. आपणास ह्या ठिकाणीं फक्त ऐतिहासिक दृष्टयाच विचार करावयाचा आहे.

वेदान्ततत्त्वज्ञानाचें मूळ उगमस्थान वेद होत. ब्राह्मण, आरण्यकें व

गाई देणारा तो 'गॉड' आणि त्याचा God = giver of cows.

उपनिषदें ह्यांनी वेदांतील तत्त्वज्ञानविषयक भागाचा विकास केला आहे. वेदांचा काल अगदी अलीकडचा म्हणजे इ. स. पूर्व ५००० वर्षांचा मानला तरी त्या वेळीं आर्यजाति आपल्या ऐन आक्रामक स्वरूपांत होती असें दिसतें. निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन व तेथील मूळ रहिवाशी लोकांना पादाक्रान्त करून वैदिक संस्कृतीचा ध्वज लावण्याच्या पराक्रमास आर्यांनी प्रारंभ केला, तो काल म्हणजे वेदकाल होय. शिवाय वेदांत ठिकठिकाणीं 'मला गाई मिळाव्यात, मला पशु मिळावेत, मला भूमि मिळावी, मला धन मिळावें' अशाच प्रार्थना केलेल्या असून त्या सर्व भौतिक संपत्तीचें संपादन करण्यास प्रोत्साहक स्वरूपाच्याच आहेत. तेव्हा वेदांतील शिकवणीमुळे आमच्यांत आलस्यवृत्ति उत्पन्न झाली असें मानतां येत नाही.

४. ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें. वेदांच्या नंतर वैदिक तत्त्वज्ञानाचा विकास ब्राह्मणें, आरण्यकें व उपनिषदें ह्यांनी केला. उपनिषदें संन्यासपर आहेत की कर्मपर हाही वाद येथे उपस्थित न करतां केवळ ऐतिहासिक दृष्टया पाहिलें तर आरण्यकोपनिषदादिकांच्या कालीं आर्यांचा उत्कर्ष यथास्थित होतच होता. इ. स. पूर्व ४००० ते ३००० हा उपनिषदादिकांचा अगदी अलीकडचा काळ मानला जातो. इ. स. पूर्व ४००० व ३००० हे रामायण व महाभारत यांच्या मूळ घटनांचे ऐतिहासिक काळ मानले जातात. तेव्हा आरण्यकोपनिषदादिकांच्या शिकवणीमुळे जर आर्यांत अकर्मण्य वृत्ति निर्माण झाली असती तर दाशरथी राम केवळ एका बायकोसाठी एवढा मोठा सेतु बांधून समुद्रोल्लंघन करता ना व रावणकुलाचा संहार करून आपल्या अपमानाचा सूड घेता ना. त्याचप्रमाणें पांडवांनीही एवढें मोठें भारतीय युद्ध केलें नसतें व आपल्या पैतृक राज्याच्या प्राप्तीसाठी असंख्य लोकांच्या संहारास ते प्रवृत्त झाले नसते. उपनिषदादिकांच्या शिकवणीमुळे भारतीय युद्धकालीं सर्वच पांडव आपल्या क्षात्रकर्मापासून निवृत्त होऊं पाहत होते असेंही मानतां येत नाही. कारण एकट्या अर्जुनासच काय तो विषाद वाटला; बाकीचे पांडव तर युद्धास उभेच होते. शिवाय अर्जुनाचा विषाद घालवीत असतांना श्रीकृष्णाने गीतेंत अगदी पहिल्याच सपाट्याला 'अर्जुना तुझा हा विषाद आर्यांना शोभण्यासारखा नाही, तुझ्यासारख्या आर्यास असला नामर्दपणा शोभत नाही'

असा ह्मणझ ीत उपदेश केला आहे. तेव्हा विषण्ण अंःतकरणाने प्राप्त कर्तव्य टाळणें हा आर्यांचा धर्म नव्हता हें उघड आहे.

५. इतिहास–पुराणांचा परिणाम. यानंतर वैदिक तत्त्वज्ञानाचा प्रसार इतिहासपुराणांनी केला. 'इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत्' असें वचन आहे. महाभारत व रामायण हे दोन आर्यांचे प्रमुख इतिहासग्रंथ होत असें मानण्यांत येतें. त्यांत सगळा कर्मप्रवृत्तीचा, सुडाचा व लढायांचाच इतिहास भरला आहे. महाभारतांत प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानाचा परिपाक भगवद्‌गीतेंत उतरला आहे असें मानण्यांत येतें. व गीतेने तर 'निष्काम बुद्धीने तूं हिंसाचरण केलेंस तरी तें तुला स्पर्श करूं शकत नाही, तेव्हा युद्ध करण्यास प्रवृत्त हो' असाच आशय इतस्ततः प्रतिपादन केला आहे. पुराणांच्याकडे पाहिलें तर तीं सर्व अमक्या देवाने तमका असुर मारला व तमक्या दवाने अमका असुर मारला म्हणून त्यांची पूजा करा असें सांगत आहेत. तेव्हा असुरमर्दनाचा आदर्श घालून देणाऱ्या पुराणांनी आमच्या ठिकाणीं नैराश्य व अकर्मण्यता उत्पन्न केलेली पौराणिक कालांत तरी दिसून येत नाही. महाभारत व रामायण या ग्रंथांचें आजच्या स्वरूपांत संस्करण झालें तो काळ म्हणजे इ. स. पू. ४००।३०० चा काळ होय. सुप्रसिद्ध जगद्विजयी वीर f कंदरची स्वारी यानंतरच झाली. पण 'या महाराज, व हिंदुस्थानचें राज्य घ्या आम्हांस आता या नश्वर जगताचा कंटाळा आला असून आम्ही मोक्षमार्गाचा अवलंब करण्यास गिरिकंदरांत निघून जातों,' असें कोणी त्यास म्हटलेलें दिसत नाही. उलट सिंधुनदीच्या तटाकींच पौरव राजाने त्यास असा तडाखा लगावला की, त्याची पुढे कदम टाकण्याची हिंमत झाली नाही. तेव्हा इतिहास-पुराणकालांत भारतीय आर्यांवर नैराश्य वृत्तीचा पगडा बसला होता व ते आपलीं कर्में यथोचित रीतीने करीत नव्हते असें म्हणतां येणार नाही.

६. बौद्धकालांत काय दिसतें ? मध्यंतरीं इ. स. पू. ६ व्या शतकापासून बौद्ध व जैन मतांचा उदय झाला. त्यामुळे काय परिणाम झाला हें ऐतिहासिक दृष्ट्या पाहिलें तर अशोक व हर्ष यांसारखे सम्राट इ. स. पू. ६०० ते इ. स. ६०० च्या कालांतच निर्माण झाले आहेत. हे दोन्ही सम्राट बौद्धमतानुयायी होते. परंतु त्यामुळे त्यांच्या साम्राज्य-

संवर्धनांत कोठे खंड पडल्याचें दिसून येत नाही. याच काळांत झालेल्या शुंग व गुप्त इत्यादि हिंदु राजांनी तर अश्वमेधासारखे यज्ञ करून कर्मयोगाची पूर्वपरंपरा चालू ठेवली होती व त्यांचीही साम्राज्यें दोनदोनशें तीनतीनशें वर्षें नांदलीं. तेव्हा बौद्धकालांत भरतवर्षांत सरसकट अकर्मण्यता निर्माण झाली होती असें ऐतिहासिक दृष्टया दिसत नाही.

७. शांकरतत्त्वज्ञान व अकर्मण्यता. यानंतर आपण श्रीमदाद्यशंकराचार्यांच्या काळांत म्हणजे इ. स. च्या आठव्या शतकांत येऊन पोचतों. वास्तविक आज ज्याला वैदिक धर्मांतील संन्यासपर तत्त्वज्ञान म्हणतात त्याचा उगमच श्रीमच्छंकराचार्यांपासून आहे असें म्हणतां येईल. श्रीमद्भगवद्गीता, ब्रह्मसूत्रें व उपनिषदें ह्या वैदिक तत्त्वज्ञानाच्या प्रस्थानत्रयीवर आपलीं सुप्रसिद्ध भाष्यें लिहून त्यांचा संन्यासपर अर्थ लावण्याचा शंकराचार्यांनी प्रयत्न केला ही गोष्ट खरी. पण मनुष्याने आपलें पारलौकिक कल्याण जो मोक्ष तो मिळविण्यासाठी झगडणें हें त्याचें कर्तव्य आहे असें सांगत असतांही शंकराचार्यांच्या एकंदर प्रतिपादनाचा सर्व रोख मुख्यत्वेंकरून ब्राह्मणवर्गास अनुलक्षून होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ब्राह्मणांखेरीज इतरांना मोक्षाचा अधिकार नसल्याने, त्यांनी म्हणजे क्षत्रिय-वैश्य-शूद्रांनी स्वर्गकाम अशीं इष्टापूर्तींचींच कर्में करावींत असें शंकराचार्यांच्या ब्राह्मण्यप्रधान तत्त्वज्ञानाचें स्पष्ट मत आहे. त्यांनी ऐहिक व पारलौकिक सुखोपभोगाचा म्हणजे भौतिक भोगाकांक्षेचाच धर्म पाळणें चांगलें असेंच आचार्यांनी शिकविलेलें असल्यामुळे त्यांच्याही मताचा सरसकट आर्यजातीच्या पारतंत्र्याशीं संबंध पोचूं शकत नाही. याचें सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे राजपुतांचेंच होय. कारण शांकरकालानंतरच राजस्थानांतील राजपूत राष्ट्रांचा उदय व उत्कर्ष झालेला आहे व त्यांनी परकी आक्रमणाचा आवेश थोपवून धरण्याचा त्यानंतर सतत एक हजार वर्षें प्रयत्न केलेला आहे.

तेव्हा अशा तऱ्हेने थेट वैदिककालापासून तों महंमदी आक्रमणाच्या कालापर्यंत आपण वैदिक तत्त्वज्ञानाचा ऐतिहासिक दृष्टया विचार केला तर त्यामुळे आम्ही पराजित व पराधीन झालों असें दिसून येत नाही.

८. भारतीय आर्यांचें नीतिशास्त्र. भारतीय आर्यांचा नीतिशास्त्रावरील सर्वश्रेष्ठ ग्रंथ भगवद्गीता हाच होय. धर्म व तत्त्वज्ञाना-

प्रमाणेंच नीतिशास्त्राचेंही सुन्दर उद्बोधन गीतेने केलेलें आहे व म्हणूनच लोकमान्य टिळकांनी आपल्या लोकविश्रुत गीतारहस्याच्या शीर्षभागीं "A Book of Hindu Religion, Philosophy and Ethics" असें स्पष्ट अभिधान केलें आहे. महाभारतांतही अनेक ठिकाणीं नीतिशास्त्रावरील संवाद ग्रथित केलेले आहेत. तसेंच स्मृतिग्रंथांतूनही नीतिशास्त्राचें विवेचन आलेलें आहे.

भगवद्गीतेंतील 'अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम्' इ० नीतितत्त्वें ब्रह्मवेत्त्या व समदर्शी पुरुषांसाठी सांगितलीं आहेत. सामान्य जनांसाठी नाहीत. पण त्याबरोबरच 'अभयं सत्त्वसंशुद्धिः' इ० श्लोकांत निर्भयतेचाही गीतेनेच उपदेश केलेला आहे. तेव्हा गीतेच्या अहिंसा, सत्य, अक्रोध इ० नीतीचा तेवढा सामान्य लोकांवर परिणाम झाला व निर्भयतेचा झाला नाही असें मानणें युक्त होणार नाही. वस्तुतः तीं सर्व ब्रह्मदर्शी पुरुषांचीं लक्षणें असल्याने सामान्य मनुष्याचे व्यवहार त्या मापाने मोजणें केव्हाही योग्य नाही. गीतेच्या नीतितत्त्वाच्या शिकवणीचा परिणाम अर्जुनाने युद्ध करून आपलें पैतृक राज्य संपादन करण्यांत झाला हें ऐतिहासिक सत्य दृष्टीसमोर ठेवलें म्हणजे गीतेची नीति नेभळी नसून मनुष्यास बलवान व कर्तव्यपरायण करणारीच आहे हें स्पष्ट होतें.

९. **महाभारताच्या नीतीचा दणदणीतपणा.** महाभारतांत ठिकठिकाणीं जे नीतीचे संवाद आलेले आहेत त्यांत राजनीतीच्या वर्णनांत राजाने आपल्या दुष्ट शत्रूवरही दया दाखवावी व त्याशीं अहिंसेने वागावें असें कोठेच म्हटलेलें नाही.

" वधमेव प्रशंसन्ति शत्रूणामपकारिणाम् । "
" अमित्रो न विमोक्तव्यः कृपणं बव्हपि ब्रुवन् । "
" कृपा न तस्मिन्कर्तव्या हन्यादेवापकारिणम् । "

इत्यादिसारखीं एतद्विषयक शेंकडों वचनें महाभारतांतून उद्धृत करून दाखवितां येतील. फार काय पण—

एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ।
क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्रीनं पुनः पुमान् ॥

अशी महाभारताच्या नीतीची दणदणीत शिकवण आहे.

१०. क्षमेचीं ऐतिहासिक उदाहरणें. भारतीय नीतिशास्त्र अहिंसा, सत्य, भूतदया इत्यादि सद्गुणांचा परिपोष करतें हें सत्य असलें तरी राजांनी दुष्ट शत्रूबरोबर त्याच नियमांनी वागावें असें त्याचें कदापि म्हणणें नाही हें वर सांगितलेंच आहे. भारतीय नीतिशास्त्रावर हा नेभळेपणाचा आरोप घेणारे लोक नेहमी पृथ्वीराज चव्हाणाचें उदाहरण पुढें करीत असतात. एकापेक्षा अधिक वेळा त्याने महंमद घोरीचा पराभव केला व तो हातीं सापडला असतांही त्यास ठार मारून न टाकतां क्षमा करून सोडून दिलें, म्हणूनच तो पुनरपि आक्रमण करूं शकला व आपल्या प्राणदात्यासच ठार मारून दिल्लीचा स्वामी बनला असें त्यांचें म्हणणें असतें. राजपुतांच्या इतिहासांतही असल्या क्षमेचीं उदाहरणें आढळतात. मेवाडचा महाराणा कुंभ याने गुजरातच्या सुलतानाचा पराभव करून त्यास चितोडच्या किल्ल्यांत कैद करून ठेवलें व नंतर त्याचा राजमुकुट ठेवून घेऊन त्यास सोडून दिलें. ह्या सुलतानास ठार मारून व त्याचें राज्य खालसा करून कुंभाने आपल्या राज्यास जोडलें नाही म्हणूनच गुजरातचे सुलतान यानंतरच्या काळांत वारंवार मेवाडवर आक्रमण करूं शकले. ह्या व ह्यासारख्याच उदाहरणांकडे बोट दाखवून सदर राजांच्या वर्तनाचा दोष आमच्या नीतिशास्त्रावर मारण्यांत येतो.

यांत आणखीही एक गोष्ट अशी गृहीत धरण्यांत येते की, पराभूत झालेल्या शत्रूंवर जणू काय हिंदुराजांनीच तेवढी दया दाखविली व त्यांना जिवंत सोडलें व हिंद्वेतर राजांनी तसें कधी केलें नाही विशेषतः मुसलमानांनी तर काबीज केलेल्या हिंदु राजांना सरसकट ठारच मारून टाकलें. परंतु ऐतिहासिक प्रमाणांनी ही गोष्ट सिद्ध होऊं शकत नाही. कसें तें पाहूं.

शिकंदर उर्फ अलेक्झांडर याने पोरस राजास जिकलें व सोडून दिलें पण ठार मारून टाकलें नाही. मुसलमान राजांनीही जिंकलेल्या हिंदु राजांना, खंडण्या इ० घेऊन जिवंत सोडल्याचीं उदाहरणें आहेत. एवढा कट्टर हिंदुविद्वेषी महंमूद गजनी! पण त्यानेही पंजाब व काबूलचा ब्राह्मण राजा जयपाळ व त्याचा पुत्र अनंगपाळ यांस खंडणी घेऊन सोडून दिलें होतें. बाबराने राणा संगाचा पराभव केला पण त्यास ठार मारलें नाही. अकबराने भारतवर्षातील हिंदु राजांना व विशेषतः राजपुतांना जिंकून

आपले मांडलिक बनविलें पण ठार मारलें नाही. उलट त्यांना मोठमोठ्या सेनापतित्वाचे व सुभेदारीचे हुद्दे दिले. त्याच्या नंतर सर्व मोगल बादशहांनी त्याचेंच धोरण अनुसरलें. एवढा कट्टर कूटनीतीचा औरंगजेब बादशाह ! पण मारवाडचा महाराजा जसवंतसिह हा आपला भयंकर शत्रु आहे हें ओळखून देखील तो त्यास उघडपणें ठार मारूं शकला नाही. उलट त्याची त्याने दक्षिण, गुजरात, माळवा, काबूल इत्यादींसारख्या महत्त्वाच्या सुभ्यांवर नेमणूक केली. शिवाजीसही एकदम ठार करण्याऐवजी त्याने नुसतें नजरकैदेंतच टाकलें. त्यामुळेच तर शिवाजीस निसटून जातां आलें व पुनरपि स्वराज्यसंस्थापनेचा उद्योग करतां आला ! शिवाजी एवढा तर भयंकर शत्रु औरंगजेबास दुसरा कोणी नव्हता ना ?

११. जित शत्रूला जिवंत सोडणें ही सार्वत्रिक रीति. वास्तविक पाहतां शत्रूला जिकल्यानंतर ठार मारून न टाकतां जिवंत ठेवण्याची रीति सर्वत्र आढळून येते. ती केवळ हिंदु राजांतच होती असें नाही. युरोपीय राजांतही ती होतीच. नेपोलियनसारखा बलाढ्य शत्रु काबीज झाला असतां युरोपीय मुत्सद्द्यांनी त्यास एकदम ठार मारून निकालांत काढण्याऐवजी एल्बा बेटांत ५०० शिपायांचा सरदार करून नेऊन ठेवलें. पण तेथूनही बाहेर येऊन नेपोलियनने पुन: फरान्सचें सिंहासन काबीज केलें व आणखी एकवार युरोपीय राजांना दे माय धरणी ठाय करून सोडलें. आता तरी त्यांनी धडा घ्यावयास पाहिजे होता. पण दुसऱ्या खेपेस नेपोलियन सापडला तेव्हाही त्यास ठार मारून न टाकतां सेंट हेलिना बेटांत नेऊन ठेवलें. युरोपांतील नेपोलियनचें उदाहरण ठळक म्हणून दिलें. पण असलींच अनेक उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत. तेव्हा त्यांनाही हें असलें पृथ्वीराजासारखें अथवा महाराणा कुंभासारखें आचरण शिकविण्यास भारतीय नीतिशास्त्र तर गेलें नव्हतें ना ?

१२. महत्त्वाकांक्षी जेत्याचें मनोविश्लेषण. खरें पाहिलें तर जेत्यांनी जितांबरोबर करावयाच्या वर्तनाचे नियम नीतिशास्त्राने घालून दिले असले तरी असल्या प्रसंगीं ते लावतां येत नाहीत. प्रबल, पराक्रमी, महत्त्वाकांक्षी, आत्मविश्वासाने भारलेल्या व जेतृत्वाची संवय झालेल्या पुरुषांना नीतिशास्त्राचे सामान्य नियम लागूच करतां येत

नाहीत. साम्राज्याकांक्षी जेता हा नेहमी स्वतःच्याच नियमांनी बद्ध असतो अथवा कोणत्याच नियमांनी बद्ध नसतो असें म्हटलें तरी चालेल. कारण त्याच्या साम्राज्यपिपासेचें समर्थन कोणत्या नीतिनियमांनी करतां येण्यासारखें आहे? ज्यांनी कोणतीही आगळीक केली नाही, अशांच्या राज्यांवर स्वाऱ्या करणें हा त्याचा मामुली खेळ बनलेला असतो.

या ठिकाणीं थोडा जेत्याच्या मनोभूमिकेच्या दृष्टीनेही विचार करणें जरूर आहे. आपण संपादन केलेले जय व त्यांमुळे प्राप्त झालेला गौरव, ऐश्वर्य, संपत्ति व माहात्म्य यांची बढाई प्रत्यक्ष जितांच्या समोर मारण्यांत जेवढें भूषण व जेवढा अभिमान वाटूं शकेल, तितका त्यांच्या पश्चात् वाटणें शक्य नाही, हा मनुष्यस्वभाव आहे. काल आपल्या बरोबरीनें मिरविणाऱ्या राजांना आज आपल्या चंड समशेरीचा प्रभाव दाखवून स्वबाहुबलाने जिंकल्यानंतर त्यांच्या मुकुटांवरील हिरेमाणकांनी आपल्या चरणकमलांना प्रकाशित करणें अथवा त्यांच्या मस्तकांवरील केशांनी आपल्या पदरजांचें प्रक्षालन करून घेणें यांत जेतृत्वाचा जो सविशेष अभिमान आहे तो त्यांना ठार मारून टाकण्यांत खास नाही. एखाद्या जबरदस्त मांत्रिकाने जसें आपल्या मंत्रविद्येच्या बळावर भयंकर विषारी अशा पन्नगश्रेष्ठाला धरावें व सोडावें व पुनः आपला फणा उचलून कितीही त्वेषाने तो चालून आला तर पुनः धरावें, तशीच महत्त्वाकांक्षी जेत्याची प्रवृत्ति असते. किंबहुना त्याचा जेतृत्वाचा अहंकार त्यास तसेंच करण्यास प्रवृत्त करीत असतो. ह्या धरण्यासोडण्याच्या खेळांतच अखेरीस एखाद्या भुजंगाच्या दंशाने जसा त्या मांत्रिकाचा प्राण जातो, तसाच, अशाच रीतीने धरून सोडलेल्या एखाद्या जिताकडून त्या प्रबळ पराक्रमी जेत्याचा विनाश होत असतो. साधारणपणें बहुतेक महत्त्वाकांक्षी जेत्यांचा विनाश असाच झालेला आहे. परंतु समानशील पूर्वपुरुषांचा हा दाखला पाहून देखील महत्त्वाकांक्षी जेत्यांनी आपल्या वर्तनांत बदल केलेला आढळून येत नाही. कारण तो आपल्या मनोधर्मास बदलूं शकत नाही. जेतृत्वाच्या अहंकाराची पिपासाच जितास जिवंत ठेवून त्याच्या वक्षःस्थलावर पाय देऊन नाचल्याशिवाय तृप्त होऊं शकत नाही.

जेत्याच्या मनोधर्माचें हें विश्लेषण लक्षांत घेतल्याशिवाय जगाच्या पाठीवर जेत्यांनी आपल्या जित शत्रूंना जिवंत कां सोडलें याचें कोडें उलगडूं शकणार नाही. तो आपल्या शत्रूस जिवंत सोडतो ही भूतदयाही नव्हे व क्षमायुक्त औदार्यही नव्हे. तर तो जेत्याच्या आत्मबलाचा अहंकार होय. व हा अहंकार नष्ट करण्याचें कार्य जगाच्या पाठीवरील कोणतेंही नीतिशास्त्र आजपर्यंत करूं शकलें नाही. म्हणून असल्या पुरुषांच्या वागणुकीवरून एखाद्या जातीच्या नीतिशास्त्रावरच नेभळटपणाचा आरोप करणें युक्त होणार नाही.

१३. विशाल भारताचें एक राष्ट्र. प्राचीनकाळीं राजकीय दृष्टया आसेतुहिमाचल हिंदुस्थान एक देश आहे ही कल्पना स्थायी स्वरूपांत रुजूं शकली नसली तरी धार्मिक व सांस्कृतिक दृष्टया ती खात्रीने रुजली होती. बद्रीनाथ, द्वारका, जगन्नाथ व रामेश्वर हे हिंदूंचे चार पवित्र धाम हीच गोष्ट अद्याप दाखवीत आहेत. एक धर्म, एक भाषा, एक संस्कृति व एक तत्त्वज्ञान हींच जर राष्ट्रीयत्वाचीं लक्षणें मानलीं तर आजच्यापेक्षाही विशाल भारताचें एक राष्ट्र फार प्राचीन काळींच बनलें होतें असें मानावें लागतें. राजदरबारीं व विद्याव्यासंगामध्ये एका संस्कृत भाषेचेंच प्राधान्य आसेतुहिमाचल सर्व हिंदु राजांनी मानलें होतें. एका वैदिक धर्माचे व वैदिक संस्कृतीचेच ते अनुयायी होते. तेव्हा या दृष्टीने हिंदुस्थान एक राष्ट्र होतें. पण राजकीय दृष्टीने नव्हतें.

१४. एकराष्ट्रीयतेचा अभाव हें विनाशाचें खरें कारण नव्हे. राजकीय दृष्टया आधुनिक अर्थाने हिंदुस्थानचें एक राष्ट्र पूर्वी झालें नाही हा कांही त्याचा दोष मानतां येत नाही. कारण ख्रिस्ती धर्माच्या उदयानंतर युरोपांतील सर्व राष्ट्रांनी तो धर्म स्वीकारला. त्यांच्या संस्कृतीचा विकासही एकाच रोमन संस्कृतीपासून झाला. पण सबंध युरोपखंडाचें एक राष्ट्र कधीच बनलें नाही. त्याचप्रमाणें मध्य आशिया खंडावर आज बहुतांश प्रमाणांत इस्लामीधर्म प्रचलित आहे. आरब व इराणी संस्कृतीपासूनच त्यांतील इस्लामी राष्ट्रांच्या संस्कृती बनलेल्या आहेत. परंतु सर्व मध्य आशियाखंडाचें एक राष्ट्र बनूं शकलें नाही. अफगाणिस्थान, इराण, तुर्कस्थान इ० निरनिराळ्या महंमदी राष्ट्रांतच तें आजही विभक्त आहे.

आज पश्चिम व दक्षिण युरोपांत अनेक बारीक बारीक राष्ट्रें आहेत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यांपैकी प्रत्येक राष्ट्रांतील लोक सांस्कृतिक दृष्टया युरोपीय संस्कृतीचा व धार्मिक दृष्टया ख्रिस्ती धर्माचा अभिमान धारण करीत असले तरी राजकीय दृष्टया सबंध युरोपखंडाचा अभिमान त्यांना कधीच वाटला नाही. युरोपांतील राष्ट्रांचा राजकीय अभिमान त्यांच्या संकुचित देशापुरताच मर्यादित आहे. हुबेहुब हीच स्थिति हिंदुस्थानांत होती. एका संस्कृतीचीं व धर्माचीं अनेक लहानमोठीं राष्ट्रें भरतखंडांत अस्तित्वांत होतीं. त्या त्या राष्ट्रांतील लोकांना आपापल्या राष्ट्राचा अभिमान होता. राजपुतांच्या बाबतींत तर ही गोष्ट विशेष ठळकपणें नजरेस येते. गुहिलोत उर्फ शिसोद्यांना मेवाडच्या भूमीचा परम अभिमान असे. तसा राठोडांना मारवाडचा, हाडांना हाडावतीचा व भट्टींना जेसलमीरचा. कच्छवाहांना अंबरचा परम अभिमान वाटे तर चव्हाणांना सांभरचा. आपापल्या राष्ट्राच्या राजकीय हक्कासाठी व त्यांच्या संरक्षणासाठी ते आपल्या सर्वस्वाचाही त्याग करण्यास तयार असत. तेव्हा युरोपप्रमाणें येथेही लहानमोठीं राष्ट्रें होतीं. इंग्लंड, फरान्स, जर्मनी, इटाली, स्पेन यांच्या एवढींच त्यांचींही क्षेत्रफळें होतीं व यांच्या इतकाच प्रादेशिक अभिमान त्यांच्या ठिकाणींही प्रखर होता. युरोपखंडाचें सबंध एकजिनसी राष्ट्र बनूं शकलें नाही म्हणून कांही युरोपियन राष्ट्रांचा नाश झाला नाही—नव्हे त्यांचा आज सारखा उत्कर्षच होत आहे. परंतु हिंदी राष्ट्राचा नाश झाला, एवढ्यावरूनच एकराष्ट्रीयतेचा अभाव हेंच त्यांच्या विनाशाचें प्रधान कारण असलें पाहिजे असें म्हणणें बरोबर होणार नाही.

१५. आणखी एक हेत्वाभास. एकराष्ट्रीयतेच्या कल्पनेच्या अभावाचें कारण दाखविणारांचा आणखी एक आशय असा असतो की, हिंदुस्थान हें एक राष्ट्र कधीच न बनल्याने व त्यांत लहान लहान अनेक राष्ट्रें नांदत असल्यामुळे परकी आक्रमणास संघटित प्रतिकार होऊं शकला नाही. आक्रमकांनी त्यांतील निरनिराळीं राष्ट्रें जिंकून घेतलीं व आपला राज्यविस्तार केला. प्रधान व केंद्रीय शासनाच्या अभावीं आमचा विनाश झाला. पण हेंही विधान हेत्वाभासशून्य नाही. एक तर

आक्रमकांच्या शक्तीची बरोबरी करूं शकतील एवढीं मोठालीं राष्ट्रें हिंदुस्थानांत होतीं व तीं आपापल्या सामर्थ्यावरही आक्रमकांचा प्रतिकार करण्यास समर्थ होतीं, ही गोष्ट भारताचार्य कुलपति वैद्य यांनी सिद्ध केली आहे. खेरीज, लहान लहान राष्ट्रांना आपल्या छत्राखाली घेऊन नांदणाऱ्या सार्वभौम सत्ता हिंदुस्थानांत निर्माण झाल्याच नाहीत असें समजणें बरोबर नाही. पाटलिपुत्र, कनोज, दिल्ली हीं उत्तर भारताच्या सम्राटांच्या राजधानींचीं शहरें अनुक्रमाने बनलीं होतीं. शिवाय जेव्हा परकी आक्रमणाचा आपल्या एकट्याच्या सामर्थ्यावर मोड करण्याची असंभवनीयता हिंदु राजांना वाटली तेव्हा त्यांनी संघटित होऊनही तिकार केलेले आहेत. पण ह्या विधानाचा आणखी विकास करण्यापूर्वी येथे प्रथम एका चुकीच्या समजुतीचें निरसन करणें जरूर आहे.

१६. एक अनैतिहासिक समजूत. राजकीय हेतूने प्रेरित झालेल्या इतिहासलेखकांच्या ग्रंथांतून व शालेय पाठ्यक्रमांतील पुस्तकांतून आमचा असा समज करून देण्यांत येतो की, जणू काय जगाच्या पाठीवर हिंदुस्थान हाच एक असा दुर्दैवी देश आहे की, त्याच्यावर कोणीही उठून आक्रमण करावें व त्यास जिंकावें आमच्यांतील सुशिक्षितांचाही असा ग्रह झालेला असतो की, परकीय आक्रमणांचा सर्वांत अधिक मारा याच देशावर झाला व प्रत्येक आक्रमणाखाली आम्ही भरडून निघालों. जगतीतलावर आम्हीच एक नादान लोक आहोंत की, ज्यांना कधीही आत्मसंरक्षण करतां आलें नाही. वास्तविक पाहतां ह्या समजुतीइतकी चुकीची व अनैतिहासिक समजूत दुसरी कोणतीही नसेल. ह्या समजुतीने जितकी मानसिक गुलामगिरी आमच्या ठिकाणीं उत्पन्न केली तितकी दुसऱ्या कोणत्याच समजुतीने केली नसेल. ही समजूत किती वृथा आहे याची योग्य कल्पना येण्यासाठी जबाबदार पाश्चिमात्य लेखकांचेच अनेक दाखले देतां येण्याजोगे आहेत.

१७. युरोपीय राष्ट्रांवरील आक्रमणें व त्यांचा भयंकर विनाश. युरोपीय लेखकांच्या प्रमाणावरून अनेक विद्वान भारतीय लेखकांनी हें सिद्ध केलें आहे की, इ. स. च्या दुसऱ्या शतकापासून मध्य आशियाच्या हूण, अवार, बल्गर, खजार, पत्जेनाक, मगियार, मंगोल

इ० जातींनी युरोपावर अनेक आक्रमणें केलीं आहेत. सतत एक हजार वर्षांहून अधिक काळपर्यंत रशिया, जर्मनी, स्पेन, इटाली, इंग्लंड, फ्रान्स इ० देशांवर हीं आक्रमणें होतच राहिलीं. रोमचें एवढें मोठें विशाल साम्राज्य त्यांच्याचखाली चूर्णविचूर्ण होऊन गेलें व आज त्याचा अवशेष-ही शिल्लक उरलेला नाही. कित्येक आक्रमकांनी तेथील मूळ रहिवाशांना नष्ट करून तेथेंच वास्तव्य केलें. आजच्या पाश्चात्य जातींच्या नसांतून ह्या अनेक आक्रमकांचें मिश्र रक्त वाहत आहे. ह्या आक्रमणांच्यामुळे युरोपीय राष्ट्रांचा केवढा भयंकर नाश झाला ह्याचें बुसोनेद नांवाच्या एका फ्रेंच लेखकाने खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे. तो म्हणतो, " प्राचीन रोमन समाजांतील उच्च व मध्यम जातींचा पार नाश झाला. त्यांतून जे वाचले ते आक्रमकांशीं समरस झाले व स्वत्व गमाऊन बसले. अँग्लो–सॅक्सन जातीने ब्रिटनची मूळची ब्रिटिश जात बिलकुल बरबाद करून टाकली. क्रूर आक्रमकांनी मो मोठ्या रोमन जमीनदारांच्या जमिनी हिरावून घेतल्या व त्यांवर ते स्वतः आपल्या कुटुम्बांसहित निवास करूं लागले. एवढेंच नव्हे तर त्यांनी त्या सर्व जमीनदारांना ठार मारून टाकलें व त्यांचीं धर्ममंदिरें उध्वस्त करून टाकलीं. ब्रिटनमधील ब्रिटिश लोकांना गुलाम बनविण्यांत आलें. सर्वत्र दुःखाचा कहर झाला. जे गुलाम बनले तेवढेच जिवंत राहूं शकले. ह्या असंस्कृत जातींच्या आक्रमणांनी दोनशें वर्षांच्या आंत रोमन व ख्रिश्चन साम्राज्याचें सुस्थित भवन पश्चिम युरोपांत पायापासून शिखरापर्यंत जमीनदोस्त केलें."

१८. भारतवर्षाचा यशस्वी प्रतिकार. वरील उताऱ्यावरून, सतत एक हजार वर्षेपर्यंत युरोपीय राष्ट्रें परकीय आक्रमणांच्या वरवंट्याखाली कशीं भरडून निघत होतीं याची वाचकांना कल्पना येईल. एकटा हिंदुस्थानच तेवढा परकी आक्रमणांना बळी पडत गेला असें आता तरी त्यांना वाटण्याचें कारण नाही. इतकेंच नव्हे तर ज्या हूणजातीच्या अत्याचारांचें वर्णन वर आलें आहे तिनेच हिंदुस्थानवर आक्रमण केलें असतां तत्कालीन हिंदु राजांनी तिचा अत्यंत यशस्वी प्रतिकार केला होता व जे कांही मूठभर हूण इकडे राहिले त्यांना आपलें स्वत्व विसरून हिंदु-धर्माशीं व संस्कृतीशीं इतकें समरस व्हावें लागलें की आज त्यांचें कोठे नांव

देखील ऐकूं येत नाही, हें अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याच जातींचीं युरोपवरील आक्रमणें व भारतावरील आक्रमणें यांतील हा भेद लक्षांत ठेवला म्हणजे आमच्या पाठीमागे कांही यशस्वी प्रतिकाराचा इतिहास आहे व प्रत्येक आक्रमणास आम्ही असेच नादानासारखें बळी पडत आलों आहोंत ही समजूत किती चुकीची आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

ख्रिस्ती शकापूर्वीच्या शिकंदर उर्फ अलेक्झांडरच्या आक्रमणाचा-ही असाच मोठा बाऊ करण्यांत येतो. पण त्याच्याही बाबतींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, त्याचे घोडे सिंधूनदीचें पाणी प्याले असले तरी त्यांच्या डोळ्यांना गंगाकिनारा कधीच दिसूं शकला नाही. पोरसाचा पराभव करुनच त्याची फौज दमांत उखडली व त्यास सिंधूपासूनच परत जावें लागलें. त्याच्या नंतर त्याच्या दोन सेनापतींनी पुनः आक्रमणाचें धाडस करून पाहिलें. पण त्यांना चंद्रगुप्ताच्या सेनेच्या हातून मार खावा लागला व आपली मुलगी त्या गुप्त सम्राटास अर्पण करून त्याचें सार्वभौमत्व मान्य करावें लागलें.

१९. महंमदी आक्रमणास प्रारंभ. अशा रीतीने इस्लामपूर्व-कालांतील आक्रमणांचा भारतवर्षाने यशस्वी प्रतिकार केला होता हें दाखविल्यानंतर आता आपण इस्लामी आक्रमणाकडे वळूं. त्यास प्रारंभ आठव्या शतकांत झाला. या शतकांत महंमद बिन कासीमने सिंध प्रांतावर स्वारी केली. सिंधुदेशचा दाहीरनामक ब्राम्हण राजा व त्याचे पुत्र यांनी सतत दोन वर्षें आपला देश लढविला. पण परिणामीं त्यांचा पराजयच झाला. कासीमच्या नंतर महमूद गजनीच्या स्वारीपर्यंतच्या एकूण तीनशें वर्षांच्या काळांत आरबांनी हिंदुस्थानवर अनेक स्वाऱ्या करून पाहिल्या. पण इतिहास असें सांगतो की, चितोडचे गुहिलोत व सांभरचे चाहमान राजपूत यांनी अनेक वेळां पराजय करुन त्यांना पिटाळून लावलें. तीनशें वर्षांच्या या यशस्वी प्रतिकाराचा इतिहासही मोठा तेजस्वी असला पाहिजे. नंतर अकराव्या शतकांत गजनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या झाल्या. त्यांना पंजाबचा राजा अनंगपाळ याच्या नेतृत्वाखालीं हिंदु राजांनी संघटित होऊन प्रतिकार केला. पण तो यशस्वी झाला नाही. त्याच्या स्वाऱ्यांमुळे अफगाणिस्थानांत इस्लामी सत्तेने मूळ धरलें. पण हिंदुस्थानांत इस्लामी

सत्तेचें मूळ कायम रुजविणारी स्वारी महंमद घोरीचीच होय. इतिहासाच्या वाचकांस विदितच आहे की पृथ्वीराजाने त्याचाही पराजय केला होता. पण त्याची अखेरची स्वारी यशस्वी होऊन तो दिल्लीचा व कनोजचा स्वामी बनला.

२०. इस्लामचा ५५० वर्षांत उत्तर भारताचा विजय. महंमद घोरीने दिल्ली व कनोजचीं राज्यें जिंकलीं याचा अर्थ त्याने सबंध भारतवर्ष जिंकला असा नाही. एखाद्या आक्रमकाने दिल्ली जिंकून तेथें आपलें राज्य स्थापन केलें की, लागलीच आसेतुहिमाचल हिंदुस्थान त्याच्या ताब्यांत गेलाच असें समजणें फार चुकीचें आहे. ह्या स्वाऱ्यांचे जे वृत्तांत क्रमिक पुस्तकांतून देण्यांत येतात त्यामुळे वाचकांचा असा समज होत असतो की, जणू काय अमुक एक वर्षी अमुक आक्रमकाने दिल्ली जिंकली की हिंदुस्थानचें राज्य त्याच्या स्वाधीन झालेंच म्हणून समजावें. वास्तविक पाहतां बाराव्या शतकांत दिल्ली प्रथमच महत्पदास चढली. यद्यपि पृथ्वीराजास त्याच्या तोमर आजाचें दिल्लीचें राज्य मिळाल्याने तो बलिष्ठ राजा बनला असें आपण म्हणतों, तथापि वस्तुतः त्याचें मूळचें सांभर-अजमीरचेंच राज्य बलाढ्य असून दिल्लीचें राज्य मिळाल्याने त्यांत भर पडली इतकेंच. पृथ्वीराजासारखा बलाढ्य राजा दिल्लीस राहूं लागला म्हणून त्या वेळीं दिल्लीस महत्त्व चढलें होतें इतकेंच. असो. तेव्हा प्रतिपादनाचा इत्यर्थ हाच की, दिल्ली अथवा कनोज पडलें याचा अर्थ सबंध हिंदुस्थान मुसलमान अमलाखाली गेला असा मुळीच करण्याचें कारण नाही.

वरील त्रोटक वृत्तांतावरून दिसून येईल की केवळ उत्तर भारताचा जय करण्यासही मुसलमानांना तब्बल ५००-५५० वर्षे लागलीं. खेरीज दिल्ली पडल्याबरोबरच आसेतुहिमाचल हिंदुस्थान त्यांच्या स्वाधीन झाला असेंही मुळीच नाही. आपल्या प्रत्येक तसु जमिनीसाठी हिंदु लढले. व १४ व्या शतकाच्या प्रारंभीं भासमान होणारा त्यांचा उत्तर भारताचा विजयही अर्धवटच होता. कारण त्यांची पाठ वळतांच पुनः भराभर हिंदु राजे स्वतंत्र होतच होते. तेव्हा परकी आक्रमणापुढे आम्ही आपली मान खालीच घातली असें कांही नाही हें वाचकांच्या लक्षांत येईल.

२४. आर्यांच्या संघटित प्रतिकाराचीं उदाहरणें. आता हिंदु राजांनी केलेल्या संघटित प्रतिकाराचीही कांही उदाहरणें येथे देणें जरूर आहे. त्यामुळे राजकीय दृष्ट्या एकराष्ट्रीयत्वाची भावना नसतांही हें परकी आक्रमण म्हणजे आपला धर्म व संस्कृति यांजवरील आघात होय असें समजून उत्तर भारतांतले राजे आपत्प्रसंगीं अवश्य संघटित होत असत याची कल्पना येईल.

राजा अनंगपालाच्या नेतृत्वाखाली झालेल्या संघटनाचा दाखला वर दिलाच आहे. त्यानंतरचें महत्त्वाचें उदाहरण पृथ्वीराज चाहमानाचें होय पण त्याचा पराजय झाला. राजस्थानांत मेवाडचे राजे बाप्पारावळ, हंमीर, कुंभ व संग यांच्या नेतृत्वाखाली सर्व राजपूत राजे संघटित झालेले होते. मेवाडच्या राजकुलाचा संस्थापक जो बाप्पारावळ त्याने महंमदी आक्रमणास केवढा जबरदस्त प्रत्याघात केला होता याविषयीं कुलपति वैद्य म्हणतात—"आरबांच्या दिग्विजयसिंधूचा दुसरा ओघ पूर्वेच्या बाजूला मेसापोटेमिया, इराण व बलुचिस्तान यांस उदरांत घेऊन व सिंधुनद पार होऊन सिंधप्रांत बुडवून पुढे चालला होता तो गेहलोत राजपुतांनी थोपवून धरून शतशः विदीर्ण केला. राजपूत लोक ज्याच्या नांवाचा उच्चार उचित अशा आदराने करतात आणि ज्याला हिंदुस्थानचा चार्लेस म्हणणें अनाठायीं होणार नाही, तो बाप्पारावळ नसता तर आरबांच्या स्वाऱ्यांपुढे सगळा हिंदुस्थान चीत झाला असता आणि प्रसिद्ध इतिहासकार गिबन याच्या वक्तृत्वपूर्ण शब्दांत लिहावयाचें तर आरब धर्मशास्त्र प्रतिपादणाऱ्या सुन्ता केलेल्या पुराणिकांनी काशीवाराणशींत आजमितीला महंमदी धर्माचीं तत्त्वें व आचार यांचीं निरूपणें केलीं असतीं. परंतु बाप्पारावळ व त्याचे राजपूत यांच्या शौर्यानें हें दुर्दैव टळलें.'

महाराणा हंमीर व महाराणा कुंभ यांनी मुसलमानांचे अनेक पराजय करून त्यांना राजस्थानापासून बरेंच लांब हाकून लावलें होतें. राणा संग्रामसिंहाच्या आधिपत्याखाली राजपूत राजांचें बाबराशीं सामना करतांना केवढें प्रचंड संघटन तयार झालें होतें ह्याचा वृत्तांत पूर्वी मेवाडच्या इतिहासांत दिला आहे. औरंगजेबानें राजस्थानावर आक्रमण केलें असतां

महाराणा राजसिंहाच्या नेतृत्वाखाली राजपुतांनी संघटित प्रतिकार केला एवढेंच नव्हे तर त्या प्रबळ सम्राटाचा खासा पराजय केला.

ह्या प्रत्येक संघटनाच्या वेळीं कमींत कमी एक लाखापासून दोन लाखापर्यंत सेना हिंदु राजांनी जमा केल्या होत्या. हे सर्व लोक कांही पगारी व भाडोत्री शिपायी नव्हते. तर आपल्या देशावरील संकट ओळखून त्याच्या प्रतिकारासाठी स्फूर्तीने लढणारे हे सर्व तरुण होते. वाचकांच्या आणखी लक्षांत येईल की, प्रत्येक आक्रमणाच्या वेळेस कांही हिंदु हारतच गेले नाहीत. त्यांचे जसे पराजय झाले तसे त्यांनी जयही मिळविले. बाप्पारावळ, हंमीर व कुंभ यांनी केलेल्या जबरदस्त पराजयांमुळे पुन: १००।१०० वर्षें डोळा वर उचलून पाहण्याची मुसलमानांची हिंमत झाली नाही.

२२. स्वत्व व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या बचावाची पराकाष्ठा. भारताच्या इतिहासांत येथील निरनिराळ्या राजांनी संघटित होऊन परकी आक्रमणास प्रत्याघात करण्याचा जितका दीर्घ काल प्रयत्न केला तसा युरोपांत झालेला आपणास आढळून येतो काय? वस्तुत: आसेतुहिमाचल भारतवर्ष प्रथम औरंगजेबानेच जिंकला–निदान जिंकण्याचा प्रयत्न तरी केला–असें म्हणतां येईल. म्हणजे ८ व्या शतकापासून १७ व्या शतकाच्या अंतापर्यंत सुमारें सतत हजार वर्षें हा देश आम्ही लढविला हें उघड आहे. औरंगजेबाच्या देखतां देखतांही महाराष्ट्राचें स्वतंत्र राष्ट्र तयार झालेंच होतें. आठव्या शतकापासून पुढील आर्य जातीच्या प्रतिकाराचा इतिहास अत्यंत तेजस्वी परंपरेने भरला आहे ही गोष्ट पाश्चात्य लेखकांनीही कबूल केली आहे. राजपुतांच्या संबंधांत राजस्थानचा इतिहासलेखक क० टॉड म्हणतो "हे शूर लोक आपल्या स्वातंत्र्याकरितां युगेंच्या युगें लढले. आपल्या पूर्वजांच्या धर्माच्या संरक्षणासाठी त्यांनी आपणास प्रिय अशा कोणत्याही वस्तूचा त्याग करण्यास कमी केलें नाही. कोणत्याही प्रलोभनास बळी न पडतां आपल्या प्राणांच्या आहुति देऊनही त्यांनी आपलें स्वत्व व राष्ट्रीय स्वातंत्र्य यांच्या संरक्षणाची पराकाष्ठा केली. त्यांच्या ह्या चित्राकडे पाहत असतांना खरोखर अंत:करण भावनेने उचंबळून आल्याशिवाय राहत नाही."

तेव्हा एकराष्ट्रीयतेच्या आधुनिक कल्पनेच्या अभावामुळेच आमचा नाश झाला असें म्हणणें मोठेंसें वस्तुस्थितीस धरून होणार नाही. कारण भरतखंडांतील हिंदु राष्ट्रांएवढींच युरोपखंडांतलीं ख्रिस्ती राष्ट्रें व मध्य आशियांतील मुसलमान राष्ट्रें होतीं सबंध युरोप अथवा सबंध मध्य आशिया हें एक राष्ट्र आहे अशी भावना त्यांच्यांतही कधीच उद्भूत झाली नाही. तथापि तीं जगलीं आहेत. नव्हे, युरोपीय राष्ट्रें तर आज वैभवगिरीवर आरूढ आहेत. भरतखंडांतल्या हिंदु राष्ट्रांचा नाश झाला, एवढ्यावरून तीं एकराष्ट्रीयतेच्या कल्पनेच्या अभावींच नष्ट झालीं हें म्हणणें कितीसें युक्तिसंगत आहे ?

२३. आत्मघातकी राष्ट्रद्रोहाचा आरोप. एकराष्ट्रीयतेचा अभाव ह्या कारणाच्या अंतर्गत आणखी एका मुद्दा असतो व तो म्हणजे आमच्यांतील दुही व राष्ट्रघातकी प्रवृत्ति हा होय. हिंदु राजे नेहमी परस्परांत भांडत राहिले व त्यांपैकी कित्येकांनी तर परकीय आक्रमणास निमंत्रण दिलें त्यामुळे आम्हीच आमच्या नाशास कारण झालों, असा या मुद्याचा आशय असतो. ह्या मुद्द्याच्या बाबतींत प्रथमतःच हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, जेतृत्वाची आकांक्षा धरणारा कोणीही वीर कोणाच्या आमंत्रणावरून आक्रमण करतो असें समजणें चुकीचें आहे. त्याची स्वतः-चीच ती आंतरिक आकांक्षा असते. दुसऱ्याचें आमंत्रण हें त्यास एखादे वेळीं निमित्तकारण होऊं शकेल. मुसलमानी आक्रमणाच्या बाबतींत बोलत असतांना अनेक लोक जयचंद राठोडाने पृथ्वीराजाचा सूड घेण्या-साठी महंमद घोरीस आमंत्रण दिलें असें सांगत असतात. शालोपयोगी हिंदी इतिहासांतही हेंच विधान केलेलें आढळतें. पण वास्तविक जयचंदाने महंमद घोरीस आमंत्रण दिलें ही गोष्ट अजीबात असत्य आहे असें कुलपति वैद्य यांनी आपल्या मध्ययुगीन भारताच्या इतिहासांत सप्रमाण सिद्ध केलें आहे. बाहेरच्या आक्रमकास हिंदु राजांनी स्वकीयांविरुद्ध लढण्यास बोला-वलें याबद्दलचें दुसरें कोणतेंही महत्त्वाचें उदाहरण सांगण्यांत येत नाही. जयचंदाचेंही उदाहरण यदाकदाचित् खरें असतें तरी एका उदाहरणावरून सामान्य नियम बांधणें चूकीचें आहे. तेव्हा प्रथम जयचंदाने घोरीस मुद्दाम आमंत्रण देऊन राष्ट्रघात केला ही समजूत वाचकांनी सोडून दिली पाहिजे.

तो पृथ्वीराजाच्या वैमनस्यामुळे त्याच्या छत्राखाली झालेल्या संघटनांत सामील झाला नाही एवढाच त्याचा दोष. पण त्याचें स्वतःचेंही राज्य व सेनाबल घोरीशीं सामना करण्यास पुरेसें होतें व त्याप्रमाणें त्याने सामना केला. पण त्यांत पृथ्वीराजाप्रमाणेंच त्यासही अपयश आलें.

हिंदुस्थानांतील हिंदु राजांचीं आपापसांत वैमनस्यें असत व ते एकमेकांशीं भांडत ही गोष्ट खरी असली तरी ती कांही केवळ भारतांतच आढळून येणारी व इतरत्र मुळीच न सापडणारी अशी असामान्य घटना नव्हे. यरोपांतील ख्रिस्ती राष्ट्रेंही सदा आपापसांत भांडत असतात. त्यांनी परस्परांत केलेल्या घोर लढायांनी युरोपचाही इतिहास कलंकित झालेला आहे अद्याप तरी त्यांचीं वैमनस्यें कोठे संपलीं आहेत ? गेल्या जर्मन युद्धाने केलेला भयंकर संहार जग अद्याप विसरलें नाही. व त्या युद्धानंतर झालेल्या तहनाम्याच्या कागदावरील शाई वाळण्यापूर्वीच तो मोडण्यास पुनः प्रारंभ झालेला आहे व आणखी एका भयंकर जागतिक युद्धाचें रणशिंग युरोपीय राष्ट्रें आज फुकीत आहेत. मध्य आशियांतील इस्लामी राष्ट्रांचीही तीच स्थिति आहे. त्यांची वैमनस्येंही आजवर सारखीं चालत आहेत. इस्ला ी राष्ट्रांनी परस्परांत केलेल्या भयंकर लढायांनीही इतिहासाचीं अनेक पृष्ठें काळीं केलीं आहेत. मग आपसांत एकी करूं शकलीं नाहीत व नित्य परस्परांत भांडत राहिलीं म्हणून जर युरोपीय अथवा मध्यआशियाई राष्ट्रांचा विनाश झालेला दिसत नाही तर एकट्या भारतांतील हिंदु राष्ट्रांचाच तेवढा तीं आपसांत भांडलीं म्हणून विनाश झाला हें म्हणणें प्रमाणशीर होऊं शकेल काय ?

२४. शस्त्रसामग्री व युद्धकला. परकी आक्रमकांच्या पेक्षा भारतीय आर्यांची शस्त्रसामग्री व युद्धकला निकृष्ट दर्जाची होती; त्यामुळेच त्यांचे सर्वत्र पराजय झाले व आक्रमक विजयी बनले; विशेषतः मुसलमानांच्या युद्धपद्धतीपुढे आमची जुनीपुराणी युद्धपद्धति निकामी ठरली; एक वेळ अनुभव आल्यानंतरही आम्ही हत्तींची युद्धपद्धति सोडली नाही; आक्रमकांच्या घोडेस्वारांची फौज आमच्या हत्तींच्या पेक्षा नेहमीच अधिक चपल व संचालनसुलभ असल्याने अधिक प्रभावी ठरली इ० मुद्दे या कारणांचे प्रतिपादक पुढे मांडत असतात.

२५. शस्त्रसामग्री व युद्धकला हें एकटेंच युद्धाचें निर्णायक गमक होऊं शकत नाहीं. वरील कारणाच्या अंगोपांगांचा विचार करण्यापूर्वीही त्यावर मूलेकुठार घालणें शक्य आहे व तो असा की, कोणत्याही युद्धाचें केवळ शस्त्रसामग्री व युद्धकला हें एकटेंच निर्णायक गमक असूं शकत नाही; कधीच राहिलें नाही. सुसज्जित शस्त्रसामग्री व अभ्यस्त युद्धकला हें युद्धांतील जयापजयाचें एक प्रभावी साधन असूं शकतें. पण तें एकटेंच निर्णायक गमक ठरूं शकत नाही. कारण, तसें तें असतें तर नेपोलियनचा पराभव कां झाला असता ? त्याच्या इतकी सुसज्जित शस्त्रसामग्री, युद्धकलाभ्यस्त सेना व अद्वितीय सेनापतित्व यांचा इतका उत्कृष्ट संयोग त्याच्या काळांतील कोणाच युरोपीय राष्ट्राजवळ नव्हता ही गोष्ट प्रसिद्ध आहे. असें असतांही त्याचा पराजय झाला.

त्याचप्रमाणें अशींही उदाहरणें आहेत की, कनिष्ठ दर्जाची शस्त्रसामग्री व युद्धकला असतांनाही कित्येकांनी जय मिळविले. जवळच्या अफगाणांचेंच उदाहरण या बाबतींत देण्यासारखें आहे. इंग्रजांनी त्या पहाडी राष्ट्रावर सर्व शस्त्रास्त्रांनी संपन्न व युद्धकलेचें शिक्षण घेतलेल्या अशा प्रचंड सेना एकाहून अधिक वेळां पाठविल्या. पण त्यांतून पराजयाचें लांछन निवेदन करण्यासही हाताच्या बोटावर मोजतां येतील इतके सुद्धा सैनिक परत येऊं शकले नाहीत. तसेंच आधुनिक शस्त्रास्त्रांनी संपन्न अशा ब्रिटिश साम्राज्याला, मागासलेल्या म्हणून गणल्या जाणाऱ्या मूठभर नेपाळी लोकांचा प्रभावी पराभव आजपर्यंत कधीच करतां आला नाही; व त्यांचें राष्ट्र आजही इंग्रजी राज्याच्या डोक्यावर स्वतंत्र डौलाने मिरवत आहे.

तेव्हा सुसज्जित शस्त्रसामग्री व अभ्यस्त युद्धकला हेंच एक युद्धांतील जयापजयाचें निर्णायक गमक होऊं शकत नाही ही गोष्ट वरील उदाहरणांवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल आणि भारतीय आर्य या बाबतींत आक्रमकांच्या पेक्षा कनिष्ठ दर्जाचे होते असें क्षणभर गृहीत धरलें, तरी त्यांच्या पराजयाचें व विनाशाचें तें मूलगामी कारण ठरूं शकत नाही हें उघड आहे.

२६. युद्धकलेंत भारतीय मागासलेले नव्हतेच. पण वस्तुस्थिति अशी आहे की, मुसलमानी आक्रमकांच्या पेक्षा शस्त्रांत व युद्धकलेंत

भारतीय लोक मुळी मागासलेले नव्हतेच. राजस्थानचा इतिहासलेखक कर्नल टॉड स्पष्ट म्हणतो–"महंमदाच्या अगोदरच्या काळांत जर एखाद्याने युरोपच्या निरनिराळ्या राजदरबारांतून प्रवास केला असता व त्यानंतर तो गिजनी, दिल्ली, कनोज, अनहिलवाडापट्टण इ० ठिकाणीं गेला असता तर सुसंस्कृतीच्या प्रत्येक घटकाच्या दृष्टीने त्याला राजपूत राजे किती तरी श्रेष्ठ दर्जाचे आहेत असें दिसून आलें असतें. कलेच्या दृष्टीनें तर ते अद्वितीय होतेच पण युद्धसामग्रीच्या दृष्टीनेही ते मागासलेले नव्हते."टॉडच्या वरील अवतरणावरून दिसून येईल की, इस्लामचे अनुयायी ज्या वेळीं भरतवर्षावर आक्रमण करूं लागले होते त्या वेळीं त्यांच्या पेक्षा भारतीय लोक युद्धसामग्रीच्या दृष्टीने मागासलेले होते असें समजणें चुकीचें आहे.

बारुदीच्या उपयोगाचाही मुद्दा कित्येक पुढे करतात. पण बारुदीचा उपयोग चौदाव्या शतकानंतरचा. पाश्चिमात्य युद्धकलेंतही त्यानंतरच बारुदीचा उपयोग होऊं लागला. पण तोंपर्यंत मुसलमानांचीं आक्रमणें इकडे होऊन चुकलीं होतीं. बारुदीप्रमाणेंच हत्तीघोड्यांचाही मुद्दा गैरमाहितीवर उभारलेला आहे. भारतीय राजांचें सर्व बळ हत्तींचेंच होतें व घोडे-स्वारांची प्रबळ सेना त्यांच्या जवळ नव्हतीच असें मानणें चुकीचें आहे. चव्हाण, परमार, राठोड, गुहिलोत, इ० राजपूत राजांच्या जवळ उत्कृष्ट घोडदळें होतीं. किंबहुना राजपुतांची खरी मदार त्यांच्या घोडदळावरच असे. हत्तींचाही ते उपयोग करीत, नाही असें नाही. पण हत्तींची फौज ही एक युद्धांतील अभेद्य रांग असूं शकते ही गोष्ट मुसलमान सेनानींनाही कळून चुकली होती. त्यांच्याही जवळ युद्धोपयोगी हत्ती बाळगलेले असत. महंमद कासीमने जेव्हा हिंदुस्थानांत हत्तींचा हा उपयोग पाहिला तेव्हा हत्तींच्या बरोबर लढण्यासाठी त्यास मुद्दाम माणसें तयार करावीं लागलीं. सबुक्तगीन व महमूद गजनी यांच्या वेळेपासून तों तहत अकबराच्या व औरंगजेबाच्या काळापर्यंत मुसलमान आक्रमकांनीही हत्तींचा उपयोग युद्धांत केलेला आहे. तेव्हा केवळ हिंदु राजांनीच हत्ती बाळगले व आक्रमकांच्या जवळ ते नव्हते, अथवा आक्रमकांच्या सारखें घोडदळ हिंदु-राजांच्या जवळ नव्हतें इत्यादि समजुती केवळ अज्ञानजनक आहेत ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत ठेवली पाहिजे.

२७. राजपुतांच्या युद्धपद्धतीवरील कांहीं आक्षेपांचें निरसन. राजपुतांच्या युद्धपद्धतीवर आणखीही कांही आक्षेप घेण्यांत येत असतात. उदाहरणार्थ राजपूत रणरंगांत उतरले की, अगदी मरेपर्यंत लढत; गनिमी काव्याची अथवा छुप्या हल्ल्यांची युद्धपद्धति त्यांना माहीतच नव्हती; रणांगणावर जाणारा प्रत्येक राजपूत अगदी मरण्यामारण्याच्याच निश्चयाने जात असे; त्यामुळे प्रसंग पडेल तसें वागण्याचें मराठ्यांच्या सारखें कसब त्यास कधीच साधलें नाही; राजपूत कुसुंब्याचा रस प्राशन करीत; युद्धास निघाले, की ते केशरिया बाणा धारण करीत व जोहार करून आपल्या स्त्रियांना जाळून टाकत; इत्यादि. एवंच काय की लढाईच्या कामांत राजपूत अतिशय शूर असले तरी उतावळे व आततायी होते व म्हणूनच जास्त धूर्त व सावधान शत्रूपुढे त्यांना हार खावी लागली.

आता वरील विधानांपैकी जोहारासंबंधीं एवढेंच सांगितलें की पुरे की, प्रत्येक लढाईच्या प्रारंभीं राजपूत जोहार करीत असें समजणें साफ चुकीचें आहे. १२०० वर्षांच्या राजपूत राष्ट्रांच्या इतिहासांत त्यांनी कमींत कमी १२०० तरी लढाया जरूर मारल्या असतील. पण जोहार अवघे पांचसात वेळांच केलेले आढळतात. राजपुतांचा दीर्घकालीन इतिहास पाहिला व त्यांत अवघे ५।७ च जोहारचे प्रसंग पाहिले म्हणजे जोहार हा त्यांचा नियम ठरूं शकत नाही. या विषयावर आमच्या राजपुतांच्या संस्कृतीवरील ग्रंथांत अधिक सविस्तर विवेचन केलेलें असल्याने त्याचीच पुनरुक्ति करून येथे जागा अडवीत नाही.

राजपूत कुसुम्ब्याचा रस प्राशन करीत व मरण्यामारण्याच्याच निश्चयाने लढाईवर जात ही गोष्ट खरी. पण राजपुतांना जसें कुसुम्ब्याचें व्यसन होतें तसें मुसलमानांनाही मदिरेचें व्यसन होतें. बाबर, अकबर, जहांगीर, शहाजहान इ० औरंगजेब खेरीज करून बाकीचे सर्व मोगल बादशाह व सेनापति व शिपाई मदिरापान करीत. शिवाय कुसुम्ब्याचा रस पिऊनही राजपुतांनी मुसलमानांवर शेंकडो जय मिळविले आहेत. केशरिया बाणा हाही राजपुतांचा निर्वाणीच्या युद्धाचा पोषाख होता. प्रत्येक युद्धाचे वेळीं ते तो वापरीत नसत. आता मरण्यामारण्याच्या निश्चयाविषयीं विचार केला तर त्याशिवाय खरी लढाईच होऊं शकत

नाही असें म्हणावें लागेल. 'लढाईवर जातों पण मी मरणार नाही बा' असें म्हणणारा रडत राऊत लढाईवर काय रड पाडणार? तेव्हा केव्हाही लढाईवर जावयाचें म्हटलें की, प्रत्येकाने आपलें शीर तळहातावर हें घेतलेंच पाहिजे. त्याशिवाय त्याच्याकडून लढाई होऊंच शकणार नाही.

२८. **गनिमी काव्याने लढणें हा राजपुतांचा स्वभाव होता.** आता गनिमी काव्याच्या लढाईविषयीं सांगावयाचें तर असें दणदणीत विधान करण्यास हरकत नाही की, मोठ्या आपत्तीच्या प्रसंगीं गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा अवलंब करणें हा राजपुतांचा स्वभाव बनला होता. हंमीर, प्रतापसिंह, राजसिंह, अजितसिंह, दुर्गादास इ० राजपूत राजांनी व सेनापतींनी अरवलीच्या पहाडांत लपून बसूनच वर्षानुवर्षें अत्यंत बलाढ्य शत्रूबरोबर सामना दिला व त्यांत गनिमी काव्याच्याच युद्धपद्धतीचा आश्रय घेतला होता. एवढेंच नव्हे तर बहिष्काराच्या शस्त्राचाही त्यांनी यशस्वी रीतीने उपयोग केला होता, ही गोष्ट या पुस्तकाच्या पहिल्या विभागांत दाखवून दिलीच आहे. मेवाडच्या शिसोदिया कुलांतील शुद्ध रक्त ज्यांच्या नसांतून वहात होतें त्या छत्रपति शिवाजी महाराजांच्या ठिकाणीं दिसून येणारा गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा गुण आनुवंशिक होता असें म्हटलें पाहिजे. राजस्थानांतील त्या त्या लहान लहान राष्ट्रांनी प्रचंड मोगल साम्राज्याच्या विरुद्ध आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी जो वर्षानुवर्षें लढा चालविला त्यांत त्यांनी गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा आश्रय केला नसता व आपलें थोडेसेंच मनुष्य-बळ मोठ्या युक्तीने, दूरदर्शित्वाने व स्वतःस अतिशय फायदेशीर होईल व कमींत कमी खर्चीं पडेल अशा रीतीने उपयोगांत आणलें नसतें, आणि आततायीपणाने वागून एकदम शत्रूवर जाऊन तुटून पडण्याच्या नीतीचा त्यांनी अवलंब केला असता तर त्यांचा त्या भीषण आक्रमणापुढे निभावच लागला नसता हें अगदी स्पष्ट आहे.

२९. **प्रासंगिक युद्धांतील जयापजय हें जातीच्या उत्कर्षापकर्षाचें खरें कारणच नव्हे.** पण याच्याही पलीकडे जाऊन असें म्हणतां येईल की, ज्याप्रमाणें सुसज्जित शस्त्रास्त्रें व सुधारलेली युद्धपद्धति हींच केवळ युद्धांतील जयापजयाचीं निर्णायक कारणें ठरवितां

येत नाहीत, त्याचप्रमाणे एखाद्या प्रासंगिक लढाईमधील जयापजय हें एखाद्या सबंध जातीच्या उत्कर्षापकर्षाचें खरें कारणच होऊं शकत नाही. वर सांगितलेंच आहे की, प्रासंगिक जयापजयाचें पारडें, भारतांत हिंदु व मुसलमान आक्रमक या दोघांच्याही बाजूला निरनिराळ्या वेळीं झुकत राहिलें. असें असतांही स्थूल मानाने गेल्या हजार–बाराशें वर्षांत हिंदु जातीचा अपकर्षच होत गेला व मुसलमान जातीचा उत्कर्षच होत गेला. प्रासंगिक पराजयाने फार तर राज्यक्रांति होईल–एक राजा जाऊन दुसरा राजा येईल. पण त्यामुळे सबंध समाज अथवा जातीच नामोहरम होऊन एकदम अपकर्षाच्या उतरणीस लागेल हें संभवत नाही. वर सांगितल्याप्रमाणें ८ ते १८ व्या शतकांपर्यंत अव्याहत उत्कर्षारोहण करणाऱ्या मुसलमान जातीचेंच उदाहरण घेतलें; तर या काळांत अनेक मुसलमान राज्यें उत्पन्न झालीं व नष्ट झालीं. प्रासंगिक पराजयांनी अनेक वेळां मुसलमानी राज्यांत भयंकर राज्यक्रांत्या झाल्या. युद्धांतील विजयी पक्षाचा विजय होण्यास पुष्कळदा राजपूत सेनापति कारण झाले. पण असल्या संधीचा फायदा घेऊन एकही हिंदु घराणें मुसलमान तख्तावर आरूढ झालेलें दिसत नाही. हिमूच तेवढा अपवादभूत आढळतो. प्रायः एक मुसलमान घराणें जाऊन दुसरें आलें एवढेंच. प्रासंगिक युद्धांतील पराजयांनी एवढ्या राज्यक्रांत्या, एवढे अत्याचार व एवढा कर्तबगार पुरुषांचा विनाश झाला तरी सतत हजार वर्षें, मुसलमानांचा जाति या दृष्टीने पाहिलें तर, तिकडे युरोपांत डॅन्यूब नदीपासून तों इकडे भरतवर्षांत ब्रह्मपुत्रा नदीपर्यंत त्यांचा सारखा उत्कर्षच होत गेला.

मुसलमानांचे हे प्रासंगिक जयापजय जसे हिंदुस्थानांत झाले तसे मध्य आशियांत व युरोपखंडांतही झाले. पण युरोपांत १५–१६ व्या शतकापर्यंत तुर्की साम्राज्य डौलाने मिरवलें व भारतांतही १८ व्या शतकापर्यंत मोगल साम्राज्यास उतरती कळा लागली नाही. मुसलमानांप्रमाणेंच, आज उत्कर्षपदारूढ असलेल्या ख्रिस्ती जातीच्या अनेक राष्ट्रांचे अनेक वेळा जंगी पराजय झाले. पण त्यांमुळे त्या सबंध जातीचाच अपकर्ष झालेला दिसून येत नाही. तेव्हा स्थलकालविशिष्ट पराजयांच्या माथीं आमच्या विनाशाचें खापर फोडण्याचा प्रयत्न होत असला तरी वस्तुतः

तें त्याचें खरें कारण होऊं शकत नाही हें स्पष्ट आहे. विशेषतः राजस्थानांतील ज्या राजपूत राष्ट्रांच्या इतिहासाचें आपण या ग्रंथांत संक्षेपानें अवलोकन केलें आहे, त्यांच्या अपकर्षाची तर शस्त्रसामग्री, युद्धपद्धति अथवा प्रासंगिक जयापजय हीं कारणें संभवूंच शकत नाहीत. कारण तसें असतें तर ज्या कालांत मुसलमानांचा भारतवर्षांत उत्कर्ष झाला त्याच सहस्रकांत ह्या राजपूत राज्यांचाही जो उदयोत्कर्ष झाला, तो झाला नसता. योगायोगाने महंमदी सत्तेच्या अपकर्षाबरोबरच त्यांच्याही अपकर्षास प्रारंभ झाला. या दरम्यानच्या काळांत त्यांचे अनेकवार प्रासंगिक जयापजय झाले. पण राजपूत डगमगले नाहीत. त्यांच्या इतिहासाचें वरवर आलोचन करणारासही ही गोष्ट दिसून येईल की, सतराव्या शतकापर्यंत जी स्वातंत्र्याची चमक व जो राष्ट्रीय जोम त्यांच्या ठिकाणीं व्यक्त होत होता तो अठराव्या शतकांत एकाएकी मावळूं लागला. अवघ्या शंभर वर्षांत तो झपाट्याने कमीकमीच होत गेला व एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादांत तर त्याचा पूर्णपणें अस्त झाला. तो कां ?

३०. जातिभेद, मूर्तिपूजा इ० कारणांचें वैयर्थ्य. हिंदु धर्मांतील जातिभेद, मूर्तिपूजा इत्यादि अंतर्गत कारणांमुळे हिंदु जातीचा अपकर्ष झाला असेंही प्रतिपादन करण्यांत येतें. पण हींही कारणें तितकींशीं बलवत्तर नाहीत. वस्तुतः महंमदी आक्रमणाच्या प्रारंभपूर्वकालांत तरी हिंदु समाजाचे आजच्या इतके अनुल्लंघ्य बंधनांनी जखडलेले असे जातींचे व पंथांचे तुकडे पडलेले नव्हते; व पडले होते असें मानलें तरी त्यानंतरच्या कालांत राजपूत व मराठे याचें उत्थान झालेलें आपणांस दिसतेंच. तें होत असतांना जातिभेदाचा अथवा मूर्तिपूजेचा बांध आडवा येऊं शकला नाही. राजपूत व मराठ्यांचा समाजही इतर हिंदुसमाजाइतकाच जात्यादींनी विभागलेला होता. मूर्तिपूजेचें प्रस्थ त्यांच्यांतही होतेंच. तथापि, सबंध भारताचें परकी आक्रमणामुळे विनाशपूर्ण वाळवंट बनलें असतां, आशेची हिरवळ राजस्थानांत व महाराष्ट्रांत उगवली व विस्तार पावली.

वस्तुतः कोणत्याही धर्मांतला समाज घेतला तरी त्यांत निरनिराळ्या रूपाने जाती अथवा पंथ निर्माण होतातच. शिवाय जातिभेद अथवा पंथभेद नसला म्हणजे त्या धर्मांतले लोक आपापसांत भांडत नाहीत अथवा त्यांचा

अपकर्ष होत नाही असें थोडेंच आहे ? जातिभेद नसलेला इस्लामी धर्म घेतला तरी त्यांतील घटकांत परस्परांत भयंकर कलह माजले व तदनुसारी घनघोर युद्धेंही झालीं, अशीच इतिहास साक्ष देत आहे. सामानी साम्राज्य नष्ट करून गजनवी साम्राज्य उदयास आलें, तर घोरीच्या कडव्या पठाणांनी त्याचाही पार विध्वंस करून टाकला. जातिभेद नसतांही मुसलमान समाजाचा अपकर्ष झालाच. धर्माच्या शिकवणीने ह्या गोष्टी घडतात असें मानणेंही तितकेंसें बरोबर नाही. पांचपांचशें वर्षांच्या संस्कृति व साम्राज्यें एका ५।५० वर्षांच्या वावटळींत पार नष्ट करून टाकणारा चंगीझखान, ज्यांत अहिंसा तत्त्वाचा उदोउदो करण्यांत आला आहे, अशा बौद्धधर्माचा अनुयायी होता. तेव्हा धर्मांत जाती अथवा पंथ उत्पन्न झाले म्हणजे त्या समाजाची अधोगति झालीच पाहिजे असा नियम बांधतां येणार नाही अर्थात भारतवर्षांतील आर्यजातीच्याही अपकर्षाचें तें वास्तविक कारण होऊं शकत नाही. राजपुतांचा तर जातिपंथनिर्मितीनंतरही उत्कर्ष झालेला असल्याने त्यांच्या अपकर्षास जात्यादींचें कारण मुळीच लागू होत नाही.

३१. विधिघटना व निसर्गाचे उत्क्षोभ. भारतांतील आर्य जातीच्या विनाशाची मीमांसा करतांना दैव अथवा विधिघटना ह्या कारणाचाही कित्येकांकडून उल्लेख करण्यात येतो. त्यांचें म्हणणें असें की, कित्येक महत्त्वाच्या लढायांच्या वेळीं, हिंदु राजांच्या बाजूला शस्त्रास्त्रांची तयारी व सेनेचें संख्याबल अधिक असतांना व लढाईचा एकंदर रागरंग आता जयश्री हिंदूंनाच माळ घालणार असा स्पष्ट दिसत असतांना एकाएकी अशा कांही तरी अकल्पित व चमत्कारिक घटना घडून आल्या की, त्यांमुळे सर्व पारडें फिरून हिंदूंचाच पराजय झाला व आक्रमक विजयी बनले. ऐन वेळेवर घडून येणाऱ्या ह्या हानिकारक व चमत्कारिक घटनांनाच दैव विपरीत गेलें म्हणून म्हणण्यांत येतें. ह्या घटनांचें, मुसलमान लेखकांनी 'खुदाचीच कृपा झाली व आम्हांस जय मिळाला. नाही तर वास्तविक जय हिंदूंच्याच बाजूला दिसत होता' अशा शब्दांत वर्णन केलें आहे. दैवाच्या प्रतिकूलतेच्या म्हणून उल्लेखिल्या जाणाऱ्या या चमत्कारिक घटना जर तपासल्या तर त्यांतून निसर्गाच्या आकस्मिक

उत्क्षोभाशिवाय कांही सापडत नाही. कांही ठिकाणीं हिंदूंच्या पिण्याच्या पाण्याचीं झरीं खराब झालीं, कांही ठिकाणीं आकस्मिक वादळ झालें, कांही ठिकाणीं एकाएकीं हिमवर्षाव होऊन असह्य थंडी पडली, तर कांही ठिकाणीं जमीन दलदल झाली. ह्या आकस्मिक घटनांमुळे हिंदु शिपायांचें शौर्य वृथा गेलें व शत्रूस जय मिळाला असें आढळतें.

पण असल्या कांही प्रसंगीं निसर्गशक्तीसमोर मान वाकवावी लागली म्हणून कांही मनुष्यसमाजाचें उत्कर्षारोहण थांबत नाही व एखाद्या जातीच्या अपकर्षाचेंही तें कारण होऊं शकत नाही. राजपूत समाजाने ह्या निसर्गशक्तींना विरोध करण्याऐवजी आपल्या स्वातंत्र्यसंग्रामांत त्यांचें साहाय्यच घेतलेलें आढळून येतें. तेव्हा असल्या आकस्मिक घटनांनी उर्फ दैवाच्या प्रतिकूलतेने झालेल्या पराजयामुळे परकी आक्रमण सफल झालें व आर्यजातीचा अपकर्ष झाला असें म्हणणें मोठेंसें युक्तिसिद्ध नाही. सतत हजार वर्षें हिंदूंनाच तेवढें दैवाने तरी प्रतिकूल कां जावें व आक्रमकांचाच पक्षपात कां करावा?

३२. सर्वत्रानुस्यूत नियम सांगणें हें इतिहासवेत्त्याचें कर्तव्य. साधारणपणें निरनिराळ्या इतिहासज्ञांनी दिलेली हिंदूंच्या अथवा भारतीय आर्यांच्या अपकर्षाची कारणमीमांसा तपासून पाहतां तिची वरसारखी दशा होते. वस्तुतः निरनिराळ्या जातींच्या अथवा समाजांच्या उत्कर्षापकर्षाचा विचार करणाऱ्या इतिहासवेत्त्याने प्रत्येक जातीच्या विनाशाचीं भिन्नभिन्न कारणें सांगून अधिकच घोटाळा उत्पन्न न करतां जातींच्या उत्कर्षापकर्षाबद्दल सर्व ठिकाणीं सारखे लागू पडतील असे सामान्य नियम सांगावयास पाहिजेत. समाजांच्या अथवा जातींच्या आरोहावरोहाचा इतिहास सांगणारास प्रासंगिक, किरकोळ व प्रत्येक ठिकाणीं भिन्नभिन्न कारणें सांगून अथवा दैववादासारखी एखादी उपपत्ति सांगून आपल्या डोक्यावरील भार हलका झाला असें समजतां येणार नाही. जातींच्या उत्कर्षापकर्षाबद्दल सर्व ठिकाणीं सारखे लागू पडतील असे नियम सांगण्याची जबाबदारी, वस्तुतः, त्याच्यावर आहे, व ती त्यास टाळतां येणार नाही. असे व्यापक नियम सांगितल्याशिवाय त्याचें इतिहासकथन संपूर्ण होऊं शकणार नाही.

३३. जातीस जमिनीचा दृष्टांत. निरनिराळ्या मनुष्यसमाजांच्या अथवा जातींच्या उत्कर्षविनाशाच्या कारणांचा विचार करीत असतांना अर्थशास्त्रांतील जमिनीच्या सिद्धांताचें स्मरण होतें. जातीस जमिनीचा दृष्टांत अनेक दृष्टींनी लावतां येण्यासारखा आहे. जमिनीची जर चांगली मशागत केली व शेतकरी कसबी असला तर तो तिच्यांतून निरनिराळ्या प्रकारचीं उत्तम पिकें काढूं शकतो. त्याचप्रमाणें जातीचा नेता अथवा नायक जर योग्य पुरुष असला तर तो तिच्या हातून अनेक कर्तबगारीचीं कामें घडवून आणतो व कर्तबगार पुरुषांचें उत्तम पीक यावें अशी तिची मशागत करतो. सर्वच जमीन निसर्गतः सारखी कसदार अथवा पिकाऊ नसते. त्याचप्रमाणें सर्वच जाती निसर्गतःच सारख्या कर्तबगार व प्रभावी नसतात. जमिनीच्या या उत्पादनक्षमतेचें वर्णन करीत असतांना अर्थशास्त्राने आपला वर निर्देशिलेला सिद्धांत प्रस्थापित केला आहे. तो असा.

३४. वाढत्या व घटत्या उत्पादनक्षमतेचे अर्थशास्त्रीय सिद्धान्त. बराच कालपर्यंत जमीन पडीत पडली तर तिच्या ह्या पडीत पडण्याच्या गुणानेच तिच्या ठिकाणीं एक प्रकारचा सकसपणा व जोमदारपणा उत्पन्न होत असतो. असल्या बऱ्याच काळाच्या पडीत जमिनी वाहितीस निघाल्या म्हणजे त्यांच्यांतून पुढे बराच कालपर्यंत चांगलें जोमदार पीक येऊं लागतें. असल्या जमिनीची जितकी जितकी मशागत करावी व तिच्या कास्तकारीसाठी जितका जितका खर्च करावा तितकें तितकें अधिक पीक व उत्पन्न तिच्यापासून मिळूं लागतें. आपल्या कसबांत वाकबगार असा शेतकरी तिच्या जोरावर आपली समृद्धि हवी तशी वाढवून घेतो. पण अगदी सामान्य प्रतीच्या शेतकऱ्याच्या हातून देखील ह्या जमिनींत चांगलेंच पीक निर्माण होतें. पडीत जमिनीच्या ठिकाणीं वाढत्या प्रमाणावर पीक अथवा उत्पन्न देण्याचा जो नैसर्गिक धर्म असतो, किंवा पडीत पडण्याच्या गुणानेच जो तिच्या ठिकाणीं उत्पन्न होत असतो त्यासच अर्थशास्त्रांत 'जमिनीच्या वाढत्या उत्पादनक्षमतेचा नियम' (Law of increasing returns) असें म्हणतात. जमिनीच्या उत्पन्नाची ही ताकत वाढतां वाढतां अखेरीस अशा एका कमाल मर्यादेस जाऊन पोचते की तिच्या पुढे तिचें उत्पन्न वाढवितां येत नाही. जमिनीच्या ही कमाल

उत्पन्नाची मर्यादा बराच काल स्थिर राहते व तिचें हें कमाल उत्पन्नच काढण्याचा मनुष्य शक्य तोंवर प्रयत्न करीत असतो. जेव्हा एखादी जमीन अशा श्रमाने शेंकडो वर्षें सारखी वाहितीखाली राहते तेव्हा तिच्यांतील जोम अथवा कस हळू हळू आपोआपच कमी होऊं लागतो. अशा वेळीं तिची कितीही उत्तम मशागत केली व तिच्यावर खतपाणी घालण्याचा कितीही खर्च केला तरी तिच्यांतून पूर्वी इतकें उत्पन्न निघूं शकत नाही. जमिनीचा हा कस कमी होतां होतां इतका कमी होतो की ती जमीन अगदीच पीक देईनाशी होते. जिचें पीक अथवा उत्पन्न उतरणीस लागलें आहे अशा जमिनीच्या बाबतींत अर्थशास्त्रीय भाषेंत 'घटत्या उत्पादनक्षमतेचा नियम' (Law of diminishing returns) लागू करण्यांत येतो. उदाहरणार्थ, अमेरिका, कानडा, आस्ट्रेलिया इ० ज्या ठिकाणच्या जमिनी गेल्या अवघ्या २५०–३०० वर्षांतच वाहितीस निघालेल्या आहेत अथवा ज्या नवीन जमिनी अद्याप वाहितीस निघत आहेत त्यांना वरील वाढत्या उत्पादनक्षमतेचा नियम लागू पडत असून हिंदुस्थानसारख्या ज्या ठिकाणच्या जमिनी आज हजारों अथवा शेंकडो वर्षांपासून वाहितीखाली आहेत त्यांच्या ठिकाणचा कस आता कमी होत चालला असून त्यांच्या बाबतींत घटत्या उत्पादनक्षमतेचा नियम लागू पडतो. अमेरिका, कानडा इ० देशांत कृषीचा इतका उत्कर्ष दिसत आहे त्याचें हेंही एक अतिशय महत्त्वाचें कारण होय. कस कमी होत चाललेली जमीन जेव्हा पुनरपि बराच कालपर्यंत पडीत पडते तेव्हा तिच्या ठिकाणीं पुन: नवा जोम उत्पन्न होऊं लागतो.

३५. जातींनाही हेच नियम लागू पडतात. जमिनीच्या बाबतींतले वाढत्या व घटत्या उत्पादनक्षमतेचे वरील नियमच समाज अथवा जाति यांनाही तंतोतंत लागू पडतात. ज्या जाती शेंकडो वर्षेंपर्यंत एकसारख्या उत्कर्षास चढत असतात त्यांच्यातील जोमदारपणा पुढे वरील घटत्या उत्पादनक्षमतेच्या कायद्याप्रमाणें आपोआपच कमी होत असतो. पुष्कळ काळाच्या उत्कर्षोपभोगाने त्यांच्यांतला कस अशा रीतीने कमी झाला म्हणजे मग कितीही प्रयत्न केले तरी त्यांचा अपकर्ष झाल्याविना राहत नाही. त्यांच्यांत तो पूर्वीचा जोम अथवा कस उत्पन्न होऊं शकत नाही. ह्याच्या उलट ज्या जाती पडीत अथवा मागासलेल्या होऊन बराच

काळ पडून राहतात त्यांच्या ठिकाणीं कालाच्या ओघांत हळूहळू शक्तिसंचय होऊं लागतो व ह्या मागासलेल्या जातींतच पुढे असा कांही विलक्षण जोम उत्पन्न होतो की, त्यांच्या आक्रमणापुढे मोठमोठ्या सुधारलेल्या जाती देखील विनम्र होतात किंवा विनाश पावतात. अशा उत्थान पावूं लागलेल्या व म्हणूनच जयिष्णु वृत्तीचा संचार झालेल्या जातींच्या बाबतींत अर्थशास्त्राचा वरील वाढत्या उत्पादनक्षमतेचा कायदा लागू पडतो त्यांच्या आक्रमणास एवढेंसें संघटन, अल्पसें स्फुरण व सामान्य नेतृत्व देखील पुरेंसें होतें. बराच काळपर्यंत मागासलेल्या ह्या जातींचें एकदा उत्थान सुरू झालें की तें शेंकडो वर्षेंपर्यन्त टिकतें. पण पुढे कालप्रवाहांत त्यांचाही जोम हळू हळू कमी होत जाऊन त्यांचा अपकर्ष सुरू होतो. जेव्हा जेव्हा ह्या मागासलेल्या जातींचें उत्थान झालेलें आहे तेव्हा तेव्हा त्यांच्या समकालीन सुधारलेल्या म्हणून प्रसिद्ध असलेल्या, शेंकडो वर्षांपासून सुसंस्कृतीचा उपभोग घेत असलेल्या आणि विद्या, कला, शास्त्र इत्यादिकांची अभिवृद्धि करीत असलेल्या जातींचा त्यांच्या झपाट्याखाली चुराडा उडालेला आहे असाच सर्व सुसंस्कृत जातींचा इतिहास साक्ष देत आहे. किंबहुना इतिहासवेत्त्यांचें असेंच प्रतिपादन आहे की, मागासलेल्या व असंस्कृत जातींच्या हातून सुधारलेल्या व सुसंस्कृत जातींचा निःपात होणें ही मानवी इतिहासांतील एक सामान्य घटना आहे.

३६. मतलबी इतिहास-लेखकांचें विधान. भरतवर्षाच्या इतिहासाचीं पृष्ठें सजविणाऱ्या आर्यजातीच्या उत्कर्षापकर्षाचा विचार करीत असतांनाही इतिहासवेत्त्यांचा हा सिद्धांत अवश्य लक्षांत ठेवावयास पाहिजे. राजकीय हेतूंनी प्रेरित झालेल्या इतिहासलेखकांनी आजवर असें दाखविण्याचा सतत व पद्धतशीर प्रयत्न केलेला आहे की, जणू काय मागासलेल्या व असंस्कृत जातींचें फक्त याच दुर्दैवी देशावर आक्रमण झालें व त्याखाली येथील सुसंस्कृत व संपन्न अशी आर्यजाति छिन्नभिन्न झाली, ही मोठी लांछनास्पद गोष्ट होय. हिंदुस्थानसारख्या सुधारलेल्या व प्राचीन कालापासून सुसंस्कृत देशाला आपण जिंकलें याबद्दल इंग्रज लेखकही मोठी फुशारकी मारीत असतात. ह्या फुशारकीच्या ओघांत ते असेंही प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करीत असतात की, हिंदुस्थान इतर

जातींच्या अपेक्षेने सुधारलेला व सुसंस्कृत असेल; पण आमच्या संस्कृती-पुढे व सुधारणेपुढे त्याची संस्कृति व सुधारणा अगदी कुचकामाची व टाकाऊ होती व म्हणूनच त्यास आमच्या समोर पराजित व पराधीन व्हावें लागलें. ह्या प्रतिपादनांतला स्पष्ट हेतु असा असतो की, आपली प्राचीन संस्कृति आधुनिक पाश्चात्य संस्कृतीपेक्षा नालायक होती असे संस्कार भारतवासीयांच्या मनावर जडावेत व त्यांनी आपल्या पराभूत संस्कृतीस नालायक समजून तिचा धिक्कार करूं लागावें व नूतन जेतृत्वा-भिमानी संस्कृतीचाच जयजयकार करण्यास शिकावें. पण आम्हांस आमच्या वरील सिद्धांताप्रमाणें हेंच म्हणावयाचें आहे की, आर्यजातीचाच काय, पण कोणत्याही सुधारलेल्या व सुसंस्कृत जातीचा नेहमी मागासलेल्या व पडीत पडलेल्या जातीकडूनच पराजय होत असतो. स्वतःच्या सुधारणेचा व सुसंस्कृतपणाचा टेंभा मिरविणारी इंग्रज जाति हो देखील अशाच अत्यंत मागासलेल्या व बराच काल पडीत पडलेल्या परंतु सांप्रत उत्थानकालांत असलेल्या जातींपैकीच एक आहे ही गोष्ट आम्ही पुढे दाखविणारच आहोंत. तेव्हा राजकीय हेतूंनी प्रेरित झालेल्या लेखकांचे इतिहास वाचून, मागासलेल्या जातींकडून भारतीयांचा पराभव झाला ही एक मोठी असा-मान्य व लांछनास्पद घटना आहे असें मानण्याचें मुळीच कारण नाही. किंबहुना ती एक अर्थशास्त्रांतील जमिनीच्या वरील सिद्धांतानुसार सिद्ध होणारी व सर्वत्र सारखीच आढळून येणारी सामान्य घटना आहे व जगाच्या इतिहासाचें वरवर आलोचन केलें तरी तिचें प्रत्यंतर येण्यासारखें आहे.

३७. मागासलेल्या जातींकडून सुसंस्कृत समाजांचा निःपात. ह्या प्रत्यंतरासाठी फार प्राचीनकाळच्या इतिहासांत जाण्याची देखील गरज नाही. अगदी अलीकडचा म्हणजे ख्रिस्तोत्तरकालीन इतिहास घेतला तरी भागण्यासारखें आहे. ख्रिस्तशकाच्या प्रारंभकालांत विकास पावलेल्या सुप्रसिद्ध रोमन साम्राज्याचेंच उदाहरण घेऊं. ह्या सुसंस्कृत व सुधारलेल्या साम्राज्याचें विस्तीर्ण भवन बांधणाऱ्या रोमन जातीचा मध्य आशियांतील मागासलेल्या जातींमधून तयार झालेल्या टोळ्यांनी कसा समूळ विध्वंस करून टाकला, त्याचें वर्णन पूर्वी दिलेंच आहे. ह्या मध्य आशियां-तील जाती तरी कोण होत्या ? तर इतिहासवेत्त्यांचें असें मत आहे की, फार

प्राचीन काळीं मध्य आशिया खंडांत एक फार मोठी व सुधारलेली संस्कृति नांदत होती. तिचें विस्तीर्ण साम्राज्य मध्य आशियाभर पसरलेलें होतें. त्यांत कमींत कमी शंभर तरी समृद्ध अशीं नगरें असावींत. परंतु काळाच्या ओघांत हें साम्राज्य गडप झालें, त्यांतील संस्कृतीचा विनाश झाला व त्यानंतर किती तरी काळपर्यंत ही संस्कृतिविनष्ट मनुष्यजात तेथेच पडून राहिली. मोठमोठाल्या समृद्ध नगरींच्या ठिकाणीं विस्तीर्ण अरण्यें वाढन त्यांत मागासलेल्या स्थितींत पडून राहण्यांत ह्या जातींचा किती काल व्यतीत झाला असेल ह्याचा सुमार नाही. पण ख्रिस्तोत्तर कालांत त्यांचें उत्थान सुरू झालें. महंमदाच्या इस्लामी धर्मास याच उत्थानावस्थेंत असलेल्या जातींमधून, प्राधान्येंकरून, अनुयायी मिळाले. चंगीझखान, तैमूर व बाबरासारखे आक्रमक ह्याच जातींमधून निर्माण झाले व त्यांच्या उत्थानाखाली एकटें रोमनसाम्राज्यच नष्ट झालें असें नाही, तर बहुतेक सगळा युरोप, इराण, अफगाणिस्थान, हिंदुस्थान, मिसर इ० सर्व देशांत त्यांनी आपला विजयाश्व फिरविला व तेथील पूर्व संस्कृति नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ह्या सर्व पूर्व संस्कृतींना पुष्कळ काळच्या उपभोगाने अर्थशास्त्राच्या घटत्या अथवा उतरत्या उत्पादनक्षमतेचा कायदा लागू झालेला होता; तर मध्य आशियांतील ह्या उत्तिष्ठमान जातींना वाढत्या उत्पादनक्षमतेचा कायदा लागू होत होता. त्यामुळे पहिल्यांचा सारखा अपकर्ष झाला तर दुसऱ्यांचा सारखा उत्कर्षच होत गेला. ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकापासून तों सुमारें सोळाव्या-सतराव्या शतकापर्यंत मध्य आशियांतील ह्या मागासलेल्या जातींच्या उत्थानाचा आवेग पुरला. हा १२००-१४०० वर्षांचा काळ म्हणजे युरोपखंडांतील कृष्णयुग अथवा अंधकाराचें युग होय. ह्या काळांतील युरोपीय जातींच्या पतनाचा इतिहास घोर विषाद उत्पन्न करणारा आहे. मध्य आशियांतील जातींकडून होणाऱ्या ह्या आक्रमणाचा मोठासा तीव्र प्रतिकार त्यांच्याकडून झालेला दिसत नाही. आपल्या पूर्व संस्कृतीचें व सुधारणेचें संवर्धन तर राहोच पण जतन देखील त्या करूं शकल्या नाहीत. रोमच्या पलायमान विद्याकलावंतांना ह्या हजार-बाराशें वर्षांत युरोपांतील कोणत्याही राजदरबारांत आश्रय मिळूं शकला नाही. तो मिळाला

इस्तंबूलमध्ये. ह्या कालांतला युरोपीय जातींचा इतिहास अद्याप इतका अंधकारांत आहे की, त्यास सर्व इतिहासज्ञांनी एकमुखाने 'कृष्णयुग' अशीच संज्ञा प्रदान केली आहे व ती अत्यंत यथार्थ आहे यांत शंका नाही.

३८. इस्लामच्या उत्कर्षाचें रहस्य व त्याचें कार्य. ह्या हजार वर्षांत महंमदी धर्माचा सारखा उत्कर्ष होत गेला याचें रहस्यच हें आहे की, शेंकडो वर्षांच्या पडीत पडलेल्या जातींमधूनच त्यास प्राधान्यें-करून अनुयायी मिळाले. मध्य आशियांतील ह्या जातींच्या प्रारंभिक उत्थानकालांत फारशी सूत्रबद्धता दिसून येत नाही. पण महंमदी धर्माने ती निर्माण केली. जगाच्या पाठीवर इस्लामचें अत्यंत महत्त्वाचें असें कोणतें कार्य असेल तर तें हेंच की, अत्यंत मागासलेल्या व रानटी स्थितींतून उत्थान पावूं इच्छिणाऱ्या ह्या जातींना त्याने एक धर्म व संस्कृति दिली. शतकानुशतकें पडीत पडल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं जो ताजा जोम उत्पन्न झाला होता त्याचा इस्लामने उपयोग करून घेतला. इस्लाममुळेच सुधारलेल्या मानवतेच्या जवळपास ह्या जाती येऊं शकल्या. त्यांच्या त्या मूळच्या जंगली जोमास जर इस्लामची जोड मिळाली नसती तर आज दिसतो त्यापेक्षा आणखी केवढा भयंकर मान-व्याचा विनाश त्या क्रूर जातींच्या हातून झाला असता ह्याची कल्पनाही करणें कठीण आहे. इस्लाममुळे त्यांचें क्रौर्य मर्यादित झालें. त्यांना एक मिशन अथवा प्रचारकार्य मिळालें. विद्या, कला व तत्त्वज्ञान यांच्याशीं त्यांचा जसजसा संपर्क येत गेला तसतसा त्यांचा मूळचा जंगली क्रूरपणा कमी होत जाऊन त्यालाही कांही मर्यादा व बंधनें उत्पन्न झालीं.

३९. भारताचा एक सहस्रकाचा तेजस्वी प्रतिकार. अशा रीतीने शेंकडो वर्षांपासून मागासलेल्या व पडीत जातींमधून वर आलेल्या इस्लामच्या अनुयायांनी आपल्या प्रबल आक्रमणाने सबंध मध्य आशिया, अर्ध्याहून अधिक युरोपखंड, आफ्रिकाखंडाचा उत्तर भूप्रदेश, रशियाचा दक्षिणभाग व तिबेटचा पूर्वोत्तर भाग धडाक्याने व्यापून टाकला असतां त्यांच्या त्याच आक्रमणाच्या धडका भरतखंडावरही येऊन आदळल्या यांत कांहीच आश्चर्य नाही. इस्लामच्या ह्या अनुयायांच्या धडकांमागून धडका वाढत्या क्रमाने आर्यावर्ताच्या महाद्वारावर ज्या वेळीं येऊन आदळत

होत्या, त्याचवेळीं सुमारें सहा हजार वर्षांच्या उत्कर्षोपभोगाने भारतीय आर्यांचा जोम व कस क्षीण होऊं लागला होता. कारण तसें नसतें तर हूण इ० मध्य आशियांतील जातींचीं तत्पूर्वीचीं आक्रमणें भारतीय आर्यांनी जशीं निष्फळ करून टाकलीं व नामशेष केलीं तीच दशा याही आक्रमणाची त्यांनी अवश्य करून टाकली असती. पण अर्थशास्त्रांतील मागे दिलेल्या सिद्धांतानुसार ह्या वेळेस आपोआपच–स्वभावतःच–त्यांचा जोम उतरणीस लागला होता. त्यामुळे ह्या आक्रमणापुढे आर्यजातीचा टिकाव लागूं शकला नाही. तथापि जगाच्या इतिहासांत त्यांचें स्थान केव्हाही उच्चच राहील. याचें कारण असें की, जेथे जगांतील इतर जातींचा जोम एक अथवा अर्ध सहस्रकांतच उतरणीस लागला तेथे भारतीयांचा कस सतत सहा सहस्रकें पुरूं शकला. इतक्या दीर्घकालापर्यंत जिचा जोम अखंड कायम राहिला अशी जाति पृथ्वीच्या पाठीवर दुसरी कोणतीही नाही व हाच तिचा महत्त्वाचा विशेष होय. जोम उतरणीस लागलेल्या काळांत देखील, अन्य जागतिक जातींप्रमाणें समुत्थित आक्रमणासमोर एकाएकी मान न वाकवतां भारतीय आर्यांनी सतत एक हजार वर्षेपर्यंत प्रतिकार केला. हा प्रतिकार अत्यंत तेजस्वी असून त्यास प्रासंगिक फळेंही आलीं. पण स्थायी स्वरूपाचीं फळें येऊं शकलीं नाहीत. कारण आर्य जातीच्या उतरणीच्या काळांतील अवशिष्ट जोमाचा तो प्रतिकार होता.

ह्या उतरणीच्या काळांत सिंध, गुजरात पंजाब, काबूल, संयुक्त-प्रांत, बंगाल व बिहार इतक्या भागांतील आर्यांचा जोम फारच झपाट्याने नष्टप्राय झाला. पण राजस्थान, मध्यभारत, महाराष्ट्र व दक्षिण भारत यांच्यांत मिळून तो आणखी एक हजार वर्षें टिकला व म्हणूनच त्यांच्या प्रतिकाराच्या ठिकाणीं प्रखर तेजस्वितेची चमक उत्पन्न होऊं शकली. सबंध आर्यावर्ताचा व ब्रह्मावर्ताचा विनाश झाला तरी, आर्यांतील कस व जोम जिच्यांत अद्याप शिल्लक होता अशी राजपूत जाति राजस्थानांतील मरुभूमींत व मध्यभारताच्या पठारावर जमा होऊन तिने आठव्या शतकापासून तों सतराव्या शतकापर्यंत अव्याहत प्रतिकाराचें व्रत चालविलें. दक्षिण भारतांत ह्या जोमाची चमक प्रथम विजयनगरच्या साम्राज्याच्या रूपाने प्रकट झालेली दिसली. बहामनी राज्याच्या इस्लामी टकरीने

विजयनगरचें साम्राज्य सोळाव्या शतकांत भग्न झालें असलें तरी नष्ट झालें नव्हतें हें अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे. शहाजीने विजयनगरचे मागे राहिलेले प्रबल अवशे अधिकाधिक भग्न करण्याचा बराच यशस्वी प्रयत्न केला. पण त्यांतूनच मुसलमान सुलतानशाहयांनाही भारी होईल एवढें मोठें शहाजीचें मांडलिक राज्य निर्माण झालें. शहाजी महाराजा बनला. त्याच्या हयातींतच आपल्या स्वतंत्र भगव्या झेंड्याखाली महाराष्ट्रस्वराज्याची इमारत उभारण्यास शिवाजीने प्रारंभ केला होता. मराठ्यांच्या ठिकाणीं अद्याप शिल्लक असलेला हा जोम आणखी दीड पावणेदोनशें वर्षें पुरला. राजपूत व मराठे यांनी विराट प्रयत्न केले असले तरी उतरणीस लागलेल्या सबंध आर्यजातीच्या ठिकाणीं नवा जोम उत्पन्न करणें त्यांना शक्य झालें नाही—शक्य नव्हतेंच. त्यांच्या प्रयत्नांनी अन्यत्र आर्यजातीचें पतन होत असतांना त्यांचा स्वतःचा कांही काल उत्कर्ष झाला, एवढेंच. पण मराठ्यांचा इतिहासलेखक ग्रँट डफ याने म्हटल्याप्रमाणें सह्याद्रीवरील पाचोळा जमा होऊन त्यास वणवा लागावा व त्याचा देदीप्यमान प्रकाश क्षणभर चोहोकडे फैलावा तशीच त्यांची स्थिति झाली. आर्यांच्या उतरत्या काळांतील तो अवशिष्ट जोमाचा प्रस्फोट असल्याने कांही काल टिकून लवकरच नष्ट झाला व राजपूत व मराठे यांचेंही पतन झालें. मागे दिलेल्या सिद्धांताप्रमाणें त्यांचेंही पतन होणें एकंदर सृष्टिक्रमांत अनिवार्यच होतें.

४०. इस्लामच्या उतरत्या काळांतील नवीन युरोपीय आक्रमण. इस्लामी आक्रमणाच्या सुमारास एकंदर आर्यजातीचा जोम सहा हजार वर्षांच्या उत्कर्षोपभोगाने स्वभावतःच कमी होऊं लागला होता. फक्त राजपूत व मराठे यांच्या ठिकाणीं अद्याप तो थोड्या फार प्रमाणांत शिल्लक होता व म्हणूनच त्यांनी इस्लामी आक्रमणाचा अत्यंत तेजस्वी प्रतिकार केला हें वर सांगितलेंच आहे. आसेतुहिमाचल भारतांतील आर्यांचा जय करण्यास इस्लामला एक हजार वर्षें लागलीं. तरी तो पूर्ण होऊं शकला नाही. उलट इतक्या अवधींत इस्लामी आक्रमक जातींच्या ठिकाणचाच जोम कमी होऊन उतरणीस लागला. ज्या विद्युद्वेगाने मराठ्यांनी सबध भारताचें आक्रमण केलें, इ. स. १७२० ते १७६० च्या दरम्यान

सुमारें ४० वर्षांच्या अल्प मुदतींत २५० वर्षांच्या सुस्थित व बलाढ्य मोगल साम्राज्यावर मराठ्यांनी जे विजयामागून विजय संपादन केले त्यांवरून इस्लामी जातीचा कस किती झपाट्याने कमी होत होता याची स्पष्ट कल्पना येतें. पण ऐन याच वेळीं आणखी एका नवीन जातीचें आक्रमण भारतवर्षावर होऊं लागलें व त्याच्या प्रतिकारांत आमचा उरला-सुरला सर्व जोम खर्ची पडला. हें नवीन आक्रमण म्हणजे साता समुद्रांपलीकडील इंग्रज जातीचें आक्रमण होय. त्याचाही संक्षेपतः विचार केल्याशिवाय आर्यांच्या पतनाचा इतिहास पूर्ण होऊं शकणार नाही व राजपूत अथवा मराठे यांच्या निःपाताची योग्य मीमांसा लक्षांत येणार नाही. येथे हें प्रथम लक्षांत ठेवावयास पाहिजे की, या नवीन आक्रमणाच्या सुमारास राजपूत व मुसलमान यांचे संबंध शिथिल होऊन राजपूत व मराठे यांचे संबंध निगडित होऊं लागले होते व तेही अनुक्रमें मांडलिक सत्ता व सार्वभौम सत्ता या स्वरूपाचेच होते. अठराव्या शतकाच्या अंतिम पादांत बहुतेक राजपूत राज्यें मराठ्यांच्या मांडलिकत्वाचा स्वीकार करून चुकलीं होतीं. त्यामुळे मराठी सत्तेच्या निःपाताशीं राजपूत राज्यांचा निःपात अत्यंत निगडित असल्याने एकाचा विचार करतांना दुसऱ्याचा विचार टाळतां येत नाही.

वर सांगितलेल्या नवीन आक्रमणाचा विचार करीत असतांना पुनः आपल्या पूर्वप्रतिपादित सिद्धान्ताप्रमाणें भरतवर्षांतील सुधारलेल्या व सुसंस्कृत आर्य व इस्लामी जातींवर, वस्तुतः बराच काळ मागासलेल्या व पडीत पडलेल्या पण सांप्रत उत्थानकालांत असलेल्या जातीचेंच हेंही आक्रमण कसें होतें, भारतवासीयांच्या पेक्षा अधिक सुधारलेल्या व सुसंस्कृतीचा उपभोग घेणाऱ्या लोकांचें हें आक्रमण होतें असें समजणें कसें चुकीचें आहे, हें प्रथम सिद्ध करणें अवश्य आहे.

४१. सतराव्या शतकांतील इंग्रजी संस्कृतीचा रानटीपणा. इंग्रज जातीच्या इतिहासाकडे पाहिलें तर अनेक आक्रमणांच्यामुळे तिचें मूळचें स्वरूप नष्ट झालें आहे असें दिसून येतें. मूळच्या ब्रिटन लोकांत रोमन, अँग्लो–सॅक्सन, जर्मन इ० अनेक रक्तांचें मिश्रण झालेलें आहे. ख्रिस्ती शकाच्या प्रारंभीं रोमन लोकांनी इंग्लंड जिंकून तेथे आपली

संस्कृति स्थापन केली. पण ज्या मध्य आशियांतील टोळ्यांनी विस्तीर्ण रोमन साम्राज्याचा विध्वंस करून टाकला त्यांनीच नंतर इंग्लंडपर्यंत आपल्या आक्रमणाचा पल्ला पोचवून तेथील सुस्थित राज्यव्यवस्थेचा व समाजव्यवस्थेचाही पूर्ण नाश करून टाकला. त्यानंतर एक सहस्र वर्षेपर्यंत युरोपखंडभर पसरलेल्या काळोखांत इंग्लंडही खितपत पडलें होतें. त्या काळांत इंग्लंडची स्थिति कशी असावी हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. पण ज्या सतराव्या शतकाच्या सुमारास इंग्लंड जातीचा भारतवर्षाशीं प्रथम संबंध आला त्या वेळीं तेथील अवस्था कशा तऱ्हेची होती हें लक्षांत ठेवणें महत्त्वाचें आहे. सुप्रसिद्ध इतिहासलेखक ड्रेपर यानें या काळांतील इंग्रज लोकांच्या परिस्थितीचें जें वर्णन केलें आहे त्यावरून तिची अगदी यथायोग्य कल्पना येऊं शकते म्हणून थोडें विस्तृत असलें तरी ड्रेपरचें अवतरण खाली देत आहें—

" नदीच्या काठांवर बिळें करून राहणाऱ्या ऊद नांवाच्या जंगली प्राण्याच्या जीवनांत व इंग्रज शेतकऱ्यांच्या जीवनांत फारसा फरक नव्हता. भर सडकांवर डाकू फिरत, नद्यांवर समुद्रांतील चांचे व लुटारू लोक फिरत व लोकांच्या कपड्यांत व बिछान्यांत उवा फिरत. मटर, उडीद, वनस्पतींच्या मुळ्या व झाडांच्या साली हें सामान्य लोकांचें अन्न असे. असा कोणताच व्यापार नव्हता की, ज्यामुळें पाऊस न पडला तर दुष्काळापासून शेतकऱ्यांचा बचाव करतां येईल. लोकसंख्या फारच कमी होती. महामारी व दारिद्र्य यांच्यामुळे ती अधिकच कमी होत होती. शहरांतील लोकांची स्थितिही खेड्यांतील लोकांपेक्षा फारशी बरी नव्हती. भुशाचा एक थैला व लाकडाचा एक ठोकळा हीं त्यांचीं बिछाना व उशीचीं उपकरणें होतीं. जरा बऱ्यांपैकी शहरवाले झाडांच्या सालींचे कपडे परिधान करीत व गरीब लोक भाताच्या गवताने आपली लज्जा रक्षण करीत. ज्यांत कारागिरांना काम मिळेल असा कोणताच उद्योगधंदा नव्हता. गरिबांसाठी वैद्य नव्हता व साफसफाईची कोणतीच व्यवस्था नव्हती.

" ह्या दिवसांत ज्या झपाट्याने गरमीपरम्याचा रोग सबंध युरोपांत बळावला त्यावरून स्पष्टपणें विदित होतें की, लोकांत केवढा भयंकर दुराचार फैलावला असेल. लहान अथवा मोठा कोणीही गृहस्थ

ह्या रोगापासून बचावला नव्हता. इंग्लंडची लोकसंख्या ह्या वेळीं पन्नास लक्षांपेक्षा अधिक नव्हती. शेतकरी आपल्या जमिनीचा मालक नव्हता. मालक असे जमीनदार व शेतकरी फक्त त्याचा मजूर ! सर्व इंग्रज जाति इतकी अशिक्षित होती की, पार्लमेंटच्या बहुतेक लार्डांना ना लिहितां येत असे, ना वाचतां ! पाद्री लोकांत भयंकर दुराचाराचें प्रमाण वाढलें होतें. असें उघडपणें म्हणण्यांत येत असे की, इंग्लंडमधील एक लक्ष स्त्रियांना पाद्रयांनी भ्रष्ट केलें आहे.

" सतराव्या शतकाच्या अखेरीस देखील लंडन शहर घाणेरडें होतें. त्यांतील घरें वेडींवाकडीं होतीं व स्वच्छतेची कांहीच व्यवस्था नव्हती. प्रत्येक विभागांतून जंगली जनावरें फिरत असत. पावसाळ्यांत रस्ते इतके खराब होऊन जात की, त्यावरून चालणें देखील कठीण होत असे. मोठमोठ्या शहरांतून देखील सडका बनलेल्या नव्हत्या व चाकाच्या गाड्या चालूं शकत नव्हत्या. त्यामुळे लोक घोड्याच्या पाठीवर दोन्ही बाजूला झोळ्या सोडून त्यांत लादून जात. टाईन नदीच्या मुखाशीं जे लोक होते ते अमेरिकेंतील मूळ रहिवाशांपेक्षा कमी जंगली नव्हते. त्यांच्या स्त्रिया अर्धनग्नावस्थेंत जंगली गाणीं म्हणत भ्रमण करीत. सामाजिक व्यवस्थेंत ज्याला आपण सदाचार म्हणतों त्याचा कोठेच ठिकाणा नव्हता. नवरा बायकोला चाबकाने झोडपून काढीत असे. बायकांच्या पायांत बेड्या अडकवून त्यांना बाजारांत सोडून देण्यांत येई.

" राजकीय अथवा धार्मिक अपराधाबद्दल ज्या अमानुष शिक्षा देण्यांत येत त्यांच्यावर आज विश्वास बसणें देखील कठीण आहे. लंडनच्या टेम्स नदीच्या मोडक्या पुलावर अपराध्यांचीं डोकीं कापून टांगून देण्यांत येत. हेतु हा की, हें भयंकर दृश्य पाहून तरी लोकांनी कायद्याच्या विरुद्ध आचरण करूं नये "*

---

* इंग्लड देशाच्या स्थितीचें हे वर्णन John William Draper नांवाच्या अमेरिकन इतिहासकाराच्या History of the Intellectual Development of Europe (Bohn's Philosophical Library, 1884) या ग्रंथावरून घेतलेलें आहे. येथे

(पुढील पानांत चालू)

ड्रेपरसारख्या सुप्रसिध्द इतिहासलेखकाने वर्णन केलेला सतराव्या शतकांतील आंग्लसंस्कृतीचा हा नमुना होय. यावरून वाचकांच्या लक्षांत येईल की, आठव्या शतकानंतर भारतावर आक्रमण करणाऱ्या इस्लामच्या मध्यआशियांतील अनुयायांच्या संस्कृतींत व इंग्लंडच्या सतराव्या शतकांतील संस्कृतींत फारशी तफावत नव्हती. शेंकडो वर्षांपासून पडीत पडलेल्या व मागासलेल्या अशा याच इंग्रज जातीचें सतराव्या शतकानंतर भारतवर्षावर आक्रमण सुरू झालें हें अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे.

४२. वर्तमान पाश्चात्य संस्कृति ही मागासलेल्या लोकांच्या भक्ष्यस्थानीं पडेल काय, अशी तत्त्वज्ञांची चिंता. मोठमोठ्या सुधारलेल्या व सुसंस्कृत जाती, मागासलेल्या व पडीत जातींच्या भक्ष्यस्थानीं पडतात व त्यांच्या आक्रमणाने कित्येक शतकांच्या प्रस्थापित संस्कृतींचा व सुधारणेचा देखील समूळ विध्वंस होतो ही गोष्ट आधुनिक तत्त्ववेत्त्यांच्याही मनांत आता इतकी ठसली आहे की, तिची यापुढे तरी पुनरावृत्ति कशी न होईल याबद्दलच्या उपायचिंतनांत ते निमग्न झाले आहेत. आज उत्कर्षाच्या परमावधीस पोचलेल्या पाश्चात्य संस्कृतीच्या ठिकाणीं देखील असे कांही मूलभूत दोष आहेत की, ते जर सुधारले नाहीत तर एखादे दिवशीं पाश्चात्य संस्कृति देखील मागासलेल्या व बराच काळापासून पडीत असलेल्या जातींच्या भक्ष्यस्थानीं पडून विनाश पावल्यावाचून राहणार नाही अशी त्यांना भीति वाटूं लागली आहे व ही आपली भीति उर्ध्व बाहू करून उच्च स्वराने घोषित करण्यास त्यांनी प्रारंभ केला आहे.

४३. आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या विचाराची आवश्यकता. असो. सुधारलेल्या व सुसंस्कृत अशा भारतीय आर्यजातीच्या

(मागील पानावरून चालू)

उतरलेल्या मजकुराचें मूळ सदर ग्रंथाच्या दुसऱ्या खंडांतील सातव्या प्रकरणामध्ये २३०–२३३ व २३८–२४० या पानांमध्ये आढळेल. ड्रेपरच्या या ग्रन्थांतील उतारे मेजर बी. डी. बसूंनी आपल्या Rise of the Christian Power in India या पुस्तकामध्ये घेतले आहेत त्यावरून प्रस्तुत ग्रन्थाच्या लेखकांनी ते येथे उतरले आहेत.—**संपादक.**

विनाशाचा विचार करीत असतांना, अर्थशास्त्रांतील पूर्वप्रतिपादित सिद्धांताच्या अनुरोधाने आपण अगदी वर्तमानकालापर्यंत येऊन पोचलों. अशा तऱ्हेने जातींच्या विनाशाचा एक सर्वव्यापी नियम पाहिल्यानंतर प्रस्तुत राजपूत राष्ट्रांच्या विनाशकालीं एकंदर भारतांत कशी परिस्थिति होती तिचें अवलोकन करून नवीन आक्रमणाचें स्वरूप विशद केलें की, ह्या प्रकरणास व त्याबरोबरच ह्या ग्रंथासही पूर्णविराम देण्यास हरकत नाही. अठराव्या शतकांतील ह्या नवीन आक्रमणाचा विचार करीत असतांना आपणास आपली दृष्टि राजस्थानच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या सीमांपलीकडे नेण्याइतकी दूरदर्शी बनविली पाहिजे. ह्या काळांतील भारतीय परिस्थितीवर जगतिक, विशेषतः युरोपीय, घटनांचे, स्थित्यंतरांचे व राजकीय व सामाजिक क्रान्त्यांचे महत्वाचे परिणाम झालेले आहेत.

४४. आधुनिक युरोपीय संस्कृतीचा विशेष-भौतिक शास्त्रांचा विकास. सतराव्या शतकाच्या सुमारास सामान्यतः सर्वच युरोपीय राष्ट्रांची व विशेषतः इंग्लंडची सुधारणा काय किमतीची होती हें मागे ड्रेपरच्या शब्दांत आपण पाहिलेंच आहे. पण वास्तविक पाहतां हजारबाराशें वर्षे पडीत पडलेल्या युरोपीय जातींच्या उत्थानाचा तोच प्रारंभकाल होता. तत्पूर्वीच्या शतकांत त्यांनी तुर्की साम्राज्याचा जो पराभव केला होता तेव्हापासून युरोपीय जातींच्या नवीन मन्वंतरास प्रारंभ होऊन चुकला होता. तुर्की साम्राज्याच्या पराभवाने इस्तंबूलच्या तुर्की अमलांतून बाहेर पडलेल्या ग्रीक विद्वानांस पुनः युरोपीय राजांच्या दरबारांत आश्रय मिळण्याची आशा वाटूं लागली व तो मिळालाही. त्याबरोबर युरोपखडांत विद्या, कला व शास्त्र यांचा झपाट्याने प्रसार सुरू झाला. सतराव्या शतकाच्या सुमारास जेव्हा युरोपीय जातींचा भारतीयांशीं संपर्क येऊं लागला तेव्हा त्यांचा उत्थानकाल याप्रमाणे सुरू झालेला होता. ह्या उत्थानांतला त्यांचा बौद्धिक रोख भौतिक शास्त्रांच्या वाढीकडे वळणें अनिवार्य होतें. युरोपीय जातींची परिस्थिति आशियाखंडांतील जातींहून भिन्न होती. त्यांच्या दैनिक जीवनांत त्यांना प्रत्यहीं निसर्गाशीं झुंज खेळावी लागत होती. थंडी, वारा, बर्फ, पर्जन्य, चमत्कारिक हवामान व समुद्रकिनारा यांच्या सान्निध्यानें उत्पन्न होणाऱ्या अडचणी त्यांना जाणवत होत्या.

विद्येच्या प्रसाराबरोबर व बुद्धीच्या विकासाबरोबर त्यांचें पहिलें लक्ष जीवनास प्रत्यहीं भासणाऱ्या निसर्गाच्या ह्या अडचणी दूर करण्याकडे लागणें स्वाभाविक होतें व म्हणून दुसऱ्या कोणीही केला नाही एवढा निसर्गाविरुद्ध लढा त्यांनी सुरू केला व त्यांतूनच भौतिक शास्त्रांचा अमर्याद विकास झाला. या भौतिक शास्त्रांच्या वाढींतूनच यंत्रकलेचा उदय झाला. युरोपीय राष्ट्रांच्या उत्थानाचें हें विशिष्ट स्वरूप लक्षांत ठेवल्याशिवाय त्यांच्या पुढील आक्रमणाची नीट उपपत्ति लागूं शकणार नाही.

४५. भांडवलशाही घटनेंतून साम्राज्यतृष्णेचा उगम. युरोपीय जातींच्या उत्थानकालाच्या प्रारंभींच त्यांची नजर हिंदुस्थानकडे वळली होती. हिंदुस्थानच्या श्रीमंतीची व समृद्धीची कीर्ति त्यांच्या कानावर सारखी येत होती. आपल्या देशांतील भिकार व दारिद्रय यांचा उपशम करण्यासाठी भारताच्या सुवर्णभूमींत जाऊन व्यापार करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू झाले व या हेतूनेच डच, पोर्च्युगीझ, फ्रेंच व इंग्रज इतके लोक सतराव्या शतकांत इकडे येऊन उतरले होते. त्यांच्या ह्या प्राथमिक व्यापाराचें स्वरूप, तिकडील कच्चा माल भारतांत आणावा व इकडील पक्का माल युरोपांत नेऊन विकावा, असें होतें. त्यांना खरा नफा मिळे तो त्यांच्याच देशांतील श्रीमंतवर्गाकडून. हिंदुस्थानच्या दृष्टीने हा व्यापार सर्वस्वी किफायतशीर होता. हिंदुस्थानांत निर्माण होणारें कापड, साखर इ० पदार्थ, फार मोठ्या प्रमाणावर, या युरोपीय व्यापाऱ्यांच्या मार्फतीने युरोपच्या बाजार पेठांत खपत असत. हिंदुस्थानच्या तलम कापडाची इंग्लंडच्या लोकांना तर इतकी चटक लागली होती की, त्यामुळे तेथील विणकऱ्यांचे धंदे अजीबात बसले व ते उपाशी मरूं लागले होते. त्यामुळे त्यांनी मोठमोठाले दंगे करून पार्लमेंटचें सभागृह देखील जाळण्याचा प्रयत्न केला. अशा रीतीने दडपण आणून त्यांनी पार्लमेंटांत हिंदी कापडास मज्जाव करणारे कायदे पास करून घेतले. हिंदी कापडावर जबरदस्त जकाती बसविण्यांत आल्या. तथापि पन्नासपट व शंभरपट जास्ती किंमत देऊनही इंग्लंडांतील श्रीमंत सरदारांच्या बायका हिंदुस्थानच्या तलम साड्या वापरीत. त्यांचा हा शौक अद्याप इंग्रज विणकऱ्यांच्या पोटावर पाय देतच होता. त्यामुळे त्या बुभुक्षेने संतप्त झालेल्या

लोकांनी आपल्या क्रोधाच्या आवेगांत कैक स्त्रियांवर अत्याचार करून त्यांच्या अंगावरील साड्या भर रस्त्यावर फाडून काढल्या व जाळल्या. हें सर्व येथे निवेदन करण्याचा उद्देश हाच की, यंत्रकलेच्या उत्कर्षापूर्वी भारतवर्षाबरोबर होत असलेला युरोपीय लोकांचा व्यापार आम्हांलाच किफायतशीर होता हें स्पष्ट व्हावें. परंतु यंत्रकलेच्या उत्कर्षानंतर हें पारडें फिरलें. संरक्षित व्यापाराचें धोरण इंग्लंडच्या राज्यसत्तेने स्वीकारलें. प्रारंभीं यंत्रावर जाडेंभरडेंच कापड निघे. तें घेण्याची देशांतील लोकांवर सक्ती करण्यांत आली, व हिंदी कापडास एकदम मज्जाव करण्यांत आला. इतका की, तें वापरणारास तुरुंगाची शिक्षा फर्मावणारे कायदे पार्लमेंटने पास केले. यंत्रकलेच्या उत्कर्षानंतरच साम्राज्यतृष्णेचा उगम झाला.

४६. आर्थिक दृष्टिकोणाच्या पाश्चात्य मुत्सद्द्यांचें भारतांत आगमन. यंत्रकलेच्या उदयाने पूर्वी सांगितल्याप्रमाणें भांडवलवाल्यांचा प्रभावी वर्ग निर्माण झाला होता व युरोपांतील राज्यसत्ताही त्याने काबीज केल्या होत्या. प्रत्येक गोष्टीचा विचार नफ्यातोट्याच्या आर्थिक भाषेंत होऊं लागला होता. असा विचार करणाऱ्या पाश्चात्य मुत्सद्यांचा वर्ग अठराव्या शतकाच्या अखेरीस हिंदुस्थानांत येऊं लागला होता. त्यावेळीं इकडे काय परिस्थिति होती हें आता पाहूं.

४७. भारताची अठराव्या शतकांतील परिस्थिति–केंद्रीय शासनाची दुर्बलता. अठराव्या शतकाच्या प्रारंभापासूनच भारतांतील केंद्रीय शासनसत्ता दुर्बल होऊं लागली होती. औरंगजेबाच्या हयातींतच त्याच्या जुलमी शासनाची प्रतिक्रिया सुरू झाली होती. राजपूत व मराठे यांच्या बरोबर झालेल्या तीस–तीस वर्षांच्या संग्रामांत मोगल साम्राज्याचें द्रव्यबळ व मनुष्यबळ अत्यंत क्षीण झालें होतें. केंद्रीय शासन जसजसें बलहीन होत गेलें तसतसे साम्राज्याचे अनेक नबाब व सुभेदार आपापल्या प्रांतांत स्वतंत्र बनूं लागले. मराठ्यांनी तर साम्राज्याचे लचके तोडण्याचें काम फारच जोरांत चालविलें होतें. नादिरशहाच्या स्वारीच्या वेळीं, म्हणजे इ. स. १७३९ सालीं मोगल साम्राज्यसत्ता इतकी बलहीन झाली की तिला या आक्रमणाचा यत्किंचित देखील प्रतिकार करतां आला नाही. त्याने मोगल बादशहाचा जीव एखाद्या चिमणीसारखा आपल्या मुठींत

धरून त्यास हवा तसा नाचविला.

४८. साम्राज्याची आर्थिक विपन्नता. आर्थिक दृष्टीनें विचार केला तरी हीच परिस्थिति दिसते. औरंगजेब मेला त्या वेळीं त्याचा सर्व द्रव्यकोष रिकामा झाला होता. राजपूत व मराठे यांच्या बरोबरच्या त्रिशतिवार्षिक स्वातंत्र्यसंग्रामांत त्याने अपरंपार धनव्यय केला होता. मरतेवेळीं त्याच्या फौजेचा वर्षावर्षाचा पगार थकलेला होता. त्याच्या नंतर दिल्लीच्या तख्तावर आरूढ झालेल्या प्रत्येक मोगल बादशहास ही आर्थिक दिवंचना अधिकाधिक भेडसावीत गेली. शाही खजिने कोरडे ठणठणीत राहूं लागले. त्यामुळे फौजांचे पगार वर्षानुवर्षें थकित राहूं लागले आणि ते चुकविण्यासाठी शेतकरी व व्यापारी यांच्यावर अधिकाधिक जुलूम करण्यांत येऊं लागले. पगार थकलेले शिपायी स्वतःच शाही मुलखांत फिरून लूटमार करूं लागले व जो पैसा देईल त्याच्या फौजेंत भरती होऊं लागले. पैसेवाल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या पलटणांना यामुळेच अधिक शिपाई मिळूं लागले. अठराव्या शतकाच्या मध्यास मोगल बादशाह पूर्णपणें दरिद्री बनले होते. त्यांच्या दारिद्र्यामुळे बेकार झालेल्या शिपायांनी व कर्मचाऱ्यांनी मनसोक्त लूटमार करून प्रजेलाही दरिद्री करून टाकलें होतें. त्यांना तसें करण्यास कूटनीतीच्या इंग्रज मुत्सद्द्यांकडून प्रोत्साहन मि त होतें अशी त्या काळचा इतिहास साक्ष देत आहे.

४९. सरंजामी सरदारांत केंद्रीय सत्तेची विभागणी. एवंच, हिंदुस्थानचें केंद्रीय शासन अशा तऱ्हेने अत्यंत दुर्बल होऊन त्याची सत्ता अनेक नबाबांत व सुभेदारांत विभागली गेली होती. मराठी सत्तेचा अठराव्या शतकांत उत्कर्ष झाला खरा. पण तिला केंद्रीय शासनसत्तेचें स्थायी स्वरूप कधीच प्राप्त होऊं शकलें नाही. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धांत, मराठी राज्यापुरता विचार केला तरी, त्याचीही सत्ता निरनिराळ्या सरदारांत विभागली गेली होती व शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले इत्यादि सरदारांनी मिळाला तो मुलूख बळकावून मध्यवर्ती सत्ता कमजोर करून टाकली होती.

५०. राजपूत सरंजामी सरदारांचा विशेष-सुपरिणाम व दुष्परिणाम. राजकीय स्थित्यंतराचा हाच प्रवाह या वेळीं राजस्थानांतही

वाहत होता. मेवाड, मारवाड, अंबर इ० राजपूत राज्यांच्या गादीवर प्रबळ, पराक्रमी व कर्तृत्वसंपन्न असा पुरुष या काळांत आलाच नाही असें म्हटलें तरी चालेल. त्यांचीही सत्ता त्यांच्या सरदारांत व जहागीरदारांत विभागली गेली होती. राजपुतान्यांतील सरदारांचा इतर ठिकाणच्या सरदारांपेक्षा एक महत्त्वाचा विशेष होता व तो हा की, त्यांतील बहुतांश लोक खास राजवंशांत उत्पन्न झालेले होते. राजकुलांतल्या या लोकांच्या पोषणासाठी राजांनीच त्यांना जहागिरी व वतनें नेमून दिलीं होतीं. राजा मजबूत व कर्तबगार होता तोंपर्यंत ह्या शिसोदिया, राठोड, कच्छवाहा, भट्टी व हाडा राजकुलांतील सरदारांचाही पराक्रम राष्ट्रकार्याच्या अतिशय उपयोगी पडला. किंबहुना, राजपूत राज्यांच्या उत्कर्षकालांत, नालायक राजांना पदच्युत करून लायक पुरुषास गादीवर बसविण्याचेंही काम या सरदारांनीच केलें. कारण प्रत्येकाच्या नसांतून त्याच राजवंशाचें रक्त वाहत असल्याने हें राज्य माझें आहे व त्याच्यासाठी प्रसंग पडल्यास आत्मसमर्पण देखील करणें हें माझें कर्तव्य आहे अशी भावना त्यांच्या ठिकाणीं दिसून येत होती. एकाच वंशांतले व रक्ताचे इतके परम अभिमानी तरुण राष्ट्रकार्यासाठी मिळणें हा राजपुतांच्या बहुपत्नीकत्वाच्या पद्धतीचा विजय होता. कर्तृत्वसंपन्न राजे या हजारों लोकांना एका राष्ट्राभिमानाच्या भावनेने बद्ध करूं शकले. पण कमकुवत राजांच्या कारकीर्दींत हेच सरदार प्रबळ होऊन बसले. दुर्बल व परप्रत्ययनेय बुद्धीच्या राजांचे त्यांच्या बरोबर वारंवार खटके उडूं लागले. त्यांचें दमन करण्यासाठी राजपूत राजेही सिंधी, रोहिला इ० मुसलमान शिपायांच्या भाडोत्री फौजा ठेवूं लागले. या फौजांचीं व सरदारांचीं जीं वारंवार भांडणें झालीं त्यांना कंटाळून त्यांचें राजाच्या मध्यवर्ती कारभारांतील लक्ष कमी होऊं लागलें व स्वतःची जहागीर सांभाळण्याचाच ते शक्य तितका प्रयत्न करूं लागले. अठराव्या शतकाच्या सुमारास राजपूत राज्यांतील ही सत्ताविभागणी कळसास पोचली होती व तिचे दुष्परिणामही आपापसांतल्या यादवीच्या रूपाने प्रत्ययास येऊं लागले होते.

५१. स्वकीय लोकशाहीच्या उदयापूर्वीच परकीय भांडवलशाहीचें आक्रमण. राजस्थानांतील सरंजामी सरदारांच्या कळसास पोचलेल्या या परिस्थितींतून युरोपांतल्या प्रमाणेंच इकडेही लोकशाहीचा

विकास होऊं शकला असता. युरोपांत देखील हा विकास होण्यास शंभर वर्षें लागलींच. इंग्लंडमध्येही एकोणिसाव्या शतकांतच तिचें पूर्ण विकसित स्वरूप दृष्टीस पडतें. हिंदुस्थानांतही हा विकास झाला नसता असें नाही. विशेषत: राजपूत राष्ट्रांत तो इतर ठिकाणांपेक्षा लवकर झाला असता. कारण राजसत्तेची विभागणी तेथील सरंजामी सरदारांत पूर्णपणें होऊन चुकली होती. युरोपांत यंत्रकलेच्या उदयाने लोकशाहीचा विकास जितका झपाटच्याने होऊं शकला तितका अर्थातच यंत्रकलेच्या अभावीं इकडे झाला नसता हें जरी खरें असलें, तरी थोडचा फार प्रमाणांत तो अवश्य झाला असता. परंतु हिंदी जाती उतरणीच्या मार्गास लागलेल्या असतांना व केंद्रीय शासन अगदी शिथिल होऊन समाजरचना विस्कळीत झाली असतांना, ती पुनरपि लोकशाहीच्या रूपाने संघटित होण्यापूर्वीच्या संक्रमण कालांतच पाश्चात्य भांडवलशाहीचा त्यांच्यावर इतका जोराचा आघात झाला की, त्यामुळे त्या पार चेंदामेंदा होऊन गेल्या.

५२. नवीन आक्रमणाचें सर्वथा भिन्न व भयंकर स्वरूप. ह्या आघाताचें स्वरूप आजपर्यंतच्या आक्रमणाहून किती भिन्न व केवढें भयंकर होतें हें पाहण्यासारखें आहे. व्यापाराच्या निमित्ताने आलेल्या डच, पोर्च्युगीझ व फरेंच जातींना मागे सारून अठराव्या शतकांत इंग्रजांनी आपलें बस्तान येथे जमविलें होतें. इतर युरोपीय जातींच्या मानाने इंग्रज जाति ही अधिक काळ पडीत पडलेली जाति होय. अठराव्या शतकापूर्वीच्या इतिहासांत इटाली, फरान्स, जर्मनी, स्पेन यांचीं नांवें एकेक वेळ गाजून गेलीं. पण इंग्रज जातीचें उत्थान या वेळीं प्रथमच सुरू झालें होतें. त्यामुळे इतरांच्या मानाने तिचा कस अथवा जोम अगदी ताजा व नवीन होता. त्यामुळेच ती जगावर सर्वांत अधिक आक्रमण करूं शकली. यंत्रकलेच्या व भौतिक शास्त्रांच्या बाबतींत इंग्लंडची जसजशी प्रगति होत गेली तसतशी हिंदुस्थानची बाजारपेठ काबीज करण्याच्या बाबतींत ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनी त्यांच्या हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांच्या मागे अधिकाधिक निकड लावण्यास सुरुवात केली. यापूर्वीही पैशासाठी त्यांची निकड असेच व ती भागविण्यासाठीच वॉरेन हेस्टिंग्सप्रभृति कंपनीच्या अधिकाऱ्यांचे इकडील लोकांवर भयंकर अत्याचार

झालेले आहेत. परंतु यंत्रकलेच्या उत्कर्षानंतर व भांडवलशाहीचा प्रभाव वाढल्यानंतर लागलेली निकड कांही निराळीच होती. इंग्लंडमध्ये हिंदुस्थानांतल्या पक्क्या मालाचा एक सुतळीचा तोडा देखील येतां कामा नये, व उलट हिंदुस्थानांत इंग्लंडचा पक्का माल ज्या ज्या सूक्तासूक्त मार्गानें खपवितां येईल त्या त्या मार्गानें खपविलाच पाहिजे अशी इंग्लंडमधल्या मुत्सद्द्यांची टोचणी होती. कंपनीचे अधिकारी स्वार्थवश होऊन असा प्रयत्न करणार नाहीत म्हणून हिंदुस्थानशीं व्यापार करण्याचा परवाना इंग्लंडमधल्या व्यापाऱ्यांना सरसकट खुला करण्यांत आला. इंग्लंडच्या भांडवलवाल्यांत शिजून तयार झालेल्या याच मताची घोषणा १८१३ सालीं पार्लमेण्टचे एक सभासद मि. टीर यांनी पार्लमेण्टच्या सभागृहांत निःसंदिग्ध शब्दांत केली. त्या वेळीं ह्याच विषयावर पार्लमेण्टमध्ये चर्चा चालली होती. मि.टीर यांनी इंग्लंडच्या भांडवलवाल्यांच्या तर्फे स्पष्ट सांगितलें की, "आमचें सर्वसामान्य धोरण असें असावयास पाहिजे की इंग्लंडने जबरदस्तीने आपला पक्का माल हिंदुस्थानच्या माथीं मारला पाहिजे. पण हिंदुस्थानांतील मात्र एकसुद्धा तयार वस्तु इंग्लंडमध्ये येऊं देतां कामा नये." अर्थात टीर साहेबांच्या या घोषणेचा अर्थ एवढाच होता की, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या डायरेक्टरांच्या तगाद्यावरून अगोदरच जें धोरण हिंदुस्थानांत प्रारंभिलें होतें त्याला इंग्लंडच्या राजसत्तेचाही पूर्ण पाठिंबा असावा—नव्हे आहे—हें स्पष्ट व जाहीर व्हावें.

५३. पक्क्या मालासाठी बाजारपेठ व तीसाठी शासनसत्तेची जरूरी. इंग्लंडचा पक्का माल हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर खपवावयाचा असेल तर हिंदुस्थानांत पक्का माल निर्माण होण्याचें प्रथम बंद करणें जरूर होतें. अठराव्या शतकांत जितका हिंदी प्रदेश कंपनीच्या ताब्यांत येऊन चुकला होता. त्यांत ही जबरदस्ती कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पूर्वीच सुरू केली होती. देशी कारागिरीचा नाश करण्यासाठी व तिचें मर्म जाणून घेऊन इंग्लंडमधल्या कारागिरांना तें पुरविण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी बंगाल्यांत जे भयंकर अनन्वित अत्याचार केले त्यांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. पण तें करीत असतांना त्यांच्या ठिकाणीं माणुसकीचा लवलेश देखील शिल्लक असलेला आढळून आला नाही एवढें नमूद

करणें भाग आहे. कंपनीच्या शासनाबाहेर अद्याप केवढा तरी हिंदुस्थान देशी राजेरजवाड्यांच्या ताब्यांत होता व ते थोडेच इंग्रजांच्या सांगण्यावरून देशी कारागिरीच्या गळ्यावर कुऱ्हाडीचा घाव घालण्यास तयार झाले असते? हिंदुस्थानांतली कारागिरी नष्ट केल्याशिवाय येथल्या बाजारपेठेंत इंग्लंडच्या मालास मोकळें रान सापडणें शक्य नव्हतें. व बाजारपेठ काबीज करण्यासंबंधीं तर कंपनीच्या डायरेक्टरांचा सारखा तगादा सुरू होता. या परिस्थितींतूनच इंग्रजांच्या साम्राज्यतृष्णेचा उगम झाला. हिंदुस्थानची राज्यसत्ता पूर्णपणें काबीज केल्याशिवाय हिंदी कारागिरीचा संपूर्ण नाश करतां येणें शक्य नाही व हा संपूर्ण नाश झाल्याशिवाय हिंदुस्थानची बाजारपेठ सर्वस्वीं आपल्या मुठींत कधीच येऊं शकणार नाही, ही गोष्ट स्पष्ट झाल्याबरोबर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी आपलें सर्व लक्ष प्रथम राजसत्ता काबीज करण्याकडे लावलें. १८०३ सालीं गवर्नर जनरल सर जार्ज बार्लो, मार्क्विस ऑफ वेलस्लीस, १२ जुलै रोजीं लिहिलेल्या पत्रांत स्पष्टपणें लिहितो की "ब्रिटिश सत्तेच्या संपूर्ण नियंत्रणाखाली येणार नाही असें एकही देशी राज्य अस्तित्वांत राहूं देतां कामा नये." यावरून अठराव्या शतकाच्या अखेरीस कंपनीच्या अधिकाऱ्यांचें हिंदुस्थानची शासनसत्ता काबीज करण्याचें धोरण ठरून गेलें होतें व त्याचें मूळ इंग्लंडच्या भांडवलशाही समाजघटनेंत होतें हें उघड दिसतें.

५४. कलह लावून देण्याचे पद्धतशीर प्रयत्न. हें धोरण ठरल्यावर त्यांनी, अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत सरंजामी सरदारांच्या पद्धतीने झालेल्या केंद्रीय शासनसत्तेच्या विभागणीचा पूर्णपणें फायदा घेतला. निरनिराळ्या लहानमोठया सत्ताधिकाऱ्यांमध्ये कलहाचें बीजारोपण करून त्याचा मोठा वृक्ष बनविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यांत आला. धार्मिक भावनांना उत्तेजित करून हिंदूविरुद्ध मुसलमान भडकावण्यांत आले. मराठ्यांविरुद्ध राजपुतांना उठवितांना जातीय अभिमान जागृत करण्यांत आला. शिखांना हिंदु व मुसलमान या दोघांचेही दुश्मन बनवून इंग्रजांचे दोस्त बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. इकडील परिस्थितीचा व लोकाचाराचा पूर्ण परिचय असलेले, भयंकर कूटनीतींत निष्णात व दूरदृष्टीचे इंग्रज मुत्सद्दी या कामावर नेमण्यांत आले. देशी

राजेरजवाड्यांत कलह माजवून ते सतत कायम ठेवण्यासाठी मुबलक पैसा या कूट मुत्सद्द्यांच्या स्वाधीन करण्यांत आला. कॉर्नवालिस, बार्लो, मिंटो, हेस्टिंग्स, डलहौसी इ० गव्हर्नर जनरलांची परम्परा पाहिली व त्यांनी अनुसरलेलें एकच विशिष्ट धोरण पाहिलें, म्हणजे हा व्यूह केवढा बुद्धिपुरःसर रचलेला व गहन होता याची कल्पना येते.

५५. कूट मुत्सद्दी कॅर्नल टॉड. भेदनीतीसाठी नियुक्त झालेल्या या इंग्रज मुत्सद्यांचें राजस्थानच्या इतिहासाशीं संलग्न असलेलें उदाहरण म्हणजे कर्नल जेम्स टॉडचेंच होय. टॉडने आपला सुप्रसिद्ध राजपुतांचा इतिहास लिहून अतिशय लोकप्रियता मिळविली आहे. पण नवीन संशोधनाअंतीं आता टॉडने आपल्या पुस्तकांत अनेक गोष्टी खोट्या व कल्पित दडपून दिल्याचें उघडकीस आलें आहे. १८०६ सालीं टॉडची प्रथम राजपूत राज्यांत नेमणूक झाली. यापूर्वी तो शिंदेहोळकरांच्या दरबारांत इंग्रजांचा वकील म्हणून काम करीत होताच. १८०६ पासून १८२३ पर्यंत टॉडने राजपूत राज्यांत काम केलें व आपला उद्देश पूर्णपणें सिद्धीस नेला. राजपुतांच्या मनांत मराठ्यांसंबंधीं द्वेष उत्पन्न करणें ही टॉडची पहिली कामगिरी होती. कारण मराठ्यांची सत्ता हीच त्या काळची प्रबलतम सत्ता होती व त्यांच्या सार्वभौमत्वाखालून राजपुतांना फोडून काढणें इंग्रजांच्या धोरणाच्या दृष्टीने अत्यवश्य होतें. मराठ्यांच्यापासून राजपुतांना फोडून त्यांना इंग्रजांचे दोस्त बनविण्याचें कामच टॉडवर सोपविण्यांत आलें होतें. राजपुतांना मराठ्यांविरुद्ध तर त्याने भडकावलेंच. पण निरनिराळ्या राजपूत सरदारांना व राजांना एकमेकांशीं सतत झगडत ठेवण्याचे कुटिल प्रयत्न करून मराठ्यांच्या बरोबरच त्यांचेंही बळ तो क्षीण करीत राहिला. राजपूत चालीरीतींचा मार्मिक ज्ञाता, मोहक वक्ता, जाडा विद्वान व गहन कूटनीतिज्ञ म्हणून टॉडची प्रसिद्धि आहे. इकडे राजपुतांच्या मनांत मराठ्यांविषयीं द्वेष उत्पन्न करावा तर तिकडे शिंदे होळकरांच्या दरबारीं असलेल्या लहानमोठ्या मराठे सरदारांना राजपुतांच्या प्रदेशांत लूटमार करण्यास प्रवृत्त करावें असा टॉडचा धंदा असे.

५६. राष्ट्रभंगाच्या प्रयत्नांची परंपरा. ह्या काळांत देशीराजेरजवाडे, निरनिराळे लहानमोठे सत्ताधारी व जहागीरदार इत्यादिकांत

जें कलहाचें एकदम रान उसळलेलें दिसतें त्याचें कारण हें असें आहे. असतील तेथले कलह वाढविणें व नसतील तेथे नवीन उत्पन्न करणें हें गव्हर्नर जनरलांचें व इंग्रज मुत्सद्यांचें तत्कालीन धोरण असल्याबद्दल अनेक इंग्रज लेखकांनी कंपनीच्या कागदपत्रांतून व पत्रव्यवहारांतूनच प्रमाणें दिलीं आहेत. मुसलमानांच्या भाडोत्री शिपायांना मोगल सुभेदारांच्या व मराठा सरदारांच्या मुलखांत लूटमार करण्यास याच मुत्सद्यांनी प्रवृत्त केलें असल्याचीं प्रमाणें उपलब्ध झालीं आहेत. फार काय, पण पेंढाऱ्यांचा उपद्रव सुद्धा प्रथम त्यांनीच उद्भूत केला. मराठ्यांच्या फौजेंत इमानेंइतबारें नौकरी करणाऱ्या या शूर लोकांना मोठमोठ्या लाचा लुचपता देऊन देशी राज्यांत लूटमार करण्यास इंग्रजांनीच प्रवृत्त केलें हें आता चांगल्या प्रमाणानिशीं उघडकीस आलें आहे.

५८. उपसंहार. आपल्या पक्क्या मालाचा उठाव हिंदुस्थानांत करण्यासाठी व इकडील कारागिरीचा कायमचा नाश करण्यासाठी हिंदुस्थानची राजसत्ता पूर्णपणें ताब्यांत घेतल्याखेरीज गत्यंतर नाही हें दिसून आल्याबरोबर अठराव्या शतकाच्या अंतिम पादापासून इंग्रजांनी सूक्तासूक्त सर्व मार्गांनी राजसत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला व त्या वेळीं इकडे अस्तित्वांत असलेली सरंजामी सरदारांत झालेली केंद्रीय शासनाची सत्ताविभागणीच त्यांना अत्यंत पथ्यावर पडली यांत शंका नाही. मध्यवर्ती प्रबळ सत्तेच्या अभावीं या लहान मोठ्या सत्ताधिकाऱ्यांना व सरदारांना, राजांना व रजवाड्यांना सतत भांडत ठेवणें व निरनिराळ्या युक्त्या योजून त्यांच्या भोवतीं अडचणी निर्माण करून त्यांना पेचांत धरणें आणि अखेरीस आपल्या संगिनी त्यांच्या छातीवर रोखून त्यांना पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेणें इंग्रजांना सोपें गेलें. राजपूत राज्यांतही हीच स्थिति असल्याचें मागे सांगितलेंच आहे. बलाढ्य भांडवलशाहीच्या नवीन सत्तेबरोबर त्यांचा अचानक सामना येऊन पडला. ह्या द्रव्याधिष्ठित सत्तेनें पैशाच्या व कूटनीतीच्या जोरावर राजपूत राजे व त्यांचे सरदार व जहागीरदार यांना अशा कांही अडचणींत आणलें की, ब्रिटिश सत्तेचें सार्वभौमत्व मान्य करणें त्यांना भागच पडलें. त्या काळचा हिंदी समाज ब्रिटिश भांडवलवाल्यांचा हा आघात सहन करण्यास सर्वथा असमर्थ होता.

हा आघात कोणीकडून व कसा येत आहे हें देखील कळणें कठीण होतें. ब्रिटिश मांडवलशाही आक्रमणाचें स्वरूप पूर्णपणें लक्षांत येण्यापूर्वीच हिंदी जाती तिच्या आहारीं जाऊन चुकल्या होत्या. हिंदुजातीचे इतर विभाग थकून त्यांचा जोम नाहीसा झाल्यानंतर राजपुतांनी आपला जोम पुरविला व मराठ्यांनीही उठावणी केली व अशा तऱ्हेने महंमदी आक्रमणास त्यांनी तोंड दिलें. पण महंमदी आक्रमणापेक्षा या नवीन पाश्चात्य आक्रमणाचें स्वरूप किती अजीबात निराळें व केवढें विषारी आहे हें लक्षांत येण्यापूर्वीच राजपूत व मराठे यांचा जोम खलास झाला होता व त्यांच्यांत नवीन सकस पीक येण्याचें बंद झालें होतें. त्यांची उत्पादनक्षमता क्षीण झाली होती. त्यांच्यांतील कांही कांही व्यक्तींना या नवीन आक्रमणाचें स्वरूप समजलेंही असेल. पण एकंदर हिंदु जातीचा सार्वत्रिक जोम इतक्या झपाट्याने उतरणीस लागला होता की तो सावरून धरण्याचें व नवीन आक्रमणास तोंड देण्याचें कार्य एकदोघा व्यक्तींच्या हातून होणें शक्य नव्हतें. त्यांचें पूर्ण पतन अनिवार्य होतें.

शंभर वर्षे या नवीन आक्रमणाची जादू पुरली. पण आता हिंदी लोकांच्या दृष्टीवरील भ्रमपटल दूर होत असून नवीन आक्रमणाचें स्वरूप त्यांना विशद होऊं लागलें आहे व विसाव्या शतकाच्या ह्या पूर्वार्धांत आपल्या मुक्ततेचे प्रयत्न त्यांनी सुरू केले आहेत. महंमदी आक्रमणापासून पछीत पडलेल्या भारतीय जातींच्या ठिकाणीं आता नव्या जोमाचा संचार होण्यास प्रारंभ झाला आहे व त्यामुळे भारताच्या उत्थानकाळाचे दिवस आता जवळ येत चालल्याचें वाटूं लागलें आहे. भारतवर्षाच्या क्षितिजावर स्वातंत्र्यसूर्याचा उदय होत असतांना त्यास मंगल अर्घ्य देण्याची भारतीय जाती शीघ्र तयारी करोत, अशी आशा प्रकट करून हें प्रकरण व पुस्तक दोहोंनाही पूर्णविराम देतों.

समाप्त

आधारभूत ग्रंथ

१. म. म. रा. ब. गौरीशंकर ओझा : राजपूतानेका इतिहास, खंड १, २ व ३.

२. विद्वत्कुलशेखर भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य : मध्ययुगीन भारत, भाग १, २ व ३.

३. रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई : मोगल व मराठी रियासती.

४. कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे : ऐतिहासिक प्रस्तावना.

५. प्रो. इंद्र : मोगल साम्राज्यका इतिहास.

६. प्रो. जगदीशचंद्र गुहिलोत : मारवाड का इतिहास.

७. बाबू पद्मराज जैन : मेवाड गौरव.

8. Col. Todd : *Annals aud antiquities of Rajasthan.*

9. Dr. Balkrisna : *Shivaji the Great.*

10. Vincent Smith : *Early History of India.*

11. Thomson : *History of India.*

12. William Irwine : *Later Mughals.*

13. Sir Arthur Mccaulipp : *the Sikh Gurus and Their Teachings.*

14. B. D. Basu : *Rise of the Christian Power in India.*

15. Indian Antiquary मधील प्रो. देवदत्त भांडारकरांचे लेख.

सूची

492